**( सभापतीस्थानी माननीय उपसभापती )**

पृ. शी. : विदर्भात गेल्या वर्षभरात 1500 च्या वर शेतकऱ्यांच्या झालेल्या आत्महत्या

मु. शी. : विदर्भात गेल्या वर्षभरात 1500 च्या वर शेतकऱ्यांच्या झालेल्या आत्महत्या याबाबत सर्वश्री पांडुरंग फुंडकर, मधुकर सरपोतदार, नितीन गडकरी, दिवाकर रावते, मधुकर चव्हाण, डॉ. दीपक सावंत, सर्वश्री पाशा पटेल, प्रकाश शेंडगे, गोपीकिसन बाजोरिया, डॉ. नीलम गोऱ्हे, श्री. अरविंद सावंत, ॲड. अनिल परब, सर्वश्री विनोद तावडे, जगदिश गुप्ता, केशवराव मानकर, सागर मेघे, सुरेश जेथलिया, परशुराम उपरकर व संजय केळकर, वि. प. स. यांनी उपस्थित केलेली अल्पकालीन चर्चा.

( चर्चा पुढे सुरू.............. )

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांना मी भाषणास सुरुवात करण्याची परवानगी देण्याअगोदर सन्माननीय सदस्या श्रीमती उषा दराडे यांनी माझ्याकडे दोन मिनिटे बोलण्याची परवानगी मागितलेली आहे. ती मी त्यांना देत आहे. त्यानंतर सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी भाषणास सुरूवात करतील.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, राज्यात होत असलेल्या शेतकऱ्यांच्या आत्महत्या या संदर्भातील चर्चेस उत्तर माननीय मुख्यमंत्री किंवा माननीय उपमुख्यमंत्री यांनी द्यावे अशी आमची सुरुवातीपासूनची मागणी आहे.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, या चर्चेवरील उत्तर माननीय मुख्यमंत्र्यांनी द्यावे अशी आम्ही पहिल्या दिवसापासून मागणी करीत आहोत.

**उपसभापती** : मान्य आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषा दराडे ( महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित ) : सभापती महोदय, 'राज्यात शेतकऱ्यांच्या होत असलेल्या आत्महत्या' हा विषय अधिवेशनाच्या पहिल्या दिवसापासून गाजत आहे. युतीच्या सर्व सन्माननीय सदस्यांनी या विषयावर त्यांची मते मांडलेली आहेत. शेतकऱ्यांच्या आत्महत्येच्या संदर्भात माननीय पंतप्रधानांनी काय पॅकेज दिले, महाराष्ट्र राज्याने काय पॅकेज दिले किंवा राज्य सरकार कोणत्या उपाययोजना करीत आहे या संदर्भात मी बोलणार नाही. कारण त्या संदर्भात माननीय मुख्यमंत्री किंवा माननीय उपमुख्यमंत्री यांच्याकडून उत्तराची अपेक्षा केलेली आहे. त्याबाबत काही सांगून मी सभागृहाचा वेळ घेणार नाही.

सभापती महोदय, मला एक गोष्ट सांगावयाची आहे की, राज्यात शेतकऱ्यांच्या आत्महत्या किती झाल्या, किती घटल्या यावर चर्चा न करता शेतकरी आत्महत्या करण्यास प्रवृत्त होणार नाही अशाप्रकारची परिस्थिती निर्माण करणे ही काळाची गरज आहे. आपण सर्वजण समाजाचे घटक आहेत. म्हणून ही जबाबदारी फक्त सरकारची नसून आपल्या सर्वांचीच आहे. यामध्ये सरकारची जबाबदारी निश्चितच आहे.शेतकऱ्यांचे कर्जमाफ करणे हे एक हत्यार आहे, आयुध आहे. शेतकऱ्यांनी आत्महत्या करू नये अशी सुलभ परिस्थिती निर्माण करणे, शेतकऱ्यांचे कर्जमाफ करणे हा एक मार्ग आहे. परंतु शेतकऱ्यांनी स्वत:च्या पायावर सक्षमपणे उभे राहिले पाहिजे अशी परिस्थिती निर्माण करणे फार गरजेचे आहे, जेणेकरून शेतकरी आत्महत्या करण्यास प्रवृत्त होणार नाही.

सभापती महोदय, माननीय केंद्रीय कृषि मंत्री श्री.शरद पवार यांनी 'शेतकऱ्यांनी शेती करू नये' अशा आशयाचा उल्लेख या सभागृहात झाला. त्या संदर्भात मला सांगावयाचे आहे की, माननीय केंद्रीय कृषि मंत्री श्री.शरद पवार यांनी, "शेतकऱ्यांनी शेती करू नये" असा सल्ला दिलेला नाही. जे अल्प भूधारक शेतकरी आहे, ज्यांच्याकडे कोरडवाहू शेतजमीन आहे. ज्यांच्यावर मोठ्या प्रमाणावर कुटुंबाची जबाबदारी आहे, ज्यांची गुजराण करणे कठीण जात आहे अशा शेतकऱ्यांनी शेती बरोबरच अन्य व्यवसाय करावा, लधुउद्योग करावा, नोकरी करावी असा पर्याय सुचविलेला आहे. परंतु याचा उल्लेख न होता. माननीय श्री.शरद पवार यांनी शेतकऱ्यांना शेती करू नये सल्ला दिलेला आहे असे रेकॉर्डवर सांगण्यात आले. तेव्हा माननीय कृषि मंत्री श्री.शरद पवार यांच्या संदर्भात अशाप्रकारची वक्तव्ये करण्यात आली ती रेकॉर्डवर राहू नयेत मी हे सर्व सांगत आहे.



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

AJIT/ MAP/ D/ 10:30

श्रीमती उषा दराडे............

सभापती महोदय, भारत हा कृषि प्रधान देश आहे. देशात 60 टक्के आणि राज्यात 80 टक्के लोक शेती करतात. माननीय कृषि मंत्री श्री.शरद पवार हे राज्याचे मुख्यमंत्री असताना त्यांनी फळबाग योजनेस सुरुवात करून महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना दिलासा देण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्या संदर्भात प्रचार आणि प्रसार तसेच त्याची अंमजबजावणी करण्यावर भर देणे गरजेचे आहे.

यानंतर श्री.पुरी........

अग्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषा दराडे.....

व त्यासाठी शासनाने विशेष प्रयत्न करणे गरजेचे आहे. आमच्याकडे कमी पाण्यांमध्ये पीक घेतले जाते. आमच्याकडील एका शेतकऱ्याने 10 एकरांमध्ये सिताफळाचे पीक घेतले असून त्या पिकांस बाजरी पिकांपेक्षाही कमी पाणी लागते. त्या पिकांस जुलै महिन्यांपासून डिसेंबर महिन्यांपर्यंत पाणी दिले जाते. ठिबक सिंचनावर ही शेती केली जाते. यासंदर्भात ठिबक सिंचन व स्प्रिंकलसाठी 100 टक्के अनुदान शासनाने शेतकऱ्यांना देऊन त्यांना दिलासा देण्याचा प्रयत्न करावा. शेती व्यवसायातील महिलांचा सहभाग व त्यांचे सक्षमीकरण करण्याच्या दृष्टीने महिला बचतगटांकडे अधीक लक्ष देण्याची गरज आहे. आज देशातील महिला कृषि क्षेत्रामध्ये पुढे येत आहेत, त्यामुळे महिला शेती व्यवसायाशी निकडित होण्याच्या दृष्टीने त्यांना वैज्ञानिक दृष्टीने प्रशिक्षण देण्याची आवश्यकता असून त्यांच्या क्रयशक्तीस ताकद देण्याची आवश्यकता आहे. तसेच महिलांच्या श्रमाला प्रतिष्ठा मिळण्याच्या दृष्टीने महिला बचतगटांना तसेच शेती उद्योगाशी संबंधित असलेल्या योजनांना विशेष प्राधान्य दिले पाहिजे. महिलांच्या शेतीतील सहभागास मान्यता देऊन त्यांच्या शेतीमधील श्रमालाही प्रतिष्ठा देणे आवश्यक आहे. त्यासाठी महिलांच्या दृष्टीने कुक्कुटपालन, दुधाचे नवीन उद्योग अशा योजनांतून त्यांच्यासाठी उद्योग निर्माण करुन दिले पाहिजेत. मी याठिकाणी शासनाचे अभिनंदन करेन की, त्यांनी विदर्भातील 6 जिल्हयांमध्ये 50 हजार महिला बचतगट निर्माण करुन येथील शेतकऱ्यांना दिलासा देण्याचा प्रयत्न केलेला आहे. महिलांचे शेती उद्योगाशी निगडित जे गट आहेत, ते सक्षम होण्याच्या दृष्टीने, त्यांच्या मालास मार्केट मिळण्याच्या दृष्टीने त्यांना या क्षेत्रामध्ये प्रशिक्षण देण्याची आवश्यकता असून या सर्व बाबींचा सरकारने विचार करावा, अशी माझी याप्रसंगी विनंती आहे. आज अर्थव्यवस्थेच्या माध्यमातून आपल्याला जगाच्या बाजारपेठेशी तुलना करावी लागणार आहे. ज्यावेळी केंद्रामध्ये युतीचे शासन होते त्यावेळी 16 हजार कोटी रुपयांचा तोटा होईल अशापध्दतीने गहू, तांदुळाचे व्यवस्थापनाचे धोरण त्याहीवेळी घेण्यात आले,. त्यावेळी त्याही शासनाकडून काही चुका झाल्या व आत्ताच्याही शासनाकडून थोडया फारप्रमाणात चुका झालेल्या आहेत. परंतु यासंदर्भात आपण एकमेकांच्या खांदयावर बंदुका न ठेवता, हा प्रश्न आपण सर्वसमावेशकपणे मार्गी लावला पाहिजे. या विषयावर बोलण्यासारखे खूप आहे. परंतु वेळ कमी असल्यामुळे मला बोलता येणार नाही. महिलांचा ग्रामस्वच्छतेतील सहभाग, ग्रामसभेतील सहभाग, दारुबंदीतील सहभाग किंवा शेती उद्यागातील नवीन प्रोडक्टसंबंधातील सहभाग या सर्व

..2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषा दराडे.....

विषायांमधील महिलांचा जो सहभाग आहे त्यासाठी कृषि क्षेत्रामध्ये महिलांना प्राधान्य देऊन त्यांना चांगल्याप्रकारे प्रशिक्षण देण्याची आवश्यकता असून त्यांना त्याप्रमाणे संधी द्यावी, अशी माझी विनंती आहे. शासनाने महिलांच्या शेतीतील सहभागाच्या दृष्टीने जास्तीत जास्त प्रयत्न करुन त्यांना जास्तीत जास्त मदत उपलब्ध करुन द्यावी, अशी माझी विनंती आहे व यापुढे राज्यामध्ये शेतकऱ्यांच्या आत्महत्या होऊ नयेत, या दृष्टीनेही प्रयत्न व्हावेत, अशी विनंती करुन मी माझे दोन शब्द पूर्ण करते.

धन्यवाद !

---------

**उपसभापती** : माझी सभागृहाला विनंती आहे की, आपण सदर प्रस्तावावरील चर्चा दुपारी 12.00 पर्यंत पूर्ण करुया व त्यानंतर या प्रस्तावावरील उत्तरास सुरुवात करुया.

श्री.मधुकर सरपोतदार : ज्यावेळी या प्रस्तावावरील चर्चेस सुरुवात झाली त्यावेळी माननीय सभापतींनी सांगितले होते की, या विषयावर बोलण्यासाठी वेळेची मर्यादा नाही. परंतु हा प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने सन्माननीय सदस्यांनी मुद्दे मांडावेत, विस्ताराने भाषण करु नये. त्यांच्या या मताशी मी सहमत असून आपण फक्त मुद्दे मांडण्याचा प्रयत्न करु. त्यासाठी आपण वेळेचे बंधन घालू नये.

**उपसभापती** : ठीक आहे. आता सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी आपल्या भाषणांस सुरुवात करावी.

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी (नागपूर विभाग पदवीधर) : सभापती महोदय, महाराष्ट्रातील अतिशय महत्वाच्या विषयावर सभागृहामध्ये चर्चा होत आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्येचा संबंध, त्यांच्या जातीशी, पंथाशी किंवा भाषेशी येत नाही तर शेतकऱ्यांच्या आत्महत्येचा संबंध हा सरकारच्या चुकीच्या आर्थिक धोरणांशी आहे.

नंतर श्री.रोझेकर......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी........

ही चुकीची धोरणे सुधारण्याकरीता सरकारमध्ये जी इच्छाशक्ती पाहिजे त्याचा अभाव, हेच खरे म्हणजे या समस्येचे मूळ आहे. मला प्रश्न पडतो की, गुजराथ राज्यामध्ये त्या ठिकाणी कापूस उत्पादक शेतकरी मोठया प्रमाणावर आहे, सौराष्ट्रामध्ये मुख्य पीक हे कापूस आहे, सिंचनाच्या सुविधा आपल्या तुलनेने कमी आहेत, पण 80 टक्के कापूस चीनमध्ये निर्यात होतो आणि तेथील एकही शेतकरी आत्महत्या करीत नाही. विदर्भामध्ये मात्र शेतकरी आत्महत्या का करतात याचे कारण गंभीरतेने शोधण्याचा सरकारने कधी प्रयत्नच केला नाही. शेतीबाबत धोरण आहे, त्या धोरणामध्ये केंद्र सरकारचे धोरण आहे, राज्य सरकारचे धोरण आहे, या दोन्ही धोरणांच्या बद्दलची परिस्थिती अतिशय चिंताजनक आहे. सन्माननीय सदस्या श्रीमती उषाताई दराडे म्हणाल्या की, पवार साहेबांनी शेती करु नये, असे सांगितलेले नाही, त्यांच्या वक्तव्याचा विपर्यास केला गेला आहे. सन्माननीय ज्येष्ठ नेते व कृषिमंत्री श्री.शरद पवार हे शेती करु नये, असे म्हणाले असे मीही म्हणणार नाही. किंबहुना मी असे मानणा-यांपैकी आहे की, ज्यांना शेतीमधील समजते असे बोटावर मोजण्याएवढे राज्यकर्त्ये आहेत त्यापैकी पवारसाहेब हे एक आहेत. परंतु, ते मंत्री नसतांना बोलतात आणि जो त्यांचा अनुभव आहे त्याच्या नेमकी उलट अंमलबजावणी कृषिमंत्री असतांना होत आहे. 'शेतक-यांचा जाणता राजा', 'शेतक-यांचा मसिहा' अशाप्रकारच्या उपाध्या राष्ट्रवादी काँग्रेसने त्यांच्यामागे लावल्या परंतु केंद्र सरकारने म्हणजे स्वत: पवारसाहेबांनी अपॉईंट केलेल्या स्वामीनाथन समितीच्या रिपोर्टची अंमलबजावणी केंद्र सरकारकडून झाली नाही. अमेरिकेमध्ये कापूस उत्पादक शेतकरी आहे, त्यांना 30 टक्के सबसिडी मिळते. अमेरिकी कापूस भारतीय उद्योजकांनी घेतला तर सहा महिन्यांच्या उधारीवर त्याना तो विकत मिळतो. म्हणजे कापसापासून सूत, सुतापासून कापड आणि कापडापासून रेडिमेड गारमेंट तयार झाले आणि तो माल विकल्यावर सहा महिन्यानंतर उद्योजकांना पैसे रिलिज झाले की, पैसे परत द्यायचे. म्हणजे तेथे शून्य टक्क्यांनी कापूस मिळणार. स्वामीनाथन समितीने शिफारस केली की, कापसावर साठ टक्के इम्पोर्ट डयुटी लावा, पण ही डयुटी आज दहा टक्के आहे. स्वामीनाथन साहेबांसारख्या माणसाने केंद्र सरकारला विनंती केली की, तुम्ही कापसावरची डयुटी साठ टक्के करा पण त्याची अंमलबजावणी होत नाही, हा खरा प्रश्न आहे.

..2.........



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी........

सभापती महोदय, चीनच्या अर्थव्यवस्थेचे गुणगान नेहमी होत असते. तेथील शेतक-यांना शून्य टक्के व्याजादराने कर्ज पुरवठा होतो. चीनची इकॉनॉमी आणि आपल्या इकॉनॉमीमध्ये स्पर्धा आहे. विदर्भामधील शेतक-यांची काय स्थिती आहे ? मला हे सांगायला लाज वाटते, सन्माननीय सदस्या श्रीमती उषाताई दराडे आपणच मला उत्तर द्या की, सन्माननीय कृषिमंत्री श्री.शरद पवार साहेब कृषिमंत्री असतांना, या देशात, या राज्यात त्यांचे सरकार असतांना, शेतक-यांच्या मतावर निवडून आले असतांना, मर्सिडिज गाडी विकत घ्यावयाची असेल तर साडेसात टक्के कर आणि ट्रॅक्टर विकत घ्यायचा असेल तर तेरा टक्के कर, हा शेतक-यांच्या हिताचा निर्णय आहे ? भारतातील शेतक-यांच्या गव्हाला आपण साडेआठ रुपये किलो दर देतो आणि विदेशातील कुजका, सडका गहू, माणसाने खाण्याकरीता अयोग्य असे सर्टिफिकेट ज्या गव्हाला मिळाले आहे तो गहू, हे सर्टिफिकेट शिवसेना किंवा भारतीय जनता पक्षाने दिलेले नाही तर गहू आयात केला पवारसाहेबांनी, वितरण केले अन्न व नागरी पुरवठा मंत्री श्री.सुनिल तटकरे यांनी, तपासणीसाठी पाठविला श्री.सुनिल तटकरे यांनी, तपासला, अन्न व औषध प्रशासन मंत्री श्री.मनोहर नाईक व सार्वजनिक आरोग्य मंत्री श्रीमती विमल मुंदडा यांनी आणि रिपोर्ट आला की, हा गहू माणसांच्या खाण्याच्या योग्यतेचा नाही एवढेच नव्हे तर गुरांनी खाण्याच्या योग्यतेचाही नाही. हे शेतक-यांच्या जाणता राज्याचे काम आहे ?

सभापती महोदय, आज सन्माननीय मंत्री श्री.पतंगराव कदम सभागृहात नाहीत. त्यांनी काय घोषणा केली ? 1 जूनपासून महाराष्ट्रामध्ये सर्व शेतक-यांना सहा टक्के दराने कर्ज पुरवठा होईल. ते खूप घोषणा करतात. मला सांगा कोणत्या जिल्हयात सहा टक्के दराने कर्ज पुरवठा झाला ?

**उपसभापती** : 1 जून ही तारीख घोषित केली आहे, साल कोणते ?

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, सन्माननीय मंत्र्यांनी सालही घोषित केले आहे. या वर्षाच्या 1 जूनपासून सहा टक्के दराने कर्ज पुरवठा करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले होते. सन्माननीय सहकार राज्यमंत्री श्री.जयप्रकाश दांडेगावकर हे या ठिकाणी उपस्थित आहेत. त्यांनी आम्हाला सांगावे की कोणत्या जिल्हयात सहा टक्के दराने कर्ज पुरवठा झाला ? हे सरकार हतबल झाले आहे.

यानंतर श्री.बोरले..........

अप्रकाशित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी ........

ते उत्तर देऊ शकत नाहीत. महाराष्ट्रात सहकार चळवळ आली, ही गोष्ट चांगली आहे. परंतु ही सहकार चळवळ शेतक-यांचे शोषण करणारी ठरली आहे. बिहारमधील शेतक-यांना राष्ट्रीयकृत बँकेतून 8 टक्के दराने कर्ज पुरवठा होतो आणि तुमच्या सहकारी बँकांतून शेतक-यांना 12 ते 13 टक्के दराने कर्ज पुरवठा होतो. नाबार्डकडून 5 टक्के दराने कर्ज मिळाल्यानंतर राज्य सहकारी बँक 3 टक्के कमिशन घेते, जिल्हा सहकारी बँक 3 टक्के कमिशन घेते आणि सेवा सहकारी सोसायटी 3 टक्के कमिशन घेते आणि त्यानंतर शेतक-यांना 13 ते 14 टक्के दराने कर्ज पुरवठा होतो. मला सांगतांना लाज वाटते की, आता तुमचे नाव बदलले पाहिजे, तुमचे नाव शायलॉग ठेवले पाहिजे. तुमच्या इतके क्रूर सावकार कोणीही नाहीत. दर वेळी कर्जातील 10 टक्के रक्कम शेअर कॅपीटल म्हणून कापून घेतली जाते. जिल्हा बँकांनी, भू-विकास बँकांनी गरीब शेतक-यांचे 5 हजार कोटी रुपये शेअर कॅपीटल म्हणून कापून घेतले. ही शेअर कॅपीटलची रक्कम बँकांकडे जमा आहे. तरीही शेतक-यांना 13 टक्के दराने कर्ज दिले जाते, हा कोठला न्याय आहे ? तुम्ही सहकारात भ्रष्टाचार करायचा आणि बँका लुटायच्या. मी उस्मानाबाद बँकेचे भ्रष्टाचाराचे प्रकरण बाहेर काढले. श्री.पवनराजे यांचे पुतणे येथे उपस्थित आहेत. उस्मानाबाद बँकेत 180 कोटी रुपयांचा घोटाळा झ ाला. हवेत शेती झाली हो. ट्रॅक्टर कोठून आणले आणि शेती कोठे आहे ? परंतु कर्ज पुरवठा मात्र झाला. नांदेड बँकेत 400 कोटी रुपयांचा भ्रष्टाचार झाला. सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील साहेब तुमची बँक शेतकरी कामगार पक्षाची आहे म्हणून चांगली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेसच्या हातात जिल्हा बँक गेली रे गेली की, ते बँक लुटून फस्त केल्याशिवाय राहत नाहीत. श्री.दिलीप देशमुख साहेब लातूरची बँक चांगली आहे. मला राष्ट्रवादी काँग्रेस पेक्षा काँग्रेसचे काम चांगले दिसते. नागपूर जिल्हा बँकेत 150 कोटी रुपयांचा भ्रष्टाचार झाला.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी साहेब काँग्रेसचे काम चांगले आहे, हे छापायचे काय ?

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, हे छापण्यास काही हरकत नाही. राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या तुलनेत कॉंग्रेसचे काम चांगले आहे. कॉंग्रेसवाले पुष्कळ चांगले आहेत. पण बिचारे साधे-भोळे आहेत. राष्ट्रवादी कॉंग्रेस ही चतूर लोकांची गॅंग आहे. राज्यात विजेची टंचाई आहे, अशी ते भाषणे देतात आणि सर्व पाप माननीय श्री.विलासराव देशमुख यांच्यावर टाकतात. शेतकरी आत्महत्या करतात, त्याला कॉंग्रेस जबाबदार आहे. हे बिचारे भोळेभाबडे मंत्री आहेत. त्यांना यातले काही कळत नाही, ते आपापसातच भांडतात आणि राष्ट्रवादीवाले त्याचे डमरु वाजवतात. सभापती महोदय, सर्व आरोप कॉंग्रेसवर केले जातात. जे वाईट होईल ते कॉंग्रेसमुळे आणि जे चांगले आहे तेवढे फक्त राष्ट्रवादीमुळे. हे बिचारे काही बोलतच नाहीत. राष्ट्रवादीवाले मात्र एकाहून एक हुषार मंत्री आहेत. सभापती महोदय, काय स्थिती आहे. शेतक-यांना 6 टक्के दराने कर्ज पुरवठा होत नाही. मी किती तरी वेळा सभागृहामध्ये बोललो की, नाबार्ड राज्य सहकारी बॅंकेला 5 टक्के दराने पैसे उपलब्ध करुन देते. राज्य सहकारी बॅंकेने एक टक्के व्याज घ्यावे, जिल्हा बॅंकेने एक टक्के घ्यावे आणि सहकारी बॅंकेने अर्धा टक्के व्याज घेऊन शेतक-यांना कमीत कमी साडेसात टक्के दराने तरी कर्ज पुरवठा करावा. तुम्ही असे का करीत नाहीत. कारण तुम्हाला तसे करायचे नाही. नागपूर जिल्हा बॅंकेत 150 कोटींचा भ्रष्टाचार करणारे आज लोकप्रतिनिधी म्हणून फिरत आहेत. त्यांच्यावर मात्र कारवाई होत नाही. त्यांनी बॅंक लुटली. नागपूर जिल्हा बॅंकेतून शेतक-यांना कर्ज मिळाले नाही. उस्मानाबाद, नांदेड, यवतमाळ बॅंकेत घोटाळे झाले. कोल्हापूरच्या बॅंकेत घोटाळा झाला. लक्ष्मी दर्शन, एक कलमी कार्यक्रम. मग का शेतकरी आत्महत्या करणार नाहीत ? बॅंकेच्या अधिका-यांनी कर्जदाराकडून कर्जाची वसुली कशी केली, हे सांगतांना मला लाज वाटते. भू-विकास बॅंकेचे कर्मचारी आपला पगार काढण्यासाठी लुटेरे आहेत, दरोडेखोर आहेत. भू-विकास बॅंकेतील एक प्रकरण माझ्याकडे आहे. श्री.पुरुषोत्तम गुजर, रा.तिगाव, जिल्हा वर्धा यांनी दिनांक 10/08/2007 भू-विकास बॅंकेकडून ट्रॅक्टर खरेदी करण्यासाठी 3 लाख 42 हजार रुपयांचे कर्ज घेतले. भू-विकास बॅंकेने कर्जाच्या व्याजापोटी त्यांच्याकडून 6 लाख 95 हजार 625 रुपये वसूल केले. श्री.जयप्रकाश दांडेगावकर साहेब आपण लक्षपूर्वक ऐका. तुमच्या सहकार खात्यामध्ये इतकी वाईट स्थिती आहे की, तुमच्या ऐवजी आणि डॉ.पंतगराव कदम यांच्या ऐवजी दुसरा कोणी संवेदनशील मंत्री असता तर त्याने आत्महत्या केली असती. हे किती वाईट आहे ?

यानंतर कु.जयश्री........

अमुद्रित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी......

सदर बँकेकडून मुद्दलापोटी अनुक्रमे 80,374 रुपये आणि 7,05,999 रुपये रक्कम त्या गरीब शेतक-यांकडून वसूल करण्यात आली. एवढेच नाही तर नंतर त्या ट्रॅक्टरचा लिलाव करुन 1,28,000 रुपयांची रक्कमही बँकेकडून वसूल करण्यात आली. त्यामुळे आता त्या गरीब शेतक-याने त्याच्याजवळ असलेली 10 एकर जमीन सुध्दा विकून टाकली. काय परिस्थिती आहे? अशा एकूण 100 केसेस मी सभागृहामध्ये सादर करु शकतो. विभागीय बँकांच्या धोरणाप्रमाणे मी सांगतो की, या उद्योगपतींना आणि व्यापा-यांना किती सवलत मिळते ? त्यांना व्याज माफ, पेनॉल्टी माफ आणि मूळ मुद्दलाच्या 22 टक्के रकमेवरील व्याज माफ, म्हणजे जर 10 कोटी कर्ज असेल तर फक्त 8 कोटी रुपयांवरील व्याज त्यांना भरावे लागते. व्यापा-यांना मूळ मुद्दलाच्या 22 टक्के रकमेवरील व्याज ओ.टी.एस.च्या सवलतीचा फायदा देऊन बँकांकडून माफ केले जाते. माझ्याकडे असलेल्या अनेक उदाहरणांपैकी एका उदाहरणामध्ये तर एका व्यापा-याला त्याचे 1500 कोटी रुपयांचे कर्ज 750 कोटी रुपये करुन मिळाले आणि येथे ट्रॅक्टरच्या कर्जासाठी भू-विकास बँकामध्ये अर्ज केलेल्या शेतक-याला आज बँक लूटत आहे, यापेक्षा दरोडेखोर तरी चांगले. सहकार चळवळीतून उभ्या राहिलेल्या भू-विकास बँकांनी शेतक-यांना सहकार्य करणे बंद केले. तुम्ही भ्रष्टाचार करावयाचा, बँका लुटावयाच्या आणि बँकेचे लुटलेले पैसे वसूल करण्यासाठी गरीब शेतक-यांचे रक्त शोषावयाचे, हा कुठला न्याय आहे ? आज जिल्हा सहकारी बँकांची सुध्दा तीच परिस्थिती आहे. महाराष्ट्रातील जिल्हा सहकारी बँका शासनाला टिकवावयाच्या आहेत, जगवावयाच्या आहेत तर मग त्या बँका अशा प्रकारे शेतक-यांच्या अंगातील रक्त शोषून टिकवावयाच्या आहेत का ? सन्माननीय सदस्य श्री.दिलीपराव सोनावणे यांना मी सांगू इच्छितो की, मी मघाशी म्हटले ते कसे बरोबर आहे, हे मी आता सांगू इच्छितो. महाराष्ट्रामध्ये माननीय प्रधानमंत्री आले, त्यांनी 3,750 कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर केले. या पॅकेजमधील एकूण 3,270 कोटी रुपये बँकांनी लुटले. यवतमाळ जिल्हा सहकारी बँक, वर्धा जिल्हा सहकारी बँक, अमरावती जिल्हा सहकारी बँक, अकोला जिल्हा सहकारी बँक, बुलढाणा जिल्हा सहकारी बँक ,वाशिम जिल्हा सहकारी बँक ठीक आहे यात एक वाशिम जिल्हा सहकारी बँक स्वतंत्र बँक नसून ती अकोला जिल्हा बँकेची शाखा आहे. या सर्व जिल्हा सहकारी बँका राष्ट्रवादी या पक्षाच्याच आहेत.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी ....

माननीय मुख्यमंत्री श्री.विलासराव देशमुखजी आज आपल्याला सभागृहामध्ये येण्यास थोडासा उशीर झाला कारण आता मी येथे सांगत होतो की, राष्ट्रवादी पक्ष कसा तुमच्यावर मात करीत आहे ते, या पॅकेजपैकी एकूण 3,270 कोटी रुपये जिल्हा सहकारी बँकांना देण्यात येऊन राष्ट्रवादी पक्षाच्या एकूण पाच जिल्हा सहकारी बँका पुनरुज्जीवित करण्यात आल्या आहेत. अशा प्रकारे माननीय प्रधानमंत्र्यांनी जाहीर केलेल्या पॅकेजचा सगळा फायदा या बँकांनी लाटला. बिचा-या प्रधानमंत्र्यांनी चांगल्या भावनेने पॅकेजच्या स्वरुपात पैसे दिले होते. माननीय मुख्यमंत्रीजी आपण नेहमीसारखा भोळेपणाने आपल्या सहका-यांवर विश्वास ठेवला परंतु राष्ट्रवादीचे मंत्री हे सहकारी म्हणून विश्वास ठेवण्याच्या पात्रतेचे नाहीत. माननीय प्रधानमंत्र्यांनी जाहीर केलेल्या 3,750 कोटी रुपयांच्या पॅकेजपैकी एकूण 3,250 रुपये तर सहकारी बँकांनी लाटले. पॅकेजपैकी फक्त 477 कोटी रुपये शेतक-यांसाठी शिल्लक राहिले. "अंधेरी रातमे, दिया मेरे हातमे" माननीय प्रधानमंत्र्यांनी शेतक-यांकरिता पॅकेज जाहीर केले, असा पॅकेजचा गवगवा झाला परंतु या पॅकेजमधून उपरोल्लेखित पाचही सहकारी बँकांचाच जास्त फायदा झाला आणि त्यांची व्हायेबिलिटी दुरुस्त होऊन गेली. याऐवजी जर आपण असे केले असते आणि रिझर्व्ह बँकेच्या आणि नाबार्ड बँकेच्या धोरणाप्रमाणे राज्यातील शेतक-यांना कर्जाच्या विळख्यातून मुक्त करण्यासाठी त्यांना कर्जमुक्त केले असते तर या 3,270 कोटी रुपयांमध्ये महाराष्ट्रातील अनेक शेतकरी कर्जाच्या जोखडातून मुक्त झाले असते. शेतक-यांनी कर्ज फेडता आले नाही म्हणून त्या कर्जावरील व्याज वाढले बँकांच्या बॅलन्स शीट्स बिघडल्या आणि म्हणून जिल्हा बँकांनी अशा प्रकारे शेतक-यांचे रक्त शोषून त्यांच्याकडून वसूल केला. खरे तर या पॅकेजमधील 477 कोटी रुपयांपैकी किती रुपये शेतक-यांपर्यंत, फायद्याच्या स्वरुपात पोहोचले ? माननीय मुख्यमंत्रीजी आपण आज सभागृहात उपस्थित आहात, मला सांगा की, किती शेतक-यांना खरोखरच पॅकेजचा बेनिफिट झाला ? आज पाच हजार कोटी रुपये तुमच्याजवळ आहेत भू-विकास बँकांचे, जिल्हा सहकारी बँकांचे, सेवा सहकारी बँकांची शेतक-यांना कर्ज वितरित करण्याची पध्दत आपल्याला माहीत आहे की, एकूण कर्जाच्या 10 टक्के रक्कम बँक कापून मग शेतक-यांना कर्ज देते आणि व्याजाचा दर मात्र शेअर्सची जी रक्कम कपात

....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी .....

केलेली असते त्या एकूण रकमेवर 13 ते 14 टक्के एवढा लावला जातो. हा तर दुष्काळात तेरावा महिना झाला. आपल्या सहकारी बँका टिकवावयाच्या असतील तर टिकवा, जगवावयाच्या असतील तर जगवा, पण बिचा-या शेतक-याच्या अंगात रक्त नाही त्याचे शोषण करुन का टिकविता ?

यानंतर श्री.गागरे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PNG/ D/ MAP/ पूर्वी कु.खर्चे 10:55

श्री.नितीन गडकरी .....

भूविकास बँकेबाबत ऑर्डर काढल्या आहेत. अशा प्रकारे शेतकऱ्यांच्या सुमारे 100 केसेस आहेत. बँकेने 10 हजार रुपयांच्या कर्जावर 70 हजार रुपयाची वसूली केली आहे. आपण नियम केलेला आहे की, शेतकऱ्यांच्या पीक कर्जाकरिता जेवढे मुद्दल असेल तेवढयाच रकमेचे व्याज देता येईल. त्यापेक्षा जास्त रक्कम देता येत नाही. याबाबत आपण चौकशी करावी की, किती सहकारी सोसायटया, सहकारी बँका, भूविकास बँकांनी यांनी या नियमाप्रमाणे काम केले आहे ? आपण कायदा केल्यानंतरही अशी परिस्थिती आहे की, आजही शेतकऱ्यांचे मोठया प्रमाणावर शोषण सुरु आहे. भूविकास बँक, राज्य सहकारी बँक, जिल्हा सहकारी बँक, सेवा सहकारी सोसायटीचे मालक कोण आहेत ? शासन एका फटकाऱ्यात सर्व बरखास्त करु शकते. परंतु ही गोष्ट वेगळी आहे. येथे नाव तुमचे आहे परंतु राज्य दुसऱ्यांचे आहे. ते म्हणतीत तो निर्णय होतो. कोणाला कारखाना किंवा रक्कम द्यायची हे ठरवितात. सभागृहात उपस्थित असलेले माननीय सदस्य श्री.दिलीपराव देशमुख हे त्यांचे संचालक आहेत. मी त्यांना विचारु इच्छितो की, तेथे तुमचे काही चालते का ? तुमचे तेथे काही चालत नाही. मला नम्रपणे सांगावे वाटते, तुम्ही माझ्या मताशी सहमत राहून खुलासा करावा. माननीय मुख्यमंत्री सांगतील ते तेथे होत नाही. कारण सर्व राष्ट्रवादी पक्षातील लोक तेथे काम करीत आहेत. काँग्रेस पक्षातील बिचाऱ्यांना याचे काही घेणे नाही, आपसातील भांडणात ते गुंतले आहेत. त्यामुळे या सर्व बँकामधील निर्णय त्यांना पाहिजे तसे करतात. मग आपल्याला बॅलन्सशीटमध्ये एवढा फायदा झाल्याचे दाखवितात. पण फायदा कशातून झाला हे दाखविले पाहिजे. एक लहान नियम सरकारने करावा. "नाबार्डकडून घेतलेल्या कर्जावर 2 किंवा 3 टक्क्यापेक्षा जास्त रक्कम घेता येणार नाही". यामुळे आता तरी शेतकऱ्यांना दिलासा मिळेल. केंद्र सरकारच्या आर्थिक धोरणानुसार रिझर्व्ह बँकेने व्यापारी व उद्योग क्षेत्रामध्ये ज्या प्रकारे यु.टी.एस. केलेले आहे. त्याप्रमाणे जिल्हा सहकारी बँका, सहकारी बँका, सोसायटया, भूविकास बँका, राज्य सहकारी बँक, अर्बन को-ऑपरेटीव्ह बँकामध्ये असणारे कर्ज, क्रेडीट सोसायटीचे कर्ज यांना हा नियम लागू करा. डिफॉल्टेशन दोन प्रकारचे असते. एक बोनाफाईड व दुसरे मॅलाफाईड. मॅलाफाईड डिफॉल्टेशन असेल तर त्यावर कृपा करुन नका. परंतु बोनाफाईड असेल तर त्यांना बरबाद का करता ?. या सर्व बँकाचे नियम तुम्ही बनविता. या बँकांचे संचालक नियुक्त करण्याचा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PNG/ D/ MAP/

श्री.नितीन गडकरी .....

अधिकार तुम्हाला आहे. तसेच या बँकांचे धोरण ठरविण्याचा अधिकार तुम्हाला आहे. हया बँका बरखास्त करण्याचा अधिकार तुम्हाला आहे. या बँकेचे खरे मालक आपण आहात. माननीय मुख्यमंत्री महोदय, आपण या बँकांचे मालक आहात. दुसरे मालक उपमुख्यमंत्री महोदय आहेत. तुमच्या छत्राखाली सर्व अत्याचार अनेक वर्षांपासून सुरु आहे. मग खरे सावकार कोण आहेत ?. महाराष्ट्रातील शेतकरी आत्महत्या करीत आहेत. त्यांचे कारण खरे सावकार माननीय मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री आहेत. म्हणून त्यांनी विदर्भातील शेतकऱ्यांवर आवळलेला पाश मोकळा करावा. त्यांना कर्जमुक्त करावे याकरिता हा प्रस्ताव दिला आहे.

सभापती महोदय, आता महाराष्ट्रामध्येही एस.ई.झेड. सुरु होत आहे. मला हे कळत नाही की, ज्या भागात औद्योगिक विकास झालेला आहे, तेथेच एस.ई.झेड.का होत आहे. मी माननीय मुख्यमंत्री यांना प्रश्न विचारु इच्छितो की, या विदर्भातील कापूस उत्पादक क्षेत्रामध्ये एखाद्या तालुक्यात जेथे कापूस पिकतो तेथे कापसापासून सूत, सुतापासून कापड व रेडीमेड गारमेंटस हा उद्योग एस.ई.झेड. मध्ये आपण का सुरु करीत नाही ? तुम्ही मुंबई पुण्यामध्ये इंडस्ट्रीयल विकासासाठी एस.ई.झेड. आणत असाल तर विदर्भ व मराठवाडयाचा औद्योगिक अनुशेष कसा भरला जाईल हे मला सांगा. मी नेहमी म्हणतो की, विदर्भ मराठवाडा व कोकणात आम्हाला सवलती नको आहेत. तुम्ही एकच काम करा. मुंबई व पुण्याच्या अडीचशे किलोमीटर परीघामध्ये उद्योगांना ज्या सवलती देत आहात त्या बंद करा म्हणजे मग आमच्याकडे इंडस्ट्रीज येतील. आज उद्योगाचा एक नवीन असमतोल तयार होत आहे. यामध्ये 100 टक्के एक्सपोर्ट ओरीऐंटेशन नाही. परंतु माझी तुम्हाला विनंती आहे की, शासनाने पुढाकार घ्यावा आणि विदर्भातील कापूस उत्पादक क्षेत्रामध्ये एस.ई.झेड. तयार करावा. शेतकऱ्यांच्या कापसावर व्हॅल्यू ॲडीशन झाले पाहिजे याचा विचार करावा व त्यांना सवलती द्याव्यात. परंतु विदर्भात एकही एस.ई.झेड आला नाही. सर्व एस.ई.झेड. मुंबई व पुण्याभोवती आहेत. तेथेच सर्व विकास सुरु आहे, तेथेच रोजगार मिळणार आहे. मग नागपूर, विदर्भ, मराठवाडा व कोकणात रोजगार कोठून मिळणार आहे. परवा मी वर्तमानपत्रात वाचले की, माननीय मुख्यमंत्री महोदयांनी ऑरगॅनिक या कंपनीच्या साडे अकराशे कोटी रुपयाच्या कपडा उद्योगाच्या 10-12 युनीटचे उद्घाटन केल, ही चांगली गोष्ट आहे.

नंतर कु.धनश्री.....

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी:माननीय तालिका सभापती श्रीमती उषाताई दराडे )**

श्री. नितीन गडकरी......

ज्या भागामध्ये कापूस पिकत नाही त्या भागामध्ये कारखाने उघडण्यात आले. एखाद्या ठिकाणी यास अपवाद असेल. ऊस्मानाबाद जिल्हयामध्ये किती कापूस पिकतो हे मला माहीत नाही. परंतु काही उद्योगांना जास्त सवलती देऊन 1100 कोटी रुपयांची गुंतवणूक यवतमाळ, अकोला, वर्धा या जिल्हयामध्ये आणली असती तर फार बरे झाले असते. संपूर्ण भारतामध्ये यवतमाळ जिल्हयामध्ये मोठया प्रमाणात ऑरगॅनिक कापसाचे उत्पादन होते. हा कापूस जर्मनीमध्ये निर्यात केला जातो. मग सूतगिरणी सुरु करण्याकरिता यवतमाळ हा जिल्हा का निवडण्यात आला नाही ? वर्धा जिल्हा का निवडण्यात आला नाही ? जिथे कापूस पिकत नाही असे जिल्हे सूतगिरणी सुरु करण्यासाठी का निवडण्यात आले ?

विदर्भातील व मराठवाडयातील शेतकऱ्याकडून तीन टक्के पैसे कापले. त्यातील काही पैसे आता सन्माननीय श्री. हर्षवर्धन पाटील परत करणार आहेत. कापसावर प्रक्रीया करणाऱ्या उद्योगांकरिता तीन टक्के पैसे शेतकऱ्यांकडून घेतले. या पैशातून पश्चिम महाराष्ट्रामध्ये अनेक गिरण्या उभ्या राहिल्या. विदर्भातील, मराठवाडयातील शेतकऱ्यांचे पैसे कापले व पश्चिम महाराष्ट्रामध्ये सूतगिरण्या सुरु करण्यात आल्या. इचलकरंजी, सांगली, कोल्हापूर या जिल्हयांमध्ये नवीन कारखाने उभे राहिले त्याचा विदर्भातील शेतकऱ्याला कायउपयोग होणार आहे ? आमच्या विदर्भामध्ये सूतगिरण्या सुरु झाल्याच नाही. काही सूतगिरण्या सुरु झाल्या परंतु त्या लोकांनी बंद पाडल्या ही वेगळी गोष्ट आहे. या सूतगिरण्या कापूस उत्पादक क्षेत्रामध्ये सुरु करण्यात आल्या असत्या व त्या सूतगिरण्यांचे खाजगीकरण केले असते तर अनेक चांगल्या सूतगिरण्या आपल्याला विदर्भामध्ये सुरु करता आल्या असत्या व आता शेतकऱ्यांवर आत्महत्या करण्याची जी वेळ आली आहे, ती वेळ आली नसती. सूतगिरण्यांच्या पैशाचे वाटप कसे होते, मंत्र्यामध्ये काय संवाद होतात त्यामध्ये पारदर्शकता किती आहे याबद्दल मी काहीही भाष्य करणार नाही कारण यासंदर्भातील वस्तुस्थितीची आपल्याला कल्पना आहेच.

सध्या लक्ष्मीदर्शन कार्यक्रम अतिशय जोरात चालू आहे. लक्ष्मी दर्शन कराओ नही तो काम नही होगा असे म्हटले जाते. मला आठवते यासंदर्भात पूर्वी एकदा मी ज्या वेळी बोललो होतो,

..2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी......

त्यावेळी माननीय उपमुख्यमंत्री श्री. आर.आर. पाटील नाराज झाले होते. ते माझ्यावर खटला दाखल करणार होते. माननीय मंत्री देखील मंत्र्यांचे काम करीत नाहीत. आपण हस्तक्षेप करुन व्हॅल्यू ॲडिशन इंडस्ट्री जर मराठवाडा, विदर्भामध्ये सुरु केल्या असत्या तर याचा जास्तीत जास्त फायदा झाला असता.

मला असे वाटते की, कापसाच्या अर्थकारणाबरोबरच लोडशेडींग हे देखील विदर्भामधील शेतकऱ्यांचे आत्महत्या करण्याचे दुसरे एक कारण आहे. मी आपल्याला सांगू इच्छितो की, मी एक डेअरी व बेकरी सुरु केली होती. त्यावेळी नागपूरपासून काही अंतरावर असणाऱ्या धापेवाडीमध्ये अठरा तास लोडशेडींग सुरु होते. डिझेलवर अठरा तास फॅक्टरी चालवली तर सव्वा ते दीड लाख रुपयांचा तोटा महिन्याला सहन करावा लागत असे. त्यामुळे मी ती डेअरी व बेकरी चालवू शकलो नाही. वीज विदर्भामध्ये 17 ते 18 तास लोडशेडींग सुरु आहे. वीज मंडळामधील अधिकारी श्री. पांडे यांना तर आपण एखादा नोबेल पुरस्कार द्यावा. मी आपणास सांगृ इच्छितो की, 3 हॉर्सपॉवरचा पंप 4 तास चालतो. झाडांना पाणी न देता आल्यामुळे, मी माझ्या शेतातील एक हजार संत्र्याची झ ाडे तोडून टाकली. सन्माननीय मंत्री महोदय, श्री. अनिल देशमुख सन्माननीय सदस्य श्री. गिरीष गांधी यांना याची माहिती आहे. वरुड, मोर्शी, काटोल नरखेड, सावनेर, धापेवाडा याभागात आज काय परिस्थिती आहे ? झाडांना पाणी न देता आल्यामुळे संत्र्याच्या बागा वाळल्या आहेत. 3 हॉर्सपॉवरचा पंप लावून 4 तासामध्ये शेतात पाणी भरता येत नाही म्हणून सरकारच्या लोडशेडींगला कंटाळून शेतकऱ्यांनी 5 हॉर्सपॉवरचे पंप लावले. तर दुष्काळात तेरावा महिना या उक्तीनुसार 5 हॉर्सपॉवरची मोटार वापरणाऱ्या शेतकऱ्यांना चोर ठरविण्यात आले व नवीन स्वाभिमान योजना सुरु करण्यात आली. सरकारची धोरणे चुकीची होती त्यामुळे शेतकऱ्यांना 3 हॉर्सपॉवरच्या पंपाऐवजी 5 हॉर्सपॉवरचा पप लावावा लागला. सरकारने या शेतकऱ्यांना चोर ठरविले. सभापती महोदय, सरकारची धोरणे चुकली, त्यामुळे भार नियमनासारखी अतिशय दुर्दैवी परिस्थिती निर्माण झाली. शेतकऱ्यांना नवीन पंप विकत घेण्याचा खर्च करावा लागला व तरी त्यालाच चोर ठरविण्यात आले. शेतकऱ्यांना सोयाबीनची मळणी करायची असेल तर परवानगी घ्यावी लागते अन्यथा दंड लावला जातो. शासनाने जनतेच्या हिताचे निर्णय घ्यायचे की जनतेला मारण्याचे निर्णय घ्यायचे असतात ?

यानंतर श्री. सुंबरे....

अग्रिम प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/ D/ कु. गायकवाड नंतर -- 11:05

श्री. गडकरी ....

आज विदर्भामध्ये किती पंपाच्या कनेक्शनसाठी वेटींग लिस्टवर आहेत ? ती लिस्ट पूर्ण का होत नाही ? वेटिंग लिस्टवरून शेतकऱ्यांनी वीज कनेक्शनसाठी अर्ज करून, पैसे भरूनही त्यांना वीज कनेक्शन मिळत नाही आणि ज्यांना मिळाले आहे त्यांना 16-18 तास लोडशेडींगला सामोरे जावे लागते आहे. मग शेतकरी आत्महत्या करणार नाहीत तर आणखी काय करणार ? त्यातच वीजेचे दर देखील मोठ्या प्रमाणे वाढत आहेत. तुम्ही कूल केले होते, तुमचे सहकारीच त्यावेळी मुख्यमंत्री होते. तेव्हा कॅबिनेटने देखील निर्णय घेतला होता आणि राष्ट्रवादी तसेच काँग्रेस पक्षाने आपल्या जाहीरनाम्याने आश्वासन दिले होते की, आम्ही सत्तेत आलो तर शेतकऱ्याच्या कापसाला 2700 रूपये भाव देऊ, मोफत वीज देऊ आणि धानाला 1700 रूपये भाव देऊ. त्यामुळेच तुम्हाला शेतकऱ्याने निवडून दिले आणि तुम्हाला सत्तेच्या खुर्चीवर बसविले. तुमच्यातीलच कोणी जाणता राजा केंद्रामध्ये मंत्री झाला, कृषी मंत्री झाला. पण आता तुम्ही म्हणू लागलात की, जाहिरनाम्यामध्ये आश्वासन दिले म्हणजे ते पाळलेच पाहिजे असे नाही. तर तुमच्या प्रदेशाध्यक्षा म्हणल्या की, ती प्रिंटींग मिस्टेक होती. एकूणच काय तर तुम्ही महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना खोटी आश्वासने दिलीत. तुम्ही अशा प्रकारे शेतकऱ्यांची फसवणूक का केली ? त्यांना खोटी आश्वासने का दिलीत ? तुम्ही निवडणुकीच्या तुमच्या जाहिरनाम्यामध्ये शेतकऱ्यांच्या कापसाला 2700 रूपये भाव देऊ म्हणून सांगितले होते की नाही ? कर्जमाफी देऊ म्हणून सांगितले होते की नाही ? हे तुम्ही कबूल केले होते की नाही ? आता तुम्ही 'नाही' म्हणत असाल तर मी आपली क्षमा मागून खाली बसेन. पण तुम्ही अगोदर कबूल करून शेतकऱ्यांचा, महाराष्ट्रातील गरीब जनतेचा विश्वासघात केला. मी आपल्याला विचारू इच्छितो की, आज आपली एकाधिकार खरेदी योजना जीवंत आहे का हो ? किंबहुना आज केवळ एका माणसाची मोनापोली सुरू आहे. खरोखरी आपला एकाधिकार योजनेचा कायदा आज अस्तित्वात आहे का ? आपल्याला आठवत असेल की, सन्माननीय श्री.हर्षवर्धन पाटील यांनीच आश्वासन दिले होते की, अधिवेशन संपण्यापूर्वी याबाबतचा ऑर्डिनन्स काढण्यात येईल. पण खरोखरी तसा तो काढला गेला आहे का ? प्रत्यक्षात तसे काहीही घडलेले नाही, परिणामी एकाधिकाराचा कायदाच आज अस्तित्वात नाही. मग का खोटी आश्वासने तुम्ही देता ? का खोटे सांगता ? विजेच्या बाबतीतही खोटी आश्वासने दिली. कापसाचे अर्थकारण तर वेगळेच आहे. सभापती महोदय, या ठिकाणी स्वामीनाथन् साहेबांनी माननीय मुख्यमंत्र्यांना एक पत्र लिहिले आहे.

...... एच 2 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( सभापतीस्थानी - तालिका सभापती श्रीमती उषा दराडे )

श्री. गडकरी .....

त्याची प्रत माझ्याकडे आहे, आपल्याकडे नसेल तर मी ती आपल्याला देतो. तुम्ही त्या पत्राची काही दखल घेतली आहे का ? श्री. स्वामीनाथन् यांनी आपल्याला 27.6.2006 ला पत्र लिहून चार मागण्या केल्या आहेत. तामिळनाडूनप्रमाणे या राज्यातील शेतकऱ्यांना पूर्ण कर्जमाफी द्या, आयात शुल्क 7 टक्के करा. आपला जो जाणता राजा दिल्लीमध्ये बसला आहे त्यांनाही सांगितले की, आयात शुल्क कमी करा. नाही तरी आपण 16 रूपय दराने गहू आयात करीत आहात. तेव्हा तुम्ही कमीत कमी 7 टक्के कापसावरील आयात शुल्क कमी करा. सभापती महोदया, मी या निमित्ताने माननीय मुख्यमंत्री महोदयांना विचारू इच्छितो की, त्यांनी किमानपक्षी स्वामीनाथन यांना पत्रोत्तर तरी दिले आहे का ? दिले असेल तर जरूर त्याबद्दल आपल्याला धन्यवाद. मग आपण आता ते का करीत नाही. आजही अमेरिकेतील शेतकऱ्याला 30 टक्के सबसिडी मिळते., चीनमधील शेतकऱ्यांना शून्य दराने कर्ज मिळते. आणि आपल्याकडे जेथे 2 टक्के कापूस उत्पादक शेतकरी आहे त्याला तुम्ही सबसिडी देत नाही. एकीकडे आपण गॅट करारारावर सही करू बसला आहात. अमेरिकेमध्ये शेतकऱ्यांना सबडिी मिळते आहे तर मग त्यांना आपल्याकडील शेतकऱ्यांना सबसिडी देण्यास आक्षेप घेण्याचा अधिकारच काय आहे ? भारतातील शेतकऱ्याची सबसिडी रद्द करा म्हणून सांगण्याचा अमेरिकेला अधिकारच काय ? आमच्या येथील गिरणी मालकाच्या फायद्यासाठी आपण शुल्क ठेवले आहे. असे असताना आपण गुजरातच्या मोदींवर किती आरोप करणार ? ते तर तुम्हाला पाण्यात दिसतात. मी त्यांना म्हटले की, मोदीजी आपण कुछ तो बोलो ? पण ते म्हणाले की, मी यावर काहीही बोलणार नाही. ...

**तालिका सभापती** (श्रीमती उषा दराडे) : मी सन्माननीय सदस्यांना जाणीव करून देते की, अगोदरच आपल्याला या चर्चेसाठी वेळ थोडा आहे, तरी त्यांनी विषयांतर न करता मूळ मुद्यावर, विषयावर बोलावे. मघाशी सन्माननीय सदस्य श्री.सरपोतदार यांनी देखील असेच सांगितले होते की, प्रत्येकाने थोडक्यात मुद्देसूद बोलावे म्हणून.

श्री. नितीन गडकरी : सन्माननीय सदस्य श्री.सरपोतदार असे म्हणाले होते की, या विषयावर ज्यांना जेवढे बोलावयाचे असेल तेवढे त्यांनी बोलावे. ...

**तालिका सभापती** : हो, पणआपण मुद्यावर बोलावे इतकेच मी आपल्याला सांगू इच्छिते.

( यानंतर श्री.सरफरे ...आय 1 ..

अप्रधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी : मी मुद्दयावरच बोलत आहे. या ठिकाणी मला काही मुद्दे शासनाच्या लक्षात आणून देण्याची आवश्यकता आहे. मी इस्त्रायलला गेलो होतो, त्यावेळी माझ्या सोबत माननीय श्री. शरद पवार, माननीय श्री. अजित पवार, माननीय श्रीमती वसुंधराराजे शिंदे बसल्या होत्या. गुजरातचे मुख्यमंत्री माननीय श्री. नरेंद्र मोदी यांच्या गुजरातमधील कापूस उत्पादक शेतकरी मला इस्त्रायलमध्ये भेटले. त्यावेळी माननीय श्री. नरेंद्र मोदी यांचे जे प्रेझेंटेशन झाले ते पाहून सर्वजण अवाक झाले. गुजरात राज्यामध्ये एकाही कोरडवाहू शेतकऱ्याने आत्महत्त्या केली नाही. चीनमध्ये गुजरातमधील कापसाला "गुजरात कॉटन" असे नाव आहे. चीनचे व्यापारी हिंदुस्थानामध्ये येतात आणि ते फक्त गुजरातचा कापूस विकत घेतात. 80 टक्के कापूस निर्यात करण्यात आला. त्यामध्ये विदर्भातील, महाराष्ट्रातील एकाधिकार खरेदी योजनेतील कापसाच्या गाठी पाठविल्या. माननीय सदस्य डॉ. हिराणी साहेब आपण मला माफ करावे. त्या गाठींमध्ये प्लॅस्टिकच्या चपला निघाल्यामुळे निर्यातदारांनी तो कापूस परत पाठविला, तो कापूस रिजेक्ट केला.

सभापती महोदया, मी आपणास स्वामिनाथन समितीच्या शिफारशींबाबत सांगत होतो. त्या शिफारशींमध्ये तीन-चार मागण्या करण्यात आल्या. त्यापैकी तामिळनाडूप्रमाणे राज्यातील शेतकऱ्यांचे संपूर्ण कर्ज माफ करावे. कापसावरील आयात शुल्क 60 टक्के करावा, विदर्भामध्ये कोरडवाहू भागात बी.टी. कॉटनचे तंत्रज्ञान न वापरता कोरडवाहू जमिनीकरिता योग्य असे तंत्रज्ञान वापरण्याची उपाय योजना करावी. हा तिसरा मुद्दा आपण तपासून घ्यावा. बी.टी. कॉटनचे उत्पादन या भागामध्ये मोठया प्रमाणात झाले आहे. माननीय विरोधी पक्षनेते श्री. भाऊसाहेब फुंडकर यांच्या खामगावमध्ये एका शेतकऱ्याकडे बी.टी. कॉटनचे उत्पादन 35 क्विंटल झाले. आणि आमच्या कोरडवाहू भागामध्ये सुध्दा दहा-दहा क्विंटल उत्पादन झाल्याचे मी ऐकले आहे. हे आपण एकदा एक्सपर्टकडून तपासून घ्यावे. बी.टी. कॉटन बियाणे कोरडवाहू भागासाठी वेगळे आणि इरिगेटेड भागासाठी वेगळे असे केले तर त्याचा विचार होऊ शकेल. बी.टी. कॉटनमुळे कापसाचे उत्पादन वाढले आहे, ही गोष्ट आपल्याला मान्य केली पाहिजे. सभापती महोदया, चौथी गोष्ट म्हणजे विदर्भामध्ये सेंद्रीय शेती करणे योग्य असल्यामुळे त्या शेतीला आपण प्रोत्साहन द्यावे अशा चार मागण्या त्यांनी सुचविल्या होत्या. स्वामिनाथन कमिटी झाली, मिश्रा कमिटी झाली, इंदिरा गांधी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ D/

श्री. नितीन गडकरी...

हयुमन रिसोर्सेसची कमिटी झाली, टाटा इंस्टिटयूट ऑफ फंडामेंटल रिसर्चची कमिटी झाली. परंतु सरकार गंभीर नाही. दिल्लीत नाही व मुंबईत सुध्दा सरकार गंभीर नाही.

सभापती महोदया, माननीय मुख्यमंत्री हे अतिशय कुशाग्र बुध्दीचे आहेत. एखादा मुद्दा पटविण्यात आपण तरबेज आहात. केंद्र सरकार सांगेल त्याप्रमाणे कर्जमाफी करु असे आपण सांगितले. स्टेट बँक, आंध्र बँक, पंजाब नॅशनल बँक, राष्ट्रीयीकृत बँका याकरिता केंद्र सरकार आहे. परंतु भू विकास बँक, जिल्हा सहकारी बँक, सेवा सहकारी सोसायटी, अर्बन को-ऑपरेटिव्ह बँका, शेतकऱ्यांनी कर्ज घेतलेल्या पत संस्था महाराष्ट्र राज्य सहकारी बँक कुणाच्या अधिकारात आहे.? याठिकाणी माननीय मंत्री श्री. पतंगराव कदम आले नाहीत. त्यांनी मला जी.आर. ची प्रत पाठविली. माननीय श्री. पतंगराव कदम यांना आपण कंसामध्ये शायलॉक म्हणू. या भू विकास बँका शेतकऱ्यांना लूटत आहे त्यांच्या इतका क्रूर सावकार कुणी नाही. मघाशी कुणीतरी सांगितले की, 10 हजाराच्या कर्जावर 9 हजाराचे व्याज वसूल करतात हे अमानवीय आहे, हे आपण थांबवा. आपण यामध्ये काही तरी मार्ग काढा. आपण सर्व व्याज माफ करुन टाका. इरिगेटेड शेतकऱ्यांसाठी वेगळे धोरण आणि कोरडवाहू शेतकऱ्यांसाठी वेगळे धोरण करा. पहिल्या स्टेजमध्ये आपण प्रयत्न करुन काही तरी मार्ग काढा. मी आपणास विनंती करतो की, कोणतीही गोष्ट कुणालाही फुकट देणे चुकीचे आहे. कर्जमाफी करणे हे चुकीचे कन्सेप्ट आहे. मोफज वीज देणे ही चुकीची गोष्ट आहे हे मला मान्य आहे.. अर्थशास्त्राच्या दृष्टीकोनातून प्रिन्सिपली हे बरोबर आहे. परंतु लोकशाहीमध्ये कल्याणकारी राज्याचे कर्तव्य काय आहे?, माणसे मरत असतील तर तुम्ही तपासून बघा. त्यांच्याकडे खते घ्यायला पैसा आहे काय? . एका एकरामध्ये तीन क्विंटल कापूस होतो. व्याज आणि कर्ज कसे परत करणार? असे असतांना आपण कर्जावर 10 टक्के शेअर्स कापूस घेता हे किती अमानवीय आहे? मागील वेळी कापसाचे तीन टक्के शेअर परत केले ते पूर्ण परत केले की नाही मला माहीत नाही. मला आपण सांगा हे 10 टक्के शेअर परत करण्याची घोषणा केली तर 4 ते 5 हजार कोटी रुपये शेतकऱ्यांना मिळतील.

(यानंतर श्री. बरवड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी .....

राष्ट्रीयकृत बँका 10 टक्के रक्कम कापतात काय ? ते अशी रक्कम कापत नाहीत. गरीब शेतकऱ्यांना लुटण्याचा आणि सहकाराला जगविण्याचा हा कोणता नियम काढला आहे ? उस्मानाबाद बँकेत 175 कोटी रुपयांचा घोटाळा झाला. आमचे मित्र आणि उत्तम प्रकारे बँक चालविणारे सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांनी सांगितले की, नांदेड बँकेत 400 कोटी रुपयांचा घोटाळा झाला. नागपूर बँकेत 150 कोटी रुपयांचा घोटाळा करण्यात आला. तो घोटाळा करणारे मोकाट फिरत आहेत. आधी ते आपल्या मागे राहिले. आता ते श्री. राणे साहेबांच्या मागे राहतात. ते श्रीमती अल्वा आणि श्रीमती प्रभा राव यांना भेटतात. त्यांच्यापेक्षा दुसरा धोकेबाज माणूस नाही. एकदा महानगरपालिकेमध्ये दोन्ही बाजूने ठरवूनही मधले जे होते त्यांना उभे केले. ते फार खतरनाक आहेत. त्यांनी बँकेचे 150 कोटी रुपये लुटले. ते भाषण द्यावयास जातात. सावनेर येथे श्री. अजित पवार असे म्हणाले की, पश्चिम महाराष्ट्रात अशी कोणी बँक लुटली असती तर ते आमदार म्हणून निवडून आले नसते. मी त्यांचे अभिनंदन करीन. यांनी बँकेचे 150 कोटी लुटले. आज प्रत्येक जिल्हा बँकेमध्ये तेच सुरु आहे. त्यांना जगवण्याकरिता शेतकऱ्यांचे शोषण करु नका. आपण जागतिकीकरण स्वीकारले, आपण खाजगीकरण स्वीकारले तसेच आपण नवीन आर्थिक धोरण आखले. आज बँकींगमध्ये 10 टक्के कर्जाची रक्कम शेअरमध्ये कापण्याचा प्रकार जगातील एका तरी बँकेमध्ये आहे काय ? जगातील एका तरी बँकेमध्ये अशा प्रकारे कर्जाची रक्कम कापण्याची तरतूद आहे काय ? 5 टक्के व्याजाच्या दराने नाबार्डकडून आलेले कर्ज 13 टक्के दराने देण्याचे थांबवू शकत नाही काय ? बँकांकरिता आपण सगळे पॅकेज देतो. आपण सांगितले की, कर्जासंबंधीचा विषय राज्य शासनाच्या अखत्यारीतील नाही. हे कर्ज नाबार्डकडून आलेले आहे. परंतु भूविकास बँका, सेवा सहकारी सोसायट्या, जिल्हा सहकारी बँका, अर्बन बँका यांच्याबाबतीत राज्य शासनाने निर्णय घ्यावा. ज्या बँका महाराष्ट्र सहकार अधिनियमाच्या अंतर्गत आहेत त्या बरखास्त करण्याचा अधिकार राज्य शासनाला आहे. मी आपल्याला सांगू इच्छितो की, त्यांच्या कर्जाचे धोरण ठरविण्याचा विषय केंद्र सरकारने घ्यावा हे बरोबर नाही. आपण त्यांना सांगावे की, यांच्या बाबतीत आम्ही निर्णय घेतो आणि ज्या राष्ट्रीयकृत बँका आहेत त्यांच्या

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/

श्री. नितीन गडकरी ....

संदर्भातील निर्णयाकरिता केंद्र सरकारला शिफारस करु. परंतु आपल्या वक्तव्याने शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळले गेले आहे. मी आपल्याला एकच विनंती करतो. एक दिवस मी रात्री टी.व्ही. सुरु केला. पार्लमेंटच्या खासदारांसमोर श्री. पी. साईनाथ यांचे भाषण सुरु होते. ते भाषण ऐकण्यासाठी सर्व पक्षांचे खासदार बसले होते. माझ्या आयुष्यामध्ये शेतकऱ्यांच्या आत्महत्येच्या संदर्भात मूल्यमापन करणारे असे विचार या आधी ऐकले नाहीत. श्री. पी. साईनाथ यांना मी कधी भेटलो नाही परंतु त्यांचे ते भाषण ऐकताना डोळ्यात पाणी आले. यवतमाळ जिल्ह्यातील श्री. गोसावी पवार या शेतकऱ्याची गोष्ट त्यांनी सांगितली. आदिवासी समाजातील या शेतकऱ्याच्या मुलीचे लग्न होते. त्या मुलीच्या लग्नासाठी सगळे पाहुणे आले. आदल्या रात्री मुलीच्या लग्नाची सोय झाली नाही म्हणून श्री. गोसावी पवार यांनी आत्महत्या केली. सकाळी मुलीचे लग्न होते. सगळे नातेवाईक तसेच गावकरी गोळा झाले. त्यांना वाटले आज जर या मुलीचे लग्न केले नाही तर ही मुलगी अविवाहित राहील. फार मोठा कटू प्रसंग होता. त्या मुलीच्या बापाने आदल्या रात्री आत्महत्या केली होती. एका रस्त्याने त्या शेतकऱ्याची अंत्ययात्रा निघाली आणि दुसरीकडून नवरा मुलगा आला. गावातील शेतकऱ्यांनी अर्धा किलो, एक किलो धान्य गोळा करुन त्या मुलीचे लग्न साजरे केले. ही गोष्ट आमच्या सरकारचा लौकिक वाढविणारी आहे काय ? त्या बापाला आपल्या मुलीच्या लग्नासाठी आदल्या रात्री आत्महत्या करावी लागली. त्या घरात एकाच दिवशी अंत्ययात्रा निघाली आणि लग्न लागले. मी आपल्याला विनंती करतो. शेतकऱ्यांच्या आत्महत्येचा संबंध त्याच्या जात, धर्म, पंथ किंवा भाषेशी नाही. शेतकऱ्याच्या आत्महत्येचा संबंध हा सरकारच्या चुकीच्या आर्थिक धोरणाशी आहे. आपण शेतकऱ्यांचे जे शोषण केले त्यामुळे शेतकरी आत्महत्या करीत आहेत. यासंदर्भात कोणते पुरावे द्यावयाचे ? माझ्याकडे काही फोटो ओहत. आपण जे साहित्य वाटले त्यातील एका ट्रॅक्टरच्या वखराचा फाळ सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी दोन्ही हाताने सहजपणे माझ्यासमोर वाकवला. माझ्याकडे फोटो आहे.

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. नितीन गडकरी पुढे सुरु..

सगळया पीव्हीसी पाईप्सचा चक्काचूर झालेला आहे. त्यांच्या सर्व मशिन्स बंद पडतात. पॅकेजच्या नावाखाली शेतक-याची फसवणूक होत आहे. पॅकेजची काही लोकांना पर्वणी मिळाली, त्यांना लक्ष्मीदर्शन झाले. या पॅकेजच्या नावावर लुटारुपणा सुरु आहे. या सदनाचे विद्वान नेते माननीय उपमुख्यमंत्री असे म्हणाले, "शेतक-यांच्या आत्महत्येचे कारण, त्यांचे मानसिक संतुलन बिघडलेले आहे. दारुच्या अतिसेवनामुळे शेतकरी आत्महत्या करतात." मी तर असे म्हणणे की, शेतक-यांचे मानसिक संतुलन बिघडलेले नसून ते या सरकारचे बिघडलेले आहे. आज महाराष्ट्रामध्ये शेतक-याची काय स्थिती आहे ? आपल्याकडे पध्दत अशी आहे की, पती-पत्नी आणि चार मुले असतील तर जोपर्यन्त आई-वडिलांचा मृत्यू होत नाही तोपर्यन्त सातबाराच्या उता-यावर वारसाचे नाव लावले जात नाही. 40 वर्षाच्या शेतक-याने आत्महत्या केल्यानंतर सातबाराच्या उता-यावर त्याचे नाव नसल्यामुळे ते आत्महत्तेचे प्रकरण रिजेक्ट करुन सरकारने 1 लाख रुपये मदत देण्याचे नाकारले. सभापती महोदय, हे अमानवीय आहे. म्हणून माझी आपणास विनंती आहे की, शेतक-यांचे निदान सहकारी बँकांचे कर्ज माफ करण्याबाबत निर्णय घ्यावा.

श्री. विलासराव देशमुख : रेकॉर्डवर चुकीचे राहू नये म्हणून मी खुलासा करीत आहे की, सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी सांगतात त्याप्रमाणे आज महाराष्ट्रामध्ये परिस्थिती नाही. ती परिस्थिती सुरुवातीला होती. परंतु नंतर कुटुंबातील कोणत्याही व्यक्तिने आत्महत्या केली तरी त्याला मदत देण्याचा शासनाने निर्णय केलेला आहे. 2001पासूनच्या सर्व केसेस रिओपन करुन त्याबाबतीत सर्वांना 1 लाख रु. मदत केलेली आहे.

श्री. नितीन गडकरी : पहिल्यांदा अशी मदत मिळत नव्हती. नंतर त्यामध्ये सरकारने दुरुस्ती केली ही गोष्टी खरी आहे. सरकारने याबाबतीत आदेश काढले हेही खरे आहे. परंतु यवतमाळ जिल्ह्यातील आत्महत्या केलेल्या शेतक-यांच्या बाबतीत अद्याप मदत मिळालेली नाही. अशा शेतक-यांची यादी माझ्याजवळ आहे.

श्री. विलासराव देशमुख : माझ्याकडे यादी द्यावी.

**तालिका सभापती** : माननीय मुख्यमंत्र्यांनी यादी मागितलेली आहे. सन्माननीय सदस्यांनी ती त्यांना द्यावी.

..2..

(श्री. नितीन गडकरी...)

श्री. नितीन गडकरी : ठीक आहे. मी त्यांना यादी देतो. माझी माननीय मुख्यमंत्री महोदयांना विनंती आहे की, त्यांनी शेतक-यांचे सहकारी बँकांचे कर्ज माफ करण्याची घोषणा करावी. वीज मंडळाच्या स्वाभीमान योजनेचा गळफास शेतक-यांना लावलेला आहे. ही स्वाभीमान योजना बंद करावी. आंाध्रप्रदेशमध्ये मोन्सॅण्टो कंपनीने बी.टी.कॉटन बियाणाचा दर 1700 रुपये लावलेला होता. आंध्रप्रदेशच्या मुख्यमंत्र्यांनी त्या कंपनीवर दबाव आणून तो दर कमी करायला भाग पाडले. महाराष्ट्रामध्ये देखील अशा त-हेने बियाणे बनविणा-या कंपन्यांवर दबाव आणून त्यांना दर कमी करण्यास सांगावे. तसेच ऑर्‌गॅनिक फार्मिंगकरिता धोरण ठरवावे. विजेची स्वाभिमान योजना रद्द करावी. शेतक-यांचे कर्ज माफ करावे, ऑर्‌गॅनिक शेती बरोबरच त्याला कुक्कुटपालन, बकरी, शेळी-मेंढी, डेअरी असे पूरक उद्योग करण्यास प्रोत्साहन द्यावे. या पूरक उद्योगाच्या बाबतीत परिस्थिती अतिशय गंभीर झालेली आहे. सन्माननीय मंत्री महोदय श्री. अनिस अहमद हे सभागृहामध्ये उपस्थित नाहीत. शेतक-यांना भाकड म्हशी देण्यात आलेल्या आहेत. म्हशी ऐवजी सांड दिले नाहीत हे शेतक-यांचे  नशिब समजायचे. राज्यामध्ये हे काय चालले आहे ? ही परिस्थिती सुधारा. मला एवढेच सांगावयाचे आहे की, या योजनांचे ऑडिट करा. मी नेहमी एक गोष्ट सांगत असतो की, एकवेळ पैशाचे ऑडिट झाले नाही तरी चालेल, परंतु परफॉर्मन्सचे ऑडिट झाले पाहिजे. मी मघाशी प्रशासनाच्या संदर्भात माननीय महसूल मंत्री श्री. नारायण राणे यांचे सी.पी.ए.मधील भाषण ऐकले. त्यांनी सुंदर भाषण केले. सभापती महोदय, प्रशासनाच्या बाबतीत एकच गोष्ट करावयास पाहिजे की, आय.ओ.एस. अधिकारी जे सांगातात त्याच्या पुढच्या भागापासून सुरुवात करावी म्हणजे जनतेचे कल्याण होईल. सत्ताधा-यांबद्दल अनेक गैरसमज आहेत. जो मंत्री आपल्या सेक्रेटरीकडे पाहून बोलतो तो कामाचा नाही. राज्य मंत्र्यांनी चालवायचे असते, सक्रेटरींनी नाही. त्यांनी सांगितले की, आग लावायची आहे, तर आग लावण्याचे दुष्परिणाम अमूक अमूक राहतील असे सेक्रेटरीनी सांगायचे.

...नंतर श्री. भोगले...

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी.....

आता सगळी धोरणे तेच ठरवितात. तुमच्या अर्थमंत्र्यांकडे एक बैठक होती. वित्त सचिव बाणेदारपणे बोलले. मला शंका वाटली, अर्थमंत्री हे आहेत की ते आहेत? म्हणून तुम्ही सेक्रेटरींवर अवलंबून राहू नका. एनजीओंची समिती अपॉईंट करा. श्री.मोहन धारिया यांनी सांगितलेच आहे. त्यांनी दिंडीमध्ये जाऊन भाषण केले.

सभापती महोदया, सहकारी बँकांच्या कर्जाबाबत घोषणा करावी. विजेची लोडशेडिंग बंद करुन शेतकऱ्यांना मोफत वीज पुरवून त्यांना दिलासा द्यावा. हे निर्णय घेण्याचा राज्य सरकारचा अधिकार आहे. केंद्र सरकारचा याच्याशी काही संबंध नाही. शेवटची मागणी करुन माझे भाषण संपविणार आहे. सहकार मंत्र्यांनी अर्बन को-ऑ.बँकांनी जी कर्जे दिली आहेत ती पंतप्रधान पॅकेजमध्ये समाविष्ट केलेली नाहीत, परंतु त्या कर्जाबाबत शिफारस करुन फाईल वित्तमंत्र्यांकडे पाठविली, परंतु वित्त विभागाने ती फाईल रिजेक्ट केली. आता दोन मंत्रालयांमध्ये वाद सुरु आहे. म्हणून माझी विनंती आहे की, ज्या शेतकऱ्यांना यवतमाळ जिल्हा अर्बन को-ऑ.बँकेने कर्ज दिले आहे त्या शेतकऱ्यांच्या कर्जाबाबत निर्णय झालेला नाही, माननीय अर्थमंत्र्यांना सांगून त्या कर्जाचा पंतप्रधान पॅकेजमध्ये समाविष्ट करुन मंजुरी द्यावी आणि शेतकऱ्यांना दिलासा द्यावा तरच आत्महत्या थांबतील. अन्यथा आत्महत्यांचे प्रमाण वाढेल. या मागण्या मान्य केल्या नाहीत आणि दहा कोटी रुपये जरी वाटले तरी आश्चर्य वाटणार नाही. या शेतकऱ्यांचे प्राण वाचवा. कल्याणकारी राज्यामध्ये ठोस निर्णय घ्यावा आणि कमीत कमी या शेतकऱ्यांचे जीव वाचवा एवढे बोलून माझे भाषण संपवितो.

----------

(नंतर हिंदी भाषण श्री.तालेवार यांचेकडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री राजेन्द्र जैन ( भंडारा-गोंदिया स्थानिक प्राधिकारी संस्था ):सभापति महोदय, पिछले एक सप्ताह से किसानों की आत्महत्या के विषय पर बहुत गंभीरता से इस सदन में चर्चा हो रही है. विधान सभा का यह अधिवेशन नागपुर में हो रहा है. इसलिए मैं यह खास तौर से बताना चाहूंगा कि महाराष्ट्र में पिछले ढाई साल में जितने किसानों ने आत्महत्या की है, उनमें सबसे ज्यादा किसानों की आत्महत्या विदर्भ में हुई है. इस घटना के प्रति सभी सम्माननीय सदस्यों ने संवेदनशीलता के साथ अपनी भावनाएं यहां पर व्यक्त की है. कई सम्माननीय सदस्यों ने कहा कि 7/12 का उतारा कोरा होना चाहिए. यह सभी सदस्य चाहते हैं. इस राज्य के किसानों को और खास तौर से विदर्भ के किसानों को न्याय देने के लिए, उनका आर्थिक स्तर ऊंचा उठाने के लिए सरकार को ठोस कदम उठाना चाहिए. 7/12 का उतारा कोरा होना चाहिए, यह सभी मानते हैं लेकिन 7/12 का उतारा कोरा कर देने के बाद क्या किसानों की आत्महत्या रुक जाएगी, इसका सही उत्तर शायद हम नहीं दे पायेंगे. मैं सम्माननीय सदस्य श्री गडकरी साहब से अनुरोध करना चाहता हूं कि, क्योंकि उन्होंने सभी बैंकों का उल्लेख करते हुए कहा कि बैंकों में घोटाले हो रहे हैं. कॉंग्रेस और राष्ट्रवादी कॉंग्रेस के पदाधिकारी गोंदिया में मध्यवर्ती सहकारी बैंक चलाते हैं और इस बैंक में आपके भी सहयोगी हैं, मैं यह बताना चाहता हूं कि यह बैंक घाटे में नहीं चल रही है, फायदे में चल रही है. इसलिए माननीय गडकरी जी आप हमारी भी तारीफ करें.

सभापति महोदय, पिछले वर्ष भंडारा, गोंदिया, गडचिरोली, चंद्रपुर और नागपुर इत्यादि जिलों के धान उत्पादक किसानों को न तो प्रधानमंत्री पॅकेज का सहारा मिला और न ही महाराष्ट्र सरकार के पॅकेज का सहारा मिला.इसी वजह से पिछले वर्ष में विदर्भ के 5 जिलों में 200 किसानों ने आत्महत्या की है. मैं किसानों की कर्ज मुक्ति एवम् किसानों की दो तीन समस्याओं के बारे में आपका ध्यान आकर्षित करना चाहता हूं. सम्माननीय सदस्य श्री बी.टी. देशमुख ने जैसे कहा कि महाराष्ट्र के एक समृध्द इलाके में जितने कृषि पंप को विद्युत कनेक्शन दिया गया है उतने विद्युत कनेक्शन विदर्भ के 5 जिलों में भी नहीं दिए गए हैं. यह बात सही है. 1988 में गोसीखुर्द प्रकल्प शुरु किया गया था. उस समय इस प्रकल्प की कीमत 372 करोड़ रुपये थी. आज 19 साल हो गए लेकिन यह प्रकल्प पूरा नहीं हुआ. आज इस प्रकल्प की कीमत 5 हजार 559 करोड़ रुपये हो गई है. अगर यह प्रकल्प निश्चित समय पर पूरा हो गया होता तो 1 लाख

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री राजेन्द्र जैन....

90 हजार हेक्टेयर कृषि भूमि पर सिंचाई की व्यवस्था हो जाती. आज विदर्भ के किसान एक फसल लेने के लिए भूखा है. अगर यह प्रकल्प पूरा हो जाता तो विदर्भ के किसान तीन फसल ले पाते, विदर्भ के किसानों का आर्थिक स्तर भी ऊंचा उठता और आज वह आत्महत्या के लिए प्रेरित भी नहीं होता. लेकिन यह प्रकल्प पूरा न होने के कारण विदर्भ के किसानों को बहुत कठिनाई का सामना करना पड़ रहा है. इसी प्रकार से 1974-75 में बावनथडी प्रकल्प शुरु किया था. उस समय इस प्रकल्प की कीमत 24 करोड़ रुपये थी. लेकिन आज भी यह प्रकल्प पूरा नहीं हुआ. आज इस प्रकल्प की कीमत 520 करोड़ रुपये है. मैं इस विषय पर राज्य के मुख्यमंत्री जी और सम्माननीय मंत्री श्री अजित पवार जी का ध्यान आकर्षित करना चाहता हूं कि अब इन प्रकल्पों का काम पूरा हो रहा है. लेकिन 15-20 दिनों से हम यह सुन रहे हैं कि इन प्रकल्पों में वन कानून का भंग हुआ है इसलिए इस प्रकल्प का काम रुक गया है. इस संबंध में मेरा सरकार से अनुरोध है कि, जिस प्रकार से उद्योगधंधों के लिए, विशेष आर्थिक क्षेत्र योजना के लिए हम नियमों में परिवर्तन करते हैं उसी प्रकार से किसानों के हित को ध्यान में रखते हुए इतने बड़े सिंचाई के प्रोजेक्ट के लिए भी नियमों में परिवर्तन किया जाना चाहिए. 1974-75 में इस प्रोजेक्ट का भूमि पूजन किया गया था. 26-27 साल हो गए हैं लेकिन अभी तक यह प्रकल्प पूरा नहीं हुआ है. इस प्रकल्प को पूरा करने के लिए वन विभाग के कानूनों के कारण अड़चन आ रही है, इसलिए सरकार से मेरी विनती है कि इन अड़चनों को दूर करने के लिए तत्काल कदम उठाए जाए. अगर ये सिंचाई प्रकल्प पूरे हो जाए तो किसानों की आत्महत्या रुक सकती है. इन प्रकल्पों का काम पूरा न होने के कारण धान उत्पादक किसानों पर अन्याय हो रहा है. अगर ये प्रोजेक्ट पूरे हो जाएंगे तो किसान आत्महत्या के लिए प्रेरित नहीं होंगे.

सभापति महोदय, दूसरा मुद्दा यह है कि आणेवारी पध्दति में सुधार किया जाना चाहिए. यह आणेवारी पध्दति ब्रिटीश कालीन है. अंग्रेज चले गए लेकिन अभी तक ब्रिटीश कालीन पध्दति चालू है. आज भी ब्रिटीश कालीन पध्दति से आणेवारी निकाली जाती है. तीन किलोमीटर के क्षेत्र का अध्ययन करने पर पता चलेगा कि पटवारी ने एक किलोमीटर के क्षेत्र में अलग पध्दति से आणेवारी निकाली जाती है तो दूसरे किलोमीटर के क्षेत्र में दूसरी पध्दति से आणेवारी निकाली जाती है. इसका परिणाम यह होता है कि सभी किसानों को एक समान न्याय नहीं मिलता है.

..3

श्री राजेन्द्र जैन....

किसी को कम फायदा होता है तो किसी को ज्यादा फायदा होता है. इसलिए मेरा सरकार से अनुरोध है कि प्रचलित आणेवारी पध्दति में सुधार किया जाए. क्योंकि इसके कारण कई किसानों पर अन्याय हो रहा है. अगर आणेवारी पध्दति में सुधार होगा तो किसानों की आत्महत्या की संख्या में भी कमी आएगी क्योंकि किसानों की आत्महत्या का यह भी एक कारण है.

सभापति महोदय, जैसा कि सम्माननीय सदस्य श्री गडकरी जी ने 10 प्रतिशत शेयर की बात कही है, मैं उनके सुझाव से सहमत हूं. यह बात सही है कि किसानों के 5 हजार के शेयर बैंक में जमा है, किसानों को उनकी यह रकम वापस की जानी चाहिए. इस बारे में भी सरकार विचार करें ताकि किसानों की आत्महत्या रुक सके.

सभापति महोदय, भंडारा और गोंदिया जिले के धान उत्पादक किसानों को धान के लिए एक हजार रुपये भाव दिए जाने की मांग पर सरकार को गौर करना चाहिए.

अंत में मैं यह कहना चाहूंगा कि विदर्भ के पिछड़ेपन को दूर करने के लिए बावनथडी और गोसीखुर्द प्रकल्प को जल्द से जल्द पूरा करने के लिए, कार्यान्वित करने के लिए सरकार तत्काल कदम उठाए और किसानों को कर्ज मुक्त करने के संबंध में कोई कारगर कदम उठाए. आपने मुझे इस विषय पर बोलने का अवसर दिया, इसके लिए आपको धन्यवाद देते हुए मैं अपना भाषण समाप्त करता हूं.

........

यानंतर श्री हिराणीचे भाषण.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. एन.पी. हिराणी ( यवतमाळ स्थानिक प्राधिकारी संस्था ) : आदरणीय सभापती महोदया, गेल्या आठवडयापासून दोन्ही सभागृहामध्ये शेतक-यांच्या प्रश्नावर एक सारखी चर्चा सुरु आहे. या चर्चेमध्ये कधी शेतक-यांच्या आत्महत्येच्या बाबतीत तर कधी शेतक-यांच्या कर्जमुक्तीच्या बाबतीत दोन्ही सभागृहात तासनतास चर्चा झाली व या चर्चेदरम्यान सन्माननीय सदस्यांनी मनापासून विचार मांडले. ही चर्चा करतांना काही वेळेला ही चर्चा घ्यावी म्हणून गदारोळ झाला होता.

यानंतर श्री. अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.एन.पी.हिराणी.............

केवळ गदारोळ करून शेतकऱ्यांचे प्रश्न सुटणार नाहीत. शेतकऱ्यांच्या प्रश्नामध्ये राजकारण येत असेल तर ते योग्य नाही. आम्हीच शेतकऱ्यांच्या जवळ आहोत, आम्ही शेतकऱ्यांनी कर्जमुक्ती मिळवून दिली अशाप्रकारचे क्रेडीट घेण्याचा प्रयत्न होत असेल तर ते बरोबर नाही असे मला वाटते. राज्यात होत असलेल्या शेतकऱ्यांचा आत्महत्या हा अत्यंत गंभीर प्रश्न आहे. या प्रश्नावर चर्चा घडवून आणणे अत्यंत आवश्यक आहे.....

**तालिका सभापती (श्रीमती उषा दराडे )** : माझी सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, अजून काही सन्माननीय सदस्यांना बोलावयाचे आहे आणि आपल्याकडे वेळ कमी आहे.त्यामुळे आपण फक्त मुद्दे मांडावेत.

डॉ.एन.पी.हिराणी : सभापती महोदया, हा आमच्या विदर्भातील शेतकऱ्यांचा प्रश्न असल्यामुळे यावर जास्त बोलण्याची परवानगी द्यावी अशी माझी आपणास विनंती आहे.

सभापती महोदया, शासनाच्या चुकीच्या धोरणावर विरोधी पक्षाने नेमकेपणे बोट ठेवणे हे त्यांचे काम आहे. परंतु हे सर्व न होता एका विशिष्ट लयीच्या बाहेर जाऊन त्यावर चर्चा करण्यात येते. सध्या देशात गहू आयातीच्या प्रश्नावर माननीय केंद्रीय मंत्री श्री.शरद पवार यांच्यावर अनाठायी टीका होत आहे. माननीय श्री.शरद पवार यांनी हा निर्णय एकट्यांनी घेतलेला नाही. हा निर्णय मंत्रिमंडळात घेण्यात आलेला आहे. हा निर्णय कसा हितावह आहे हे त्यांनी वारंवार स्पष्ट केलेले आहे. परंतु गहू आयातीचा प्रश्न पुढे करून त्या प्रश्नावर गदारोळ करण्यात येतो. मी हे सर्व एक उदाहरण म्हणून सांगितलेले आहे. शेतकऱ्यांना पुढे करून त्यावर वैयक्तिक राजकारण करण्यात येत असेल तर आपण शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवू शकणार नाही. आपणास हा प्रश्न सोडवावयाचा असेल तर आपण सर्वांनी एकत्रित येऊन हा प्रश्न सोडविला पाहिजे. यापुढे शेतकऱ्यांना कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही, शेतकरी आत्महत्या करण्यास प्रवृत्त होणार नाही अशाप्रकारची परिस्थिती निर्माण केली पाहिजे आणि आपण ती करू शकतो. आपण कापसाच्या बाबतीत सर्वांनी मिळून निर्णय घेतला. त्यामुळे यठिकाणी बी.टी.कापसाचा प्रश्न उपस्थित होत नाही. शेतकऱ्यांना कोणाहीकडून कर्ज घ्यावे लागणार नाही अशाप्रकारची परिस्थिती आपण निर्माण केली

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.एन.पी.हिराणी.............

पाहिजे. आपण आज शेतकऱ्यांचे कर्जमाफ केले तरी शेतकऱ्यांच्या आत्महत्या होणार नाहीत असे आपण ठामपणे सांगू शकत नाही. शेतकरी शेतीसाठी बँकेकडून कर्ज घेतो, ते कर्ज फेडता आले नाही तर सावकराकडून कर्ज घेतो. ते कर्ज फेडता आले नाही तर शेती गहाण ठेवतो किंवा विकतो अशाप्रकारचे एक चक्र सुरु आहे ते आपणास तोडावयाचे आहे. तेव्हा आपण शेतकऱ्यांना कर्ज घ्यावे लागणार नाही अशाप्रकारची परिस्थिती निर्माण केली पाहिजे. आज आपण शेतकऱ्यांचे कर्जमाफ केले तरी पुढील पाच-सहा वर्षात त्यास कर्ज घ्यावे लागेल आणि पुन: हे दुष्ट चक्र सुरु राहील. तेव्हा मी मघाशी उल्लेखप्रमाणे शेतकऱ्यांनी कर्ज घेऊ नये अशाप्रकारची परिस्थिती निर्माण करणे फार गरजेचे आहे. त्यासाठी आपण सर्वांनी एकत्रितपणे येऊन अशाप्रकारचा निर्णय घेण्याची गरज आहे. आज शेतकऱ्यांना कर्जमाफी मिळणे आवश्यक आहे याबद्दल कोणाचेही दुमत नाही. परंतु राज्याची आर्थिक परिस्थितीसुध्दा अडचणीची आहे. त्याही परिस्थितीत सरकारने शेतकऱ्यांची कर्जमाफी केल्यास त्याचा आपणा सर्वांना आनंदच होईल. तेव्हा हा प्रश्न कसा सुटेल याबाबत आपण सर्वांनी मिळून प्रयत्न केला पाहिजे.

यानंतर श्री.पुरी.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.एन.पी.हिराणी....

याबाबतीत असे लक्षात घेतले पाहिजे की, ज्याठिकाणी म्हणजे, विदर्भामध्ये जास्त प्रमाणात आत्महत्या होत आहेत, त्याठिकाणी आपण पिकांस लागणारा खर्च कमी करुन जास्तीत जास्त उत्पादकता वाढविण्याच्या दृष्टीने लक्ष केंद्रित केले पाहिजे. जोपर्यंत आपण असे करत नाही तोपर्यंत उत्पादकता वाढणार नाही. बी.टी. कॉटनने क्रांती केली असे, आताच सन्माननीय गडकरी साहेबांनी सांगितले. त्यादृष्टीने विदर्भामध्ये फार चांगला प्रयोग करण्यात आला व तो यशस्वीही झालेला आहे. आज येथे कोरडवाहू जमिनींमधून बी.टी.कॉटनचे पीक डबल घेण्यात येत आहे. जो शेतकरी कापसाचे 3-4 क्विंटलचे पीक घेत होता, तो शेतकरी आज 10-10 क्विंटलचे कापसाचे पीक घेत आहे. एरिगेशनमध्येही 20 क्विंटलची मर्यादा पार झालेली आहे. परंतु अकोला कृषि विद्यापीठाने सांगितले होते की, बी.टी. कॉटन कापूस लावू नये. मग, कृषि उत्पादन कसे वाढेल ? कृषि विद्यापीठाने असे कसे सांगितले तेच मला कळत नाही. परंतु मी याठिकाणी सांगेन की, बी.टी. कॉटन लावावे. कारण यामुळे शेतकऱ्यांचे अर्थशास्त्र सुधारण्यामध्ये खूप मोठी मदत झालेली आहे, हे कोणीही नाकबूल करु शकणार नाही. आज मोठयाप्रमाणात शेतकरी बी.टी.कॉटन लावत आहे. अशाचप्रकारे प्रत्येक पिकांमध्ये म्हणजे ज्वारी, गहू, सोयाबीन या पिकांमध्येही जास्तीत जास्त प्रमाणात उत्पादकता वाढविण्याची आवश्यकता आहे. याठिकाणी माननीय मुख्यमंत्री उपस्थित आहेत. त्यामुळे माझी त्यांना विनंती आहे की, विदर्भामध्ये विशेष करुन आत्महत्याग्रस्त जिल्हयांमध्ये सगळयात वाणवा ही शेतीवरील प्रक्रिया करणारे जे उद्योग आहेत, त्यांची आहे. आज याठिकाणी अजिबात शेतीवरील प्रक्रिया करणारे उद्योग नाहीत. याठिकाणच्या सगळया सहकारी संस्था बंद पडलेल्या आहेत. याठिकाणच्या जवळपास 600 सहकारी जिनिंगमधील 540 जिनिंग बंद पडलेल्या आहेत. आपण पॅकेजच्या माध्यमातून प्रक्रिया उद्योगाला मदत करण्याचे ठरविलेले आहे. याबाबतीत मी याठिकाणी शासनास धन्यवाद देऊ इच्छितो की, महाराष्ट्र शासनाने एकास सहाच्याऐवजी एकास नऊप्रमाणे मदत देण्याचा प्रयत्न केलेला आहे. ..(अडथळा) यासंदर्भातील सगळया योजना विदर्भात राबविल्या गेल्या पाहिजेत. आपण येथील प्रक्रिया उद्योगास चांगल्या प्रकारे चालना देण्याची आवश्यकता आहे. आज विदर्भातील एस.टी.झेड. कागदावरच आहे. याठिकाणी नवीन जिनिंग लागल्या पाहिजेत. आम्हाला

..2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.एन.पी.हिराणी...

श्री.गोयल नावाचे फार चांगले काम करणारे कमिशनर लाभले होते. त्यांनी याबाबतीत चांगल्या प्रकारे लक्ष देण्यास सुरुवात केली होती, परंतु त्यांची नंतर बदली करण्यात आली. त्यांनी जिनिंग व प्रेसिंगच्या माध्मातून चांगले प्रयत्न सुरु केले होते. दुर्दैवाने याठिकाणी चांगले काम करणारे कमिशनर जास्त काळ ठेवले जात नाहीत. जे कमिशनर चांगले काम करतात, त्यांची लागलीच बदली करण्यात येते. आताचे नवीन कमिशनही याबाबतीत लक्ष घालून काम करीत आहेत. याठिकाणी प्रक्रिया उद्योगावर शासनाने जास्तीत जास्त घक्ष घालण्याची आवश्यकता आहे. तसेच आज येथील शेतकऱ्यांच्या मुलांना अल्टरनेटीव्ह जोडधंदाही उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता आहे. त्यांना अशाप्रकारचा जोडधंदा किंवा प्रक्रिया उद्योगाच्या माध्यमातून नोकरी देऊन त्यांना मदत करण्याची आवश्यकता आहे. त्यांना आपण जोडधंदा उपलब्ध करुन दिला तर ते आत्महत्या करणार नाहीत. त्यामुळे याप्रश्नी एकत्रितरित्या सगळया राजकीय पक्षांनी बसून निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. तसेच यापुढील काळात शेतकऱ्यांना आत्महत्या कराव्या लागणार नाहीत, त्यांना कर्ज घ्यावे लागणार नाही, यादृष्टीनेही आपण चांगले प्रयत्न करावेत. याठिकाणी विरोधी पक्षाच्या वतीने जी चर्चा उपस्थित करण्यात आली, त्याबाबतीत सगळयांनीच बसून चर्चा केली तर हा प्रश्न सुटू शकेल,असे मला वाटते. एवढे बोलून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

धन्यवाद !

---------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार (महाराष्ट्र विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, शेतकऱ्यांच्या आत्महत्येसंदर्भातील चर्चे सुरु होण्याच्या दृष्टीने खूप गदारोळ करावा लागला, असा गदारोळ करण्यापेक्षा त्यावर पुनर्विचार विनिमय करावा, असे सन्माननीय सदस्य आपल्या भाषणाच्या ओघात बोलले. मला हे समजत नाही की, गदारोळ करण्यामध्ये सदस्यांना आनंद वाटतो का ?

नंतर श्री.रोझेकर....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SRR/ प्रथम श्री.पुरी......... 11:45

श्री.मधुकर सरपोतदार.......

या सभागृहामध्ये सन्माननीय सदस्यांना गदारोळ का करावा लागतो, याचा शोध सन्माननीय सदस्य डॉ.एम.पी.हिराणी यांनी घेतला तर बरे होईल. आमची दुसरी कोणतीही मागणी नव्हती. येथे आल्यानंतर विरोधी पक्षाकडून नियम 289 अन्वये प्रस्ताव दिला होता व अशी विनंती केली होती की, सर्व कामकाज बाजूला ठेवा आणि शेतक-यांच्या आत्महत्यांच्या प्रश्नावर चर्चा घ्या. या चर्चेच्या वेळी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री श्री.विलासराव देशमुख व उपमुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील यांना सभागृहात उपस्थित ठेवा. कारण यासंदर्भातील जो निर्णय घ्यावयाचा आहे तो शासनाला घ्यावयाचा असल्याने आणि या दोघांवरही प्रमुख म्हणून भिस्त असल्याने आम्ही तशी मागणी केली होती. या सर्व पार्श्वभूमीवर आम्ही आग्रह धरला होता. मात्र त्याचे वर्णन सन्माननीय सदस्य डॉ.एम.पी.हिराणी यांनी 'गदारोळ', 'गोंधळ' या शब्दांमध्ये केले त्याबद्दल प्रथम मी माझी नापसंती व्यक्त करतो. विरोधी पक्षाचा तसा तो अधिकार आहे आणि लोकशाहीच्या प्रथा त्यांना कळल्या नाहीत, असे वाटते. न्याय मिळत नसेल तर विरोधी पक्षाला दुसरे कोणते साधन आहे ? एक मागणी केली आणि त्या मागणीच्यासंदर्भात आग्रह धरला, तसा तो लोकशाहीमध्ये हक्क आहे, तो आम्ही बजावला. सन्माननीय सदस्य डॉ.एम.पी.हिराणी हे आता माझे बोलणे ऐकत नाहीत कारण ते माननीय मुख्यमंत्र्यांशी चर्चा करीत आहेत. त्यांना समजावे या उद्देशाने मी बोलत आहे. सन्माननीय मुख्यमंत्री हे अधिवेशन सुरु झाल्यानंतर आज प्रथमच या सभागृहात आले आहेत आणि त्यांच्यासमोर या विषयावर चर्चा होत आहे, ही फार चांगली गोष्ट आहे.

श्री.विलासराव देशमुख : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांचे विचार ऐकून काही सुधारणा करता येतील या हेतुने मी सभागृहात आलो आहे. सन्माननीय सदस्यांच्या बोलण्याकडे माझ ो पूर्ण लक्ष आहे.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, माझ्या बोलण्याचा उद्देश सन्माननीय मुख्यमंत्र्यांच्या लक्षात आला नाही. अधिवेशन सुरु झाल्यानंतर या सदनामध्ये आज प्रथमच ते आले आहेत. म्हणून मी तसा उल्लेख केला. दुसरा कोणताही उद्देश नव्हता.

श्री.विलासराव देशमुख : आपण तशी संधी मला दिली नाही.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, आमच्याकडे रोज संधी होती. असो. आज ते या ठिकाणी उपस्थित आहेत, याचा आम्हाला आनंद वाटतो. कमीतकमी शेतक-यांच्या ज्या व्यथा

...2.........



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार.........

आहेत, वेदना आहेत, दुःख आहे, यातना आहेत त्या समजून घेण्यासाठी ते आले आहेत, असे मी समजतो. विधानसभेमध्ये या विषयावर चर्चा झाली आहे, सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी उत्तरही दिले आहे. त्यापेक्षा नवीन वेदना, यातना आम्ही येथे सांगणार नाही, त्या सारख्याच आहेत. त्यावर इलाज काय करायचा, हा सर्वांच्यादृष्टीने महत्वाचा प्रश्न आहे. यासदर्भात बोलतांना डॉ.एम.पी.हिराणी यांनी जे वक्तव्य केले त्यासंदर्भात मी खुलासा केला आहे, त्यांनी तो ऐकला नाही पण तो रेकॉर्डवर आला आहे. ठीक आहे.

सभापती महोदय, शेतक-यांच्या आत्महत्यासंदर्भात सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी निरनिराळया मुलाखती दिल्या. त्यांच्या मुलाखतीवरुन एक गोष्ट लक्षात आली की, शेतक-यांवर जे कर्ज आहे ते 7500 कोटी रुपयांचे आहे, या कर्जाचा हा प्रश्न आहे. हे कर्ज माफ करावयाचे असेल तर केंद्राकडे तशा प्रकारची विनंती करावयास हवी, केंद्राने ग्रीन सिग्नल दिला तर महाराष्ट्र शासन पुढील पाऊल केंद्राच्या सल्ल्याने उचलेल, अशाप्रकारचा उल्लेख त्यांच्या मुलाखतीतून व्यक्त केला गेला. मला एक गोष्ट कळली नाही की, या सदनामध्ये मी सूचना मांडली होती की, महाराष्ट्र राज्याची इच्छा असेल तर जे सन्माननीय शेतकरी आत्महत्या करीत आहेत किंवा आत्महत्या करण्याच्या मार्गावर आहेत त्यांच्या आत्महत्या थांबवावयाच्या उद्देशाने काही निर्णय घ्यायचा असेल तर सुदैवाने हिवाळी अधिवेशन विदर्भातील नागपूरमध्ये सुरु आहे, आत्महत्या करणारे जास्तीत जास्त शेतकरी हे विदर्भातील आहेत, यादृष्टीकोनातून जो काही निर्णय घ्यावयाचा असेल तो त्यावेळी घ्या. मी अशीही सूचना केली होती की, दोन्ही सदनामध्ये प्रस्ताव मांडा, 7500 कोटी रुपयांचे कर्ज माफ करावे, असा प्रस्ताव मंजूर करुन तो केंद्र सरकारकडे पाठवा आणि त्यानंतर त्याचा पाठपुरावा करा, त्यादृष्टीने केंद्र सरकारशी वाटाघाटी करा. असे केले असते तर शेतक-यांपर्यन्त असा मेसेज गेला असता की, हे सभागृह, महाराष्ट्र सरकार आमच्या पाठीशी उभे आहे. आमच्या यातना, वेदना, दुःख दूर करण्यासाठी प्रयत्नशील आहेत. माननीय मुख्यमंत्र्यांनी मुलाखतीत जे वक्तव्य केले त्यामध्ये अशाप्रकारचा उल्लेख नव्हता, त्यामुळे मी माझ्या सूचनेची पुनरावृत्ती केली आहे. सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी त्यांच्या मुलाखतीत केलेल्या आणखी एका वक्तव्याचा मला विषाद वाटला, दुःख वाटले. त्यांनी असे म्हटले की, विदर्भातील अधिवेशन सुरु झाल्यानंतर वा त्या सुमारास शेतक-यांच्या आत्महत्येचे प्रमाण कमी झाले आहे, हे दिलासा देणारे आहे.

यानंतर श्री.बोरले.........

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार ...........

त्याऐवजी माननीय मुख्यमंत्र्यांनी असे स्टेटमेंट करावयास पाहिजे की, आजपर्यंत शेतक-यांच्या ज्या आत्महत्या झाल्या त्याबद्दल आम्हाला वेदना होतात, त्याचे आम्हाला दु:ख आहे, यापुढे एकाही शेतक-याची आत्महत्या होणार नाही याची जबाबदारी घेण्यास महाराष्ट्र शासन तयार आहे आणि त्यासाठी लागणारी उपाययोजना आम्ही अवश्य करु. यापुढे एकाही शेतक-याची आत्महत्या झाली तर ते महाराष्ट्रासारख्या नंबर एकच्या राज्याला काळिमा फासणारे आहे. महाराष्ट्र राज्य नंबर एकचे राज्य आहे अशी जाहिरात आपण करतो. त्याला हे काळिमा फासणारे स्टेटमेंट आहे. महाराष्ट्र राज्य शेतक-यांच्या आत्महत्यांच्याबाबतीत नंबर एक वर आहे. पण हा नंबर एक आपल्याला नको आहे. शेतक-यांच्या आत्महत्यांच्याबाबतीत आपला नंबर शेवटचा असला पाहिजे. मागील 50-60 वर्षामध्ये महाराष्ट्रातील शेतक-यांवर असा प्रसंग आला नव्हता. 4-5 वर्षामध्ये हा प्रसंग आलेला आहे. त्याच्या पाठीमागची कारणे शोधून काढली पाहिजे. शासकीय यंत्रणा खीळखीळी झालेली आहे, शासन शेतक-यांना जी मदत करते ती मदत शेतक-यांपर्यंत पोहोचत नाही. शासकीय अधिकारी घोटाळे करतात. सहकारी बँकाँमध्ये घोटाळे होतात. शेतक-यांनी घेतलेल्या कर्जाची मुद्दल वसूल झाली परंतु शेतक-यांना व्याजासाठी त्रास दिला जातो. हे सर्व तपासून बघण्याची आवश्यकता आहे. तपासून बघितले तर असे लक्षात येईल की, कर्जाची मुद्दल वसूल झालेली आहे. परंतु शेतक-यांकडून व्याज वसूल केले जाते. सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी यासंदर्भातील एक उदाहरण सभागृहामध्ये मांडले. याचा अर्थ असा आहे की, अशा घटना घडत आहेत. सहकार खाते हे असहकार खाते झालेले आहे. त्यांचे सर्व नोंदणी कार्यालये भ्रष्टाचाराचे मोठे कुरण बनलेले आहे. त्यांच्यावर कोणाचेही कंट्रोल राहिलेले नाही. त्यांच्यावर सहकार मंत्र्यांचे देखील कंट्रोल नाही. त्याचा परिणाम असा दिसून येतो की, सहकार खाते हे सर्व बाजूने लोकांना दु:खदायक ठरत आहे. माननीय मुख्यमंत्री महोदयांनी या गोष्टींकडे लक्ष दिले पाहिजे. खरोखर वस्तुस्थिती काय आहे ? राज्य सहकारी बँका आणि इतर ज्या छोटया बँका आहेत त्यामध्ये घोटाळे झालेले आहेत. हजारो कोटी रुपयांची रक्कम गायब झालेली आहे. शेकडो कोटी रुपये बरबाद झालेले आहेत. परंतु दोषींना शिक्षा झालेली नाही. शेतकरी त्यांचे पैसे भरु शकला नाही तर तो स्वत:ला शिक्षा करतो आणि स्वत:चे जीवन संपूवन घेतो. ही खरोखर वेदना

..2..........

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार.........

देणारी घटना आहे, अशा प्रकारच्या घटना महाराष्ट्रात वाढू नयेत म्हणून प्रयत्न करणे हे महाराष्ट्र शासनाचे कर्तव्य आहे. सभापती महोदया आपण मघाशी आपल्या भाषणामध्ये उल्लेख केला की, ही सर्वांची जबाबदारी आहे. याला केवळ शासन जबाबदार आहे, असे मी म्हणणार नाही. राजकारणामध्ये जे भाग घेतात, राजकारणामध्ये ज्यांचे कॉन्ट्रीब्युशन आहे त्यांच्यावर मार्ग शोधण्याची व यावर इलाज करण्याची जबाबदारी आहे. यासाठी शासनाचे धोरण सर्वांना सामावून घेणारे असले पाहिजे व यावर उपाययोजना करण्याची शासनाची मानसिकता असली पाहिजे. यामध्ये मुख्य जबाबदारी शासनाची आहे. आम्ही त्यांना पाठिंबा देऊ. हे सर्व सदस्यांचे काम आहे आणि सर्व सदस्य हे काम करतील. आपल्यासमोर एकच गोष्ट आहे आणि ती म्हणजे शेतक-यांच्या आत्महत्या थांबविणे. मानवतेच्या दृष्टीकोनातून या गोष्टींवर इलाज होणे ही काळाची गरज आहे. ही गरज आपण भागविली नाही तर आपण आपल्या कर्तव्यात कसूर करीत आहोत असा त्याचा अर्थ निघेल. आत्महत्यांचे प्रमाण पूर्वीपेक्षा कमी झाले असले तरी त्यात समाधान मानू नका. नागपूरला आल्यानंतर आम्हाला पहिली बातमी वाचावयास मिळाली की, 3 जिल्यामध्ये तीन शेतक-यांनी आत्महत्या केल्या. एकही दिवस असा जात नाही की, शेतक-यांच्या आत्महत्या होत नाहीत. त्याची अनेक कारणे आहेत. There are multiple reasons for these suicides. पण त्याचा अर्थ असा नाही की, याकडे दुर्लक्ष व्हावे. शासनाने शेतक-यांच्या आत्महत्यांची जी कारणे सांगितली ती योग्य नाहीत. दारुचे व्यसन हे त्याचे प्रमुख कारण आहे, असे सांगितले जाते.

यानंतर कु.जयश्री.........

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

JPK/ SBT/MMP यापूर्वी श्री.बोरले...... 11:55

श्री.मधुकर सरपोतदार......

माझा शासनाला प्रश्न आहे की, ही दारुबंदी केली तुमच्याकडे दारुबंदी व उत्पादन शुल्क या नावाचे एक खाते सुध्दा आहे. या खात्याला एक मंत्रीदेखील आहे. जर दारुबंदी खाते आणि त्याचा मंत्री आपल्याकडे असतांना हा शेतकरी व्यसनाधीन होतो मग कसा याचा अर्थ असा होतो की, दारुबंदी खात्याची यंत्रणा उपलब्ध असूनही दारुच्या भट्टया, साधने ही सर्व माहिती असताना देखील त्याबाबत कुठलीच कारवाई होती नाही. म्हणजेच दारुबंदी या खात्यावर शासन जो पैसा खर्च करीत आहात, तो सर्व खर्च अनाठायी खर्च आहे, असे म्हटले तर ते चुकीचे ठरणार नाही. That is a futile exercise. दारुबंदी तुम्ही हटवून टाका, ज्यांना दारु प्यावयाची आहे त्यांना पिऊ द्या. कारण एक प्रकारे जे दारु पित नाहीत त्यांना सुध्दा दारु प्या असे सांगण्याची जबाबदारी हे पोलीस खातेच करीत आहेच. खेडेगावांमध्ये दारुच्या भट्टया चालू करा, असे सांगण्याचे काम पोलीस खाते करीत आहे, कारण त्यांचे ते एक प्रकारे उत्पन्नाचे साधन होऊन बसले आहे. या पार्श्वभूमीवर हे कारण शासनाने देऊ नये की, शेतक-यांच्या दारुच्या व्यसनामुळे त्यांचे कुटुंब उध्वस्त झाले आणि त्यांनी आत्महत्या केली. दारुबंदी खाते अस्तित्वात असतांना जर शेतकरी व्यसनाधिन होत असतील तर दारुबंदीच्या संदर्भामध्ये शासनाचे प्रयत्न कोठेतरी तोकडे पडत असतील, असा त्याचा अर्थ होतो. शेतक-यांच्या आत्महत्येमागे त्यांच्या व्यक्तिगत कारणांप्रमाणेच कर्जबाजारीपणा हे देखील अत्यंत महत्वाचे कारण आहे.

**तालिका सभापती ( श्रीमती उषाताई दराडे )** : सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार आपण आपले भाषण पाच ते सात मिनिटांमध्ये पूर्ण करावे, कारण सदर विषयावर अजून पाच ते सात सन्माननीय सदस्यांना बोलावयाचे आहे.

श्री.मधुकर सरपोतदार : माननीय सभापती महोदया, आपण जर म्हणत असणार तर मी आताच खाली बसतो.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार आपण आपले मुद्दे लवकरात लवकर कव्हर करावे याकरिता मी सांगितले.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदया,मी मुद्दयांची पुनरावृत्ती करीत नसून एक एक मुद्दयांवर येतच आहे. आता दारुबंदी या मुद्दयावर मी थोडेसे बोलणार आहे.

........2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( सभापतीस्थानी : माननीय उपसभापती )**

श्री. मधुकर सरपोतदार .....

सभापती महोदय, आपल्याकडे दारुबंदी खाते आहे. कालच पुरवणी मागण्यांवर बोलतांना दारुबंदी करण्याकरिता लागणारा निधी अपूर्ण असून राज्यात दारुबंदी पूर्णपणे झालेली नाही, असे सांगण्यात आले. दारुबंदीचे धोरण जाहीर केले असतांना देखील आजच्या परिस्थितीत देखील राज्यात दारुच्या भट्टया व कारखाने ओपनली सुरुच आहेत. तसेच राज्यात दारुबंदीचे धोरण सरकारने जाहीर केलेले असतांनाही दारु विकण्याचे आणि दारु पिण्याचे परवाने मिळण्यास सुरुवात झालेली आहे. म्हणून शासनाने आपले दारुबंदी खाते आता बंद करुन टाकावे. दारुचे एखादे कोणते नवीन मॉडेल, एखादे प्रॉडक्शन बाजारात आले तर त्यावर महात्मा गांधींचे नाव छापा, म्हणजे दारु पिण्यास सगळे मोकळे होतील. देशात दारुबंदी व्हावी, असा त्यांचा आग्रह होता, परंतु आता राष्ट्रपिता महात्मा गांधी नाहीत. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर 60 वर्ष उलटून देखील दारुबंदीच्या बाबतीत परिस्थितीत बदल झाला नाही उलट दारु पिणे वाढतच चालले आहे. तरीही दारु पिऊन शेतकरी कर्जबाजारी झाले आणि म्हणून ते आत्महत्या करीत आहेत, हे कारण शासनाने देऊ नये, असे मला वाटते.

दुसरा मुद्दा या ठिकाणी मला असा सांगावयाचा आहे की, सभापती महोदय, विजेचे भारनियमन, या विजेच्या भारनियमनामुळे अनेक शेतक-यांचे हाल झालेले आहेत. विजेच्या भारनियमनावर देखील या सभागृहामध्ये एक स्वतंत्र चर्चा होणे आवश्यक होते,परंतु त्याकरिता या सत्रामध्ये आणखी किती वर्किंग डेज आहेत, हे मला माहित नाही. लोड शेडिंग हा देखील एक अत्यंत महत्वाचा मुद्दा आहे. विजेच्या कमतरतेमुळे अनेक ठिकाणी शेतक-यांना पणी मिळत नाही,शेतीला पाणी मिळत नाही. शेती व्यवसाय त्यामुळे बंद पडण्याच्या मार्गावर आहे. विजेची कमतरता हे सुध्दा शेतक-यांच्या आत्महत्येचे एक कारण असू शकते. यावर आता इलाज करण्याची आवश्यकता आहे. पाण्याच्या उपलब्धततेवर देखील शेतक-याची शेती अवलंबून असते.

सभापती महोदय, आणखी एक मुद्दा असा आहे की, राज्यातील ज्या ज्या ठिकाणी रासायनिक व सेंद्रिय खतांचे वाटप शेतक-यांना केले जाते, तेथे सुध्दा शासनाला लक्ष घालण्याची आवश्यकता आहे. कधी कधी जी खते शेतक-यांना पुरविली जातात, ती बोगस असतात. जे

.....3

अशुध्दित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

बियाणे शेतक-यांना पुरविले जाते, किंवा अनेक ठिकाणी शेतक-यांकडून जी बियाणे खरेदी केली जातात, ती देखील बोगस असतात, ही बोगस बियाणे व खते कोठून आणली जातात, ती शेतक-यांना का विकली जातात आणि हे बोगस बियाणे घेऊन शेतकरी कसा फसविला जातो हे पडताळण्याची किंवा तपासण्याची आवश्यकता आहे. आपल्याकडे शेतकी खाते आहे, त्या खात्याला एक मंत्री देखील आहे. शेतक-यांना कोणत्या दर्जाचे बी-बियाणे, खते पुरविली जातात ? हे पाहणे त्या मंत्र्यांची जबाबदारी आहे. ज्या भागामध्ये शेतीचे बियाणे,खते विकली जातात. ती जेन्युईनली विकली जातात का? ती योग्य आहेत की, अयोग्य आहेत ? हे पाहण्याची जबाबदारी या खात्याची आहे. हे तपासून यांच्यावर काहीतरी इलाज शोधणे आवश्यक आहे. शेतक-यांच्या कर्जावरील व्याज या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी हे विस्ताराने बोललेले आहेत. मी एकच सांगेन की, शासनाने जूनमध्ये असे धोरण जाहीर केले की, आम्ही शेतक-यांना सहा टक्के दराने कर्ज उपलब्ध करुन देऊ आणि शेतक-यांकडून कोणत्याही परिस्थितीत कोणत्याही कारणास्तव सहा टक्क्यापेक्षा जास्त व्याजदर आकारला जाणार नाही. परंतु आता शेतक-यांना किती व्याजदराने कर्ज उपलब्ध होत आहे, हे पाहण्याची जबाबदारी शासनाची आहे. जर कोणत्या बँका कर्जाच्या हप्त्यांच्या आणि व्याजाच्या वसूलीसाठी शेतक-यांची पिळवणूक करुन त्यांना त्रास देत असतील आणि आत्महत्या करण्यास प्रवृत्त करीत असतील तर त्यांना शासन झाले पाहिजे, अशा प्रकारची उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे.

यानंतर श्री.गागरे......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार .....

शेतकऱ्यांच्या आत्महत्या व कर्जमुक्तीबाबत सभागृहात चर्चा झालेली आहे. आज माननीय सदस्य श्री.कमलकिशोर कदम हे सभागृहात दिसत नाहीत. ते त्या दिवशी म्हणाले होते की, शासकीय कर्मचाऱ्यांच्या वेतनावर 80 टक्के खर्च होत आहे. कर्मचारी 10-15 हजार रुपये वेतन घेत आहेत. त्या दिवशी ते घसरले. का घसरले ? त्यांना कोणता राग होता, ते मला माहिती नाही. विषय शेतकऱ्यांना होता, मात्र राग कामगारांवर काढला आहे. हा प्रकार मला नीटसा कळाला नाही. त्यामुळे मी जरा संभ्रमात पडलो. मी सर्व सदस्यांना विचारु इच्छितो की, ते बोलले ते खरे आहे ना ? त्यांना अर्थकारण सांगायच होत तर तेवढयापुरते बोलायचे होते.

(अनेक सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात )

श्री.उल्हास पवार : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.कमलकिशोर कदम यांना महाराष्ट्राचे अर्थकारण व 80 टक्के खर्च पगारावर होत आहे, ही वस्तुस्थिती सांगायची होती.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांचे भाषण आपण शांतपणे ऐकावे. कृपया दुसरे कोणी बोलू नये.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, उद्योजकांच्या कर्जमाफीबबात लोकसभेत विषय आल्यानंतर या संपूर्ण देशामध्ये 85 हजार कोटींचे रुपयांचे उद्योजकांचे कर्ज माफ केले जाते. हजारो कोटी रुपये अन्य घटकांना माफ केले जातात. सध्या 7500 हजार कोटी रुपये शेअर्सच्या रुपाने रक्कम तुमच्याकडे जमा आहे. जवळपास 10 हजार कोटी रुपये सहकारी संस्थांच्या रुपाने तुमच्याकडे जमा आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांचे कर्ज तुम्ही माफ केलेतर फार मोठी श्रध्दा महाराष्ट्र शासनावर बसणार आहे. तुमच्या आर्थिक प्रगतीला फार मोठा फटका बसणार आहे अशी काही परिस्थिती नाही. या एका विषयाचा नीट अभ्यास केला, 7500 कोटी रुपयांचे कर्ज माफ केले आणि शेतकऱ्यांना आयुष्यातील एक संधी दिली तर फार चांगले होईल. यासाठी काही नियम व अटी घातल्या तरी काही हरकत नाही. परंतु ज्या पध्दतीने आत्महत्येचे प्रमाण वाढत चाललेले आहेत, ते कमी होईल किंवा शेतकरी आत्महत्या करणार नाहीत. अशी काळजी घेण्याची नितांत आवश्यकता आहे. ही काळजी महाराष्ट्र शासनाने घ्यावी अशी माझी विनम्र सूचना आहे. दुसरी महत्वाची गोष्ट म्हणजे शेतमालाला भाव मिळाला पाहिजे. शेतकरी शेतात राबून भाजीपाला, टमॅटो,

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार .....

कोथिंबीर, बटाटा, पेरु, गहू व कापूसाचे पीक घेतो. सभापती महोदय, मला एक बाब सांगावयाची आहे की, कापसाचा विषय अत्यंत ज्वलंत विषय आहे. आताच माननीय सदस्य डॉ.एन.पी.हिराणी यांनी सांगितले की, शासन शेतकऱ्यांच्या कापसाला योग्य तो भाव देत आहे. परंतु कापूस महामंडळाकडे किती कापूस येतो ?. बाहेरच्या बाजारात किती कापूस जातो ? याचा तौलनिक अभ्यास करावा. कोणत्या उद्देशाने कापूस महामंडळ निर्माण केले आहे ?. शेतकऱ्यांच्या शेतमालास हमीभाव देण्याच्या दृष्टीकोनातून महाराष्ट्र शासनाने 1972 पासून पावले उचलली आहेत. त्यानंतर आज आपण प्रगतीकडे जात आहोत, की अधोगतीकडे जात आहोत याचा देखील तौलनिक अभ्यास होण्याची खूप आवश्यकता आहे. शेतकरी आत्महत्या करतो, याचे महत्वाचे कारण कापसाचा भाव हे सुध्दा आहे. माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी सांगितले की, गुजरातमधील कापसाला चीनमधून मोठया प्रमाणावर मागणी आहे. महाराष्ट्रातील कापसाला तशी मागणी का असू नये ?. आमच्या शेतमालाला हा भाव का मिळू नये. आमचे शेतकरी कष्ट करीत नाहीत का ?. आमचे शेतकरी उत्पादन करीत नाही का ?. आमच्या शेतकऱ्यांनी उत्पादन केलेल्या कापसाचा दर्जा निकृष्ट आहे का ?, ज्यामुळे त्याला भाव मिळत नाही. तसे असेल तर तोच कापूस शेतकऱ्यांनी बाजारभावाप्रमाणे इतरत्र विकल्यास त्यांना जास्त पैसा मिळतो. मंडळाकडून त्यांना योग्य ते पैसे का मिळू शकत नाही ? याचा शोध घेण्याची आवश्यकता आहे असे मी माननीय सदस्य डॉ.एन.पी.हिराणी यांना सांगू इच्छितो. सध्या या मंडळामधील बहुतांशी कर्मचारी तुम्ही कमी केलेले आहेत. त्याबद्दल माझी तक्रार नाही. कर्मचारी घेणे हे तुमच्या हातात आहे. कर्मचारी काढून टाकताना कायद्याच्या दृष्टीकोनातून काही अडचण नसेल तर ते काढून टाकले जातात. हल्ली स्वेच्छानिवृत्ती म्हणजे व्ही.आर.एस. योजनेचे प्रमाण वाढत आहे. कर्मचाऱ्यांना काहीतरी प्रलोभन दाखवायचे आणि त्यांच्या हातात नारळ द्यायचा. एकदा एवढे पैसे घ्या, आणि तुम्ही बाहेर जा असे सांगितले जाते. कायम असणारे कर्मचारी बाहेर गेल्यानंतर कमी वेतनावर आणखी माणसे ठेवायची व त्यांना राबवायचे असा उद्योग महाराष्ट्रात सुरु झालेला आहे. याबाबत माननीय मुख्यमंत्री महोदयांना मला सांगावयाचे आहे. सध्या सिमेंटचा एक कारखाना बंद पडलेला आहे, याबाबत आज

.....3



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार.....

तुमच्याशी त्यांची चर्चा आहे. कामगारांचे पुढारी तेथे कामगारांची बाजू घेऊन लढत आहेत. त्यांच्या व्यथा व महाराष्ट्रातील सर्वसाधारण कर्मचाऱ्यांच्या व्यथा यामध्ये जास्त अंतर नाही. तेथे कायम कर्मचारी 600 असतील तर ती आनंदाची गोष्ट आहे. हा प्रश्न मिटला असल्याचे मुख्यमंत्री महोदय आता म्हणत आहेत. तेथे श्री.नरेश पुगालिया होते, त्यांनी व आपण पुढाकार घेऊन मध्यस्थी केली आणि मार्ग काढला आहे.

यानंतर श्री.बोरले.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DVG/ प्रथम श्री.गागरे... 12:05

श्री. मधुकर सरपोतदार.....

सर्वच बाबतीत असे घडते असे आमचे म्हणणे नाही. याबाबतीत मी आपल्याला दोष देत नाही....

( एक सन्माननीय सदस्य मध्ये बोलतात.)

आपण त्यांची वकिली कशाला करीत आहात ? मुख्यमंत्र्यांची अडचण आम्ही समजू शकतो. त्यांची अपॉइंटमेंट मिळणे किती दुरापास्त आहे याची आम्हाला कल्पना आहे. प्रत्येकाला माननीय मुख्यमंत्र्यांना भेटण्याची इच्छा असते. ही गोष्ट अशक्य आहे. विविध खात्याला विविध मंत्री दिलेले आहेत. वेगवेगळया प्रश्नासाठी त्या त्या संबंधित खात्याच्या मंत्र्यांकडे जावे. प्रत्येकाने माननीय मुख्यमंत्र्यांकडे जाण्याचा आग्रह धरणे योग्य होणार नाही. आपण हे समजून घेतले पाहिजे. परवापासून आपण येथे आपला रंग दाखवायला सुरुवात केली. आम्हाला यापूर्वी आपला रंग माहीत नव्हता. या सदनामध्ये दोन दिवसापूर्वी आपण जो धुमाकूळ घातला त्यावरुन आपण कोणत्या रंगाचे आहेत हे आम्हाला कळले.

सभापती महोदय, या दृष्टीकोनातून कामगारांचे जे प्रश्न आहेत, त्याकडे लक्ष देण्यासाठी आपण एक यंत्रणा सुरु करणे आवश्यक आहे. आता संपूर्ण यंत्रणेचे संगणकीकरण करण्यात येत आहे. त्याचा उपयोग कर्मचारी आणि कामगारांना किती होत आहे याकडे आपण लक्ष देण्याची आवश्यकता आहे. आपण मुख्यमंत्री आहात. आमच्या आपल्याकडे अपेक्षा आहेत. ज्या सुधारणा झ ााल्या, त्या तुम्ही मुख्यमंत्री असताना झाल्या असा उल्लेख होण्याची आवश्यकता आहे. अनेक मुख्यमंत्री येतात आणि जातात. आम्ही श्री. अंतुले यांचे नाव घेतो. काही जरी असले तरी त्यांनी मुंबईतील फूटपाथवरची झोपडपट्टी दूर करण्याचा धाडसी निर्णय घेतला. श्री. अंतुले यांच्या पूर्वी आणि पश्चातही कोणी घेतलेला नाही. अशाप्रकारे निर्णय घेण्यास आपण आता सुरुवात केलेली आहे. परंतु ज्या पद्धतीने व ज्या गतीने याबाबत कार्यवाही होणे आवश्यक आहे, ती गती त्यास मिळत नाही. आता चंद्रशेखर तेथे नाहीत. त्यामुळे आता पुढे काय होते हे बघायचे. आमचे काम केवळ निरिक्षण करणे हे आहे आणि आम्ही ते करीत आहोत.

सभापती महोदय, दलाल ही संस्कृती देशामधून काढून टाकणे किंवा कमीत कमी करण्याचा प्रयत्न आपण केला तर ते फार चांगले होईल. या दलालांनी देशाला सर्वत्र लुटले आहे. म्हाडामध्यें दलाल. मंत्रालयामध्ये दलाल. हायकोर्टमध्ये दलाल. शेती मालासाठी दलाल. दिल्लीमध्ये

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार.....

दलाल, गल्लीमध्ये दलाल. जिकडे जाल तिकडे दलालच दलाल आहेत. यावर ईलाज करण्याची आपल्याला आवश्यकता आहे.

माननीय मुख्यमंत्री महोदय, आपणाकडे निर्णय घेण्याची शक्ती आहे. ती शक्ती वापरुन ही दलाल पद्धत कमी केली पाहिजे. आज मुंबईमध्ये 20 मजली इमारती दलांलाकडून बांधल्या जात आहे. त्यापैकी किती इमारतीमध्ये मराठी माणूस घरे घेऊ शकतो ? यासंदर्भात युएलसी हा विषय यानंतर पुढे येणार आहे. त्यावेळी आपण नंतर बोलू. माझा प्रश्न असा आहे की, शेतकऱ्यांच्या मालाच्याबाबतीत दलालांकडून शेतकऱ्यांना नागविणाऱ्या  दलालांच्या विरोधात महाराष्ट्र शासनाने पावले उचलावीत आणि शेतकऱ्यांना दिलासा मिळवून द्यावा अशी मी माझ्या भाषणातून आपल्याकडे विनंती करु इच्छितो.

सभापती महोदय, मला येथे आणखी एक शेवटचा मुद्दा मांडावयाचा आहे. कोणत्याही परिस्थितीमध्ये शेतकऱ्यांच्या आत्महत्या या थांबल्याच पाहिजे अशा निश्चयाने आपण नागपूर मधून बाहेर पडू या.  कोणत्याही शेतकऱ्याने आत्महत्या केली तर त्याची जबाबदारी कोणावर तरी निश्चित केली पाहिजे. शेतकऱ्यांनी आत्महत्या केली तर त्या कारणाचा आपण शोध घेतला पाहिजे. प्रत्येक गोष्टीला ईलाज हा असतोच. Preventive action is alwas better then anything else. यादृष्टीने आपण काय करु शकतो, शेतकऱ्यांच्या आत्महत्या आपणास कशा थांबविता येतील यादृष्टीने आपण विचार करण्याची आवश्यकता आहे. शेतकरी हा आपला अन्नदाता आहे. त्याला आपण दिलासा दिला पाहिजे. त्याने जर शेतात काही पिकविले नाही तर तुम्ही आम्ही काय खाणार ? म्हणून आम्ही याप्रस्तावाचा आम्ही आग्रह धरला. याठिकाणी आपण चर्चेच्या शेवटच्या सत्रामध्ये उपस्थित राहिलात त्याबद्दल मी आपणास धन्यवाद देतो. या चर्चेस आपण निर्णय  देणार आहात. निर्णय देताना, मी आपणास सांगू इच्छितो की, दोन्ही सदनामध्ये यासंदर्भात प्रस्ताव करा. त्यासाठी पैसे लागत नाही परंतु त्यामधून जबाबदारी येते. जबाबदारी स्वीकारुन, जबाबदारी डोक्यावर घेऊन केंद्र शासनाच्या ऊरावर बसल्यास आपल्याला रिझल्ट मिळेल. अन्यथा केंद्राच्या मर्जीवर, केंद्राच्या मेहरबानीवर जगायचे ठरविले तर मला वाटत नाही महाराष्ट्र राज्याला कधीही न्याय मिळू शकेल. एवढी विनंती करुन मी माझे दोन शब्द येथे संपवतो.

............

यानंतर श्री. सुंबरे....

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : मी सर्व सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आता 12.10 वाजले आहेत. सभागृहाच्या ही विशेष बैठक 12.30 वाजेपर्यंत आहे. त्यानंतर 1.00 वाजता सभागृहाची नियमित बैठक सुरू होणार आहे. तेव्हा आताच्या या विशेष बैठकीमध्ये नियम 97 अन्वये चालू असलेल्या चर्चेत भाग घेणाऱ्या उर्वरित सन्माननीय सदस्यांनी थोडक्यात त्यांचे विचार मांडले तर आता या चर्चेसाठी उपस्थित असलेल्या माननीय मुख्यमंत्र्यांना या चर्चेला उत्तर देणे जास्त सोयीचे होईल. तेव्हा आता या चर्चेत भाग घेण्यासाठी 4 वक्त्यांची नावे माझ्याकडे आहेत. तरी या सर्व सदस्यांनी थोड्या वेळात आपले विचार मांडल्यास बरे होईल अन्यथा थोडे प्रॉब्लेमेटिक होईल, म्हणजे आताच सन्माननीय सदस्यांनी म्हटले की, शेतकऱ्यांच्या होणाऱ्या आत्महत्या ताडतोब थांबल्या पाहिजेत तर मग त्यासाठी या चर्चेवरील माननीय मुख्यमंत्र्यांचे उत्तराचे भाषण देखील तेवढ्याच तातडीने व्हायला लागेल याची आपण जाणीव ठेवावी. आता यानंतर सन्माननीय सदस्य श्री. पाशा पटेल हे भाषण करतील.

...... यू 2 .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सय्यद पाशा पटेल (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, नियम 97 खाली चाललेल्या चर्चेत भाग घेऊन त्याद्वारे माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे. या ठिकाणी शेतकऱ्यांच्या होत असलेल्या आत्महत्यांबत चर्चा चालू आहे. पण शेतकरी आत्महत्या कोठल्या मानसिकतेतून करतो हे मी स्वत: भोगले आहे. शेतामध्ये दारिद्र्य कसे येते आणि त्याचे चटके कसकसे बसतात हेही मी स्वत: पाहिलेले आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्या खऱ्या अर्थाने कायमच्या बंद व्हावयाच्या असतील तर काय करायला पाहिजे ? मी याबाबत माझे अनुभव कमी सांगणार आहे मात्र शासनाची या संबंधातील कागदपत्रे आणि आकडेवारीच येथे अधिक दाखवून देणार आहे. सभापती महोदय, आपण शेतकऱ्याच्या घरावर सोन्याची कौले घालून दिली आणि जर त्याच्या शेतीमालाला भाव दिला नाही तर एक दिवस ती सोन्याची कौले विकून आपले घर चालविण्याशिवाय त्याला दुसरा पर्याय राहणार नाही. तेव्हा आत्महत्या खऱ्या अर्थाने थांबवावयाच्या असतील तर 2001 ते 2008 या वर्षांतील सरकारची आकडेवारीच मी आपल्या समोर मांडणार आहे.

सभापती महोदय, आपल्या राज्यातील शेतीमालाचे भाव हे राज्य शेतीमाल समितीच्या मार्फत निश्चित केले जातात आणि हे भाव केंद्रीय शेतीमाल समितीकडे पाठविले जातात आणि ती केंद्रीय समिती ते भाव जाहीर करीत असते. या दोन समित्यांच्या भावातील तफावत आपण पाहिली तर आपल्या सारे लक्षात येईल. मी आपणास यासंबंधातील आकडेवारी वाचून दाखवितो. 2001-02 मध्ये भाताच्या पीकासाठी आपल्या राज्य शेतीमाल समितीने 974.66 रूपये इतका भाव केंद्रीय समितीकडे सुचविला होता आणि केंद्रीय समितीने जो भाव यासाठी जाहीर केला तो केवळ 530 रूपये. म्हणजे जवळपास 400 रूपये कमी भाव केंद्रीय समितीने राज्य समितीने सुचविल्यापेक्षा कमी जाहीर केला. त्यानंतर 2002-03 मध्ये राज्य समितीने 859.64 रूपये भाव सुचविला असता केंद्रीय समितीने 550 रूपयेच भाव जाहीर केला. त्यानंतर 2005-06 मध्ये राज्य समितीने 927.61 रूपये भाव सुचविला असता केंद्रीय समितीने 550 रूपये भाव जाहीर केला. म्हणजे एका एका क्विंटलमागे अशा प्रकारे 300-400 रूपये कमी भाव केंद्रीय समितीने जाहीर केला आहे. शेतकऱ्याचा लादेखील 10 ते 50 क्विंटल इतका असतो आणि अशा प्रकारे एका एका क्विंटलमागे 400 रूपये भाव कमी शेतकऱ्याला मिळत असतील तर तो जगेल कसा ? जशी भाताच्याबाबतीत परिस्थिती आहे तशीच

...... यू 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

26-11-2007 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) U 2

KBS/ कु. धनश्री नंतर --- 12:10

परिस्थिती बाजरीच्या बाबतीत देखील आहे. त्यासाठी राज्य समितीने 1050 रूपये सुचविले असताना केंद्रीय समितीनेकेवळ 485 रूपये भाव जाहीर केला. सभापती महोदय, वेळ कमी असल्याने शेवटी मी सांगू इच्छितो की, राज्य समितीने 2007 मध्ये 975.20 रूपये भाव सुचविला असता केंद्रीय समितीने मात्र केवळ 600 रूपये भाव जाहीर केला. तीच गोष्ट शेंगदाण्याच्या बाबतीत. राज्य समितीने शेंगदाण्यासाठी रूपये 2594.74 इतका भाव सुचविला असताना केंद्रीय समितीने मात्र 1982 रूपये भाव जाहीर केला. या वर्षाच्या शेवटी हा भाव 2213 रूपये राज्य समितीने सुचविला असता केंद्रीय समितीने हा भाव 1520 रूपये इतका जाहीर केला आहे. ....

( यानंतर श्री. सरफरे ..... व्ही 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पाशा पटेल...

सभापती महोदय, तूर आणि माननीय मुख्यमंत्री यांचा बराच संबंध आहे. त्यांच्या भागामध्ये तूरीचे उत्पादन फार मोठया प्रमाणात होते. तूरीला राज्य शेत माल भाव समितीने 2422.60 पैसे हा भाव दिला आणि केंद्र शासनाने 1320 रुपये भाव जाहीर केला. शेवटचे आकडे वाचून दाखवितो. सन 2007 मध्ये 2190.51 पैसे भाव राज्याने सुचविला तर केंद्राने 1580 रुपये भाव दिला. म्हणजे असा भाव दिला गेला तर बाजरी, तूरदाळ जगणार नाही, कॉटन टिकणार नाही. केंद्र व राज्य यांच्या भावामध्ये एका क्विंटलमागे 1200 ते 1500 रुपये कमी दाखविले गेले आहेत. राज्य शेतमाल भाव समिती आणि केंद्र शासनाच्या शेतमाल भाव समितीने ठरविलेल्या किंमतीमध्ये 350 रुपयांपासून 1300 रुपयांपर्यत एकेका क्विंटलमागे कमी पैसे मिळत असतील तर आपण कितीही प्रयत्न केले, धोरण सुचविले तरी महाराष्ट्रातील शेतकऱ्याचे मरण थांबणार नाही. तुम्ही एक पॅकेज किंवा दोन पॅकेज जाहीर केले किंवा त्याला पेग दिला तर फरक पडणार नाही. तुम्ही एका समितीऐवजी 20 समित्या केल्या तरी फरक पडणार नाही. फक्त सरकारचे कर्तव्य सरकारने पार पाडले पाहिजे. त्या संदर्भात मी आपणास सांगू इच्छितो की, राज्यातील पिकांना उत्पादन खर्चावर आधारित, जास्त किंमतीवर आधारित योग्य भाव मिळत नसल्यामुळे केंद्रिय शेतमाल खर्च व किंमत आयोग नवी दिल्ली यांच्या समितीवर राज्य शासनाचा मंत्री स्तरावरील राज्य शेत माल समितीतील प्रतिनिधी नेमण्याबाबत केंद्र शासनाला विनंती करावी. जेणेकरुन सदर प्रतिनिधी हा राज्य शेतमाल भाव समितीने शिफारस केलेल्या शिफारशी केंद्र शासनापुढे मांडू शकेल असा ठराव दिनांक 18 जुलै 2006 रोजी मा. कृषिमंत्री यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या 109 व्या बैठकीमध्ये निर्णय घेण्यात आलेला होता. त्यानुसार मा. कृषिमंत्री यांचे अर्ध शासकीय पत्र क्र. एसीपी/सीएसीपी/रब्बी.6/333 दिनांक 29 ऑगस्ट 2006 नुसार केंद्र शासनास कळविण्यात आलेले आहे. म्हणजे आम्ही जे सुचवितो ते देत नाही. त्यासाठी तुमच्या बैठकीमध्ये चर्चा होते. तो भाव कसा दिला जातो? हे पाहिले तर हा शेतकरी कसा वाचेल? तो वाचण्याची शक्यता नाही. या बाबतीत मी आपणास दोन-तीन गोष्टी सांगणार आहे. खरे म्हणजे मी जरी शेतकरी असलो तरी हा अर्थशास्त्राचा विषय असल्यामुळे मी त्यावर तासभर बोलू शकतो. सन 2007-08 चे ज्वारीचे प्रति हेक्टरी उत्पादन खर्च.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विलासराव देशमुख : सभापती महोदय, माननीय सदस्य हे कोणत्याही पक्षाचे सदस्य म्हणून बोलत नाहीत तर ते शेतकरी संघटना म्हणून बोलत आहेत. तेव्हा आपण त्यांना अधिक वेळ बोलण्यास परवानगी द्यावी अशी विनंती करतो.

श्री. पाशा पटेल : सभापती महोदय, मी दोन महत्वाच्या गोष्टी सांगणार आहे. ज्वारीच्या पिकाचा प्रति हेक्टरी उत्पादन खर्च कसा काढला जातो? राज्य शासनाच्या पध्दतीनुसार त्यामध्ये दोन गोष्टी आहेत. शेतीवर लागणारे रोजंदारीवरील मजूर, यामध्ये पुरुषांची मजूरी 66.41 पैसे पकडण्यात आली आहे तर स्त्री मजुराची मजूरी 47 रुपये पकडण्यात आली आहे. रोजंदारीवरील मजूर आणि कौटुंबिक मजूर अशी विभागणी केली आहे. शेतकऱ्याचे कुटुंब हे शेतामध्ये राबते, त्यांची कौटुंबिक मजूरी धरली आहे. बाकीचे उरलेले मजूर आहेत त्यांना रोजंदारीवरील मजूर धरले जाते. अशाप्रकारे रोजंदारीवरील पुरुष मजूराला 66.41 पैसे आणि स्त्री मजूराला 47 रुपये मजुरी दाखविली आहे. त्याचप्रमाणे कौटुंबिक मजुरांमध्ये पुरुष मजुराला 83.03 पैसे आणि स्त्री मजुराला 58.75 पैसे पकडण्यात आले आहेत.

(यानंतर श्री. बरवड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पाशा पटेल .....

एक गोष्ट मी माननीय मुख्यमंत्र्यांच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, आपण शेतीमध्ये काम करणाऱ्याला 66 रुपये मजुरी पडकली. या ठिकाणी बसणारे आपण सर्व आमदार आहोत. जर आपण मुख्यमंत्री नसता आणि बाभळगावच्या शेतावर गेला असता तर आपली मजुरी 66 रुपये पकडली गेली असती. दु:ख एका गोष्टीचे आहे की, व्यवसाय बदलला की मजुरी बदलते. या देशामध्ये न्याय, समता आणि बंधुता असे जर बोलले जात असेल तर शेतीमध्ये काम करणाऱ्या माणसाची मजुरी ठरविताना अशाच पध्दतीने जी ठरविली गेली त्याबाबत विचार करणे गरजेचे आहे. एक बी.एस्सी. अग्री झालेला कृषी अधिकारी आणि शेतामध्ये काम करणारा मजूर यांच्या बाबतीत पाहिले तर बी.एस्सी.ॲग्री. झालेल्या माणसाला आठ हजार रुपये, दहा हजार रुपये, बारा हजार रुपये पगार मिळतो. म्हणजे त्याला 300 रुपये, 400 रुपये, 500 ते 600 रुपये रोज मिळतो आणि शेकऱ्याला 66 रुपये मिळतात. त्या दोघांमध्ये काय फरक आहे ? त्यांच्यातील फरक पहावयाचा असेल कोणत्याही कृषी अधिकाऱ्याला तिफनीवर थांबून पेरावयास सांगा. सन्माननीय सदस्य श्री. उल्हास पवार साहेब, आपण लक्षात घ्यावे. विषय भयानक आहे. सन्माननीय सदस्य श्री. जैन साहेब, गुजराथी साहेब, आपण जरा ऐकावे. आपण दोघेही हुशार सन्माननीय सदस्य आहात. आपण माझे शुभचिंतक आहेत म्हणून मी म्हणालो की, माझे म्हणणे ऐकून घ्यावे. शेतकरी मरु नये अशी सगळ्याची खरोखर इच्छा असेल तर यामध्ये कृपाकरुन पक्ष आणू नका. आपले काय आहे हे बघणे महत्वाचे आहे. बी.एस्सी ॲग्री. झालेला कृषी अधिकारी असेल तो शेतामध्ये जातो आणि शेतकऱ्याला सांगतो की, हे बियाणे घे, हे औषध लाव, असं घोळ, असं चोळ, तीन इंच असे आणि दोन फूट असं लाव असे सांगतो. परंतु शेतकरी स्वत: काय करतो ? तो तिफनीवर थांबतो. कुठले बी वर घालायचं, कुठलं बी खाली घालायचं हे त्याला कळते. तीन चार बोटांनी तीन नळ्यांमध्ये बियाणांचे सारखे प्रमाण टाकतो. सहा इंचावर म्हणजे सहाच इंचावर बियाणे पडते आणि चार इंच खोल म्हणजे चारच इंच खोलीवर बियाणे पडते. तसेच रेषा सुध्दा सरळ काढतो. या माणसाला मजुरी 66 रुपये मिळते आणि जो असे घाला आणि असे घोळा म्हणतो त्याला 600 रुपये मिळतात. शेतकरी कसा वाचेल ? या गोष्टीचा विचार करण्याची गरज आहे. आपण एक गोष्ट लक्षात घ्यावी.

...2...

असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

बरवड

श्री. पाशा पटेल ....

या कृषी अधिकाऱ्याला रानात नेऊन झोपवा आणि त्याला रात्री 2.00 वाजता उठवून किती वाजले असे विचारा. तो म्हणणार माझ्याकडे घड्याळच नाही, मी कसे सांगणार ? परंतु शेतात काम करणाऱ्या गुराख्याला रात्री 2.00 वाजता उठवा आणि किती वाजले ते विचारा. तो आकाशाकडे बघतो. ग्रह ताऱ्यांकडे बघतो. तो खगोल शास्त्राचा अभ्यासक आहे. तो म्हणतो रात्रीचे 2.00 वाजले आहेत. तो खगोलशास्त्र सांगतो. कृषी अधिकारी ते सांगू शकत नाही. मृग नक्षत्रामध्ये पाऊस येतो. कृषी अधिकारी सांगू शकत नाही. परंतु आमच्या गावातील माणूस म्हणतो लाल किडे पडले, कुंभारी वारे सुटले म्हणजे 15 दिवस पाऊस येत नाही. म्हणजे हवामान शास्त्राचा अभ्यास ज्या माणसाला आहे तो अकुशल. ग्रह ताऱ्यांचा अभ्यास ज्याला आहे तो अकुशल. ज्याला पेरणीचे सगळे कळते त्याला अकुशल म्हणतो. त्याला अकुशल म्हणून 66 रुपये दिले गेले आणि बाकीच्यांना 600 रुपये दिले गेले. हा माणूस जीवंत राहणार की मरणार हे आपण ठरवावे. मी आपल्याला एक विनंती करतो. एवढयाच पेपरवर जर राज्य शासनाने अभ्यास केला तर माननीय मुख्यमंत्री साहेब, महाराष्ट्रातील जनता एक हजार वर्षे आपले नाव घेतल्याशिवाय राहणार नाही. कारण सगळी वरवरची औषधे आहेत. अहो, शरिरावर फोड झाले. सगळे जण मलम लावावयास लागला आहे पण रक्त नासले आहे त्याचा कोणी विचार करणार आहे की नाही ? मुळात रक्त नासले आहे आणि या गोष्टीचे राजकारण करुन आपण ही गोष्ट टाळणार असाल तर तुम्ही काहीही उपाय योजले तरी महाराष्ट्रातील आणि देशातील शेतकरी वाचण्याची सूतराम शक्यता नाही. मी दुसरी आणखी एक महत्वाची गोष्ट सांगणार आहे आणि ती म्हणजे पीक बुडीचा घोका. या देशातील जेवढे कारखाने आहेत आणि ज्या ज्या वस्तू त्या कारखान्यामध्ये तयार होतात, उदा. काचेचे बल्ब बनविण्याचा कारखाना असेल आणि 100 बल्बची काच टाकली तर 100 बल्ब बाहेर येत नाहीत. 80 बल्ब बाहेर येतात. 20 बल्ब फुटतात. हे कारखानदार फुटलेल्या बल्बचाही खर्च लावतात. पण शेतीमध्ये असे होत नाही. चार वर्षातून हमखास एकदा पीक जाते. कधी पाऊस जास्त पडल्याने तर कधी पाऊस कमी पडल्याने तर कधी रोग पडल्याने चार वर्षात एकदा पीक

...3...

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. पाशा पटेल ....

गेलेच म्हणून समजा. उरलेल्या तीन वर्षाच्या पिकावर गेलेल्या एक वर्षाच्या पिकाचा मोबदला न लावता जरी दुष्काळ पडला तरी तो रोजगार हमी योजनेची मागणी मान्य करणार नाही. तो आपल्या शेताचे मेन्टेनन्स करील. झुडपे तोडील, बंधाऱ्याचे काम करील अशी बरीच कामे आहे ती तो करील.

यानंतर श्री.शिगम..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ पूर्वी श्री. बरवड 12:25

(श्री. पाशा पटेल...)

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्रीमती उषाताई दराडे)**

ती गोष्ट यामध्ये घेणे गरजेचे आहे. उत्पादन खर्चामध्ये जमिनीचा घसारा धरला जात नाही. अवजारे, शेतघर यांचा घसारा 226 रुपये दाखविलेला आहे. पण जमिनीचा घसारा दाखविलेला नाही. देशातील कारखान्यांमध्ये प्रत्येक गोष्टीवरील खर्च हा उत्पादन खर्चामध्ये धरला जातो. परंतु शेतीच्या बाबतीत तसे होत नाही. वातानुकूलित दालनामध्ये बसून गभ्रू लोक प्लॅनिंग करतात. त्यांनी शेतीचा घसारा धरलेला नाही. सभापती महोदय, सगळ्यात मजेशीर गोष्ट आहे. ज्वारी काढण्यासाठी बैलाची मजुरी धरली. आपण सर्व शेतातील माणसे आहोत. बैलांना शेतामध्ये किती दिवस घेऊन जावे लागते हे आपणास माहीत आहे. सभापती महोदय, ज्वारीच्या उत्पादन खर्चामध्ये बैलाच्या 13 दिवसाची मजुरी धरलेली आहे. आता 13 दिवस बैलाचा वापर शेतीसाठी केल्यानंतर उर्वरित दिवस या बैलाचे काय करायचे हा प्रश्न आहे. मग त्याच्याकडून तेरा दिवस काम करवून त्याला कुंभाराच्या गाढवाप्रमाणे उकिरड्यावर सोडून द्यायचे, किंवा तो विकायचा, नाही तर रानात मोकाळा तरी सोडून द्यायचा. 13 दिवस शेतात काम केल्यानंतर तो बैल शेतक-याला वर्षभर पोसावा लागतो. आणखी एक चमत्कारीक बाब मी आपणास सांगतो. कौटुंबिक मजुरी 14 दिवस पकडलेली आहे. मग उरलेल्या वेळेत या लोकांनी काय करावे ? सर्व शेतक-यांच्या कुटुंबामध्ये तलाठ्याला नमस्कार करण्यासाठी, आमदाराला भेटण्यासाठी एक वेगळा माणूस लागतो. तो माणूस येथे कोठेही धरलेला नाही. म्हणून शेतक-याच्या मालाची किंमत वाढू शकत नाही. ही किंमत वाढली नाही तर या देशातील शेतकरी जगू शकणार नाही. या सर्व गोष्टीचा बारकाईन अभ्यास केल्यानंतर मला असे म्हणावयाचे आहे शेतक-याच्या मालाची किंमत वाढण्यासाठी या सर्व गोष्टी करणे गरजेचे आहे. हे झाले नाही तर पुढे काय होईल हे मी सांगू शकत नाही. सगळयात महत्वाची गोष्ट ही आहे की फक्त ऊस आणि ताग शेतातून घरी आणण्याचा खर्च धरलेला आहे. अन्य कोणत्याही पिकासाठी हा खर्च धरलेला नाही, ही वस्तुस्थिती आहे. ह्या सर्व गोष्टी सरकार ठरविते. मी एक साधा कार्यकर्ता आहे. मला हे माहीत आहे की, दुस-या महायुध्दामध्ये बेचिराक झालेले जपान आज संपन्न झालेले आहे. नागासकी आणि हिरोशिमा या शहरांवर अणूबॉम्ब पडल्यानंतर सर्व बेचिराख झाले, त्या परिसरातील कोठल्या गावामध्ये बत्ती लावायला माणूस जिवंत

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..2..

(श्री. पाशा पटेल...)

राहिला नाही. त्याच वेळी भारत स्वतंत्र होत होता. आता दोन देशातील तुलना करताना गावातील फेटेवाला माणूस सांगतो की, आज जपानमधील शेतकरी हा शेतावर चार टायर असलेल्या चार चाकी कारने जातो तर आपल्या देशातील शेतकरी चपलेला टायर लावून शेतामध्ये जातो. दोन्हीकडे टायर आहे. जपानमधील शेतक-यांच्या गाडीला टायर आहेत तर आपल्या देशातील शेतक-यांच्या चपलेला टायर आहे. आज माझा देश स्वतंत्र झाल्यानंतर माझ्या देशाची ही अवस्था आहे. माझ्या देशातील शेतकरी चप्पल झिजू नये म्हणून त्याला टायर लावतो. माणूस मेला तरी चालेल पण चप्पल मरता कामा नये. कारण ती परत घेता येत नाही. सभापती महोदय, आपण दोन-तीन दिवस या विषयावर चर्चा केली.

...नंतर श्री. भोगले...

....नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ 12:30

श्री.पाशा पटेल.........

हे आपले वरिष्ठ सभागृह आहे. वरिष्ठ सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्यांना मी विनंती करणार आहे, या विषयाकडे उथळपणे कोणीच पाहू नका.

**तालिका सभापती** (श्रीमती उषाताई दराडे) : सभागृहाची वेळ दुपारी 12.50 पर्यंत वाढविण्यात येत आहे. सन्माननीय सदस्य श्री.पाशा पटेल यांनी आपले भाषण पुढे सुरु करावे.

श्री.पाशा पटेल : या सगळ्या गोष्टींचा विचार आपण सगळ्यांनी केला पाहिजे. हे केले तरच देश वाचेल, आपण वाचू. नाही तर एक लक्षात घ्या, आपल्याकडे कितीही पैसा आला आणि गाव उपाशी राहिले तर एक कोटी रुपयांना खून करायची सुपारी मिळत होती, आता ती लाखावर आली आहे, मुख्यमंत्री महोदय आता तर हजार रुपयांवर आली आहे. कोण कुणाचा कधी काटा काढेल हे कळायचे नाही. हे गुंड कशामुळे व का निर्माण झाले? त्यांना ताकद का मिळाली? कमी पैशामध्ये जीव गमावणारी मुले गुंड टोळ्यांच्या नायकाला मिळतील तोपर्यंत हे प्रकार बंद होणार नाहीत. गावातील माणसांच्या श्रमाला मोबदला अत्यंत अल्प दिला जातो हे पाप आहे. हे पाप थांबविण्याची गरज आहे. हे थांबविले नाही तर या देशाचे आणि या देशातील गावांचे भविष्य अंध:कारमय वाटते.

सभापती महोदया, माझ्या दृष्टीने मी चार-पाच महत्वाच्या सूचना करणार आहे. या देशातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबवायच्या असतील तर उत्पादन खर्चावर आधारित भाव दिला गेला पाहिजे. कर्ज मर्यादा वाढविली पाहिजे. आपण ज्वारीच्या एका हेक्टरला 2500 रुपये देतो. केव्हा देतो? घरची गाय वासरु घेऊन यायची असते तेव्हा. आता बैल गेले. आता ट्रॅक्टर आले. आता एका एकराला नांगरणीला 1200 रुपये. कोळपणीला वेगळे, पेरणीला वेगळे, खुरपणीला वेगळे पैसे द्यावे लागतात. त्यामुळे पीक कर्जाची मर्यादा वाढविली पाहिजे. कर्जाची सुध्दा मर्यादा वाढविली पाहिजे. शहरातील एका उद्योजकाने जर समजा कारखान्यासाठी कर्ज घ्यायचे ठरविले तर आणि त्याचा स्वत:चा प्लॉट असेल तर त्याला 80 टक्के कर्ज मिळते. परंतु माझी दोन लाख रुपये एकर या किंमतीची जमीन असली तरी 2500 रुपयांवर कर्ज द्यायची सोय नाही. त्यामुळे जो न्याय या देशातील उद्योगाला कर्जाबाबत दिला जातो तोच न्याय शेतीला लावला पाहिजे.

सभापती महोदय, पीक विमा योजनेबद्दल बोलायचे झाले तर पीक विम्याची पध्दत कशी आहे? पूर्ण तालुक्यातील पीक गेले तरच विमा. पिकाचा विमा जर माणसाला लावला तर कसे

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पाशा पटेल.........

होईल? एका माणसाने विमा काढला आणि तो मेला तर विमा कंपनी त्याच्या घरचा कमावता माणूस गेला म्हणून भरपाई देणार नाही, तो अधिकारी म्हणणार की, तालुक्यातील सर्व माणसे मेल्याशिवाय विम्याची भरपाई मिळणार नाही. अशी वेळ येऊ नये. जो न्याय माणसांना दिला जातो तोच न्याय पिकाला द्या. स्वतंत्र पीक विमा योजना आल्याशिवाय त्या शेतकऱ्यांचे आणि त्याच्या शेतीचे भले होणार नाही.

सभापती महोदया, बियाण्याच्या संदर्भात बोलायचे झाले तर परवा लातूरला जाताना हदगावमध्ये थांबलो होतो. बी.कॉटनमध्ये बियाण्यांचे दोन नमुने आले आहेत. एक बियाणे सपशेल लोकांना फसवायला आले आहे. त्यावर काहीही चर्चा होत नाही. त्याचबरोबर कुशल आणि अकुशल यामधील मजुरीचे दर सुधारले पाहिजेत. सगळ्यात महत्वाचे म्हणजे, शेतकऱ्यांचे कर्ज माफ झाले पाहिजे. कर्जमाफीतून शेतकरी वाचणार आहे ही भावना माझ्या मनात अजिबात नाही. परंतु कर्जमाफी केल्यामुळे सगळे पक्ष माझ्या पाठिशी आहेत, आता मला मरु देणार नाहीत ही भावना त्याच्या मनामध्ये तयार होण्यासाठीच कर्जमाफीचा उपयोग होणार आहे. त्या शेतकऱ्याचे मरण थांबणार नाही परंतु शेतकऱ्यांचा विश्वास वाढविण्यासाठी हा उपाय आहे. या विषयाबाबत ठोस निर्णय घेण्यासाठी शासनाने समिती स्थापन करावी. या समितीवर तीन-चार तज्ञ लोकांची नियुक्ती करावी. ए.सी.मध्ये बसणाऱ्या अधिकाऱ्यांवर विश्वास ठेवू नका. ते आपल्याला बुडवतील. माझ्यासारख्या हजारो कार्यकर्त्यांनी फक्त आत्महत्येचा निर्णय केला, आत्महत्या करायची मानसिकता बनविली, परंतु निर्णय करु शकले नाहीत अशापैकी मी एक वाचलेला कार्यकर्ता आहे.

(नंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

श्री. पाशा पटेल ....

सभापती महोदया, मी शेतकरी कार्यकर्ता आहे. नागपूर मध्ये हिवाळी अधिवेशन सुरु आहे असे असतांना माझ्या प्रश्नाकडे हे सरकार बघत नाही अशी या महाराष्ट्रातील तरुण शेतक-यांच्या मनामध्ये भावना निर्माण झालेली आहे, संवेदना निर्माण झालेली आहे. नागपूरच्या हिवाळी अधिवेशनामध्ये शेतक-यांच्या प्रश्नासंबंधी चर्चा सुरु आहे परंतु या चर्चेतून शेतक-याला काहीही न्याय मिळणार नाही अशी महाराष्ट्रातील शेतक-यांच्या मनात पक्की भावना निर्माण झालेली आहे. महाराष्ट्रातील 6 जिल्हयाकरता माननीय पंतप्रधांनानी 3750 कोटी रुपयांचे पॅकेज दिले होते, परंतु या पॅकेजमुळेही शेतक-यांच्या आत्महत्या काही थांबल्या गेल्या नाहीत. म्हणून मी सरकारला विनंती करतो की, माझ्या मनामध्ये एक उद्देश आहे की, "ज्या शेतकरी कुटुंबात जो जन्माला आलेला आहे त्याला जे चटके सहन करावे लागत आहे ते चटके मी सहन केलेले आहे. शेतक-याचे चटके शेतकरी नसलेला माणूस कधीही समजणार नाही. महाराष्ट्रातील 80 टक्के जनतेने हे चटके सहन केलेले आहे. या 80 टक्के शेतकरी जनतेला हे चटके सहन करावे लागणार नाही यासाठी सरकारने या विषयाकडे गंभीरतेने लक्ष देण्याची आवश्यकता आहे. शेतक-यांच्या प्रश्नाकडे सरकारने गंभीरतेने लक्ष दिले नाही तर शेतकरी जीवंत राहणार नाही. या 80 टक्के शेतक-याला चटके सहन करावे लागणार नाही असा माझा उद्देश आहे.

सभापती महोदया, 11 व्या वित्त आयोगाचा ड्राफ्ट माझ्याकडे आहे. या ड्राफ्टमध्ये म्हटलेले आहे की, "अन्याय आणि नैराश्यातून केवळ अतिरेकाचा जन्म होतो. देशभरातल्या 100 हून अधिक जिल्हयात झालेल्या नक्षलवादाच्या प्रसाराने धोक्याचा इशारा दिला आहे. काही भागात जाती संघर्षाच्या माध्यमातून जनतेचा असंतोष बाहेर पडतो आहे. या सर्व असंतोषामागे कारणीभूत आहे. सुयोग्य प्रशासन देण्यात आणि बहुतांश लोकांपर्यन्त विकासाचे लाभ पोहोचवण्यात शासन यंत्रणेला अपयश आलेले आहे." हे असे का होत आहे याबाबत केंद्रसरकार कबूल करते परंतु महाराष्ट्र शासन यासंदर्भात काही सुध्दा विचार करीत नाही. आपण महाराष्ट्रातील शेतक-याच्या संवेदनशील मनाकडे कधी बघणार आहात की नाही? आपण अधिवेशन कितीही चालवले आणि त्यातून शेतक-यांना काही दिलासा मिळाला नाही तर या अधिवेशनाचा काही सुध्दा उपयोग होणार नाही.



असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. पाशा पटेल ....

मी शासनाला विनंती करतो की, शेतक-याला कर्जमुक्ती दिली, त्याच्या मालाला खर्चा प्रमाणे भाव दिला तर किमान 5-6 अधिवेशन होऊ द्या आणि नंतर पहा या कालावधीत एकही शेतकरी आत्महत्या करणार नाही. जर शेतक-याच्या बाजून शासनाने निर्णय घेतला तर या निर्णयाचा फायदा सर्व पक्ष घेण्याचा प्रयत्न करतील. परंतु सर्व पक्षाने जरी या निर्णयाचा फायदा घेण्याचे ठरवले तरी काही बिघडणार नाही. कारण शेतक-याला वाटेल की, आम्ही जिवंत रहावे यासाठी सगळया पक्षांनी प्रयत्न केलेले आहेत त्यामुळे त्याला वाईट न वाटता आनंदच होणार आहे. गेल्या 30 वर्षापासून महाराष्ट्रातील शेतकरी तळहातावर जीव घेऊन जीवन जगत आहे. त्यामुळे शेतक-यांच्या बाजूने शासनाने निर्णय घेतला तर एकही शेतकरी पुढील काळात आत्महत्या करणार नाही. त्यामुळे यासंदर्भात शासनाने गंभीरपणे विचार करावा अशी माझी कळकळीची विनंती आहे. सरकार शेतक-यांच्या प्रश्नासंबंधी गंभीर होईल अशी परमेश्वराजवळ प्रार्थना करतो, सरकारने गंभीर व्हावे अशी विनंती करुन मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

--------------

....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. रमेश निकोसे (नामनियुक्त) : माननीय सभापति महोदय, मैं एक शेर कहना चाहूंगा कि

वक्त की आंधी में जहां बदल जाता है,
उम्र की राह पर इंसान बदल जाता है,
कसूर मैंने नहीं किया रोटी की कसम,
इस भूख की दुनिया में ईमान बदल जाता है.

महाराष्ट्रातील शेतकरी आत्महत्या करीत आहे. इंग्लंडच्या राणीने भारताला भिकारी बनवायचे ठरवले होते. "कृषि तंत्रज्ञान " या पुस्तकामध्ये नमूद केले आहे की, सेल्फेट खतामुळेच आज शेतक-यांची अशी दयनिय अवस्था झालेली आहे. ज्या देशात अगोदर सोन्याचा धूर निघत होता आज त्याच देशातील माणूस भिकारी झालेला आहे. अगोदर शेती ही गुराढोरांच्या शेणखतावर पिकवली जात होती. आता शेती ही युरिया खतावर पिकवली जाते. युरिया खतावर आता शेती पिकवली जात असल्यामुळे जमिनीचा पोत खराब झालेला आहे.

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश निकासे................

त्यासाठी शेण खताचा जास्तीत जास्त उपयोग झाला पाहिजे. शेतकरी बँकाकडून कर्ज घेतो, सेवा समित्यांकडून कर्ज घेतो. ही सर्व कर्जे परत करण्याची वेळ येते त्यावेळी त्याच्याकडे पैस नसतात. शेतीस चांगला भाव न मिळाल्यामुळे किंवा शेत पिकले नाही म्हणून त्याच्याकडे पैसे नसतात. त्यामुळे तो कर्ज फेडू शकत नाही. मागील वर्षी पेरणी होऊन 28 दिवस झाले तरी पाऊस झाला नाही. माननीय मुख्यमंत्री श्री.विलासराव देशमुख यांनी पंढरपूरच्या विठ्ठलाकडे साकडे घातले. काही दिवसांनी संपूर्ण महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर पाऊस झाला. या पावसामध्ये मुंबई वाहून जाते की काय अशाप्रकारची परिस्थिती निर्माण झाली. या अतिवृष्टीमुळे महाराष्ट्रातील काही जिल्ह्यातील उभीच्या उभी पिके वाहून गेली. त्यामुळे परिस्थिती आणखीच गंभीर बनली.

सभापती महोदया, महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना शेतीसाठी पुरविली जाणारी बि-बियाणे निकृष्ट दर्जाची व बोगस असतात. या संदर्भात कृषि अधिकाऱ्यांकडे तक्रार करूनही त्याचा काही उपयोग होत नाही. बोगस बियाणे विकणाऱ्यांवर फौजदारी खटले भरले पाहिजेत. तेव्हा माझी विनंती आहे की, शेतकऱ्यांना पुरविण्यात येणाऱ्या बि-बियांणाची तपासणी करण्यासाठी एखादी चांगल्या दर्जाची यंत्रणा उभारावी.

सभापती महोदया, विदर्भात शेतकऱ्यांच्या मोठ्या प्रमाणावर आत्महत्या झाल्या म्हणून माननीय पंतप्रधानांनी विदर्भात गावोगावी जाऊन पाहणी केली. शेतकऱ्यांसाठी खास पॅकेज जाहीर केले. हे पॅकेज जाहीर झाल्यानंतर विरोधी पक्षाकडून टीका झाली की, शेतकऱ्यांच्या पॅकेजचे पैसे गेले कुठे ? असा प्रकार झाला असेल तर त्याचा सरकारने शोध घेतला पाहिजे. माननीय मंत्री महोदय 17-18 तास काम करतात. परंतु सरकारी अधिकारी पाच वाजले की, निघून जातात. तेव्हा अधिकाऱ्यांनी सुध्दा अशाप्रकारे काम करावे अशी त्यांना जाणीव करुन देणे गरजेचे आहे.

सभापती महोदया, राज्यात लोडशेडींगचा प्रश्न आहे. ग्रामीण भागात 17-18 तास लोडशेडींग होत असल्यामुळे पाणी असूनही शेतकऱ्यांना शेतीला पाणी देता येत नाही अशी परिस्थिती आहे. शेतकऱ्यांना पाहिजे त्यावेळी विजेचा पुरवठा होत नाही. शेतीला पाणी न देता आल्यामुळे शेतीचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत आहे. त्यामुळे लोडशेंडीगचा प्रश्न प्राधान्याने सोडविणे आवश्यक आहे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश निकासे................

सभापती महोदया, शेतीला उद्योगाचा दर्जा दिला पाहिजे. मोठमोठ्या उद्योगांना सबसिडी दिली जाते, त्यांचे कर्ज माफ केले जाते. तेव्हा शेतीला उद्योगाचा दर्जा देणे फार गरजेचे झालेले आहे. सन्माननीय सदस्य श्री.पाशा पटेल यांनी याठिकाणी सांगितलेला मुद्दा अतिशय बरोबर आहे. आपण शेतकऱ्यांसाठी पीक विमा योजना काढली, परंतु त्याचा लाभ शेतकऱ्यांना मिळत नाही. एका तालुक्यामध्ये एकाच्या शेतात चांगले पीक आले असेल आणि दुसऱ्याच्या शेतीत चांगले पीक आले नसेल तर त्यास पीक विमा योजनेचे पैसे मिळत नाही अशी परिस्थिती आहे.

सभापती महोदया, शेतकऱ्यांना जवाहर विहीर रोजगार योजनेंतर्गत विहिरी मंजूर केल्या जातात. परंतु त्यासाठी अधिकारी वर्ग त्यांच्याकडून पैशांची अपेक्षा व्यक्त करतात. अशाप्रकारची एक तक्रार माझ्याकडे आलेली आहे. त्या व्यक्तीने तक्रार केली म्हणून त्यास विहीर खोदून देण्यात आलेली नाही. तेव्हा याबाबतीतही सरकारने लक्ष घालावे अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदया, शेतीची मजुरी वाढलेली आहे. शेतमजूर मिळत नाही.

यानंतर श्री.पुरी.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती (श्रीमती उषाताई दराडे)** : आजच्या विशेष बैठकीचा वेळ आता संपला आहे. आजची अपूर्ण राहिलेली चर्चा उद्या मंगळवार, दिनांक 27 नोव्हेंबर 2007 रोजी सकाळी 10.00 ते दुपारी 12.00 या वेळात घेण्यात येईल. सन्माननीय सदस्य, श्री.केशवराव मानकर हे ऑन लेग आहेत, ते उद्या ही चर्चा पुढे सुरु करतील.

सभागृहाची बैठक आता स्थगित होईल आणि नियमित बैठक दुपारी 1.00 वाजता पुन: भरेल.

(दुपारी 12.50 ते दुपारी 01.00 बैठक स्थगित झाली.)

------------------

यानंतर श्री.बोरले..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( स्थगितीनंतर )**

**( सभापतीस्थानी माननीय सभापती )**

**पृ.शी./मु.शी.**: तोंडी उत्तरे .

**राज्य शासनाकडून शेतकऱ्यांना दिले जाणारे कृषि भूषण पुरस्कार नकली आढळल्याबाबत**

**(1) * 33713 डॉ. निलम गोऱ्हे , श्री. पांडुरंग फुंडकर , श्री. नितीन गडकरी , श्री. श्रीकांत जोशी , सय्यद पाशा पटेल , श्री. विनोद तावडे , श्री. संजय केळकर , श्री. वसंतराव चव्हाण , श्री. जितेंद्र आव्हाड , श्री. दिवाकर रावते , श्री. गोपीकिसन बाजोरिया , श्री. मधुकर सरपोतदार , श्री. अरविंद सावंत , श्री. सुरेश जेथलिया , श्री.परशुराम उपरकर , श्री. किसनचंद लेखराज तनवाणी , श्री. रणजितसिंह मोहिते-पाटील , प्रा. फौजीया खान , श्री. गिरीश गांधी , श्री.सागर मेघे , श्री. पांडुरंग फुंडकर** : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राज्य शासनाने सन 2006 मधील कृषी भूषण पुरस्काराचे मानकरी म्हणून 19 शेतकऱ्यांची निवड केली होती, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, या 19 शेतकऱ्यांना कृषी भूषण पुरस्कार म्हणून मा.राज्यपालांच्या हस्ते प्रत्येकी 50 ग्रॅम वजनाचे 14 कॅरेटचे सुवर्णपदक देण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, 19 शेतकऱ्यांना देण्यात आलेली ही 14 कॅरेटची सुवर्णपदके नंतरच्या काळात चांदीची असल्याचे उघड झाले, हे ही खरे आहे काय,

(4) असल्यास, या प्रकाराची शासनाकडून चौकशी झाली आह काय, चौकशीत काय आढळून आले व कोणकोणत्या अधिकाऱ्याविरुद्ध कोणत्या स्वरुपाची कारवाई करण्यात आली आहे,

(5) कोणत्या शेतकऱ्यांना ही पदके बदलून देण्यात आली आहेत ?

श्री. बाळासाहेब थोरात : (1) व (2) सन 2005 सालासाठी सन 2006 मध्ये पुढीलप्रमाणे 19 विविधपुरस्कारांसाठी निवड केलेली होती,

1) कृषि रत्न 1
2) कृषि भूषण 10
3) जिजामाता कृषि भूषण 5
4) शेतीनिष्ठ 3

या पुरस्कार प्राप्तींना पदकांसह मा. राज्यपाल महोदयांच्या हस्ते गोरविण्यात आले

(3) नाही. सदर पदके मिश्र धातूची असलेचे आढळले.

(4) चौकशी अहवावल प्राप्त झालेला असून त्यानुषंगाने पुढील कारवाई करणेत येत आहे

(5) अद्याप नाही

..2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. 33713....**

श्री.राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, उत्तरामध्ये दुरुस्ती आहे. पहिल्या उत्तरामध्ये "शेतीनिष्ठ" असे नमूद केलेले आहे त्या ऐवजी "शेतीमित्र" असे वाचावे.

डॉ.नीलम गो-हे : सभापती महोदय, शेतक-यांना न्याय मिळावा यादृष्टीकोनातून सभागृहामध्ये कर्ज माफीच्या विषयावर सातत्याने चर्चा सुरु आहे. दुर्दैवाने या सदर घटनेमध्ये श्री.दादाजी खोब्रागडे यांना राज्य सरकारने दिलेले सुवर्णपदक चांदीचे निघाले. या प्रकरणामध्ये माननीय गृहमंत्री महोदयांनी चौकशीचे आदेश दिलेले आहेत. आपण उत्तरामध्ये असे म्हटलेले आहे की, "सदर पदके मिश्र धातूची असल्याचे आढळून आले." शासनाने सुवर्णपदक तयार करण्याची जबाबदारी जे.जे. स्कूल ऑफ आर्टवर टाकलेली आहे. माझा प्रश्न असा आहे की, ही सुवर्णपदके देणारे जबाबदार अधिकारी कोण होते, त्यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केलेली आहे आणि शासनाला जो चौकशीचा अहवाल प्राप्त झालेला आहे त्यासंदर्भात शासन काय कारवाई करीत आहे ?

श्री.राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, सुवर्णपदक तयार करण्यासाठी दिनांक 24 ऑक्टोबर, 2005 रोजी श्री.एल.एन.येवले, प्राध्यापक, कला विभाग, जे.जे.स्कूल ऑफ आर्ट यांना दर पत्रक काढण्याबाबत विनंती केली होती. त्या अनुषंगाने त्यांच्याकडून शासनाला दर प्रत्रक प्राप्त झाले. त्यामध्ये त्यांनी असा उल्लेख केला होता की, हे 50 ग्रॅम वजनाचे सुवर्णपदक 14 कॅरेट सोन्याचे असेल आणि त्याच्या दराचा त्यांनी दर पत्रकात उल्लेख केला होता. त्याप्रमाणे सुवर्णपदक मिळाले. तक्रार प्राप्त झाल्यानंतर हे पदक आम्ही मागवून घेतले आणि त्याचे तीन तुकडे करुन तीन वेगवेगळया संस्थांना चौकशीसाठी पाठविले. चौकशीमध्ये असा उल्लेख आला की, स्टँडर्ड प्रमाणे 14 कॅरेट सोन्यामध्ये 58.5 टक्के सोने असते, 12.7 टक्के चांदी असते आणि 17.05 टक्के तांबे असते. 14 कॅरेट सोन्यामध्ये सोने, चांदी आणि तांबे यांचे मिश्रण असते. आपण हे सुवर्णपदक तीन ठिकाणी पाठविले होते. त्याची माहिती आल्यानंतर त्या पदकांमध्ये सरासरी 58.5 टक्के सोने असावयास पाहिजे होते, परंतु त्यामध्ये 40.41 टक्के सोने असल्याचे आढळून आले. चांदी 12 टक्क्याऐवजी 60 टक्के असल्याचे आढळून आले. या पदकांमध्ये तांब्याचा वापर करण्यात आला नव्हता. 14 कॅरेटमध्ये मित्र धातू असतात. या पदकांमध्ये सोन्याचे प्रमाण 18 टक्क्यांनी कमी होते. या 50 ग्रॅमच्या पदकामध्ये अंदाजे 9 ग्रॅम सोने कमी असल्याचे आढळून आले.

.3...



GRB/ D/ प्रथम श्री.रोझेकर ....... 13:00

**ता.प्र.क्र. 33713....**

श्री.राणा जगजितसिंह पाटील .......

ही माहिती लक्षात आल्या नंतर श्री.येवले यांच्यावर दिनांक 22.11.2007 रोजी एफ.आय.आर. दाखल करुन त्यांच्या निलंबनाची व विभागीय चौकशीची कारवाई सुरु आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, शासनाने 14 कॅरेट, 22 कॅरेट आणि 24 कॅरेटची सुवर्णपदके देण्याचे ठरविले होते. सुवर्णपदक देण्याचे शासनाचे धोरण काय आहे ?

यानंतर श्री.गागरे .......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PNG/ D/ पूर्वी श्री.बोरले 13:05

ता.प्र.क्र.33713.....

श्री.राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, शासनाचे धोरण 14 कॅरेटचे आहे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी पदकांमधील सोन्याचे प्रमाण सांगितले आहे. इतर पदकांमध्ये ते देखील कमी असण्याची शक्यता आहे. कारण चंद्रपूर जिल्हयात सोनाराकडे ही पदके नेऊन तपासली असता त्यामध्ये प्रत्यक्षात सोने नव्हते असे आढळले आहे. ती पूर्ण पदके चांदीची निघाली आहेत. तुम्ही जी पदके तपासणीसाठी पाठविली आहेत. त्यामध्ये एवढे कमी सोने निघाले तर बाकीच्या जेवढया तक्रारी केलेल्या आहेत, त्या प्रत्येकाची पदके तुम्ही तपासली आहेत का ? हा पहिला प्रश्न आहे. दुसरा प्रश्न असा आहे की, अशा प्रकारे खोटी पदके देऊन लोकांची व शेतकऱ्यांची तुम्ही फसवणूक केली आहे. जसे पदके तयार करणाऱ्या आयुक्तांवर तुम्ही कारवाई केली तसे ज्यांनी पदके वाटली, शेतकऱ्यांची फसवणूक केली, त्या पदके वाटणाऱ्यांवरही तुम्ही कारवाई करणार आहात का ? तिसरा प्रश्न असा आहे की, याबाबत माननीय गृहमंत्री यांनी प्रॉंप्टली सांगितले आहे की, ताबडतोब त्यांच्यावर कारवाई करु. एफ.आय.आर. दाखल करण्यात येतील. माझ्या माहिती प्रमाणे एकही एफ.आय.आर. दाखल झालेला नाही. गृह विभागाने काहीही कारवाई केलेली नाही. गृहमंत्र्यांच्या स्टेटमेंटप्रमाणे कारवाई झाली किंवा नाही ?

श्री.राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, दिनांक 22.11.2000 रोजी एफ.आय.आर. दाखल करण्यात आला आहे. 304/07 अन्वये आझाद मैदान पोलीस स्टेशनमध्ये श्री.येवले यांच्याविरुध्द एफ.आय.आर.दाखल करण्यात आला आहे. तसेच मला आवर्जून उल्लेख करावयाचा आहे की, 24 कॅरेट सोने मॅलेएबल असते. त्याचे पदक बनविणे शक्य नसते. त्यामुळे 14 कॅरेटचे सोने वापरण्याचा निर्णय आला आहे. सध्या आपल्याकडे श्री.दादाजी खोब्रागडे यांनी तक्रार केली आहे व त्यांचे पदक तपासण्यात आले आहे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, कृषी विभागाने सर्व पदके परत घेतली आहे. ती सर्व तुम्ही तपासली आहेत का ? एक पदक तपासले ती चांगली बाब आहे, बाकीचीही पदके खराब आहेत. बाकीच्या पदकातही घोटाळा झाला आहे, त्याबाबत पुढे कोणती कारवाई केली आहे ?.

श्री.राणा जगजितसिंग पाटील : सभापती महोदय, बाकीच्या पदक तपासणीचा रिपोर्ट आल्यानंतर तो सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल.

.....2



PNG/ D/

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, बाकीची पदके तपासण्यासाठी पाठविलेली नाहीत. मंत्री महोदय, विद्यमान सरकारचे राज्य असल्यापासून त्यांनी महाराष्ट्र भुषणसह जेवढे पुरस्कार दिलेले आहेत, ती सर्व पदके तपासून घेण्याची गरज आहे. कारण या पदकामध्ये बरेच घोटाळे झालेले आहेत. तुम्ही जेवढी पदके या वर्षात दिली आहेत, त्याबाबत माझी माहिती अशी आहे की, काही पदके केवळ चांदीची होती व त्यावर सोन्याचे पॉलीश होते. तुम्ही ही पदके तपासली आहेत का ?

श्री.राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, नुकतीच माझ्याकडे जी माहिती उपलब्ध झालेली आहे त्यावरुन ते पदक श्री.खोब्रागडे यांचे नव्हते. प्रत्येक वर्षाचे एक पदक असे शेतकऱ्यांना विनंती करुन परत आणलेले असून ते तपासणीसाठी दिलेले आहे. 2005-06 मध्ये जी पदके वितरीत केली होती, त्यातील एका पदकाचा रिपोर्ट मी अगोदर आपणास सांगितला आहे.

**सभापती** : मी माननीय राज्यमंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, या प्रश्नाचा रोख असा आहे की, 2005-06 मधील पदके आपण 2006 मध्ये वितरीत केली आहेत. ती सर्व पदके या पध्दतीने तपासली आहेत का ? किंवा केवळ एक पदक तपासले का ?

श्री.राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, ही सर्व पदके आपण तपासलेली नाहीत, फक्त एक पदक तपासले आहे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, मुळ पदक तपासले आहे ते काहीतरी बरे आहे. चंद्रपूर जिल्हयात सोनाराने तपासलेल्या पदकाबाबत ई.टी.व्ही.वर मुलाखत पाहिली असता, त्यांनी सांगितले की, हे पूर्ण पदक 100 टक्के चांदीचे आहे. मंत्री महोदयांनी माहिती दिली आहे की, एकच पदक तपासण्यासाठी दिलेले आहे, हे बरोबर नाही. मग तुम्ही इतर शेतकऱ्यांची पदके परत का घेतली आहेत. ? जर ही पदके शुध्द असतील तर ती परत घेण्याची आवश्यकता नव्हती. तुम्ही परत याकरिता घेतली आहे की, त्यामध्ये घोटाळा झालेला आहे. मग तुम्ही ती सर्व पदके तपासण्यासाठी पाठविणार का ? सर्व पदके तपासण्यासाठी पाठविण्यात यावी व त्याचा रिपोर्ट येईपर्यत हा प्रश्न राखून ठेवावा. कारण मुळ प्रश्न हा अनेक पदकांसंबंध्री असून केवळ एका पदकांसबंधी नाही. म्हणून माझी विनंती आहे की, आपण हा प्रश्न स्थगित ठेवावा.

.....3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.33713.....

श्री.राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, तपासणी झाल्यानंतर त्यांच्यावर कारवाई केलेली आहे. यामध्ये महत्वाची बाब अशी आहे की, 9 ग्रॅम सोने पदकामध्ये कमी होते असे निदर्शनास आलेले आहे. आपण सर्व पदके परत घेऊन तपासून घेऊ म्हणजे त्यामध्ये कोणाचा काही आक्षेप असण्याचे कारण नाही. त्याचबरोबर ही पदके रिप्लेस करुन सर्टीफाईड पदके देण्याबाबत काय करता येईल, हे बघितले जाईल.

**सभापती** : माननीय मंत्री महोदयांना मी सांगू इच्छितो की, महत्वाचा प्रश्न असा आहे की, शेतकऱ्यांनी घाम गाळल्यानंतर किंवा अनेकांनी त्या त्या क्षेत्रात अत्यंत उत्कृष्ट काम केल्यानंतर त्यांचा आपण बहुमान करतो.

यानंतर कु.धनश्री.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DVG/ D/ 13:10

ता.प्र.क्र.33713....

**सभापती** ....

अशाप्रकारे जर एखादी गोष्ट झालेली असेल तर ते यत्किंचीतही योग्य नाही अशी सदनाची भावना आहे. सन 2006 मध्ये शेतकऱ्यांना जी पदके देण्यात आली त्यातील एका पदकाची तपासणी आपण केली. इतर सर्व पदकांची तपासणी केल्यास त्यातही गडबड झालेली आहे किंवा नाही हे स्पष्ट होईल. या तपासणीचा रिपोर्ट पटलावर ठेवण्यात येईल. माननीय मंत्री महोदय, आपण संपूर्ण तयारीनिशी सभागृहात या. हा प्रश्न आता राखून ठेवण्यात येत आहे.

............

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..2..

**सोयगांव, जि.औरंगाबाद मन्याड धरण ते कामनदी जोडणी प्रकल्पास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत**
**(२) * ३६५२५ श्री.अरुण गुजराथी :** सन्माननीय **जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून) लाभक्षेत्र विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोयगांव जिल्हा औरंगाबाद मन्याड धरण ते कामनदी जोडणी प्रकल्पास प्रशासकीय मान्यता देण्यासाठी विलंब होत आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय,
(३) सदरच्या प्रकल्पास किती कालावधीमध्ये प्रशासकीय मान्यता देण्यात येईल ?

डॉ.सुनील देशमुख, श्री.अजित पवार यांच्याकरिता : (१) असा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. अरुण गुजराथी : सभापती महोदय, या प्रश्नाच्या उत्तरामध्ये असा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला नाही असे म्हटले आहे. मन्याड धरण ते कामनदी जोडणी प्रकल्पास मान्यता देण्याबाबत त्या परिसरातील शेतकरी मागणी करीत आहेत. हा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला नसेल तर तो पुन्हा पाठविण्यात येईल. त्यासंदर्भात शसन विचार करेल काय आणि या प्रस्तावास त्वरेने शासकीय मान्यता देण्यात येईल काय ?

डॉ. सुनील देशमुख : सभापती महोदय, या प्रकल्पाचा प्राथमिक अभ्यास करण्यात आलेला आहे. नदीजोड प्रकल्प राष्ट्रीय जलविकास अभिकरण, हैद्राबाद यांच्याकडे तांत्रिक मान्यतेसाठी पाठविण्यात आलेला आहे. याबाबत सविस्तर सर्व्हे तयार करण्यात येईल. त्यांच्याकडून हा प्रस्ताव फिजिबल आहे असा रिपोर्ट आल्यास पुढील कार्यवाही करण्यात येईल.

..............

..४..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ठाणे जिल्ह्यातील मुरवाड येथे संपूर्ण ग्रामीण रोजगार योजनेअंतर्गत मिळणारे धान्य वाटपाबाबत**

**(३) * ३३७४२ श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील , श्री. संजय दत्त , श्री. अरविंद सावंत , श्री.परशुराम उपरकर , डॉ. निलम गोऱ्हे :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्हयातील मुरवाड येथे संपूर्ण ग्रामीण रोजगार योजने अंतर्गत मिळणारे धान्य रेशनिंग दुकानदार व पुरवठा खात्याच्या कर्मचाऱ्यांनी वाटप न करता परस्पर विक्री करुन मोठया प्रमाणात घोटाळा केल्याचा खळबळजनक प्रकार जुलै, २००७ च्यश अखेरीस उघडकीस आला, हे खरे आहे काय?

(२) असल्यास, शासनाने या प्रकारची चौकशी केली आहे काय?

(३) असल्यास, चौकशीतून काय निष्पन्न झाले व त्यानुसार संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे?

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. सुनील तटकरे : (१) श्री.दत्तात्रेय शंकर शिंगोळे, रास्त भाव दुकानदार, मौजे खाटेघर, तालूका मुरबाड, जिल्हा ठाणे यांनी संपूर्ण ग्रामीण रोजगार योजनेंतर्गत धान्याचा अपहार केल्याचे माहे सप्टेंबर, २००७ मध्ये उघडकीस आले, हे खरे आहे,

(२) होय,

(३) चौकशीमध्ये श्री.दत्तात्रेय शंकर शिंगोळे, रास्त भाव दुकानदार, मौजे खाटेघर, तालूका मुरबाड, जिल्हा ठाणे यांनी संपूर्ण ग्रामीण रोजगार योजनेंतर्गत १९२८.०५ क्विंटल तांदूळ व ३७८.५९ गव्हाचा अपहार केलयाचे आढळून आले. त्यामुळे त्यांच्याविरुध्द मुरबाड पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच, याप्रकरणी जबाबदार असलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांविरुध्द कारवाई करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. प्रतापसिंह मोहिते पाटील : सभापती महोदय, या प्रकरणी दोषी असलेल्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आलेली आहे हा पहिला प्रश्न आहे. तसेच या योजनेअंतर्गत मिळणारे धान्य रेशन दुकानदारांनी जे धान्य घेतले, ते मुरबाड या भागातून खरेदी करुन आणले होते हे खरे आहे काय ?

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, या संपूर्ण अपहाराच्या प्रकरणामध्ये लक्ष घालण्यात आलेले आहे. मी त्याची माहिती घेतलेली आहे. त्यामुळे या गोष्टीचे गांभीर्य लक्षात घेता, ज्या अधिकाऱ्यांच्या कार्यकालावधीमध्ये धान्याचा अपहार झालेला असेल त्या वेळच्या तत्कालिन तहसीलदार, व ज्यांच्या पत्राच्या आधारे हे धान्य वितरित करण्यात आले, ते तत्कालिन बी.डी.ओ

..५..

२६-११-२००७ ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) FF ५

DVG/ D/ १३:१०

ता.प्र.क्र.३३७४२......

श्री. सुनिल तटकरे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यांच्या निलंबनाविषयी आजच संबंधित विभागाला कळविण्यात येईल. खोटी पत्र देण्यात आली असे जे सांगण्यता आले आहे. या संदर्भात सुध्दा फौजदारी गुन्हा दाखल करण्याच्या संदर्भात सांगण्यात येईल. ठाणे जिल्हयामधील धान्य घोटाळयाची चौकशी करण्यासाठी विभाग आयुक्त, कोकण महसूल विभाग यांना सांगण्यात आले आहे. संपूर्ण ग्रामीण रोजगारहमी योजना संदर्भात वितरीत करण्यात आलेल्या धान्याची चौकशी करुन एक महिन्यात अहवाल तयार करण्यासंदर्भात आदेश देण्यात येतील. आता ही योजना यावर्षीपासून बंद होत आहे. म्हणूनच या योजनेचा संपूर्ण राज्यभरामध्ये आढावा घेण्याच्या दृष्टीने,अधिवेशन कालावधी संपल्यानंतर माझ्या विभागाचे सचिव, प्रधान सचिव, ग्रामीण विकास आणि प्रधान सचिव रोजगारहमी योजना यांची एक बैठक घेऊन यासंबंधी आढावा घेण्यात येईल. हा आढावा घेतल्यानंतर आवश्यकता वाटल्यास माननीय मुख्यमंत्री व माननीय उपमुख्यमंत्री यांना विनंती करुन अतिरिक्त मुख्य सचिवांमार्फत,संपूर्ण योजनेची संपूर्ण महाराष्ट्रामध्ये चौकशी करण्याचे प्रस्तावित करण्यात येईल.

श्री. परशुराम उपरकर : सभापती महोदय, सिंधुदूर्ग जिल्हयामध्ये झालेल्या घोटाळयासंबंधी चर्चा करण्यात आली होती. त्यावेळी माननीय मंत्रीमहोदयांनी विभागीय आयुक्त स्तरावर चौकशी करुन अधिकाऱ्यांवर कारवाई करु अशा प्रकारचे उत्तर दिले होते. ती कारवाई शासनाकडून करण्यात आलेली आहे काय ? या कारवाईमध्ये ४८ तास, २४ तास अटक झालेले महसूल विभागाचे जे अधिकारी आहेत त्यांना निलंबित करण्याची कारवाई झालेली आहे काय ? या रेशन दुकानातील धान्य घोटाळयामध्ये जे लोक दोषी आहेत त्यांचे परवाने रद्द झालेले आहे काय ?

श्री.सुनिल तटकरे : सभापती महोदय, हा रत्नागिरी, सिंधुदूर्ग जिल्हयातील प्रश्न आहे. तरी देखील यासंदर्भात उच्च स्तरावर आढावा घेण्याच्या संदर्भात मी या अगोदरच सांगितले आहे.

यानंतर श्री.सुंबरे.....

असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

KBS/ D/ कु. गायकवाडनंतर --- 13.15

श्री. तटकरी (पुढे चालू... ) ता.प्र.क्र. 33742 ...

उच्च स्तरीय आढावा घेण्याच्या दृष्टीने मी अगोदरच सांगितले आहे. सन्माननीय सदस्य श्री.उपरकर यांनी विचारलेला प्रश्न हा ठाणे जिल्ह्यासंबंधातील नसून सिंधुदुर्ग जिल्ह्यासंबंधातील आहे म्हणूनच तो प्रश्न वेगळा आहे.

श्रीमती मंदा म्हात्रे : सभापती महोदय, कालच लोकसत्ता या वृत्तपत्रात एक बातमी आली होती की, मुरबाड येथील 18 दुकानदारांवर कारवाई केलेली आहे. तेव्हा ही जी कारवाई त्या दुकानदारांवर केलेली आहे त्या संदर्भात मी विचारू इच्छिते की, किती वर्षांपासूनहा घोटाळा तेथे चालू होता ?

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, 2002 सालापासून वेगवेगळ्या ठिकाणच्या दुकानदारांकडून धान्याच्या बाबतीत अतिरिक्त धान्य उचल झाल्याचे लक्षात आले आहे म्हणूनच यातील गांभीर्य लक्षात घेऊन कोकण महसूल आयुक्तांकडे याबाबतची चौकशी सोपविण्यात येईल आणि त्यांनी महिनाभरामध्ये मुरबाडच नव्हे तर एकूणच ठाणे जिल्ह्यातील आढावा घेण्याच्या दृष्टीने चौकशी करावी असे सांगण्यात येईल.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, ठाणे जिल्ह्यातील सर्वच तालुके आपण चौकशीसाठी घेत आहात त्याबद्दल धन्यवाद. परंतु या सोतच रॉकेलच्या वाटपाचेबाबतीत देखील आपण चौकशी केली पाहिजे. कारण ठाणे जिल्ह्यातील अवैध वाहतुकीसाठी डिझेलऐवजी रॉकेल काढले जाते आणि त्यामुळेच यामध्ये रॉकेल वाटपाची देखील आपण चौकशी करायला पाहिजे, ती आपण करणार काय आणि त्या संबंधात ज्या अधिकाऱ्यांनी या गोष्टीकडे गेली अनेक वर्षांपासून दुर्लक्ष केले आहे त्याबद्दल त्यांना जबाबदार धरून त्यांच्यावर कारवाई करणार का ?

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, हा प्रश्न भिन्न स्वरूपाचा आहे. येथे मूळ प्रश्न हा धान्यासंबंधातील आहे. तरीदेखील सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत यांनी जे सांगितले आहे त्या संदर्भात केरोसिनचे असलेले नियतन आणि त्याची शासनाकडे होत असलेली मागणी या सर्वच बाबतीत एका विभागामार्फत आढावा घेण्याचे लवकरच सुरू करण्यात येईल.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, अन्न आणि नागरी पुरवठा खात्याकडून जी उत्तरे येतात ती नेहमीच संभ्रमित करणारी असतात. आता जो प्रश्न येथे मांडलेला आहे तो जुलै महिन्यातील आहे आणि आपण त्यावर उत्तर देताना असे म्हटले आहे की, कारवाई करण्यात येत

...... जीजी 2 ..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सरपोतदार (पुढे चालू...) ता.प्र.क्र. 33742 ...

आहे. कारवाई केलेली आहे असा उल्लेख या उत्तरात आपण केलेला नाही. जुलै महिन्यात घडलेल्या प्रकरणाबाबत आज 5 महिने उलटून गेल्यानंतरही अद्यापी आपण कारवाई केलेली नाही तर करीत आहात असे म्हणत आहात याचा अर्थच असा होतो की, यातील गुन्हेगारांना पाठीशी घालण्याचा मंत्री महोदयांना विचार आहे काय, नसेल तर या लोकांवर अद्यापी कारवाई का झाली नाही ?

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, हा एकंदर घोटाळा जुलै महिन्यात उघडकीस आला हे सत्य आहे. परंतु सुरूतीसच मी सांगितले आहे की, या सर्व प्रकरणातील गांभीर्य लक्षात घेऊन आयुक्तांमार्फत याबाबत चौकशी करण्याचे आपण प्रस्तावित केले आहे आणि दोन्ही विभागाकडे आम्ही त्यांच्याबाबतीत कळवित आहोत. जुलै महिन्यापासून आजपर्यंत या संदर्भात जी काही माहिती उपलब्ध झाली, आताच सन्माननीय सदस्या श्रीमती म्हात्रे यांनी सांगितल्याप्रमाणे या संधात काही दुकानदारांवर कारवाई झालेली आहे आणि एकंदरीतच या सर्व प्रश्नाचे गांभीर्य लक्षात घेता या ाबतीत विशिष्ट कालावधीत चौकशी केली जाईल.

श्रीमती सुधा जोशी : सभापती महोदय, मुरबाडमध्ये धान्याच्या योजनेत फार मोठ्ठा घोटाळा झ ाालेला आहे आणि अनेक गावच्या रेशनिंग दुकानांमध्ये धान्याचा ताळमेळ बसलेला नाही. त्यामुळे सारा तहसील हडबडून गेलेले होते. त्यामुळे उत्तरात एकाच रास्त भाव दुकानदाराच्याबद्दल आपण कारवाई होत असल्याचे म्हटले आहे. म्हणजे या सर्व घोटाळ्यामध्ये हा एकच दुकानदार सापडला होता काय ? तसेच हा घोटाळा केव्हा पासून चालू आहे ? आणि हा घोटाळा उघडकीस येऊन इतके महिने झाल्यानंतरदेखील कारवाई अद्याप पूर्ण झालेली नाही तर ती केव्हा पूर्ण होणार आहे?

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, या संबंधात 18 दुकानदारांवर निलंबनाची कारवाई केली गेलेली आहे. या निलंबनाच्या बाबतीत उच्च स्तरीय चौकशी करण्याच्या बाबतीत यापूर्वीच मी सांगितले आहे. तसेच एक महिन्याच्या आत या बाबतची चौकशी पूर्ण करून संधितांवर कारवाई केली जाईल.

( यानंतर श्री. सरफरे ..... एचएच 1 ..

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 33742...

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, सन 2002 ते 2006 या कालावधीमध्ये झालेला हा घोटाळा आहे. तहसिल कार्यालयाला हाताशी धरुन हा घोटाळा झालेला असतांना सुध्दा सभागृहामध्ये हा प्रश्न उपस्थित होइपर्यंत शासनाने याबाबत कोणतीही कारवाई न करता या प्रकरणी कुणाला पाठिशी घातले आहे? आणि कशासाठी पाठिशी घातले आहे? माझा प्रश्न साधा आहे की, यामध्ये 21 दुकाने सहभागी असतांना सुध्दा एकाच दुकानावर पोलिसात तक्रार दाखल कशी केली? बाकीच्या दुकानदारांना आपण पाठिशी कां घातले? श्री. निगुडकर यांनी दिलेल्या अहवालानुसार 21 दुकाने ताब्यात घेऊन त्यांना सील करुन त्यांच्यावर आपण केस का दाखल केली नाही? कुणाचा पॉवरबाज वशिला होता काय? कुणी उपोषण केले होते काय? मुरबाड हा तालुका रोजगार हमी योजनेमधील भ्रष्टाचाराचे केंद्र आहे. तेव्हा याबाबत आपण कुणालाही पाठिशी न घालता टाईम बाऊंड कालावधीत सक्त कारवाई करणार आहात काय?

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, ही दुकाने निलंबित करण्यात आली असून त्यांच्यावर पुढील कारवाई निश्चितपणे केली जाईल. आपण मघाशी प्रश्न विचारला त्याबाबत पुढील कारवाई प्रस्तावित केली आहे.

श्री. विनोद तावडे : ही कारवाई यापूर्वी आपण कां केली नाही?

श्री. सुनील तटकरे : यामध्ये कुणावरही मेहरबानी करण्याचा प्रश्न नाही. सरकारला जी कारवाई करावयाची आहे ती सरकार करीत आहे. याबाबत महिन्याभरात सखोल चौकशी करुन कारवाई केली जाईल. निलंबनाच्या बाबतीत मी आताच घोषित केले असून आयुक्तांमार्फत उच्च स्तरीय चौकशी केली जाईल असे सांगितले आहे. एवढेच नव्हेतर ही योजना बंद झाली असल्यामुळे ही योजना सुरु झाल्यापासून आतापर्यंत तीन विभागाच्या प्रधान सचिवांसहीत माझ्या स्तरावर चौकशी करण्यात येईल. त्यामध्ये सुध्दा आवश्यकता भासली तर अपर मुख्य सचिवांसाठी सुध्दा चौकशीकरिता पाचारण केले जाईल.

श्री. संजय केळकर : सभापती महोदय, मुरबाडमध्ये अत्यंत गंभीर व महत्वाचा विषय आहे. शासनाने जरी जाहीर केले असले तरी या विषयाबाबत मी ऑगस्ट महिन्यापासून पाठपुरावा करीत आहे. सन 2000 ते 2007 पर्यंत इतकी वर्षे हा घोटाळा चालू होता. यामध्ये या रेशनिंग दुकानांवर कारवाई करण्याबरोबर यामध्ये फार मोठे रॅकेट गुंतले आहे. त्यामध्ये लाखो रुपयांचा भ्रष्टाचार चालू आहे. माझ्या माहितीप्रमाणे 5600 क्विंटल धान्य गायब झाले आहे हे खरे आहे काय? नसेल



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ D/

ता.प्र.क्र. 33742...

श्री. संजय केळकर....

तर किती क्विंटल धान्य गायब झाले आहे? रेशनिंग दुकानदार आणि अधिकाऱ्यांवर आपण कारवाई केली असे म्हणत असला तरी आतापर्यंत फक्त एकाच अव्वल दर्जाच्या कारकूनावर कारवाई केली आहे. आणि म्हणून या घोटाळयाच्या साखळीमध्ये असलेल्या अधिकाऱ्यांवर आपण कारवाई करणार काय? तसेच, त्या रेशनिंग दुकानदारांवर आपण कारवाई करणार काय?

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, या सर्व प्रश्नांची उत्तरे मी दिलेली आहेत.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ D/

**बीड जिल्ह्यातील २१ गावांतील जलस्त्रोतांमध्ये "फ्लाराईड, नायट्रेटस, लोह, आयर्न, या रसायनांचे प्रमाण" वाढल्याबाबत**

**(४) * ३५९८३ सय्यद पाशा पटेल , श्री. नितीन गडकरी , श्री. प्रतापराव सोनवणे :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्ह्यातील २१ गावांतील जलस्त्रोतांमध्ये "फ्लोराईड, नायट्रेटस, लोह, आयर्न, या रसायनांचे प्रमाण वाढल्याने त्या गावामधील नागरिकांना दात, हाडांचा ठिसूळपणा, केसगळती, नेत्ररोग या व्याधीमुळे आजारांना सामोरे जावे लागते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रसायनयुक्त पाण्यामुळे शेकडो नागरिकांचे बळी जाण्याची भिती निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी सखोल चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे ?

श्री. रणजित कांबळे, श्री.अजित पवार यांच्याकरिता : (१) नाही,

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) व (४) बीड जिल्ह्यात एकूण २१ गावांच्या पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत रासायनिक घटकांमुळे बाधित आहेत हे खरे आहे. भारतनिर्माण कार्यक्रमांतर्गत दूषित पेयजलग्रस्त गावे, वाडया यातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्याचा कालबध्द कार्यक्रम आखण्यात आला आहे. या कार्यक्रमांतर्गत बीड जिल्ह्यातील उपरोक्त २१ गावांपैकी ४ गावांसाठी नविन योजना घेण्यात आल्या असून त्या पूर्ण झ ाल्या आहेत व त्यामधून पाणी पुरवठा सुरु करण्यात आला आहे. तसेच १२ गावांच्या योजना प्रगतीपथावर आहेत. उर्वरीत ५ गावांच्या योजनांचे अंदाजपत्रक व आराखडे प्राप्त झाले असून ते मंजुरीच्या अंतिम टप्प्यात आहेत.

श्री. पाशा पटेल : सभापती महोदय, बीड जिल्हयात एकूण २१ गावांमध्ये पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत रासायनिक घटकांमुळे बाधित झाले आहे. प्रामुख्याने जमिनीमधील पाणी बाधित झाले आहे ही वस्तुस्थिती आहे. या रासायनिक घटकामुळे पिण्याच्या पाण्याबरोबर शेतीकरिता वापरावयाचे पाणी दूषित होत चालले आहे. याकरिता शासनाने तात्पुरती व कायम स्वरुपाची कोणती योजना केली आहे? रासायनिक घटकांमुळे जल स्त्रोत बाधित झाल्याचे मंत्रिमहोदयांनी मान्य केले आहे. यामुळे लोकांच्या आरोग्यावर परिणाम होऊ शकतो. याबाबत शासनाने कोणती उपाय योजना केली आहे?



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ D/

ता.प्र.क्र. ३५९८३...

श्री. रणजित काबळे : सभापती महोदय, बीड जिल्हयातील २१ ग्रामपंचायतीमधील जलस्त्रोतामध्ये फ्लोराईड, आयर्न किंवा संबंधित रासायनिक घटक असल्याचे सन २००५ मध्ये एकदा सर्व्हे केला असतांना निदर्शनास आले आहे. त्यानंतर आम्ही २१ गावे भारत निर्माण कार्यक्रमामध्ये प्रस्तावित केली आहेत.

(यानंतर श्री. बरवड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 35983 ....... श्री. रणजित कांबळे ....

त्यामध्ये पाच गावांच्या नवीन योजना झालेल्या आहेत. 12 गावांच्या योजना प्रगतिपथावर आहेत तसेच उर्वरित योजना प्रस्तावित आहेत. ज्या गावामध्ये अनेक सोर्सेस आहेत त्यातील काही सोर्सेस कंटॅमिनेटेड आहेत. मागील 14-15 तारखेला काही सॅम्पल्स घेतले होते. त्यामध्ये दोन सोर्सेस हतगाव आणि रोही या ठिकाणी कंटॅमिनेटेड आढळून आले. जे सोर्सेस कंटॅमिनेटेड आढळून आले तेथील पाणी पिण्यासाठी वापरु नये असे बंधन घालतो. हतगावमध्ये 3 हातपंप, 1 सार्वजनिक विहीर आणि 1 वैयक्तिक विहीर आहे. जी सार्वजनिक विहीर होती ती कंटॅमिनेटेड होती. त्या ठिकाणी 3 हातपंप आहेत. त्या ठिकाणी नवीन नळ योजना भारत निर्माण योजनेमध्ये प्रस्तावित केलेली आहे. रोही या ठिकाणी 3 हातपंप, 1 सार्वजनिक विहीर आणि 2 खाजगी विहिरी आहेत. 1 हातपंप आणि खाजगी विहीर कंटॅमिनेटेड होती. तेथील पाणी पिण्यासाठी योग्य नव्हते. त्या ठिकाणचे पाणी पिण्यासाठी वापरु नये असे बंधन घातले. त्या ठिकाणी बाकीचे इतर सोर्स आहेत. त्या गावामध्ये भारत निर्माण योजनेमध्ये नवीन योजना प्रस्तावित आहे. या सगळया योजना 2009 पर्यंत कोणत्याही परिस्थितीमध्ये पूर्ण होणार आहेत.

श्री. पाशा पटेल : त्या पाण्यामध्ये रसायने आहेत हे सिध्द झालेले आहे. या रसायनांनी हे रोग होतात मग त्या ठिकाणी रोग झालेले नाहीत असे उत्तर का दिले आहे ?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, या सोर्सेसमध्ये काही ना काही केमिकल्स राहणारच. परंतु त्याची एक सेफ्टी लेव्हल असते. फेरसचे प्रमाण 0.03 टक्के असेल तर ते सेफ असते. परमिसिबल लिमिटच्या बाहेर प्रमाण असेल तर ते पाणी पिऊ शकत नाही. परिमिसिबल मिमिटमध्ये असेल तर पाणी पिऊ शकतो. पाण्यामध्ये केमिकल्स राहणारच आहेत. कारण जमिनीमध्ये जे मेकिकल्स असतात ते पाण्यामध्ये येणारच आहेत. जेव्हा त्याचे प्रमाण परमिसिबल लिमिटच्यावर जाते तेव्हा त्याच्यावर बंधन घालतो आणि ते पाणी पिण्यासाठी योग्य नाही असे सांगतो. त्याच्या ऐवजी वेगळा सोर्स घ्यावयास पाहिजे. सन्माननीय सदस्य म्हणतात त्याप्रमाणे हाडांचा ठिसूळपणा वगैरे बाबतीत कोणत्याही प्रकारची तक्रार त्या भागामध्ये आलेली नाही.

-----

...2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ D/

**धुळे व नंदूरबार जिल्ह्यातील नद्या व नाल्यावर शासनाच्या जलसंपदा विभागामार्फत साठवण बंधारे बांधणे तसेच ब्रिटीश कालीन बंधाऱ्यांची दुरुस्ती करणेबाबत**

**(५) * ३३७७२ श्री. शरद रणपिसे , श्री. गोविंदराव आदिक , श्री. संजय दत्त , श्री. धनाजी साठे , श्री. रमेश निकोसे :** सन्माननीय **जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून) लाभक्षेत्र विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे व नंदूरबार जिल्हयातील नद्या व नाल्यावंर शासनाच्या जलसंपदा विभगामार्फत साठवण बंधारे बांधणे तसेच ब्रिटीश कालीन बांधाऱ्यांची दुरुस्ती करणे व त्याचा सर्वे करुन अंदाज पत्रिकेचा नकाशा तयार करुन कार्यवाही करण्याची मागणी मा. केंद्रीय गृह राज्यमंत्री यांनी मा.मुख्यमंत्री मा. वित्त मंत्री, मा. जलसंपदा मंत्री तसेच आदिवासी विकास मंत्री यांच्याकडे दिनांक २७ सप्टेंबर , २००७ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निर्णयानुसार आदिवासी क्षेत्रातील दुरुस्तीचे काम संबाधित जलसंपदा विभागाने आदिवासी विकास विभागाकडे देऊन करावयाची असल्याने उक्त कामासाठी शासनाने अर्थव्यवस्था मागणी नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, किती रक्कमेची मागणी करण्यात आली आहे, व कधी पर्यंत काम पूर्ण करावयाचे आहे,

(४) अद्याप कोणतीच कारवाई केली नसल्यास, होणाऱ्या विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत?

श्री.अजित पवार : (१) होय, मा.केंद्रिय गृहराज्यमंत्री यांनी मा. राज्यमंत्री, वित्त व नियोजन, (महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई) यांचेकडे दिनांक २१/०४/२००७ च्या पत्रान्वये मागणी केलेली आहे.

(२) दुरुस्तीची कामे आदिवासी विभागाकडे देऊन करावयाची नसून आदिवासी विभागाच्या निधीतून जलसंपदा विभाग/जलसंधारण विभागाकडून करण्यात येतात.

स्थानिक स्तर मार्फत धुळे व नंदुरबार जिल्ह्यातील १०१ ते २५० हेक्टर सिंचनक्षमतेच्या ६ लघु पाटबंधारे योजनांची कामे तसेच ० ते १०० हेक्टर सिंचनक्षमतेची १०७ साठवण बंधाऱ्याची कामे प्रगतीपथावर असून ४४ साठवण बंधाऱ्यांची प्रशासकीय मान्यतेची कार्यवाही चालू आहे. २५० हेक्टर सिंचनक्षमतेचे साठवण बंधारे घेण्यात आलेले नाहीत.

(३) जलसंधारण विभागाने आदिवासी विभागाकडे वरील कामासाठी रुपये ९० लक्षची मागणी केली असून सदर काम जून २००८ पर्यंत पुर्ण करण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. धनाजी साठे : सभापती महोदय, आदिवासी विभागातील पाणी साठवण करण्यासाठी या देशाचे गृह राज्यमंत्री श्री. गावीत साहेब यांनी काही योजना सुचविलेल्या आहेत आणि त्या योजनांच्या संदर्भामध्ये ही कामे लवकर व्हावी अशी त्यांची मागणी आहे. या ठिकाणी दिलेल्या उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, 250 हेक्टर सिंचन क्षमतेचे साठवण बंधारे घेण्यात आलेले

...3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ D/

ता.प्र.क्र. 33772 ..... श्री. धनाजी साठे ....

नाहीत. तिसऱ्या प्रश्नाला उत्तर देत असताना असे म्हटले आहे की, जलसंधारण विभागाने आदिवासी विभागाकडे वरील कामासाठी रुपये 90 लक्षाची मागणी केली असून सदर काम जून ,2008 पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे. त्या विभागाकडून आतापर्यंत किती रुपये देण्यात आले आहेत आणि सध्या कामाची स्थिती काय आहे ?

श्री. अजित पवार : सभापती महोदय, सन्माननीय केंद्रीय गृह राज्यमंत्री महोदयांचे पत्र आमच्या विभागाकडे आले होते. हा प्रश्न धुळे आणि नंदूरबार जिल्ह्यापुरता मर्यादित आहे. यामध्ये काही बंधारे शून्य ते 100 हेक्टरपर्यंतचे असतात. 100 हेक्टर सिंचन क्षमतेचे बंधारे यामध्ये येतात. काही बंधारे 101 ते 250 हेक्टर सिंचन क्षमतेचे असतात. काही बंधारे 250 हेक्टरपेक्षा जास्त सिंचन क्षमतेचे असतात. जे बंधारे 101 ते 250 हेक्टर सिंचन क्षमतेचे असतात ते जलसंधारण विभागाकडून करण्याचा प्रयत्न करीत असतो. 250 हेक्टरपेक्षा जास्त सिंचन क्षमतेचे बंधारे जलसंपदा विभागाकडून करीत असतो. शून्य ते 100 हेक्टर क्षमतेचे बंधारे जिल्हा परिषदेकडून, जलसंधारण विभागाकडून करुन घेत असतो. यामध्ये नंदूरबार आणि धुळे या दोन जिल्ह्यामधील जे बंधारे आहेत त्यातील काही बंधारे बिगर आदिवासी मध्ये मोडतात आणि काही बंधारे आदिवासीमध्ये मोडतात.

यानंतर श्री. शिगम ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(ता.प्र.क्र. 35983.... (श्री. अजित पवार....)

आमचा प्रयत्न असा आहे की, आदिवासी विकास योजनेमध्ये आदिवासी विभागामध्ये मोडणारे जे प्रकल्प किंवा बंधारे आहेत त्यांना तेथून निधी घ्यावयाचा. तशा पध्दतीने आम्ही निर्णय घेतलेला आहे. 0 ते 100 हेक्टर सिंचन क्षमता असणारे साठवण बंधारे धुळे जिल्हयामध्ये 23 आहेत. त्यासाठी 36 लाख रुपये खर्च झालेला आहे. एकूण 5.24 कोटी रु. खर्च करावयाचा आहे. निधीची मागणी आम्ही केलेली आहे. नंदूरबार जिल्हयामध्ये 84 बंधारे आहेत. त्यावर 4.31 कोटी रु. खर्च झालेला आहे. उर्वरित 8.43 कोटी निधीची मागणी केलेली आहे. काही निधीची मागणी ही आदिवासी विकास योजनेतून करण्यात येत आहे. जो निधी आदिवासी विकास योजनेमध्ये बसत नाही त्याबाबतीत जलसंपदा विभागाकडून कशी मदत करता येईल हे आम्ही पहात आहोत. तसेच अन्य बाबतीत जलसंधारण विभागाकडून निधी उपलब्ध करुन देण्याचे काम चालले आहे. केन्द्रीय गृहराज्यमंत्री श्री. माणिकराव गावित यांनी जी मागणी केलेली आहे ती पूर्णत्वाला नेण्याचा आमचा प्रयत्न राहील.

----

**ता.प्र.क्र. 36898**

(सन्माननीय सदस्य अनुपस्थित)

----

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**गोवा राज्यातील घातक कचऱ्याची विल्हेवाट कोकणामध्ये करण्यासंदर्भात शासनाने घेतलेला निर्णय**

**(७) * ३३८९५ श्री. जयंत पाटील , प्रा. शरद पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक २४७८० ला दिनाक १३ एप्रिल, २००७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोवा राज्यातील ज्वलनशील घातक घनकचऱ्यावर प्रक्रिया व विल्हेवाट करण्यासाठी व्यवस्था नसल्याने तो कचरा रायगड जिल्ह्यातील तळोजा येथील केंद्रामध्ये आणण्यासाठी सशर्त परवानगी देण्याची कारणे कोणती,

(२) ही परवानगी केव्हा देण्यात आली,

(३) दरवर्षी किती घनकचऱ्यांची या ठिकाणी आयात होणार आहे, या येणाऱ्या घनकचऱ्यासंबंधी सशर्त परवानगी दिली नसती तर व घनकचऱ्यावर काही प्रमाणात कर आकारणी केली असती तर शासनाच्या उत्पन्नात भर पडण्याची शक्यता आहे की नाही,

(४) या ज्वलनशील घातक घनकचऱ्याची रस्त्याने वहातुक करताना पर्यावरण विभागाने कोणती दक्षता घेतली आहे ?

श्री. गणेश नाईक : (१) सर्वोच्च न्यायालयाच्या या सनियंत्रण समितीच्या व केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या आदेशानुसार लहान राज्ये वकेंद्रशासित प्रदेशांना घातक कचरा विल्हेवाटीसाठी परिपूर्ण यंत्रणा उभारणे तांत्रिक वआर्थिकदृष्टया शक्य नसल्याने शेजारच्या राज्यांनी मदत करावयाची असल्याने गोवा राज्याने याबाबतमहाराष्ट्र राज्यास विनंती केलीहोती. गोवा राज्यात ज्वलनशील घातक पदार्थ जाळून टाकण्याचे संयत्र नसल्याने गोवा राज्याने वारंवारकेलेल्याविनंतीस अनुसरुन या राज्यातील फक्त घातक कचरा जाळण्यासाठी सर्शत परवानगी देण्यात आलेली आहे. महाराष्ट्र राज्याततळोजा,रायगड येथेच परिपूर्ण घनकचरा प्रक्रिया व विल्हेवाट केंद्र कार्यरत आहे.

(२) दिनांक ९.०६.२००६ रोजी परवानगी देण्यात आलेली आहे.

(३) प्रथमत: सन २००६-०७ सालासाठी २०,००० मे.टन प्रतिवर्ष इतका ज्वलनशील घातक घनकचरा महाराष्ट्रात आणण्याचर परवागी देण्यात आलेली असून त्या पुढील वर्षासाठी फक्त १०,००० मे.टन प्रतिवर्ष इतका ज्वलनशील घातक घनकचरा आणण्यात येणार आहे. गोवाराज्यातील ज्वलनशील घातक घनकचरा तळोजा येथे भस्मीकरणासाठी पाठविणाऱ्या गोवा राज्यातील कारखान्यांनी रु १०००/- प्रति टन शुल्क महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे जमा करण्याची अट घातली आहे

(४) ज्वलनशील घातक घनकचऱ्याची रस्त्याने वाहतूक करण्यासाठी मे.मुंबई वेस्ट मॅनेजमेंट लि. ताळोजा या संस्थेसकेंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मागदर्शक तत्वानुसार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने परवानगी दिलेली आहे. तसेच सदर वाहतुकीच्या दरम्यान कोणत्याही प्रकारचा अपघात झाल्यास मे. मुंबई वेस्ट मॅनेजमेंट लि.तळोजा जबाबदार असून त्यांनी विमा संरक्षण पुरविण्याची महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने अट घातलेली आहे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(ता.प्र.क्र. 33895...)

श्री. जयंत प्र. पाटील : गोवा राज्यातील घातक घनकच-यावर प्रक्रिया करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेण्यापूर्वी मंत्रिमंडळाची परवानगी घेतली होती काय ? तसेच संबंधित ग्रामपंचायतीचा ना हरकत दाखला घेतला होता काय ? पब्लिक हिअरिंग घेतले होते काय ? 2006-07मध्ये ही परवानगी दिल्यापासून रागयड जिल्हयामध्ये किती टन घनकचरा आलेला आहे ?

श्री. गणेश नाईक : औद्योगिक विकास विविध राज्यामध्ये होत असताना विविध कंपन्यामधून घातक घनकचरा बाहेर येत आहे. त्यावर प्रक्रिया करण्यासाठी त्या त्या राज्यातील प्रदुषण नियंत्रण मंडळ जबाबदारी घेत असते. गोवा हे छोटे राज्य आहे. घातक घनकच-याची विल्हेवाट लावण्याची यंत्रणा त्या राज्याकडे उपलब्ध नसल्यामुळे सर्वोच्च न्यायालयाच्या नियंत्रणाखाली असलेल्या समितीने व केन्द्राच्या प्रदुषण नियंत्रण मंडळाने अशा छोट्या छोट्य राज्यांना लगतच्या मोठया राज्यांनी मदत करावी अशी प्रकारची भूमिका घेतलेली आहे. गोव्याच्या तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी आपल्या राज्याच्या मुख्यमंत्र्यांना विनंती केलेली आहे. त्यानुसार घातक, ज्वालाग्राही घनकचरा आपल्या राज्यात आणून त्याची विल्हेवाट लावली जाते. रायगड जिल्हयातील तळोजा येथे अशा प्रकारची यंत्रणा आहे. डिसेंबर 2006 ते 8 ऑगस्ट 2007 पर्यन्त 577 टन घातक पदार्थ आलेला आहे. यासाठी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने परवानगी दिलेली असल्यामुळे ग्रामपंचायतीची परवानगी घेण्याची आवश्यकता नाही.

श्रीमती सुधा जोशी : आपल्या राज्यात निर्माण होणा-या ज्वलनशील घातक कच-याची विल्हेवाट लावण्याकरिता पुरेशी यंत्रणा आहे काय ? विल्हेवाट लावण्यासाठी अतिरिक्त यंत्रणा उपलब्ध असली तरच दुस-या राज्यातील घातक घनकचरा घेऊन त्याची विल्हेवाट लावणे शक्य आहे. अशी अतिरिक्त यंत्रणा किती प्रमाणात उपलब्ध आहे ?

नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती सुधा जोशी......... ता.प्र.क्र.33895..

जो आपण दुसऱ्या राज्यातील घनकचरा घेऊन विल्हेवाट लावू शकतो तसेच गोवा ते तळोजा या दरम्यान घनकचरा वाहतुकीच्या मार्गावर आतापर्यंत काही अपघात झालेले आहेत का? अशा घातक कचऱ्याच्या वाहनाला अपघात झाला तर त्याचे काय दुष्परिणाम होतात?

श्री.गणेश नाईक : सभापती महोदय, तळोजा विभागामध्ये अशा प्रकारच्या घनकचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी यंत्रणा उभारण्यात आली आहे. आपल्याकडे क्षमता आहे म्हणूनच आपण गोव्यातील घातक घनकचऱ्याची विल्हेवाट लावण्यास परवानगी दिलेली आहे. सन्माननीय सदस्य श्रीमती सुधाताई जोशी यांनी प्रश्न विचारल्याप्रमाणे गोवा ते तळोजापर्यंत कुठलाही अपघात घडलेला नाही. असे अपघात घडू नयेत म्हणून बंद टाकीमधून घातक पदार्थ आणले जातात. त्या टाकीची साईज स्पेसिफिक ठरलेली आहे आणि त्याचे पालन करण्याची जबाबदारी त्या कंपनीवर टाकण्यात आली आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, गोव्याकडून पर्यटन धोरण स्वीकारले पाहिजे, गोव्याकडून वीज घेतली पाहिजे. घातक घनकचरा कशासाठी घेतला जातो? मुंबई वेस्ट मॅनेजमेंट लि. या कंपनीमध्ये कोणाचा तरी इंटरेस्ट आहे, ते हित जपण्यासाठी हे करीत आहात का? 20 हजार मे.टनपेक्षा अधिक घातक घनकचरा निर्माण होत असेल तर त्या त्या राज्याने प्लँट उभारला पाहिजे असा नियम आहे. असे असेल तर गोवा राज्यावर मेहेरबानी दाखविण्याचे कारण काय? सिंधुदुर्ग आणि रत्नागिरी जिल्हयामध्ये या वाहनांमुळे रहदारी आणि अपघातांचे प्रश्न निर्माण होत आहेत. ही वाहने प्रचंड मोठी असतात. त्यामुळे इतर वाहनांचे अपघात होतात. माननीय मंत्रीमहोदय सांगतात की, स्थानिक ग्रामपंचायतीची हरकत असण्याची गरज नाही. ग्रामपंचायतीने त्याठिकाणी प्लँट बांधायला परवानगी दिली. कोणत्याही वस्तीला कचरा डेपो नको असतो. परंतु दुसऱ्या राज्याला परवानगी दिली जाते हे योग्य नाही. त्यामुळे गोव्यातील घनकचरा आणण्यावर बंदी घातली जाईल काय?

श्री.गणेश नाईक : सभापती महोदय, गोवा राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री श्री.पर्रिकर यांनी महाराष्ट्र राज्याच्या मुख्यमंत्र्यांना विनंती केली होती. गोव्यातील जनतेची अडचण लक्षात घेऊन त्याठिकाणी साठलेला 20 हजार मे.टन घनकचरा सुरुवातीला आणला गेला. आता प्रतिवर्षी साधारणपणे 10 हजार टन घनकचरा येऊ शकतो. त्या राज्याला आर्थिकदृष्ट्या प्लँट उभारणे

..2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

परवडणारे नाही. केंद्रीय प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या निकषाप्रमाणे बाजूच्या छोट्या राज्यांना मदत करण्याचे धोरण स्वीकारण्यात आले आहे. त्याठिकाणी इन्शूरन्स पूल असतो. हा कचरा वाहून आणणाऱ्या वाहनांना विशिष्ट वेगाचे बंधन घालण्यात आलेले आहे. शेजारच्या राज्यांना मदत करण्याचे धोरण आहे. केंद्रीय प्रदुषण मंडळाने महाराष्ट्राला विनंती केली की, तुम्ही गोवा राज्याला मदत करावी. विशिष्ट कालखंडामध्ये त्या राज्यात औद्योगिकरणाचे प्रमाण वाढले तर त्या राज्याला गोव्यामध्ये प्लँट करण्यास सांगता येईल. तुम्ही तुमची व्यवस्था करावी असे सांगता येईल.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, मी तीन प्रश्न विचारले होते, त्यापैकी एकाही प्रश्नाचे उत्तर मंत्रीमहोदयांनी दिलेले नाही. राज्य मंत्रिमंडळाने निर्णय घेतला होता का? ग्रामपंचायतीची एनओसी घेतली होती का? हे राज्य कायद्याप्रमाणे चालते की नाही? प्रदुषण नियंत्रण मंडळाने निर्णय घेतला म्हणजे ग्रामपंचायतीच्या एनओसीची गरज नाही का? रायगड जिल्हयात जे वीज प्रकल्प होत आहेत त्याबाबत पब्लिक हिअरिंग घेतल्याशिवाय प्रकल्प होत नाहीत. असे असताना महाराष्ट्रातील नगरपालिकांना घनकचरा टाकण्यासाठी पब्लिक हिअरिंग घेतल्याशिवाय परवानगी दिली जात नाही. मग हा दुजाभाव का? गोवा राज्याला वेगळा न्याय आणि महाराष्ट्रातील नगरपालिकांना वेगळा न्याय का? याचे उत्तर मंत्रीमहोदय देतील का?

(नंतर श्री.जुन्नरे....

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. : 33895** .........

श्री. गणेश नाईक : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी 3 प्रश्न विचारलेले आहेत. त्यांनी पहिला प्रश्न विचारला आहे की, राज्य शासनाचे काय नियम / धोरण आहे ? होय यासंदर्भात राज्य शासनाचे नियम/धोरण स्पष्ट आहे. सन्माननीय सदस्यांच्या दुस-या प्रश्नाच्या संदर्भात मी सांगू इच्छितो की, महाराष्ट्र पोल्यूशन कंट्रोल बोर्ड हे सर्व गोष्टीचे नियंत्रण करीत असते. एमआयडीसीमध्ये महाराष्ट्र प्रदूषण मंडळाच्या निकषानुसार घातक कच-यांची विल्हेवाट लावण्यासंदर्भात नुकतीच एका संयत्राची व्यवस्था केलेली आहे. गोवा राज्याकरिता स्पेशल परवानगी घेण्याची गरज नाही. महाराष्ट्र राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी यासंदर्भातील अधिकार खात्याला प्रदान केले असून खात्याने ते अधिकार प्रदुषण बोर्डाला प्रदान केलेले असल्यामुळे स्पेशल परवानगी घेण्याची गरज नाही.

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी हे अधिकार प्रदान केले होते ते या राज्यापुरते होते की, दुस-या राज्याकरिताही होत ? दुस-या राज्याचा विषय असतो तेव्हा तो विषय मंत्रीमंडळाच्या बैठकीत चर्चेला जात असतो.

श्री. गणेश नाईक : सभापती महोदय, सन्माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार समिती नियुक्त करण्यात आली होती. सर्वोच्च न्यायालयाच्या नियंत्रणाखाली काम करणारी समिती आहे त्या समितीच्या अधिका-यांनी प्रमुखांनी केंद्रीय व राज्य प्रदूषण बोर्डाच्या दोन्ही अधिका-यांनी जबाबदारी स्वीकारावी अशी सूचना करण्यात आली होती. गोव्याचे तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी आपल्या माननीय मुख्यमंत्री महोदयांना यासंदर्भात विनंती केली होती, त्यामुळे शेजारच्या राज्याला मदत करावी म्हणून अशा प्रकारचा निर्णय घेण्यात आलेला आहे.

-------------

....2

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**नागपूर मनपा कार्यक्षेत्रामध्ये असणारे रुग्णालय त्यांची जैविक कचऱ्याची विल्हेवाट प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या निकषाप्रमाणे करीत नसल्याबाबत**

**(8) * 34384 श्री. रणजितसिंह मोहिते-पाटील , श्री. जितेंद्र आव्हाड , प्रा. फौजीया खान** : सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) नागपूर मनपा कार्यक्षेत्रामध्ये असणारे रुग्णालय त्यांची जैविक कचऱ्याची विल्हेवाट प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या निकषाप्रमाणे करीत नसल्याचे माहे ऑक्टोबर, 2007 मध्ये उघडकीस आले आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, त्यांची संख्या किती आहे, त्यांना प्रदूषण नियंत्रण मंडळांनी कारणे दाखवा नोटीस दिलेली आहे काय,

(3) प्रदूषण नियंत्रण मंडळाचे निकष व पाळणाऱ्या रुग्णालयांवर शासन कोणती कारवाई किती कालावधीत करणार आहे ?

श्री. गणेश नाईक : (1) नाही,

(2) प्रश्न उद्भवत नाही.

(3) प्रश्न उद्भवत नाही.

श्री. रणजितसिंह मोहिते पाटील : दिलेल्या उत्तरामुळे माझे समाधान झालेले आहे.

-----------

....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**विदर्भ पॅकेज अंतर्गत कृषि विकास योजना**

**(9) * 33967 श्री.सय्यद जामा , श्री. संजय दत्त , श्री. गोपीकिसन बाजोरिया , श्री. दिवाकर रावते , डॉ. निलम गोऱ्हे** : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राज्य शासनाच्या कृषि विस्तार कार्यक्रमाच्या सुधारणेसाठी विदर्भ पॅकेजअंतर्गत विदर्भातील सहाजिल्हयांसाठी सहाकोटी रुपयांच्या निधी शासनाने प्रशासकिय मान्यता दिली हे खरे आहे काय,
(2) असल्यास,सदर निधी ही सन 2007-2008 य वर्षात खर्च केला जाणार आहे हेखरे आहे काय,
(3) असल्यास, कृषि विस्तार योजनेचा लाभ बुलढाण,वाशिम , अकोला, अमरावती,यवतमाळ व वर्धा या जिल्हयांना होणार आहे हे खरे आहे काय,
(4) असल्यास, कृषि विस्तार कार्यक्रमांची अंमलबजावणी शेतकेऱ्यांच्या गरजा लक्षात घेऊन करण्यात येणार आहे काय,
(5) असल्यास, कृषि विस्तार योजनेकरिता केंद्र शासनाकडून ही 90 टक्के विधी मिळतो, हे खरे आहे काय ?

श्री. राणा जगजितसिं पाटील, श्री.बाळासाहेब थोरात यांचे करिता: (1) सन 2007-08 या वर्षासाठी राज्याच्या कृषि विस्तार कार्यक्रमांना विस्तार विषयक सुधारणांकरिता सहाय्य या योजनेअंतर्गत विदर्भातील सहा जिल्ह्यांकरिता रुपये 406.15 लक्ष निधीच्या कार्यक्रमास केंद्र शासनाने प्रशासकीय मान्यता दिली आहे.
(2) होय,
(3) होय,
(4) होय,
(5) होय, ही केंद्र पुरस्कृत योजना असून ती राज्यात 90 टक्के केंद्र हिस्सा व 10 टक्के राज्य हिस्सा अशी राबविली जाते.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, कृषि विस्तार कार्यक्रमासाठी राज्यशासनाने सहाय्य केलेले आहे अशी माहिती उत्तरमध्ये दिलेली आहे. त्यामुळे कृषि विस्तार सुरणेच्या संदर्भात योजना काय आहे ? या योजनेस 4.06 कोटी रुपये खर्च करण्यास केंद्र शासनाने मान्यता दिलेली आहे त्यामुळे या योजनेचे स्वरुप काय राहणार आहे?

श्री. राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, कृषि विस्तार कार्यक्रमाअंतर्गत प्रत्येक जिल्हयामध्ये "आत्मा" नावाच्या संस्थेनुसार काम केले जाते. या कमिटीमध्ये जिल्हाधिकारी हे अध्यक्ष आहेत. या योजनेमध्ये वेगवेगळे घटक येतात. पहिला घटक हा शेतकरी प्रशिक्षणाचा आहे. यामध्ये राज्याच्या बाहेर किंवा राज्याअंतर्गत किंवा जिल्हा अंतर्गत शेतक-यांना प्रशिक्षणासाठी पाठविले जात असते व यावर रक्कम खर्च केली जात असते.

तसेच शेतक-यांना प्रात्याक्षिक , कृषि मेळावे तसेच तिस-या घटकामध्ये शैक्षणिक सहली राज्याअंतर्गत, जिल्हा अंतर्गतसाठी काही रक्कम उपलब्ध करुन द्यावयाची आहे.

...4



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र.** : **33967** .........

श्री. राणा जगजितसिंह पाटील..........

तिसरी बाब अशी आहे की, शेतक-यांशी सुसंवाद साधणे, तंत्रज्ञानाचा प्रचार करणे असे एकंदर 16 हेड यामध्ये आहेत. या योजनेत प्रत्येक जिल्हयासाठी पैशांची तरतूद केली जात असते.

डॉ. नीलम गो-हे : सभापती महोदय, शेतक-यांच्या आत्महत्या थांबाव्यात हा या योजनेचा मुळे उद्देश आहे. या योजनेअंतर्गत प्रत्यक्ष पैसे देण्यास सुरुवात झालेली आहे काय ?

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र 33967........

डॉ.नीलम गोऱ्हे...........

माझा दुसरा प्रश्न असा की, आत्महत्या झालेल्या गावांमध्ये हा कार्यक्रम राबविण्यात आला काय ?

श्री.राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी कृषि विस्तार कार्यक्रमा संदर्भात प्रश्न विचारलेला आहे. हा कार्यक्रम मंजुरीसाठी केंद्र शासनाकडे पाठविण्यात येतो. यात केंद्र शासनाचा 90 टक्के आणि राज्य शासनाचा 10 टक्के हिस्सा आहे. या योजनेंतर्गत प्रत्येक जिल्ह्यांसाठी रक्कम उपलब्ध करुन देण्यात येते......

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मला माननीय मंत्रिमहोदयांच्या निदर्शनास आणून द्यावयाचे आहे की, राज्य शासनाच्या कृषि विस्तार कार्यक्रमाच्या सुधारणेसाठी विदर्भ पॅकेज अंतर्गत विदर्भातील सहा जिल्ह्यांसाठी सहा कोटी रुपयांच्या निधीस शासनाने प्रशासकीय मान्यता दिली आहे हे खरे आहे काय, असा आम्ही प्रश्न विचारला होता. या प्रश्नाचे उत्तर " सन 2007-08 या वर्षासाठी राज्याच्या कषि विस्तार कार्यक्रमांना विस्तार विषयक सुधारणांकरिता सहाय्य या योजनेंतर्गत विदर्भातील सहा जिल्ह्यांकरिता रुपये 406.15 लक्ष निधीच्या कार्यक्रमास केंद्र शासनाने प्रशासकीय मान्यता दिलेली आहे." असे देण्यात आलेले आहे. म्हणून मी मघाशी या संदर्भातील योजना सांगावी, या योजनेतंर्गत किती खर्च झाला याची माहिती द्यावी असा प्रश्न विचारला होता. मी संपूर्ण महाराष्ट्राची माहिती विचारलेली नाही. कृषि विस्तार कार्यक्रमांच्या सुधारणेसाठी विदर्भ पॅकेज अंतर्गत विदर्भातील शेतकऱ्यांसाठी कोणत्या उपाययोजना करण्यात आल्या, किती शेतकऱ्यांना त्याचा लाभ झाला याची माहिती मंत्रिमहोदय देतील काय ?

श्री.राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, याठिकाणी विदर्भ पॅकेज म्हणत असाल तर या योजनेंतर्गत प्रत्येक जिल्ह्याला मदत उपलब्ध करुन दिली जाते.......

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय मंत्रिमहोदयांनी फक्त सहा जिल्ह्यां संदर्भातील माहिती द्यावी.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र 33967........

**सभापती** : मी सन्माननीय मंत्रिमहोदयांना सांगू इच्छितो की, सन्माननीय सदस्यांनी विदर्भ पॅकेज अंतर्गत कृषि विस्तार कार्यक्रमासंदर्भात प्रश्न विचारलेला आहे. आपण उत्तरात म्हटलेले आहे की, "............ सहा जिल्ह्याकरिता 406.15 लक्ष निधीच्या कार्यक्रमास केंद्र शासनाने प्रशासकीय मान्यता दिलेली आहे." या कार्यक्रमांतर्गत सहा जिल्ह्यांमध्ये कोणकोणत्या उपाययोजना करण्यात आल्या आहेत असा सन्माननीय सदस्यांचा प्रश्न आहे.

श्री.राणा जगजितसिंह पाटील : या योजनेंतर्गत शेतकऱ्यांना प्रात्यक्षिके, शैक्षणिक सहली आयोजित करणे.......

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माझी आपणास विनंती आहे की, आम्हास बरोबर उत्तरे मिळत नाहीत. पॅकेज संदर्भात शंका व्यक्त करण्यात आलेली आहे तेव्हा आपण हा प्रश्न राखून ठेवावा अशी आमची आपल्याला विनंती आहे.

श्री.जगदीश गुप्ता : सभापती महोदय, सन्माननीय मंत्रिमहोदयांनी जी उत्तरे दिलेली आहेत त्यामध्ये विरोधाभास आहे. ही योजना संपूर्ण महाराष्ट्रासाठी आहे असे त्यांनी उत्तरात सांगितले. आम्ही सहा जिल्ह्यांपुरता प्रश्न विचारलेला आहे. तेव्हा मंत्रिमहोदयांनी सहा जिल्ह्यांची आकडेवारी द्यावी. या योजनेंतर्गत 4 कोटी रुपयांची प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे असे उत्तरात नमूद करण्यात आलेले आहे. हे 4 कोटी रुपये संपूर्ण राज्यात खर्च झालेले आहेत की, फक्त सहा जिल्ह्यांत खर्च झालेले आहेत ? सहा जिल्ह्यांत खर्च झाले असतील तर त्या संदर्भातील आकडेवारी मंत्रिमहोदय देतील काय ?

श्री.राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, उत्तरामध्ये नमूद करण्यात आलेली 4 कोटी 15 लक्ष इतकी रक्कम सहा जिल्ह्यांकरिता आहे. ही रक्कम सहा जिल्ह्यांकरिता खर्च होणार आहे. ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र 33967........

**सभापती** : प्रश्न क्रमांक 1 च्या उत्तरात पुढीलप्रमाणे म्हटले आहे. " सन 2007-08 या वर्षासाठी राज्याच्या कृषि विस्तार कार्यक्रमांना विस्तार विषयक सुधारणांकरिता सहाय्य या योजनेंतर्गत विदर्भातील सहा जिल्ह्यांकरिता रुपये 406.15 लक्ष निधीच्या कार्यक्रमास क्रेंद शासनाने प्रशासकीय मान्यता दिली आहे." याचा अर्थ ती रक्कम खर्च झाली असा होत नाही. फक्त प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे.

यानंतर श्री.पुरी.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.33967...

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, उत्तरामध्ये "विदर्भातील सहा जिल्हयांकरिता रुपये 406.15 लक्ष निधीच्या कार्यक्रमास केंद्र शासनाने प्रशासकीय मान्यता दिली आहे," असे म्हटले आहे, तो कार्यक्रम कोणता ?

श्री.राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, मी या प्रश्नाचे उत्तर दोनवेळा दिलेले आहे. परत मी सांगू इच्छितो की, शेतकरी प्रशिक्षणासाठी काही रक्कम देण्याचे ठरविलेले असून यामध्ये 12 हजारांचे लक्ष होते, त्यापैकी 11620 लाभार्थ्यांना आपण प्रक्षिक्षण दिलेले आहे. शैक्षणिक सहलीच्या बाबतीत 700 लोकांचे लक्ष होते, त्यापैकी 650 लोकांना लाभ आपण दिलेला आहे. प्रात्यक्षिकांमध्ये 18 हजारांचे लक्ष होते, त्यामध्ये आपण 17972 लोकांना प्रात्यक्षिक दिलेले आहे. कृषि मेळाव्यामध्ये 3 लाखांचे लक्ष होते, त्यामध्ये आपण 2 लाख 55 हजार लोकांना लाभ दिलेला आहे.

----------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**गावडे-आंबेरे(ता.जि.रत्नागिरी) येथील जलस्वराज्य योजनेअंतर्गत नळपाणी पुरवठा योजनेच्या कामाबाबत**

**(१०) * ३६७७२ श्री.परशुराम उपरकर , मेजर सुधीर सावंत , श्री. संजय दत्त , श्री. धनाजी साठे , श्री.जैनुद्दीन जव्हेरी , श्री.राजन तेली , श्री. विनोद तावडे , श्री. मधुकर चव्हाण :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गावडे-आंबेरे(ता.जि.रत्नागिरी) येथील जलस्वराज्य योजनेअंतर्गत सुमारे दिड लाख रुपये खर्च झाल्याचे दाखवून ४० हजार रुपये खर्चुन बांधकाम केलेल्या सार्वजनिक विहिरीवरील नळपाणी योजनेचे पाईप पहिल्याच पावसाने जमिनदोस्त झाले हे खरे आहे काय,

(२) सदर योजनेची पाईप लाईन जमिनी खालून टाकणे जरुरीचे असताना जमिन मालकांची संमती न घेता किंवा त्यांना कुठल्याही प्रकारचा मोबदला न देता वरुन टाकल्याने अनेक ठिकाणी या पाईपलाईनला शिवणीचे लाकडी ठोंबारे टेकू लावल्यामुळे या जिमिनीवरुन भविष्यात वाहतूक करणे अडचणीचे झाले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने याबाबत चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले , पुढे दोषी अधिकारी/कर्मचाऱ्यांवर काय कारवाई करण्यात आली,

(४) अद्याप चौकशी करुन कारवाई केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

श्री.रणजित कांबळे, श्री.अजित पवार यांच्याकरिता : (१) नाही,

(२) नाही,

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.परशुराम उपरकर : सभापती महोदय, सध्या नळपाणी पुरवठा योजनेची सद्य:स्थिती काय आहे ? त्यावर एकूण खर्च किती झाला ? व सध्या त्या नळपाणी पुरवठा योजनेतून पाणी पुरवठा होतो काय ?

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, सध्याच्या परिस्थितीमध्ये सदरची नळपाणी पुरवठा योजना चालू आहे. सन्माननीय सदस्यांनी याठिकाणी खर्चाबाबत विचारले, त्याबाबत मी सांगू इच्छितो की, सदरची नळपाणी पुरवठा योजना ही फारच जूनी आहे. यामध्ये जलस्वराज्य योजनेचा भाग हा जवळपास ३२ लाख ५३ हजार रुपयांचा आहे. यामधील खर्च हा १ लाख ५७ हजार रुपयांचा असून अजूनपर्यंत तो खर्च झालेला नाही.

श्री.परशुराम उपरकर : सभापती महोदय, सदरची योजना केव्हा कार्यान्वित होईल ? व सदरची रक्कम आपण कधी खर्च करणार ?

..३...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.३६७७२....

श्री.अजित पवार : सभापती महोदय, जुलै, २००७ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे पंपिंग मशिनची दुरुस्ती, ३० मिटरच्या आत केबल टाकणे, गाळ काढणे ही कामे केलेली आहेत. अशाप्रकारे त्याठिकाणी तात्पुरती दुरुस्ती करुन नळपाणी पुरवठा सुरु केलेला आहे. तो कायमस्वरुपी सुरु करण्यासाठी आपण १ लाख ५७ हजार रुपयांचे दुरुस्तीचे अंदाजपत्रक तयार केलेले आहे. अतिवृष्टी अनुदानाच्या माध्यमातून सदरची रक्कम मंजूर करण्यात आलेली आहे. सदरचे काम ग्रामपंचायती मार्फत लवकरात लवकर हाती घेण्यात येईल व अतिवृष्टीच्या अनुदानाच्या माध्यमातून ग्रामपंचायतीस रक्कम उपलब्ध करुन दिली जाईल. ती योजना दुरुस्तीसाठी सुरु करण्यात येईल. वाढीव नळपाणी पुरवठा योजनेस आम्ही २० फेब्रुवारीस मान्यता दिलेली आहे. ते काम ३२ लाख ५३ हजार रुपयांचे असून ते काम प्रगतीपथावर करण्यात येऊन सदरचे काम मार्च,२००८ पर्यंत पूर्ण करण्याचा विभागाचा प्रयत्न आहे.

-------------

..४....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मु.पो.ता.गोळप-रानपार, जि.रत्नागिरी, येथील फिनोलेक्स इंडस्ट्रीज या पेट्रो रसायन उद्योगाने २२ मेगावॅट क्षमतेचा विज प्रकल्प उभारण्याबाबत**

**(११) * ३४०३९ श्री. विनोद तावडे , श्री. मधुकर चव्हाण , श्री. संजय केळकर , सय्यद पाशा पटेल :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

१) मु.पो.ता.गोळप-रानपार, जि.रत्नागिरी, येथील फिनोलेक्स इंडस्ट्रीज या पेट्रो रसायन उद्योगाने २२ मेगावॅट क्षमतेचा विज प्रकल्प उभारण्यास स्थानिक नागरिकांनी विरोध दर्शवून १५.८.२००७ रोजी हा प्रकल्प व त्याचे केलेले बांधकाम पाडून का टाकण्यास आत्मदहनाची नोटीस जिल्हाधिकारी हयांना जून,जुलै, ऑगस्ट, २००७ रोजी वारवार दिली, हे खरे आहे काय?

२) याबाबत दि.१३.८.२००७ रोजी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या सचिव व मुंबई, कोल्हापूर येथील वरिष्ठ अधिकाऱ्यांबरोबर आंदोलनाची एक बैठक झाली, हे खरे आहे काय,

३) या बैठकीमध्ये काय निर्णय घेण्यात आले व तद्नुसार कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत?

श्री.गणेश नाईक : (१) होय,

(२) होय,

(३) १) २२ मेगावॅट क्षमतेचा प्रकल्प उभारण्यासाठी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने योग्य त्या अटींसह संमतीपत्र दिले होते. तसेच ४३ मेगावॅट प्रकल्पासाठीचे संमतीपत्र रद्द केलेले आहे.

२) मा. मंत्री, ऊर्जा, यांनी दिनांक २५/०८/२००७ रोजी रत्नागिरी येथे बैठक घेतली. बैठकीत निर्देशित केल्यानुसार मे.फिनोलेक्स इंडस्ट्रीज लि. यांनी त्यांच्या २२ मेगावॅट क्षमतेच्या वीज निर्मिती प्रकल्पाचे बांधकाम थांबविलेले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, उत्तरामध्ये म्हटले आहे की, "...महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने योग्य त्या अटींसह संमतीपत्र दिले होते. तसेच ४३ मेगावॅट प्रकल्पासाठीचे संमतीपत्र रद्द केलेले आहे." माझा प्रश्न असा आहे की, आपण जे संमतीपत्र रद्द केले ते कायमचे केले की तात्पुरते केले ? तसेच बांधकाम पाडून देण्याचे आदेश दिले का ? तसेच, प्रकल्पासाठी जेटीचे बांधकाम मंजूर करण्यात आलेले आहे, ते बंद करण्याचे आदेश देण्यात आले का ?

श्री.गणेश नाईक : सभापती महोदय, फिनोलेक्स उद्योग समुहाने सुरुवातीला २२ मेगावॅट क्षमतेची कॅपटीव्ह वीज निर्मिती करण्याकरिता परवानगी मागितली होती. कन्सन्ट टू एस्टॅब्लिश यानुसार कारखान्याला परवानगी देण्यात आली. दि.५.८.२००६ रोजी त्यावेळी व्यवस्थापनाने ४३ मेगावॅट क्षमतेच्या वीज उभारणीसाठी मागणी केल्यानंतर...

नंतर श्री.रोझेकर...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र.34039 पुढे सुरु...........**

श्री.गणेश नाईक...........

विशिष्ट क्षमतेनंतर पब्लिक हिअरिंग घ्यावी लागते. त्या अनुषंगाने हिअरिंग घेण्यात आली. जनतेचे असे म्हणणे आहे की, आमच्या परिसरामध्ये कोळशावर आधारीत वीज प्रकल्प नको आहे, गॅसबेस असेल, प्रदुषणविरहित प्रकल्प असेल तर आमचे काहीही म्हणणे नाही. माननीय पालकमंत्री आणि माननीय उर्जामंत्री यांच्या उपस्थितीत दिनांक 25/08/2007 रोजी रत्नागिरी येथे आंदोलनकर्ते, ज्यांचा या प्रकल्पाला विरोध आहे, या सर्व लोकांची बैठक घेण्यात आली. सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांनी असा प्रश्न विचारला आहे की, प्रकल्प कायमस्वरुपी रद्द करण्यात आला आहे का ? त्यासंदर्भात मी हे निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, शासनाने नियुक्त केलेल्या उच्चाधिकार समितीसमोर ही सर्व बाब ठेवण्यात येईल व त्यानंतर त्यांचा जो अहवाल प्राप्त होईल त्यानुसार पुढील निर्णय घेण्यात येईल.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, मी वेगळया पद्धतीने प्रश्न विचारतो माननीय मंत्री महोदयांनी वेगळया पद्धतीने उत्तर देण्याचा प्रयत्न करावा. या प्रकल्पाचे काम फायनली थांबविले आहे काय ? जी उच्चाधिकार समिती नेमलेली आहे ती शासनापेक्षा मोठी आहे काय ? कारण, उच्चाधिकार समिती ही शासनानेच नेमलेली आहे. समितीने शासनाला नेमलेले नाही. शासनानेच समितीला नेमलेले असल्यामुळे शासनाने दिलेले आश्वासन हे समितीवर बंधनकारक आहे काय ? हे आश्वासन दिले आहे ते जनतेची तात्पुरती फसवणूक करण्याकरीता आहे की कायमस्वरुपी मान्यता देण्याकरीता आहे ?

श्री.गणेश नाईक : सभापती महोदय, शासन हे सर्वोच्च आहे. शासनाने काही अधिकारांसहीत सर्व बाबींची तपासणी करण्यास समितीला सांगितले आहे. शासनाने अधिकार दिल्यानंतर त्या समितीला शासनाचेच अधिकार प्राप्त झाले आहेत. त्यांना सर्व शहानिशा करण्यास सांगितले आहे, ती त्यांनी केल्यानंतर योग्य-अयोग्यतेचा निर्णय घेता येईल.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, असे असेल तर त्यांचा अहवाल येण्यापूर्वीच प्रकल्पाचे काम थांबविण्याचा निर्णय शासनाने कसा घेतला ?

...2.......



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र.34039 पुढे सुरु...........**

श्री.गणेश नाईक : सभापती महोदय, त्या ठिकाणच्या आंदोलनकर्त्यांच्या भावना लक्षात घेऊन प्रकल्पाच्या कामाला तात्पुरती स्थगिती देण्यात आली आहे. स्थगिती देण्यात आली आहे याचा अर्थ कायमस्वरुपी काम थांबविण्यात आले आहे, असा नाही. उच्चाधिकार समिती त्यांचा अहवाल शासनाला सादर करेल. आंदोलनकर्त्यांची भूमिका योग्य आहे, असे समितीने सांगितले तर प्रकल्पाचे काम कायमस्वरुपी बंद करण्यात येईल.

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, आंदोलनकर्त्यांबरोबर माननीय उर्जामंत्र्यांची रत्नागिरीला ऑगस्टमध्ये बैठक झाली होती. त्यानंतर एका आठवडयाच्या आत हायपॉवर कमिटीची बैठक बोलाविण्यात येणार होती. ही बैठक कधी बोलाविणार व या समितीचा अहवाल कधी प्राप्त होणार ?

श्री.गणेश नाईक : सभापती महोदय, समितीच्या बैठक आयोजनाबाबत माननीय मंत्री महोदयांनी कोणता शब्द दिला, याची मला माहिती नाही. परंतु, अधिवेशन संपल्याबरोबर या समितीला बैठक घेण्यास सांगण्यात येईल.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, हा कारखाना गेल्या 15-20 वर्षांपासून सुरु आहे. चांगल्याप्रकारे स्थानिकांना रोजगार उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न होतो आहे. 22 मेगावॅट विजेच्या प्रकल्पाला शासनाने यापूर्वीच मान्यता दिलेली आहे आणि परिसरातील लोकांनीही त्याबाबत आक्षेप घेतलेला नाही. अनेक आंदोलने होतात. प्रदुषण होता कामा नये या आंदोलनकर्त्यांच्या मागणीचे आपण समर्थन करु शकतो. परंतु, राज्याला विजेची असलेली गरज लक्षात घेता आणि साखर कारखान्यांना वीज निर्मितीला परवानगी देत असतांना एवढेच नव्हे तर सदर कारखाना स्वत:च्या हिंमतीवर प्रकल्प उभा करु इच्छित असतांना आंदोलनकर्त्यांचे समाधान करण्याकरीता शासन स्वत:हून पुढाकार घेऊन हा प्रकल्प लवकरात लवकर सुरु होण्याच्यादृष्टीने परवानगी देईल काय ?

श्री.गणेश नाईक : सभापती महोदय, उच्चाधिकार समितीकडे ही बाब गेल्यानंतर त्यांच्याकडून जो अहवाल प्राप्त होईल त्या अनुषंगाने पुढील पावले टाकली जातील.

यानंतर कु.धनश्री.........

अप्रकाशित / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.34039......

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, रत्नागिरी जिल्हयामध्ये, कारखान्यामधील प्रदूषणाचा प्रश्न येथे उपस्थित झालेला आहे. त्याचे मुलभूत कारण हा परिसर प्रदूषणमुक्त रहावे हे आहे. त्यामुळे अनेक उद्योगांना रत्नागिरी जिल्हयामध्ये विरोध करण्यात आला. आजही तेथे नवीन उद्योग स्थापन करण्यास जनतेकडून विरोध करण्यात येतो. रत्नागिरी जिल्हयामध्ये आंब्याचे ,काजूचे उत्पादन मोठया प्रमाणात होते. याउत्पादनाला प्रदूषणामुळे धोका पोहचेल व तेथील लोकांची रोजीरोटी जी आहे, ती या उद्योगामुळे नष्ट होईल अशी तेथील लोकांची भावना झाल्यामुळे तेथील जनतेने या प्रकल्पास विरोध केला. माननीय उर्जा मंत्री तेथे गेले होते. त्यावेळी खूप मोठे आंदोलन करण्यात आले होते. त्यावेळी माननीय मंत्री महोदयांनी यासंदर्भात काही आश्वासने दिली. परंतु त्यानंतर देखील बऱ्याच कालखंडा गेला. उच्चाधिकार समिती म्हणजेच हाय पॉवर समिती नेमली आहे त्या कमिटीसमोर जो प्रश्न आहे, त्याचे टर्म्स ऑफ रेफरन्स काय आहेत व हा अहवाल किती महिन्यात सादर करावा या संदर्भात काही गाईडलाईन दिलेली आहे काय ?

श्री. गणेश नाईक : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार यांनी येथे काही बाबी आपल्या निदर्शनास आणल्या आहेत. रत्नागिरी जिल्हा हा आंबा आणि काजूचे उत्पादन होणारा प्रदेश आहे. सर्वसामान्य लोकांना असे वाटत असते की, आपल्या उपजिवीकेवर कोणताही विपरीत परिणाम होऊ नये. त्याच्याशी शासन सहमत आहे. उच्चाधिकार समितीला निश्चितपणे हेच सांगितले गेले की, या कारखान्याचा कॅप्टीव्ह वीज प्रकल्प तयार होताना , तेथील परिसरामध्ये पर्यावरणाची कोणतीही हानी होऊ नये. आरोग्याच्या दृष्टीने तेथे कोणते दुष्परिणाम होणार आहेत, यासर्व बाबींची तपासणी करुन अहवाल सादर करण्यात येईल. हा अहवाल किती दिवसात सादर करण्यात येईल ही माहिती सध्या माझ्याकडे उपलब्ध नाही. ती यानंतर पटलावर ठेवण्यात येईल.

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, परवानगी प्रदूषण नियंत्रण मंडळाने ज्यावेळी 43 मेगावॅट वीज उत्पादन करण्याची परवानगी दिली, त्यावेळी त्यासंबंधी सुनावणी घेण्यात आली होती काय, संबंधित ग्रामपंचायतीचे नो ऑब्जेक्शनचे दाखले त्यांना मिळाले होते काय, त्यावेळेला जर सुनावणी घेण्यात आली असेल तर त्याबाबत किती लोकांनी हरकती घेतल्या होत्या ?





असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.34039......

श्री. गणेश नाईक : सभापती महोदय, 22 मेगावॅट क्षमतेचा प्रकल्प उभारण्यासाठी पब्लिक हिअरिंगची आवश्यकता लागत नाही. परंतु या मर्यादेच्या पलिकडे मागणी केल्यानंतर पब्लिक हिअरिंग करावे लागते. त्या अनुषंगाने,प्रदुषण नियंत्रण मंडळाने लोकांमध्ये जागृती केली. त्यावेळी लोकांनी सांगितले की, आम्हाला, कोळशावर आधारीत असणारा वीज प्रकल्प नको.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, 43 मेगावॅट क्षमतेचा प्रकल्प उभारताना, हिअरिंग घेतले. त्यावर लोकांनी काही ऑब्जेक्शन घेतले. तरीदेखील 43 मेगावॅट प्रकल्पासाठीचे संमतीपत्र प्रदूषण मंडळाने कसे दिले ? माझा दुसरा प्रश्न असा आहे की, सनमाननीय सदस्य श्री. संजय केळकर यांनी सांगितल्याप्रमाणे, माननीय उर्जा मंत्र्यांनी स्पष्ट असे आश्वासन दिले होते. इलेक्ट्रॉनिक मिडियाला बाईट दिले. 7 दिवसांच्या आत उच्चाधिकार समितीसमोर निर्णय घेण्यात येईल. हा केवळ जनरल विरोध नाही तर अतिशय अभ्यासपूर्ण विरोध आहे. आम्ही जे मुद्दे मांडत आहोत ते आपण खोडून काढावेत. तेथील लोकांनी अतिशय अभ्यासपूर्ण पद्धतीने हे मुद्दे काढले आहेत. अधिवेशन संपल्यानंतर 8 दिवसांच्या आत यासंदर्भात आपण निर्णय घेणार काय ?

श्री. गणेश नाईक : सभापती महोदय, 43 मेगावॅटच्या प्रकल्पाला संमतिपत्र देण्यात आलेले नाही.एखादा उद्योग स्थापन झाल्यानंतर कन्सेंट टू ऑपरेट, त्या निकषाच्या आधाराने पर्यावरण आरोग्य जनहीत या बाबींचे कव्हरेज जर मिळाले असेल तरच ऑपरेटीव्ह परवानगी देण्यात येते. कारखाना उभा केला आहे याचा अर्थ कारखाना चालू करण्याची परवानगी दिली आहे असा होत नाही.

**सभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे.

.............

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.:पृ.शी. : लेखी उत्तरे.**

**मु.शी. :** तारांकित प्रश्नासंबंधी अधिक माहिती सभागृहासमोर ठेवणे.

--

श्री. राणा जगजितसिंह पाटील (रोजगार व स्वयंरोजगार राज्यमंत्री) : महोदय, मी आपल्या अनुमतीने "मौलाना आझार आर्थिक विकास महामंडळामार्फत लाभार्थींना कर्ज वाटपातील अटी शिथिल करण्याबाबत या विषयावरील सर्वश्री. धनाजी साठे, संजय दत्त, मुझफ्फर हुसेन, यशवंतराव गडाख, कर्नल सुधीर सावंत यांच्या दिनांक 12 डिसेंबर 2006 राजी उत्तरित झालेल्या तारांकित प्रश्न क्रमांक 20465 ची अधिक माहिती सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अधिक माहिती सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

अधिक माहिती

( **प्रेस** : कृपया सोबतची अधिक माहिती येथे छापावी. )

...... क्यूक्यू 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी. मु.शी.** : कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे.

श्री. रणजित कांबळे (ग्रामविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन् 2001-02 व 2002-03 चे महाराष्ट्रातील जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांचे वार्षिक एकत्रित वित्तीय व महसुली लेखी सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांचे वार्षिक एकत्रित वित्तीय व महसुली लेखी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहेत.

श्री. बाबा सिद्दीकी (कामगार राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने

1) कापूस बाजार कामगार मंडळ बृहन्मुंबईचा सन 1999-2000, 2000-2001, 2001-2002, 2002-2003 व 2003-2004 चा अनुक्रमे अठ्ठावीसावा, एकोणतिसावा, तिसावा, एकतिसावा व बत्तिसावा वार्षिक अहवाल .,

2) जळगांव जिल्हा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळाचा सन 1999-2000 चा वार्षिक अहवाल .,

3) धुळे माथाडी व असंरक्षित कामगार मंडळाचा सन 1999-2000 चा अकरावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

4) सोलापूर जिल्हा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळाचा सन 1996-97, 997-98, 1998-99 व 1999-2000 चा अनुक्रमे आठवा, नववा, दहावा व अकरावा वार्षिक अहवाल.,

5) सातारा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळाचा सन 1993-94 व 1994-95 चा अनुक्रमे तिसरा व चौथा वार्षिक अहवाल .,

6) अमरावती माथाडी व असंरक्षित कामगार मंडळाचे सन 2001-2002, 2002-2003 व 2003-2004 चे वार्षिक अहवाल .,

7) अहमदनगर माथाडी व असंरक्षित कामगार मंडळाचा सन 2001-2002 व 2002-2003 चा अनुक्रमे अकरावा व बारावा वार्षिक अहवाल .,

8) कोल्हापूर जिल्हा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळाचा सन 2002-2003 चा लेखा परिक्षण अहवाल .,

...... क्यूक्यू - 3 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सिद्दीकी ....

9) जालना जिल्हा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळाचे सन 2003-2004, 2004-2005, 2005-2006 व 2006-2007 चा अनुक्रमे पंधरावा, सोळावा, सतरावा व अठरावा वार्षिक अहवाल .,.

10) लातूर व उस्मानाबाद जिल्हा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळाचा सन 2001-2002, 2002-2003, 2003-2004, 2004-2005 व 2005-2006 चा अनुक्रमे अकरावा, बारावा, तेरावा, चौदावा व पंधरावा वार्षिक अहवाल .,

11) मुंबई लोखंड व पोलाद कामगार मंडळाचा सन 2000-2001, 2001-2002 व 2002-2003 चा अनुक्रमे एकतिसावा, बत्तिसावा व तेहतिसावा वार्षिक अहवाल .,

12) दि खोका मेकींग ॲण्ड टिंबर मार्केट लेबर बोर्ड, मुंबई चा सन 2002-2003 व 2003-2004 चा अनुक्रमे तिसावा व एकतिसावा वार्षिक अहवाल .,

13) किराणा बाजार व दुकाने (बृहन्मुंबई, ठाणे, रायगड जिल्ह्यांकरिता) मंडळाचा सन 1999-2000, 2000-2001, 2001-2002 व 2002-2003 चा अनुक्रमे तिसावा, एकतिसावा, बत्तिसावा व तेहतिसावा वार्षिक अहवाल .,

14) अकोला माथाडी व असंरक्षित कामगार मंडळाचा सन 1998-99 व 1999-2000 चा वार्षिक अहवाल.,

15) नांदेड माथाडी व असंरक्षित कामगार मंडळाचा सन 1999-2000, 2000-2001, 2001-2002 व 2002-2003 चा अनुक्रमे आठवा, नववा, दहावा व अकरावा वार्षिक अहवाल .,

16) माल वाहतुक कामगार मंडळ, मुंबईचा सन 2002-2003, 2003-2004 व 2004-2005 चा अनुक्रमे बत्तिसावा, तेहतिसावा व चौतिसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

**

..... क्यूक्यू 4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पंचायती राज समितीचा अहवाल सादर करणे.**

श्री. रामनाथ मोते (समिती सदस्य) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पंचायती राज समितीचा 2007-08 चा तेरावा व चौदावा अहवाल सभागृहाला सादर करतो.

**सभापती** : पंचायती राज समितीचा तेरावा व चौदावा अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

( यानंतर श्री. सरफरे .... आरआर 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी. : नियम 93 अन्वये सूचना.**

**सभापती** : सन्माननीय सदस्य सर्वश्री रामनाथ मोते, संजय केळकर, प्रतापराव सोनावणे यांनी "राज्यातील उच्च माध्यमिक शिक्षकांना मार्च, 2000 पासून 7,225/- रुपयांची वेतनश्रेणी लागू करुनही आदिवासी विभागाने मात्र उच्च माध्यमिक शिक्षकांना 2006 पासून वेतनश्रेणी लागू केल्याने त्यांच्यावर होत असलेला अन्याय दूर करण्याचे सभागृहात आश्वासन देऊनही शासनाने त्यानुसार कार्यवाही न केल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

सन्माननीय सदस्य सर्वश्री. जगदीश गुप्ता, नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर यांनी "मौजे मिरे, ता. जि. ठाणे येथील सर्व्हे नं. 225 या जमिनीचे कब्जेदार आदिवासी कुटुंबांना त्यांची जात नवबौध्द असल्याबाबतचे जातीचे खोटे दाखले सादर करुन त्याव्दारे एका बिल्डरने शासनाला फसवून बिगर शेती परवानगी मिळविणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

सन्माननीय सदस्य श्री. गोपीकिशन बाजोरिया यांनी "अकोला, वाशिम, बुलढाणा आदी जिल्हयात जमीन, प्लॉट, सदनिका आदी स्थावर मालमत्तेच्या खरेदी-विक्रीचे हस्तांतरण, शासनाने तयार केलेले रेडिरेकनर मधील किंमतीनुसार करणे बेकायदेशीर असल्याचे आदेश न्यायालयाने देऊनही रेडिरेकनरप्रमाणे मुद्रांक शुल्क आकारण्यात येणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

सन्माननीय सदस्य सर्वश्री. जयंत पाटील, शरद पाटील, कपिल पाटील यांनी "कार्यकारी अभियंता, खारभूमी सर्वेक्षण व अन्वेषण विभाग, रायगड यांचे अहवालानुसार अलिबाग तालुक्यातील एकूण 1050 हेक्टर जमिनीचे क्षेत्र कायम स्वरुपी नापिक होणे, सदर शेतकऱ्यांना पिवळे रेशनकार्ड देण्याबाबत जिल्हाधिकारी यांनी प्रस्ताव पाठवूनही त्यावर विचार न होणेबाबत"



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ D/

**सभापती**...

या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

सन्माननीय सदस्य सर्वश्री. जयंत पाटील, शरद पाटील, कपिल पाटील यांनी "नाशिक वीज परिमंडळ परिसरात 10 अधिकाऱ्यांनी 24 पोलच्या सहाय्याने 11 के.व्ही. उच्चदाबाची स्वतंत्र लाईन उभारुन एका कनिष्ठ अभियंत्याच्या सुमारे 200 ते 250 एकर जमिनीला बेकायदेशीर पाणी देणे, अहमदनगर येथील वीज वापरणाऱ्या 34 शेतकऱ्यांवर गुन्हे दाखल होणे, अकोला येथील कनिष्ठ लिपिकाने 10 लाखाचा भ्रष्टाचार करणे, धुळे येथील एका कर्मचाऱ्याने 57 लाखाचा भ्रष्टाचार करणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

---

**<u>सभागृहामध्ये कॅबिनेट मंत्री उपस्थित नसणे</u>**

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, सभागृहामध्ये कॅबिनेट मंत्री उपस्थित नसल्यामुळे सभागृहाचे कामकाज आपण स्थगित करावे अशी माझी विनंती आहे.

**सभापती** : ठीक आहे, मी सभागृहाचे कामकाज 10 मिनिटांकरिता तहकूब करीत आहे.

( दुपारी 2.12 ते 2.22 पर्यंत स्थगित )

----

(यानंतर श्री. बरवड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( स्थगितीनंतर )

**( सभापतीस्थानी माननीय उपसभापती )**

**उपसभापती** : यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री सागर मेघे, पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी यांनी "मुंबई शहरात एकूण 5 सहकार न्यायालये असून विदर्भात नागपूर, भंडारा, गोंदिया, गडचिरोली, चंद्रपूर, वर्धा या 6 जिल्ह्यांसाठी नागपूर येथे एकच सहकार न्यायालय असणे, सदर न्यायालयातील न्यायाधीशाचे पद जून, 2007 पासून रिक्त असणे तसेच 5500 प्रकरणे निर्णयाअभावी प्रलंबित असणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर यांनी "सन 1996 मध्ये नागपूर विणकर सहकारी सूतगिरणी अवसायनात निघाल्याने गेली 10 वर्षे सदर गिरणी सुरु व्हावी यासाठी प्रयत्न करुनही ती सुरु न होणे, सदर गिरणीची 21 एकर जागा फुटाण्याच्या भावात विकणे, सदर गिरणी कायद्यानुसार भाग धारकांना पुन्हा सुरु करण्यासाठी देणे आवश्यक असतानाही न देणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे, मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य डॉ. नीलम गोऱ्हे यांनी "मेळघाटात मुलींची परप्रांतात मोठ्या प्रमाणावर होत असलेली विक्री, मुलींना परप्रांतात पाठविण्यासाठी बाह्य व स्थानिक एजंट एकत्र येऊन गरीब आई-वडिलांना घेऊन त्यांना हुंड्यापोटी 10 ते 15 हजार रुपये देऊन सदर तरुणीची मध्यप्रदेश, राजस्थान, दिल्ली इत्यादी राज्यात अवैध विक्री होत असणेबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे, मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री मधुकर चव्हाण, विनोद तावडे, रामनाथ मोते, संजय केळकर यांनी " इयत्ता 10 वीच्या मराठीच्या पाठ्यपुस्तकात झालेल्या असंख्य चुकांमुळे नव्याने

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** ..........

छापण्यात आलेली पाठ्यपुस्तके सन 2007-08 या वर्षापुरतीच अभ्यासक्रमात ठेवावी व पुढील शैक्षणिक वर्षात नव्याने पुस्तकाची निर्मिती करण्याची शिफारस पाठ्यपुस्तक पुनर्संपादन समितीने करणे, त्यामुळे आधीच 13 लाख पुस्तके छापल्याने पुढील वर्षी नव्याने पुस्तके छापल्यास सदर पुस्तके रद्दीत जाणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे, मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, सागर मेघे, जगदीश गुप्ता यांनी "नागपूर शहरातील गांधीबाग व सिव्हील लाईन येथील वीज वितरण फ्रँच्याईझी झाल्याचे दिनांक 26.11.2007 रोजी उघडकीस येणे, या व्यवहारासंबंधी निविदा न मागविणे, कर्मचा-यांचा सदर फ्रँच्याईझीस विरोध असणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे, मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

-------

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी**. : उच्च न्यायालयाने निर्णय देऊनही कायम विना अनुदानित शाळांना अनुदानित तत्वावर आणण्याच्या बाबतीत निर्णय न होणे.

**मु. शी**. : उच्च न्यायालयाने निर्णय देऊनही कायम विना अनुदानित शाळांना अनुदानित तत्वावर आणण्याच्या बाबतीत निर्णय न होणे याबाबत प्रा. बी. टी. देशमुख, व्ही. यू. डायगव्हाणे, प्रा. वसंतराव खोटरे, सर्वश्री जी. एल. ऐनापुरे, कपिल पाटील, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

प्रा. वसंत पुरके ( शालेय शिक्षण मंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य प्रा. बी. टी. देशमुख, व्ही. यू. डायगव्हाणे, प्रा. वसंतराव खोटरे, सर्वश्री जी. एल. ऐनापुरे, कपिल पाटील, वि. प. स. यांनी "उच्च न्यायालयाने निर्णय देऊनही कायम विना अनुदानित शाळांना अनुदानित तत्वावर आणण्याच्या बाबतीत निर्णय न होणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

यानंतर श्री. शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी.टी.देशमुख : मी स्पेसिफिक ज्या गोष्टींचा उल्लेख माझ्या सूचनेमध्ये केलेला आहे त्यासंबंधी कोणत्याही प्रकारचा खुलासा निवेदनामध्ये करण्यात आलेला आहे. विशेषत: हायकोर्टाने एक निर्णय दिलेला आहे. त्या निर्णयामध्ये हायकोर्टाने असे म्हटलेले आहे की, 'In other words, the expression "Permanent no grant basis' used in the permission dated 2nd June, 1999 does not mean denial of no grant permanently but subject to consideration of grant-in-aid in accordance with the law and the policy that may be formulated by the State Government on improvement of the State's financial condition and other relevant circumstances.'

हायकोर्टाच्या दुस-या एका निर्णयामध्ये असे म्हटलेले आहे की,

'In other words, for all practical purposes, the recognition of petitioner's school on permanent non-grant basis has to be read and understood as recognition of petitioner's school on non-grant basis.' खरे म्हणजे विनाअनुदान या शब्दाचा अर्थ बदलल्यामुळे कायम विनाअनुदान असा शब्द पुढे वापरावा लागला. 1983 मध्ये हे विनाअनुदान सुरु झाले. सरकार असे सांगते की, मरेपर्यन्त विनाअनुदान. या संदर्भात 5, 7, 10 वर्षे शिक्षकांनी, व्यवस्थापकांनी राज्यभर आंदालने केली, 500 लोक माननीय मुख्यमंत्र्यांच्या गाडी समोर आडवे झाले. त्यानंतर 75, 100चा जी.आर. निघाला. विनाअनुदान 25 टक्के, 50 टक्के, 75 टक्के आणि 100 टक्के म्हणून असा शब्द वापरण्यात आला. हायकोर्टाने असे सांगितले की, कायम विनाअनुदान शब्दाचा अर्थ विनाअनुदान असाच लावण्यात यावा. मी होयकोर्टाचे निर्णय सांगितले, त्याच्यां तारखा सांगितल्या. पण त्याबद्दल एक ओळ देखील निवेदनामध्ये खुलासा करण्यात आलेला नाही. सभागृहामध्ये लक्षवेधी आणि अन्य आयुधांमार्फत उपस्थित केलेल्या प्रश्नांच्या वेळी मंत्री महोदयांनी कोणकोणती आश्वासने दिली ती मी आज आणलेली आहेत. ती मी वाचून दाखवित नाही. कारण ज्यांनी ती आश्वासने दिली ते मंत्री आणि राज्यमंत्री सभागृहामध्ये उपस्थित आहेत. हायकोर्टामध्ये केलेले ॲफिडेव्हिट देखील वाचून दाखविण्याचे कारण नाही. कारण मंत्री महोदयांना हे माहीत आहे की, हे टप्प्याटप्प्याने राहील. या वर्गासाठी करु, त्या वर्गासाठी करु अशी आश्वासने दिलेली आहेत. मी त्यांचा आभारी आहे. त्यांनी टोटल निगेटिव्ह अटिट्युड घेतलेला नाही. विषमतेची बेटे समाजामध्ये फार दिवस शिल्लक राहात नाहीत.

==2==



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावा.

प्रा. बी.टी.देशमुख : माझा प्रश्न असा आहे की, हायकोर्टाने दिलेल्या निर्णयाप्रमाणे तसेच केलेल्या ॲफिडेव्हिट प्रमाणे शासनाने काय कारवाई केलेली आहे ? नसल्यास, कोणती कारवाई केली जाईल ?

श्री. हसन मुश्रीफ : हे खरे आहे की, 2001 सालापासून मंत्रिमंडळाने या राज्यामध्ये खाजगी प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळा द्यावयाच्या असतील तर त्या कायम विनाअनुदान तत्वावर द्याव्यात असा निर्णय घेतला. कारण त्यावेळी राज्याची आर्थिक परिस्थिती बरी नव्हती. त्यावेळी अनेक शाळा उच्च न्यायालयामध्ये गेल्या. त्यावेळी शासनाने एक ॲफिडेव्हिट केले आणि सांगितले की, आता ज्या विनाअनुदान शाळा आहेत त्या अनुदानावर आल्यानंतर पहिल्यांदा जेथे आदिवासी शिक्षणापासून लांब आहे, जेथे झोपड्या असतील त्याबाबतीत प्राधान्य देऊ. याबाबतीत आम्ही पॉलिसी नंतर करु. आता हे काम अंतिम टप्प्यावर आलेले आहे. प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळा आणि तुकडया किती आहेत याची माहिती संकलित करण्याचे काम चालू आहे. आम्ही लवकरात लवकर मंत्रिमंडळापुढे येऊन कायम विनाअनुदान शाळांच्या बाबातीत पॉलिसी ठरविणार आहोत.

...नंतर श्री.भोगले..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, हाच विषय मागील अधिवेशनात लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून मी सभागृहात उपस्थित केला होता. या विषयावर सर्वंकष चर्चा झाली. इतकेच नव्हे तर आपल्या निर्देशानुसार यासंदर्भात माननीय सभापतींच्या दालनामध्ये बैठक सुध्दा झाली होती. त्या बैठकीला माननीय शिक्षणमंत्री, माननीय अर्थमंत्री ही मंडळी उपस्थित होती. त्या बैठकीमध्ये माननीय सभापतींनी शासनाला निर्देश दिले होते. शासनाने कायम विनाअनुदान तत्वावरील शाळा देण्याचा निर्णय 24.11.2001 रोजी घेतला याचा अर्थ त्यापूर्वीच्या सर्व कायम विनाअनुदान शाळांना अनुदान देण्याची जबाबदारी शासनाची आहे. त्यामुळे त्या सर्व शाळांना अनुदान देण्यासाठी किती खर्च येईल याची आकडेवारी द्यावी आणि तातडीने या शाळांना अनुदान देण्याचा निर्णय घ्यावा. दुसरे निर्देश असे दिले होते की, त्यानंतरच्या ज्या शाळा आहेत त्या नंतरच्या कायम विनाअनुदान तत्वावरील शाळांना सुध्दा शासनाला टप्प्याटप्प्याने अनुदान द्यावे लागेल आणि ते तातडीने देण्याची कारवाई करावी अशा प्रकारचे निर्देश माननीय सभापतींनी दिले होते. या संदर्भात कोणतीही कारवाई झालेली नाही. निवेदनात म्हटले आहे की, मराठी आणि अन्य माध्यमाच्या 1834 शाळा आहेत त्यासाठी किती बोजा पडू शकतो याची माहिती घेत आहोत.

सभापती महोदय, एका शाळेसाठी 9.90 लक्ष इतका वार्षिक खर्च येतो. शाळांची संख्या निश्चित आहे. एका शाळेला वर्षाला 9.90 लक्ष रुपये खर्च येतो. एक मुख्याध्यापक, चार शिक्षक, दोन शिपाई, एक लिपीक यांच्यासाठी हा 9.90 लक्ष रुपये खर्च येतो. त्यापेक्षा जास्त एका वर्षासाठी खर्च होत नाही. उदाहरण आपल्यासमोर आहे, गणित आपल्यासमोर आहे. त्यामुळे अधिक माहिती मिळविण्याच्या नावाखाली आमचा हक्क नाकारला जात आहे. या संदर्भात माननीय सभापतींनी बैठकीत तातडीने कारवाई करण्याचे आदेश दिले होते, त्याची तातडीने अंमलबजावणी करण्याचे निर्देश आपण शासनाला द्यावेत अशी माझी विनंती आहे.

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, मी मघाशी सांगितल्याप्रमाणे या कायम विनाअनुदान तत्वावरील शाळांना अनुदानावर आणायचे आहे. सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांनी सांगितले की, समाजामध्ये असंतोष निर्माण झाला आहे. काही शाळांमध्ये चांगले शिक्षण मिळत नाही, शिक्षकांना पगार मिळत नाही. पहिल्यांदा ॲफिडेव्हीट घेऊनच शाळा मंजूर केल्या होत्या. हा विषय शासनाला निकाली काढायचा आहे. 230 कोटी रुपये माध्यमिक शाळांना आणि 73

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हसन मुश्रीफ..........

कोटी रुपये उच्च माध्यमिक शाळांना लागतात अशी माहिती संकलित झालेली आहे. लवकरात लवकर यातून बाहेर पडण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. मंत्रिमंडळाच्या बैठकीत विषय आणून टप्प्याटप्प्याने अनुदान आणि जे धोरण ठरविले जाईल त्याप्रमाणे देणार आहोत.

**उपसभापती** : या विनाअनुदान तत्वावरील शाळांच्या संदर्भात काही मंडळी उपोषणास बसली होती. त्यांची भेट घेण्यासाठी मंत्रीमहोदयांसोबत मी देखील गेलो होतो. ज्यावेळी सन्माननीय मंत्री प्रा.वसंत पुरके यांनी उपोषणकर्त्यांना सांगितले की, या संदर्भात मला जे काही म्हणणे मांडावयाचे आहे ते मी कॅबिनेटपुढे मांडेन. मला असे वाटते की, मंत्रीमहोदयांनी जे काही आश्वासन दिले आहे ते माझ्यादेखत दिलेले आहे. एवढे आश्वासन दिल्यानंतर काही काळ थांबणे आवश्यक आहे ही वस्तुस्थिती आहे. कायम विनाअनुदान तत्वावर शाळा देताना संबंधितांकडून लेखी लिहून घेतले होते ही वस्तुस्थिती आहे. आमच्यासारखी माणसे शाळा मंजूर करुन घेतात आणि कायम विनाअनुदानावर मंजूर करा असे त्यावेळी म्हणतात. नंतर पुन्हा अनुदानाचीही मागणी केली जाते. या संदर्भात जो प्रश्न मांडला आहे त्या अनुषंगाने मंत्रीमहोदयांनी विचार करण्याचे मान्य केले आहे.

(अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात)

मी आपल्याला एवढेच सांगतो की, माननीय मंत्रीमहोदयांनी ज्यावेळी उपोषणकर्त्यांची भेट घेतली होती त्यावेळी मी त्यांच्यासमवेत होतो. मंत्रीमहोदयांनीच उत्तर द्यावे असा आपला हट्ट असेल तर त्याचा अर्थ माझ्या बोलण्यावर आपला विश्वास नाही असा होतो.

(नंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी.टी.देशमुख : सभापती महोदय, मी आपला आभारी आहे. माननीय शिक्षण मंत्र्यांनी आपल्या समक्ष कायम विनाअनुदानित मंडपाला भेट देऊन सांगितले होते की, " आम्हाला हे करावयाचे आहे." यासंदर्भात माननीय शिक्षणमंत्र्यांनी जे सांगितलेले आहे ते बाहेर सांगितलेले आहे. माननीय मंत्रीमहोदयांनी जे शब्द उच्चारले होते तेच शब्द या ठिकाणी माननीय राज्यमंत्र्यांनी उच्चारलेले आहेत व हे शब्द मी काळजीपूर्वक ऐकलेले आहेत. माननीय राज्यमंत्र्यांनी सांगितले आहे की, "आम्हाला टप्प्याटप्प्याने अनुदानावर आणावयाचे आहे." या विषयाच्या संदर्भात जो निर्णय झालेला आहे त्याची अंमलबजावणी काही दोन दिवसात होणार नाही याची आम्हाला देखील कल्पना आहे. परंतु यासंदर्भात टाईम बाऊंड कार्यक्रम देणे आवश्यक आहे. शिक्षक हे सदा सर्वकाळ खाजगी लोकांवर अवलंबून राहावे हे काही योग्य नाही. शिक्षकांना खाजगी लोकांवर सोपवणे व यासंदर्भात सरकारने काहीही करायचे नाही हे काही बरोबर नाही. त्यामुळे माननीय राज्यमंत्री महोदयांनी अनुदानाच्या संदर्भात टाईम टेबल ठरवून 2- 3 महिन्यात यासंदर्भात निर्णय होईल याबाबत घोषणा करावी अशी माझी विनंती आहे.

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, 3 महिन्याच्या आत हा विषय मंत्रीमंडळाच्या बैठकीपुढे आणला जाईल.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, आपण पुढाकार घेऊन आम्हाला न्याय देण्याचा प्रयत्न केल्याबद्दल आम्ही आपले फार आभारी आहोत. परंतु गेल्या तीन अधिवेशनात लवकरात लवकर निर्णय घेतला जाईल असे शब्द आम्ही किती तरी वेळेस ऐकलेले आहेत. कायम विनाअनुदानित आणि अनुदानित ही विषमता आपल्याला संपवणे आवश्यक आहे. दुस-या बाजूने शासनाने मुलींची फी माफ करण्याचा, मागासवर्गीय मुलांची फी माफ करण्याबाबत नियोजन आयोगाने राज्यसरकारला स्पष्ट सूचनाही केलेल्या आहेत. कायम विनाअनुदानित शाळेमध्ये शिकत असलेल्या विद्यार्थ्यांना फी भरावी लागत आहेत. त्यामुळे कायम विनाअनुदानित शाळेत शिक्षण घेतलेल्या मुलींची, इबीसीं विद्यार्थ्यांची तसेच मागासवर्गीय मुलांची फी शासन भरणार आहे काय?

....2

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, हा वेगळा प्रश्न आहे. या प्रश्नाच्या संदर्भात आम्ही प्रामाणिपणे काम करीत आहोत. राज्यात 247 विनाअनुदानित शाळा असून आदिवासींच्या अटी 140 शाळांनी पूर्ण केलेल्या असून राहिलेल्या 50 शाळांनी आदिवासी विभागाच्या अटी पूर्ण न केल्यामुळे त्यांना अनुदान दिले जाणार नाही असे आदिवासी विभागाने कळवलेले आहे. अटी आणि उपस्थिती च्या संदर्भातील अटी आम्ही शिथील केलेल्या आहेत. आता अनुदान देण्याच्या संदर्भात थोडयाच शाळा राहिलेल्या आहेत. अनुदान देणे एवढेच आमचे काम राहिलेले आहे. आमच्यावर विश्वास ठेवा. आमच्यावर जी जबाबदारी सोपविण्यात आलेली आहे ती निश्चितपणे पार पाडली जाईल. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी जो प्रश्न उपस्थित केलेला आहे त्यासंदर्भात शासनाची जबाबदारी असेल तर ती बाब तपासून त्यावर निर्णय घेतला जाईल.

श्री. व्ही.यू. डायगव्हाणे : सभापती महोदय, विनाअनुदानीत शाळेच्या संदर्भात तीन महिन्यात कॅबिनेटपुढे आणला जाईल अशी माहिती माननीय मंत्रीमहोदयांनी न देता पॉझिटीव्ह निर्णय करुन कॅबिनेटमध्ये हा विषय आणू असे सांगावयास पाहिजे.

**उपसभापती** : मंत्रीमंडळाच्या बैठकीत हा विषय आणल्याशिवाय निर्णय कसा काय घेता येईल. आता पहिली लक्षवेधी सूचना घेण्यात येईल.

-------------

....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : राज्यातील ओ.बी.सी. प्रवर्गातील विद्यार्थ्यांना 100 टक्के शिष्यवृत्ती मिळण्याबाबत.

**मु. शी.** : राज्यातील ओ.बी.सी. प्रवर्गातील विद्यार्थ्यांना 100 टक्के शिष्यवृत्ती मिळण्याबाबत सर्वश्री सुधाकर गणगणे, रमेश निकोसे, गिरीष गांधी, विक्रम काळे, संजय दत्त, धोंडीराम राठोड, जैनुद्दी जव्हेरी, शरद रणपिसे, राजेंद्र जैन, जितेंद्र आव्हाड, सर्व श्रीमती सुधा जोशी, मंदा म्हात्रे, उषाताई दराडे, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. सुधाकर गणगणे ( महाराष्ट्र विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्यातील ओ.बी.सी. प्रवर्गातील विद्यार्थ्यांना सद्य: स्थितीत 50 टक्के शिष्यवृत्तीनुसार शिक्षण फी, परिक्षा फी तसेच व्यवसायिक शिक्षणाकरीता दिनांक 13 मार्च 2007 रोजीच्या शासन निर्णयाप्रमाणे देण्यात येणे, 100 टक्के शिष्यवृत्ती मिळावी याकरिता राज्यातील अनेक इतर मागासवर्गीय संघटनांनी मागणी करणे, परंतु याबाबत शासनाने कोणतीही दखल न घेणे, यामुळे या राज्यातील ओ.बी.सी. वर्गातील जवळ जवळ 5 लाख विद्यार्थी फी पासून वंचित असल्याने अनेक आर्थिक दुर्बल विद्यार्थी शिक्षणापासून वंचित होऊन त्यांचे शैक्षणिक नुकसान होणे, सदर शिक्षण शिष्यवृत्ती अपूर्ण मिळण्याच्या गंभीर प्रश्नामुळे राज्यातील लाखो ओ.बी.सी. विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झालेला असंतोष व याबाबत शासनाची प्रतिक्रिया व शासनाने करावयाची उपाययोजना. "

श्री. धर्मरावबाबा आत्राम ( विमुक्त, भटक्या जमाती व इतर मागासवर्गीयांचे कल्याण मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे ) ...4

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुधाकर गणगणे : सभापती महोदय, राज्यातील जवळ जवळ 5 लक्ष विद्यार्थ्यांना आज 50 टक्के शिष्यवृत्ती मिळत आहे. निवेदनात म्हटले आहे की, शासन स्तरावर 100 टक्के शिष्यवृत्ती देण्याबाबत छाननी सुरु आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना 100 टक्के शिष्यवृत्ती मिळण्याच्या छाननीला अजून किती दिवस लागणार आहेत ? सन 2004 मध्ये यासंदर्भात निर्णय झालेला असतांना 3 वर्षे होऊन गेली असली तरी याबाबतीत शासनाची छाननीच चालु आहे काय ? 100 टक्के शिष्यवृत्ती विद्यार्थ्यांना केव्हा मिळणार आहे ? राज्यात आज अनेक गरीब विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळत नसल्यामुळे,

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुधाकर गणगणे...........

ते शिक्षणपासून वंचित राहिलेले आहेत. तेव्हा ओ.बी.सी विद्यार्थ्यांना किती कालावधीत 100 टक्के शिष्यवृत्ती मिळेल याचे उत्तर मंत्रिमहोदय देतील काय ?

श्री.धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदय, हा प्रश्न सोडविण्यासाठी दिनांक 3 ऑक्टोबर 2007 रोजी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली दहा सदस्यांची एक समिती गठित करण्यात आलेली आहे. ओ.बी.सी.विद्यार्थ्यांना फी माफ करायची असेल तर त्यासाठी किती खर्च येईल याचा अभ्यास समिती करणार आहे. तसेच वेगवेगळ्या अभ्यासक्रमासाठी वेगवेगळी कॉलेजेस फी आकारते त्या संदर्भात समिती अभ्यास करणार आहे. यावर्षी जवळपास 65290 विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देत आहोत. यापूर्वी क्रिमिलेअरची मर्यादा 1 लाख रुपयांपर्यंत होती. मागील वर्षी केंद्र शासनाने ती 3 लाख रुपयांपर्यंत वाढविली. परंतु आपल्या राज्याने ही मर्यादा 4 लाख रुपयांपर्यंत वाढविली आहे. राज्य शासनाने हा एक चांगला निर्णय घेतलेला आहे. हा प्रश्न सोडविण्यासाठी एक समिती गठित केलेली आहे. त्या समितीचा रिपोर्ट आल्यानंतर तो ताबडतोब मंत्रिमंडळापुढे ठेवला जाईल.

श्री.सुधाकर गणगणे : सभापती महोदय, 5 लाख विद्यार्थ्यांचा प्रश्न आहे. ओ.बी.सी.वर्गातील अनेक विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहिलेले आहेत. जी समिती गठित करण्यात आलेली आहे त्या समितीचा अहवाल केव्हा प्राप्त होईल याचा खुलासा मंत्रिमहोदय करतील काय ?

श्री.धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदय, आपण यापूर्वी ओ.बी.सी.च्या विद्यार्थ्यांना काहीही सवलत देत नव्हतो. परंतु सन 2006-07 पासून त्यांना 50 टक्के सवलत देण्याचा धोरणात्मक निर्णय राज्य सरकारने घेतलेला आहे. सन 2007-08 मध्ये सुध्दा त्यांना सवलत देणार आहोत. सन 2008-09 मध्ये त्यांना 100 टक्के सवलत द्यावयाची किंवा कसे याचा अभ्यास करण्यासाठी एक समिती गठित केलेली आहे. त्या समितीचा रिपोर्ट आल्याबरोबर तो मान्यतेसाठी मंत्रिमंडळापुढे ठेवला जाईल.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, हा अतिशय संवेदनशील विषय आहे. महाराष्ट्रातील 52 टक्के लोकसंख्या असलेल्यांचा हा प्रश्न आहे. ओ.बी.सी.वर्गातील अनेक गरीब विद्यार्थ्यांना गरिबीमुळे शिक्षण घेता येत नाही. सन 2003 पासून आम्ही हेच उत्तर ऐकत आलो आहोत. तेव्हा मंत्रिमहोदयांनी या संदर्भात ठोस उत्तर द्यावे. किती दिवसांत निर्णय घेणार आहात हे सांगावे. आम्हाला भीक मागण्याची गरज नाही.

श्री.धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, भीक मागण्याची आवश्यकता नाही. ओ.बी.सी.वर्गातील विद्यार्थ्यांना आम्ही फी माफ द्यायला लावली. सन 2006-07 आणि 2007-08 मध्ये 50 टक्के फी माफ करण्याचा निर्णय घेतलेला आहे. सन 2008-09 मध्ये फी माफ करावी किंवा कसे या संदर्भात निर्णय घेण्यासाठी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठित केलेली आहे. .............

( अनेक सन्माननीय सदस्य एकाचवेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात. )

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, या संदर्भात माननीय मंत्रिमहोदय निर्णय घेत नसतील तर आपण माननीय मुख्यमंत्र्यांना सभागृहात बोलवावे. माननीय मुख्यमंत्री सभागृहात येईपर्यंत सभागृहाचे कामकाज स्थगित करावे. सन्माननीय मंत्रिमहोदयांनी याठिकाणी "आम्ही द्यायला लावली, सरकारने धोरणात्मक निर्णय घेतला असे सांगितले. कोणता धोरणात्मक निर्णय आहे हे त्यांनी सांगावे. तेव्हा माझी आपणास विनंती आहे की, आपण ही लक्षवेधी राखून ठेवावी.

यानंतर श्री.पुरी..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : सभागृहातील सन्माननीय सदस्यांच्या भावना लक्षात घेऊन ही लक्षवेधी सूचना मी राखून ठेवत आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मी अभिनंदन करतो व धन्यवाद देऊ इच्छितो की, ओबीसीच्या प्रश्नावर सरकार न्याय देत नसल्यामुळे सदरची लक्षवेधी सूचना आपण राखून ठेवली. मला एक गोष्ट खेदाने नमूद करावीशी वाटते की, या लक्षवेधी सूचनेच्या संदर्भात आम्ही तर मागणी केलीच, परंतु सत्ताधारी पक्षातील आमदारांनीही अत्यंत तडफेने व याप्रश्नावर तुटून पडून ओबीसी प्रवर्गास सरकार न्याय देत नसल्याचे निदर्शनास आणून दिले व हे सरकार ओबीसीवर अन्याय करीत असल्याचे त्यांनी जगजाहीर केले. याबाबतीत मी सर्व सन्माननीय सदस्यांना मन:पूर्वक धन्यवाद देतो.

----

..2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**लक्षवेधी क्रमांक 2 बाबत.**

**उपसभापती** : लक्षवेधी क्रमांक 2 ही श्रीमती मंदा म्हात्रे, श्रीमती उषाताई दराडे, श्रीमती फौजिया खान, सर्वश्री अरुण गुजराथी, भास्कर जाधव या सन्माननीय सदस्यांची आहे. सदरची लक्षवेधी सूचना पुढे ढकलण्यात येत आहे.

..3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : अमरावती जिल्हयातील 50 कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांचे वेतन अदा न होणे

**मु. शी.** : अमरावती जिल्हयातील 50 कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांचे वेतन अदा न होणे यासंबंधी सर्वश्री प्रा.बी.टी.देशमुख, व्ही.यू.डायगव्हाणे, वसंतराव खोटरे ,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

प्रा. बी.टी.देशमुख ( अमरावती विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय शालेय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"अमरावती जिल्ह्यातील जवळ जवळ ५० कनिष्ठ महाविद्यालयातील शेकडो शिक्षकांचे जानेवारी व फेब्रुवारी तसेच जुलै, ऑगस्ट व सप्टेंबर २००७ चे वेतन अजून पर्यत अदा न होणे, प्रत्यक्ष दिवाळीपूर्वी अनेक कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांना हे वतन न मिळणे, वरिष्ठ वेतन श्रेणीच्या फरकांच्या रकमा, वैद्यकीय प्रतिपूर्तीचा परतावा, इत्यादींच्या थकबाकीची ३१ मार्च २००७ पूर्वी सादर झालेली देयके अजूनपर्यंत अदा न होणे, राज्यातील कोणत्याही जिल्ह्यामध्ये वेतन विलंबाने होत असल्याचा प्रकार घडत नसतांना अमरावती जिल्ह्यामध्ये तो वारंवार घडणे, शिक्षण संचालक यांना शिक्षण उपसंचालक, अमरावती यांचे मार्फत १२ नोव्हेंबर २००७ रोजी विदर्भ ज्युनिअर कॉलेज टिचर्स असोसिएशनने उपोषण आंदोलनाची दिलेली नोटीस, संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाईची करण्यात आलेली मागणी, यापूर्वीसुध्दा २९ ऑगस्ट २००७ रोजी शिक्षण मंत्र्यांना व २७ सप्टेंबर २००७ रोजी शिक्षण उपसंचालक, अमरावती यांना स्वतंत्र निवेदन देऊन ही बाब लक्षात आणून देऊनही त्याबाबत कोणतीही कारवाई न होणे, वेतन वितरण व्यवस्थेची जबाबदारी पार पाडण्यात संबंधित अधिकाऱ्यांचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, त्यामुळे या शेकडो शिक्षकांमध्ये निर्माण झालेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाची भूमिका व प्रतिक्रिया."

श्री. हसन मुश्रीफ ( शालेय शिक्षण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..4.....

प्रा. बी.टी.देशमुख : सभापती महोदय, वेतन वितरण व्यवस्थेप्रमाणे वेतन होणे आवश्यक आहे. परंतु यामध्ये काही शिक्षकांचा दोष नसतानाही त्यांचे मागच्या वर्षीचे दोन महिन्यांचे व यावर्षीचे दोन महिन्यांचे वेतन वितरित करण्यात आलेले नाही. या व्यवस्थेमध्ये मुख्याध्यापकांकडून काही कळवले गेले नसेल तर त्याबाबतीत त्यांना प्रशासन करण्याची जबाबदारी ही शिक्षण संचालकांची आहे. माझा प्रश्न असा आहे की, त्या शिक्षकांनी दिनांक 29.8.2007 रोजी यामध्ये आमचा काहीही दोष नाही, आमचा पगार झालेला नाही अशाप्रकारे शिक्षण संचालकांच्या लक्षात आणून दिलेले असताना व यामध्ये पूर्णपणे मुख्याध्यापकांची चूक असल्यामुळे याबाबतीत शिक्षण संचालकांनी त्यांच्यावर कोणती कारवाई केली ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, हे खरे आहे की, खाजगी शाळांनी आपली देयके प्रत्येक महिन्याच्या 7 तारखेच्या आत कार्यालयाकडे सादर करावयाची असतात. याठिकाणी आताच सन्माननीय सदस्य, प्रा.बी.टी.देशमुख यांनी सांगितल्याप्रमाणे, या 27 कनिष्ठ महाविद्यायांनी आपली वेतन देयके विहित वेळेत सादर केलेली नाहीत. आता शासनाने नवीन कॅशफ्लो पध्दत सुरु केलेली आहे. वेतन वितरण व्यवस्थेप्रमाणे आपण देयकांची बिले अदा करतो. याठिकाणी 54 कनिष्ठ महाविद्यालयांची देयके पारित करण्यात आलेली असून ती 96 लाखांची आहेत. सदरची देयके लवकरात लवकर म्हणजे पुढील महिन्यात अदा करण्यात येतील. परंतु शिक्षण संचालकांना जे पत्र देण्यात आलेले आहे, त्यामध्ये माझ्या माहितीप्रमाणे हा विषय नाही. त्यामध्ये त्यांनी वेगळी विनंती केलेली आहे. असोसिएशनने जे पत्र दिलेले आहे, त्याची प्रत माझ्याकडे आहे. परंतु याबाबतीतील खाजगी शाळांतील मुख्याध्यापकांवरील जबाबदारी टळत नाही. शिक्षकांना पगार देण्याची जबाबदारी ही त्यांची आहे. यामध्ये वेळ आली तर आम्ही मुख्याध्यापकांवरही कारवाई करु.

नंतर श्री.रोझेकर...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SRR/ प्रथम श्री.पुरी....... 14:50

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, ज्यांचा दोष आहे त्यांच्यावर कारवाई करा, त्याबद्दल आम्हाला काहीही म्हणावयाचे नाही. परंतु, ज्यांचा अजिबात दोष नाही त्यांच्याबाबतीत तातडीने निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. हे शिक्षक मला म्हणाले की, तुम्हीसुध्दा आम्हाला हेच सांगणार असाल तर आम्ही बाहेर उभे रहावयाचे काय ? ज्याचा दोष आहे त्याच्यावर कारवाई करा. माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, एक महिन्यामध्ये शिक्षकांचे वेतन दिले जाईल. माझा असा प्रश्न आहे की, याबाबतचे आदेश आजच्या आज तातडीने काढले जातील काय ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, एक महिन्याच्या आत वेतन दिले जाईल असे मी स्वत: सांगितले आहे. थोडा विश्वास ठेवला पाहिजे. जानेवारी महिन्यामध्ये वेतन देणार आहोत.

प्रा.बी.टी.देशमुख :सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी माझ्या पहिल्या प्रश्नाला उत्तर देतांना असे सांगितले की, संचालकांकडे तक्रार दिली त्यामध्ये या बाबीचा समावेश नाही. संचालकांकडे जी तक्रार दिली त्या तक्रार अर्जाची प्रत माझ्याकडे उपलब्ध आहे. त्यामुळे मंत्री महोदयांनी दिलेले उत्तर बरोबर नाही. खरे म्हणजे, मी शिक्षकांना म्हटले की, ऑगस्ट महिन्यामध्ये का तक्रार दिली ? जानेवारी, फेब्रुवारी महिन्याचे पगार झाले नाही हे लक्षात आल्याबरोबर तक्रार द्यावयास हवी होती. परंतु, जानेवारी, फेब्रुवारी व पुढे जुलै 2007 चे पगार झाले नाहीत. त्यांची सहनशीलता बघा, त्यांनी ऑगस्टमध्ये तक्रार दिली. शासनाच्या लक्षात आल्यानंतर मंत्रीमहोदयांनी सांगितले की, कारवाई करु. जे नियमाप्रमाणे आहे ते जरुर करा. माझा प्रश्न असा आहे की, तक्रार अर्ज प्राप्त झाल्याबरोबर संचालकांनी कारवाई का केली नाही ? संचालकांना तक्रार प्राप्त झ ाल्यानंतर त्यांच्यावर कारवाई न करणे हे बरोबर आहे काय ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, वास्तविक या खाजगी शाळा आहेत. मुख्याध्यापकांनी देयके पाठवावयाची आहेत. त्यामुळे स्वत: संस्था चालक किंवा शिक्षक यांनी दबाव आणला पाहिजे. आता संचालकांना आदेश देऊ की, मुख्याध्यापकांनी अशाप्रकारे देयके पाठविण्यास टाळाटाळ केली तर त्यांच्यावर ताबडतोबीने कारवाई करण्यात यावी.

श्री.व्ही.यू.डायगव्हाणे :सभापती महोदय, वेतन विलंब होण्यास कॅश फ्लो पद्धत जबाबदार आहे कारण ही पद्धत फार क्रोनिक आहे. आम्ही मंत्री महोदयांना भेटून हे सांगितले होते की, पे-युनिट आणि ए.ओ.कार्यालये इंटरनेटव्दारा जोडली जात नाहीत तोपर्यन्त ही पद्धत अंमलात

...2........



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.व्ही.यू.डायगव्हाणे..........

आणू नये. माझा प्रश्न असा आहे की, जोपर्यन्त परिपूर्ण व्यवस्था होत नाही तोपर्यन्त जुन्या पद्धतीने वेतन वितरण करणार काय ? कारण महाराष्ट्रामध्ये अनियमित वेतन वितरण होत आहे.

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, हे मान्य आहे की, पहिले दोन-तीन महिने त्रास झ ाला. परंतु आता सर्व अप-टू-डेट झाले आहे. देयके देण्याबाबत अडचण नाही. कॅश फ्लो पद्धत ही चांगली पद्धत आहे.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, कॅश फ्लो पद्धत शासकीय कर्मचा-यांच्या वेतन वितरणाला लागू होणार नाही, असा शासन निर्णय वित्त विभागाने काढला आहे, याची माहिती मंत्री महोदयांना आहे काय ? नसेल तर ती माहिती घेऊन तीच व्यवस्था येथे लागू करण्यात येईल काय ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, मला माहिती नाही, ती माहिती घेऊन अंमलबजावणी करण्यात येईल.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, मुख्याध्यापकांनी देयके सादर केली नसतील तर त्यांच्यावर कारवाई करा, हरकत नाही. परंतु, वैद्यकीय प्रतिपूर्तीची देयके व वरिष्ठ वेतनश्रेणीच्या फरकाची देयके सादर करुन सुध्दा कार्यालयात ती प्रलंबित राहतात. यासंदर्भात कालबद्ध कार्यक्रम लागू करुन किती कालावधीत ही देयके मंजूर केली पाहिजेत, याबाबत निर्णय घेण्यात येईल काय ? ही बिले वर्षानुवर्षे प्रलंबित असतात. वैद्यकीय उपचारांची देयके देखील प्रलंबित असतात. त्यामुळे देयके सादर केल्यानंतर महिन्या-पंधरा दिवसात मंजूरी देण्याबाबत कालबद्ध कार्यक्रम निश्चित करण्यात येईल काय ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, वैद्यकीय प्रतिपूर्ती व वरिष्ठ वेतनश्रेणीच्या फरकाची देयके दिल्यानंतर किती दिवसात ती मंजूर करावीत, याबाबत सर्व अधिका-यांना सूचना देण्यात येतील.

----------------------

...3.........





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: परप्रांतीय ट्रालर्सच्या अतिक्रमणामुळे सिंधुदूर्ग जिल्हयातील मालवण, देवगड, सर्वेकोट व आचरा भागातील मच्छिमारांमध्ये निर्माण झालेला असंतोष व निर्माण झालेली कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती

**मु.शी.**: "परप्रांतीय ट्रालर्सच्या अतिक्रमणामुळे सिंधुदूर्ग जिल्हयातील मालवण, देवगड, सर्वेकोट व आचरा भागातील मच्छिमारांमध्ये निर्माण झालेला असंतोष व निर्माण झालेली कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती"संबंधी सर्वश्री परशुराम उपरकर, अरविंद सावंत, वि.प.स.यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री.परशुराम उपरकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मत्स्यव्यवसाय मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"प्रतिवर्षी ऑक्टोंबर-नोव्हेंबर पासून समुद्र शांत होत असल्याने समुद्रात मोठया प्रमाणात मिळत असलेली मासळी, परंतु या सिझनप्रमाणे परप्रांतीय शेकडो पर्ससीन ड्रॉलर्सन सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या मालवण, देवगड, सर्वेकोट व आचरा भागातील समुद्रात खुलेआम मासेमारीसाठी येऊन लाखो रुपयांची मासळी पकडून नेण्यात येणे, स्थानिक गरीब मच्छिमारांची मासे पकडण्यासाठी समुद्रात सोडलेली हजारो रुपयांची जाळी, परप्रातीय ट्रॉलीवाले तोडून टाकीत असणे, ही बाब गंभीर असणे, स्थानिक मच्छिमारांची जाळी तोडणे त्यांना मच्छिमारीला प्रतिबंध करणे, त्यांच्या हद्दीत येऊन मासळीची लूट करण्यात येणे, परप्रांतीय ट्रॉलर्सच्या अतिक्रमणामुळे स्थानिक मच्छिमार हैराण होत असून त्यांनी तेथील बंदर अधिकारी, कस्टम अधिकारी व मत्स्यव्यवसाय विभाग यांच्याकडे केलेल्या तक्रारी, सदर तक्रारीकडे तिन्ही विभागाच्या अधिकाऱ्यांनी हेतूपुरस्सर केलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी तमाम स्थानिक गरीब छोटया मच्छिमारांनी परप्रांतीय मच्छिमारांचे आक्रमण रोखण्यासाठी स्वत:च पुढे सरसावण्याचा केलेला निर्धार, त्यामुळे भरसमुद्रात कायदा व सुव्यवस्थेचा निर्माण झालेला गंभीर प्रश्न, परप्रांतीय मच्छिमारांचे दिवसेदिवस वाढत असलेल्या अतिक्रमणामुळे स्थानिक मच्छिमारांची होत असलेली उपासमारी, त्यामुळे तमाम छोटया मच्छिमारांत पसरलेला तीव्र असंतोष व संतापाची लाट लक्षात घेता या प्रकरणी शासनाने तातडीने केलेली व करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

....4......



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हसन मुश्रीफ (मत्स्यव्यवसाय राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन, आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

यानंतर श्री.बोरले.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.परशुराम उपरकर : सभापती महोदय, मत्स्यव्यवसाय विभागाचे मंत्री सभागृहामध्ये उपस्थित नाहीत. या लक्षवेधी सूचनेला कोण उत्तर देणार आहे ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, मी मत्स्यव्यवसाय विभागाचा राज्यमंत्री आहे. मी या लक्षवेधी सूचनेला उत्तर देणार आहे.

श्री.परशुराम उपरकर : सभापती महोदय, गोवा राज्यातील पर्ससीन ट्रॉलर्सन सिंधुदुर्ग जिल्हयाच्या मालवण, देवगड, सर्वकोट, आचरा भागातील समुद्रात येऊन मच्छिमारीमध्ये अतिक्रमण करतात. हे अतिक्रमण होऊ नये म्हणून जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग, मत्स्यव्यवसाय विभाग आणि कस्टम विभाग काही बोटी भाडयाने घेतात. त्या बोटींना स्पीड नसतो. ज्या बोटी मच्छिमारी करीत नाहीत, अशा बोटी प्रतीदिन 5,100 रुपये भाडयाने घेतल्या जातात. त्या बोटींचे एका महिन्याला 1 लाख 53 हजार रुपये व 10 महिन्याला 15 लाख 30 हजार रुपये भाडे होते. एवढे करुनही अतिक्रमण थांबलेले नाही. 24 लाख रुपयांमध्ये एक बोट तयार होते. परंतु प्रतीवर्षी 15 लाख रुपये भाडे दिले जाते. त्यामुळे मच्छिमारांवर वेगळा प्रसंग आला आहे. छोटया बोटीधारकांना मच्छी मिळत नाही. सिझनमध्ये ट्रॉलरधारकांना जेवढी मच्छी मिळावयास पाहिजे, तेवढी मच्छी मिळत नाही. म्हणून ते त्रस्त झालेले आहेत. त्यांनी कर्ज घेतलेले आहे. ट्रॉलरधारक आणि होडीधारकांनी कर्ज न फेडल्यामुळे विदर्भातील परिस्थिती कोकणामध्ये येण्याची शक्यता नाकारता येत नाही. ट्रालरधारकांचे कर्जावरील व्याज वाढलेले आहे. त्यांचे कर्ज थकीत आहे. माननीय मुख्यमंत्री महोदयांनी घोषणा केली की, 75 वर्षापूर्वीच्या ट्रॉलरधारकांना कर्ज माफ केले जाईल. परंतु 75 वर्षोपूर्वीचे ट्रॉलर समुद्रात जात नसल्यामुळे ही घोषणा निष्फळ ठरली आहे. 1990 नंतर एन.सी.डी.ए. ची योजना आली. 15 वर्षात हे कर्ज फिटले नाही तर त्याची सबसिडी कर्जात रुपांतरीत होईल. म्हणून शासन 12 वर्षाची कालमर्यादा वाढवून छोटया मच्छिमारांना सबसिडीने रॉकेलचा पुरवठा करणार काय आणि मच्छिमारांसाठी कर्नाटक आणि केरळसारखी पेन्शन योजना लागू करणार काय ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, हे खरे आहे की, सिंधुदुर्ग जिल्हयाच्या मालवण, देवगड, सर्वकोट व आचरा भागातील मासेमारी करणारे व्यावसायिक गणपती उत्सव झाल्यानंतर मच्छिमारी करण्यासाठी समुद्रात जात असतात. आपल्या राज्यातील मच्छिमारांना आपण लायसन्स दिलेले

..2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हसन मुश्रीफ ..........

आहे. जे लायसन्स घेत नाहीत त्यांना आपण अनधिकृत समजून त्यांच्यावर खटले भरतो. आपण जवळ जवळ असे 144 खटले दाखल केलेले आहेत.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.परशुराम उपरकर यांनी विचारलेल्या प्रश्नाला माननीय मंत्री महोदय वेगळेच उत्तर देत आहेत.

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, मी असे सांगत होतो की, आपण अनधिकृत मच्छिमारांवर 144 खटले दाखल केलेले आहेत. सन्माननीय सदस्य श्री.परशुराम उपरकर यांनी गस्ती नौकांसंदर्भात प्रश्न उपस्थित केला. केंद्र सरकारकडून आपल्याकडे गस्ती नौका आल्या. परंतु त्यांचा मेंटेनन्सचा खर्च अधिक असल्यामुळे आपण गस्ती नौका भाडयाने घेण्याचे ठरविले. 10 वावापर्यंतच्या सागरी जलधी क्षेत्रात छोटया मच्छी व्यावसायीकांनी मासेमारी करावी, असा 1981 चा कायदा आहे. 12 सागरी मैल क्षेत्रापलीकडे मच्छिमारी करु नये, असा आम्ही आदेश काढला होता. पर्ससीन ट्रॉलर्सच्या लोकांनी कोर्टामध्ये जाऊन त्याला स्थगिती मिळविली आणि आता ते मच्छिमारी करीत आहेत. गोव्याचे मच्छिमार सिंधुदुर्ग जिल्हयाच्या काही भागात मच्छिमारी करण्यासाठी येतात.....

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. सन्माननीय सदस्य श्री.परशुराम उपरकर यांनी विचारलेल्या प्रश्नाला माननीय मंत्री महोदय वेगळे उत्तर देत आहेत. सुप्रिम कोर्टाचा स्टे आणला, हरकत घेतली ती महाराष्ट्रातील मच्छिमारांसाठी घेतलेली आहे. सन्माननीय सदस्य श्री.परशुराम उपरकर यांनी विचारले की, गोव्यातील मच्छिमार महाराष्ट्रात येतात. परराज्यातील मच्छिमारांना राज्यात येण्यासाठी बंदी आहे. 12 सागरी मैल क्षेत्राच्या हद्दीमध्ये गोव्याचे मच्छिमार येतात, त्यांच्यावर शासन काय कारवाई करणार आहे ?

यानंतर कु.जयश्री........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हसन मुश्रीफ : आपले जे परवानाधारक मच्छिमार आहेत त्यांना परवानगी आहे, परंतु ज्यांच्याकडे परवाने नाहीत, ते गोव्याचे म्हणजेच परप्रांतातून आलेले मच्छिमार आहेत त्यांना पकडण्यासाठी आपण भाडयाने गस्ती नौका घेतलेल्या आहेत.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, महाराष्ट्रामध्येही परवानेधारक नसलेले मच्छिमार आहेत.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांचा प्रश्न अतिशय स्पेसिफिक आहे की, आपल्या शासनाने त्या ठिकाणी ज्या नौका भाडयाने घेतलेल्या आहेत, त्या तशाच बंद पडून आहेत, तेथेच उभ्या आहेत. त्यांचा पाठलाग या भाडयाने घेतलेल्या बोटींनी करण्याऐवजी त्या तशाच तेथे बंद अवस्थेत पडून आहेत. गोव्यातून मच्छिमारीकरिता आलेल्या बोटींना पकडण्याची जबाबदारी त्या भाडयाने घेतलेल्या गस्ती नौकांची आहे. त्या भाडयाने घेतलेल्या बोटींवर जो खर्च होत आहे तो अनाठायी खर्च होत आहे, असे यातून लोकप्रतिनिधींना सभागृहामध्ये स्पष्ट करावयाचे आहे. माननीय मंत्रिमहोदय सन्माननीय सदस्यांच्या पॉईंटेड प्रश्नाचे उत्तर देत नाहीत आणि नको त्या गोष्टी सभागृहामध्ये सांगत आहेत. शासनाने त्या बोटींवर केलेल्या खर्चाचे रिटर्नस काय मिळत आहेत सरकारला ? यामध्ये दोनच प्रश्न महत्वाचे आहेत, ते म्हणजे असे की, गोव्यातून मच्छिमारीकरिता होणारे अतिक्रमण जे आहे त्यासंदर्भात शासन काही कारवाई करणार आहे का ? आणि शासनाने भाडयाने घेतलेल्या बोटींवर लाखो रुपये खर्च केले आहेत व करीत आहे, त्याचा काही उपयोग आहे का ? या दोन्ही प्रश्नांचे उत्तर माननीय मंत्रिमहोदयांकडून अपेक्षित आहे.

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, यासंदर्भात मी आताच सांगितले की, या ज्या भाडयाने घेतलेल्या नौका आहेत, त्यासंदर्भातील एकूण 144 खटले न्यायालयामध्ये दाखल केले असून, त्यापैकी काही खटले प्रलंबित अवस्थेत आहेत. सागरी मासेमारी अधिनियम, 1981 अंतर्गत असलेल्या तरतुदीनुसार जिल्हयाच्या प्रादेशिक जलधी क्षेत्रामध्ये परप्रांतिय नौका धारकांना प्रतिबंध करण्यात येतो. 10 वावापर्यंतचे सागरी जलधी क्षेत्र छोटया मच्छिमारांकरिता संरक्षित असल्याने त्या क्षेत्रात कोणत्याही मोठया यांत्रिकी नौकेद्वारे अतिक्रमण होणार नाही व छोटया मच्छिमारांचे नुकसान होणार नाही याची कटाक्षाने काळजी घेण्यात येते. तरी यासंदर्भात सन्माननीय सदस्यांची



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हसन मुश्रीफ ....

तक्रार असेल तर ज्या भाडयाने घेतलेल्या गस्ती नौका बंद अवस्थेत आहेत, त्या पुन्हा कार्यान्वित करण्यासाठी शासनाकडून निश्चितपणाने प्रयत्न करण्यात येईल तसेच परप्रांतातून विनापरवाना येणा-या मच्छिमारांवर कारवाई करण्यात येईल.

ॲड.अनिल परब : शासनाने भाडयाने घेतलेल्या गस्त नौका बंद करुन ठेवण्यात आलेल्या आहेत. त्या चालविण्याकरिता डिझेल नाही, त्यांच्या मेंटेनन्सकरिता विभागाकडे निधी नाही, अशी अनेक कारणे सांगून त्या गस्त नौका बंद करुन एका बाजूला उभ्या केल्या जातात. दुसऱ्या बाजुला बोगस नौका भाडयाने घेऊन, किंवा नौका भाडयाने घेऊन त्या बंद आहेत असे सांगून एका बाजूला उभ्या करुन ज्यांच्याकडून या नौका भाडयाने घेतल्या जातात, त्यांचे आणि यांचे संगनमत झालेले आहे. या अधिका-यांनी आपापसात केलेले संगनमत उघडकीस आणून त्या अधिका-यांवर कारवाई करुन शासनाने भाडयाने घेतलेल्या गस्त नौका पुन्हा कार्यान्वित केल्या जातील का ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, केंद्राकडून नौका आल्या होत्या, त्या आपण परत केल्या, कारण त्याचा खर्च.......

श्री.परशुराम उपकरकर : केंद्राकडून नौका घेणे आपण बंद केलेले नसून,केंद्राकडून येणा-या बोटी आपण घेत आहात.

श्री.हसन मुश्रीफ : सन्माननीय सदस्य म्हणत असतील तर आपण एक दिवस प्रत्यक्ष घटनास्थळी जाऊन भेट देऊ व वस्तुस्थितीचा आढावा घेऊ.

श्री.दिवाकर रावते : ठीक आहे, कधी बोलाविता आपण त्या ठिकाणी वस्तुस्थितीचा आढावा घेण्यासाठी ?

श्री.हसन मुश्रीफ : हे हिवाळी अधिवेशन संपल्यानंतर आपण घटनास्थळी जाऊन प्रत्यक्ष वस्तुस्थितीची पाहणी करु.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महादेय, माननीय मंत्रिमहोदय असे उत्तर देऊन विषय टाळत आहेत.

ॲड.अनिल परब : सभापती महोदय, सदर बोटींचे भाडे प्रतिदिन रुपये 5100 असून दर महिन्याला 1,53,00 रुपये त्याचे भाडे आकारले जाते. यासंदर्भात माननीय मंत्रिमहोदयांनी काहीही उत्तर दिलेले नाही.

.....3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : माननीय मंत्रिमहोदयांनी उत्तरामध्ये असे सांगितले की, हे हिवाळी अधिवेशन संपल्यानंतर घटनास्थळी जाऊन वस्तुस्थितीचा आढावा घेण्यात येईल.

श्री.हसन मुश्रीफ :सभापती महोदय, खरोखर जर त्या ठिकाणी शासनाने भाडयाने घेतलेल्या गस्ती नौका काम करीत नसतील तर आपण तेथे जाऊन प्रत्यक्ष पाहणी करु.

**उपसभापती** : सदर ठिकाणी यासंदर्भात जर भ्रष्टाचार झाला असेल तर माननीय मंत्रिमहोदय त्यावर कारवाई करतील आणि त्यांनी ती करावी.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, सभागृहामध्ये जर एखाद्या विषयासंदर्भात माहिती सांगितली तर ती सत्य मानून त्याच्यावर कारवाई करण्याची आवश्यकता असते. आपण यासंदर्भात उत्तर देतांना असे सांगावयास पाहिजे होते की, घटनास्थळी आपण संबंधित चार लोकप्रतिनिधींना घेऊन जाऊन वस्तुस्थितीची पाहणी केली जाईल. परंतु लोकप्रतिनिधींनी दिलेली माहिती ती खरी आहे का ? असे विचारणे म्हणजे सदस्यांवर अविश्वास दाखविण्यासारखे आहे.

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, मी उत्तरामध्ये असे म्हणालो की, आपण प्रत्यक्ष जाऊन वस्तुस्थितीची पाहणी करु व मग त्यासंदर्भात निर्णय घेऊ.

यानंतर श्री.गागरे....

अशुद्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, खालच्या सभागृहातून आपल्या सभागृहात मोठा आवाज येत आहे, याबाबत दोन दिवस मी सतत तक्रार करीत आहे.

**उपसभापती** : आपल्या सभागृहातील स्पीकरचा आवाज वाढविण्यात यावा.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.परशुराम उपरकर यांनी स्पेशिफिक प्रश्न विचारले आहेत की, तेथील नौका उपयोगात येत नाहीत. यावर शासनाने कोणती ठोस कारवाई केली याबाबत माहिती न सांगता प्रश्नाला बगल दिली जात आहे. कारण व्हिझीट करु असे म्हटले म्हणजे सर्व सदस्य शांत बसतात, मात्र असे नाही. सागरी जिल्हयातील व किनाऱ्यावर राहणारे माननीय सदस्य या विषयावर बोलत आहेत. ते मच्छिमारांना भेटत असतात, तेथून भेटून आल्यानंतर त्यांच्या समस्या येथे मांडतात. त्यावर काही ठोस कार्यवाही केली पाहिजे. याबाबत पुरेशी माहिती उपलब्ध नसल्यास अभ्यास करुन उत्तर देण्यात येईल असे मंत्री महोदयांनी सांगावे. मंत्री महोदयांनी चिठ्ठयांवर उत्तरे देऊ नये. या लक्षवेधीसाठी मॅक्झिमम चिठ्ठयावर उत्तरे येत आहेत. मला वाटते की, रेकॉर्डवर ज्या नौका आहेत. त्या व्यतिरिक्त त्या परिसरात दुसऱ्या नौका दिसतात, दुसऱ्या नौकांवर आपण कारवाई करणार का ? दुसरा प्रश्न असा आहे की, ठाणे जिल्हयातील या प्रश्नाबाबत आपण पाहिले किंवा ऐकले असेल की, 12 नॉटीकल मैलाच्या पलिकडे मच्छिमारांमध्ये भांडणे आणि मारामाऱ्या होतात. पोलीस स्टेशन काही कारवाई करीत नाही कारण ते म्हणतात की, 12 नॉटीकल मैलापर्यंत आमची हद्द आहे. पुढे आमची हद्द नाही. याबाबत राज्य सरकार केंद्राशी बोलून तेथील मारामाऱ्या थांबण्यासाठी काही ठोस कायदा करील का ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, चार बोटी भाडयाने घेतलेल्या आहेत. सिंधुदुर्ग येथे "अलमिना" ही गस्तीनौका असून 4979 रुपये दररोज त्यासाठी भाडे दिले जाते. रत्नागिरी येथे "नवशीर" ही गस्तीनौका असून 4904 दररोज त्यासाठी भाडे दिले जाते. मुंबईमध्ये "डॉल्फीन" गस्तीनौका असून दररोज 5400 भाडे दिले जाते. रायगडमध्ये "सागरसेवक" ही गस्तीनौका असून 3900 भाडे दिले जाते. याचे रोजचे भाडे 19183 रुपये आहे. याचा महिन्याचा खर्च 5 लाख 75 हजार 490 आहे. पावसाळयात याचा वापर होत नाही. एकंदरीत 30-40 लाख रुपये दरवर्षी खर्च

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हसन मुश्रीफ .....

येतो. हा निर्णय घेत असताना या नौकांनी किती फिरावे, लॉगबुक कसे ठेवावे, मत्स्यव्यवसाय अधिकाऱ्यांनी त्याची कशी तपासणी करावी, याबाबत निर्देश दिलेले आहेत. त्याप्रमाणे आम्ही करीत आहोत. आता माननीय सदस्यांनी सांगितले या गस्तीनौका फिरत नसून उभ्या असतात. म्हणून मी म्हणालो की, तुमचे म्हणणे सत्य मानून आपण तेथे भेट देऊ. आपल्या सोबत तेथे भेट देण्याची माझी तयारी आहे. माननीय श्री.विनोद तावडे यांनी केंद्र सरकारबाबत विषय सांगितला आहे, 200 नॉटीकल मैलाच्या पुढे इंटरनॅशनल हद्द आहे. 12 नॉटीकल मैलापर्यंत देशाची हद्द आहे. तेथे काय करता येईल, याचा निश्चितपणे विचार करण्यात येईल.

श्री.परशुराम उपरकर : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी उल्लेख केलेल्या नौकांना, जिल्हाधिकारी कार्यालयाकडून टेंडर काढलेल्या नौकांना व कस्टम खात्याच्या नौकांनाही 5100 भाडे आहे. कस्टमच्या 4 नौका आहे, जिल्हाधिकारी कार्यालयाच्या 6 नौका आहे, आणि मत्स्यविभागाची 1 नौका आहेत. एका जिल्हयामध्ये 7 गस्ती नौका आहेत. परंतु त्या गस्तनौका काम करीत नाही. कोणत्याही प्रकारचे अतिक्रमण थांबवत नाहीत. अतिक्रमण केलेल्या बोटी 5 ते 10 हजार रुपये दंड भरुन ताबडतोब सोडल्या जातात. त्यांच्यावर ठोस कारवाई होत नाही. यावर कोणती कारवाई करणार आहात ?.

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, कस्टम विभाग केंद्र शासनाच्या अखत्यारित येत असल्याने त्यांचा संबंध येत नाही. आमची प्रत्येक जिल्हयाला एक नौका आहे. माननीय सदस्य श्री.परशुराम उपरकर व ॲड.अनिल परब यांना बरोबर घेऊन पाहणी करण्यात येईल. याबाबत निश्चितपणे योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



PNG/ MAP/ D/

**पृ.शी.** : हाफकिन संस्थेने जीवनावश्यक औषधे व लस जनतेला रास्त भावात

उपलब्ध करुन देणे.

**मु.शी.** : हाफकिन संस्थेने जीवनावश्यक औषधे व लस जनतेला रास्त भावात उपलब्ध करुन देण्यासंबंधी सर्वश्री मधुकर चव्हाण, विनोद तावडे, रामनाथ मोते, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय अन्न व औषधे प्रशासन मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे अशी विनंती करतो.

"हाफकिन संस्थेची स्थापना सन 1940 साली होणे, या संस्थेमध्ये विविध प्रकारच्या जीवनावश्यक औषधांचे व लसींचे उत्पादन करण्यात येणे, या उत्पादनाचा दर्जा इतर खाजगी उत्पादनाच्या तुलनेत उच्च असूनही ती औषधे रास्त भावाने जनतेला उपलब्ध करुन देणे, देशातील गोरगरीब जनतेला विविध आरोग्य सेवांतर्गत या औषधांचा पुरवठा केला जाणे, हाफकिन जीव औषध निर्माण महामंडळ उत्पादन सुविधांमध्ये अनुसूची (Revised Schedule M) प्रमाणे सुधारणा करण्यासाठी अधिकचे भाग भांडवल देऊन मदत करण्याचा प्रस्ताव राज्य शासनाकडे प्रस्तावित असणे, या मदतीअंतर्गत होणारा खर्च अंदाजे 100 कोटी असून त्यातील सुमारे 50 कोटी रुपये टप्प्याटप्प्याने राज्यशासनाने भाग भांडवल म्हणून उपलब्ध करुन द्यावेत अशी मागणी संचालक मंडळाकडून करण्यात येणे, परंतु शासनाने आजपर्यंत यावर कोणतीही कार्यवाही अथवा भाग भांडवलाची तरतूद न करणे, परिणामत: राज्यातील गोर गरिब जनतेला रास्त भावात पुरविण्यात येणाऱ्या औषधांच्या निर्मितीवर परिणाम होण्याची भिती, त्यामुळे शासनाबद्दल जनतेच्या मनात निर्माण झालेला असंतोष व संतापाची भावना यावर तातडीने करावयाची उपाययोजना."

श्री.बाबा सिद्दीकी (अन्न व औषधे प्रशासन राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, येथे मी एक महत्वाची गोष्ट आपल्या लक्षात आणून देऊ इच्छितो. हाफकिन ही संस्था विविध प्रकारच्या जीवनावश्यक औषधांचे व लसींचे उत्पादन करीत असते. जागतिक आरोग्य संघटनेने यांना असे सांगितले आहे की, त्यांची प्रॉडक्शन करण्याची जी पध्दती आहे आधुनिक काळाला अनुरुप हवी, तशी आधुनिक व अनुरुप इमारत हवी. एअरकंडीशन इत्यादी सोयी हव्यात. त्यासाठी हाफकिनने एक प्रोजेक्ट तयार केलेला आहे. 100 कोटी रुपये त्यासाठी लागणार आहेत. 50 कोटी रुपये ते स्वत: खर्च करणार आहेत. 50 कोटी रुपये शासनाकडे मागितले आहेत.

यानंतर कु.धनश्री.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण......

परंतु शासनावर दबावआणल्यामुळे या सर्व योजना बंद करण्यात आल्या आहेत. याठिकाणी मी आपणास एक उदाहरण देऊ इच्छितो. लसीकरणासाठी टी.टी. चे इंजेक्शन खाजगी दवाखान्यामध्ये 15 रुपयाला उपलब्ध होते व हाफकिनमध्ये 6 .20 रुपयांना मिळते. डी.डी. हे इंजेक्शन खाजगी दवाखान्यामध्ये 9 रुपयाला मिळते व हाफकिनमध्ये 7.49 रुपयाला मिळते . डीपीटी हे इंजेक्शन खाजगी दवाखान्यामध्ये 37.05 रुपयाला मिळते तर हाफकिनमध्ये 13.00 रुपयाला मिळते.

सभापती महोदय, हा प्रोजेक्ट होऊ नये यासाठी शासनावर दबाव आणण्यात आला आहे.या लक्षवेधी सूचनेच्या निवेदनामध्ये असे उत्तर देण्यात आलेले आहे की, त्यांची मागणी वाजवी आहे. दरवर्षी 10 कोटी रुपये याप्रमाणे 50 कोटी रुपये आम्हाला द्या. म्हणजे हा प्रोजेक्ट पूर्ण होऊ शकेल. प्रश्न असा आहे की, राज्य शासनाने आणि महाराष्ट्र शासनाने दरवर्षी कोटयावधी रुपयांचा निधी टी.टी., डी.डी. डी.पी.टी. या लसी खरेदी करण्याकरिता खर्च करते हे खरे आहे काय ? माझ ा दुसरा प्रश्न असा आहे की, खाजगी औषध कंपन्याकडून जी औषधे महाग मिळतात ती औषधे हाफकिनमध्ये स्वस्त दरात मिळतात काय ? तसेच 50 कोटी रुपये मागणी केल्याप्रमाणे देण्यात येणार आहेत काय ?

श्री बाबा सिद्दीकी : सभापति महोदय, हाफकिन इंस्टीटयुट के बारे में सरकार बहुत गंभीर है. क्योंकि 30.10.2007 को उनका पत्र आया जिसमें उन्होंने 50 करोड़ रुपए की डिमांड रखी और कहा कि वे भी 50 करोड़ रुपए की इक्विटी अपनी तरफ से रखेंगे. केवल चौदह दिन के बाद यानी 14.11.2007 को हमने उनसे कुछ स्पष्टीकरण मांगे. मैं बताना चाहूंगा कि हॉफकिन इंस्टीटयुट एक कारपोरेशन है उसके बोर्ड ऑफ डायरेक्टर्स हैं. हमने उनसे पूछा कि आप 50 करोड़ रुपए का इक्विटी शेयर कहां से लायेंगे. उनका उत्तर आने के बाद मेडिकल एजुकेशन विभाग के सेक्रेटरी, फायनेंस डिपार्टमेंट के सेक्रेटरी तथा ड्रग कंट्रोलर ऑफ इंडिया विभाग मिलकर उनके पत्र पर विचार करेंगे और व्हायबिलिटी देखेंगे. उसके बाद उस बारे में शासन निर्णय लेगा.

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. याठिकाणी दिशाभूल करणारी माहिती देण्यात येत आहे. लक्षवेधी सूचनेच्या निवेदनामध्ये असे उत्तर देण्यात आलेले आहे की, हाफकीन जीव औषध निर्माण महामंडळाला उत्पादन सुविधामध्ये अनुसूची एम प्रमाणे सुधारणा न केल्या कारणास्तव अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य यांनी मुख्यत:. टॅबलेट, इंजेक्शन, लिक्वीड ओरल इत्यादींचे उत्पादन करण्यास दिनांक 27.4.2007 च्या आदेशानुसार बंदी घातली आहे. शासनावर खाजगी कंपन्यांचा दबाव आहे. म्हणून बंदी घातली आहे. याचे कारण सांगितले आहे की, इंफ्रास्ट्रक्चर जुने आहे. माझे या ठिकाणी एवढेच म्हणणे आहे की, आपण चुकीची माहिती एकाच परिच्छेदामध्ये दिलेली आहे. सदर पत्र नुकतेच प्राप्त झालेले आहे. महामंडळाच्या वरील प्रस्तावामध्ये त्यांच्या विविध विभागाचे उन्तीकरण, श्रेणीवर्धन करण्यासाठी आराखडा तयार केलेला आहे. त्यामध्ये विविध लसी तसेच जीवरक्षक औषधांचे उत्पादन करणे त्यासाठी प्रयोगशाळेचे नुतनीकरण करणे इत्यादी विविध बाबीसाठीचा समावेश आहे. व शेवटच्या ओळीमध्ये असे म्हटले आहे की, भागभांडवल मागितले आहे तरीसुध्दा वरील प्रस्तावामध्ये बऱ्याच त्रुटी आढळून आल्यामुळे हा प्रस्ताव परत पाठविण्यात आलेला आहे. वरती डिटेल्स दिलेले आहेत व खाली म्हटले आहे की, डिटेल्स दिलेले नाहीत. म्हणून माझे एवढेच म्हणणे आहे की, डिटेल्स दिल्यामुळे शासनाचे कोटयावधी रुपये वाचणार आहेत. जे इंजेक्शन बाहेर 9 रुपयाला मिळते, तेच येथे 6 रुपयाला मिळते. माझा असा प्रश्न आहे की, प्रपोजल आल्यानंतर 50 कोटी रुपये देऊन शासनाचे कोटयावधी रुपये वाचवणार काय ?

श्री बाबा सिद्दीकी : सभापति महोदय, यह बड़ा महत्वपूर्ण प्रश्न है. मैं स्पष्ट करना चाहूंगा कि हाफकिन 50 करोड़ रुपए मांग रही है. मैं बताना चाहूंगा कि हॉफकिन डी.टी.पी. ग्रुप आफ वेक्सीन,एन्टी स्नेक वेक्सीन और ओरल पोलिओ वेक्सीन बना रही है ओर ये दवा यूनीसेफ को जाती है. जी.एम.पी. पॉलिसी सेंट्रल गवर्नमेंट की वजह से लगी है. हॉफकिन ने जो 50 करोड़ रुपए मांगे हैं उस बारे में उनका स्पष्टीकरण आने के बाद उसकी व्हायबिलिटी पर विचार किया

....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री बाबा सिद्दीकी...

जाएगा, यह देखा जाएगा कि हॉफकिन 50 करोड़ रुपए कहां से लाएगी. इस बारे में मेडिकल एजुकेशन विभाग के सेक्रेटरी तथा फायनेंस सेक्रेटरी विचार करेंगे और व्हायबिलिटी देखेंगे तथा उस बारे में निर्णय लेंगे. सिर्फ 14 दिन के अंदर ही हमने हॉफकिन से आये हुए पत्र का जवाब दे दिया है.

( इसके बाद श्री सुंबरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, ही हाफकीन इन्स्टिटट्यूट परळच्या केइएम रूग्णालय आणि शिवडीच्या मध्ये आहे. 1940 साली ही संस्था स्थापन झाली आणि देशातील सर्वोत्तम औषधे कमी किंमतीत देणाऱ्या या संस्थेची भरभराट देखील आम्ही पाहिलेली आहे. दुर्दैवाने आता शासनाच्या निर्णयामुळे तेथील संशोधन आणि निर्मिती बंद होत गेलेले आहे. आता या संस्थेमध्ये रिसर्चचा भाग वेगळा केला आणि औषध निर्मितीचा-उत्पादनाचा भाग वेगळा केलेला आहे आणि तो बंद केला जात आहे. या संस्थेचा जो प्रस्ताव शासनाकडे आला आहे त्याबाबत उत्तर देताना माननीय राज्यमंत्र्यांनी म्हटले की, डायरेक्टर बोर्डाने मान्य केलेला प्रस्ताव आल्यानंतर ... म्हणजे यापूर्वी आलेला प्रस्ताव हा बोर्डाच्या मान्यतेशिवाय आलेला होता काय ?

श्री. बाबा सिद्दिकी : होय.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, दुसरा प्रश्न असा आहे की, आता उत्तर देताना माननीय राज्यमंत्र्यांनी सांगितले की, आता 14 दिवसात प्रस्ताव पाठविण्याबाबत त्यांना आपण द्यायला सांगितले आहे. ....

श्री. बाबा सिद्दिकी : 14 दिवसात उत्तर आम्ही दिलेले आहे म्हणजेच शासन याबाबत एवढे गंभीर आहे.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, आता सर्वात महत्त्वाचा प्रश्न असा आहे की, ही संस्था जे औषध उत्पादन करते ती सारी स्वस्त दरात आणि उच्च दर्जाची असतात आणि त्यामधून शासनाचा खूप निधी वाचणार आहे. म्हणून संचालक मंडळाचा हा प्रस्ताव आपल्याकडे आल्यानंतर आपण किती दिवसात त्याला मान्यता देणार आहात ?

श्री. बाबा सिद्दीकी : सभापति महोदय, जैसे ही प्रपोजल आएगा उस पर मेडिकल एजुकेशन के प्रिंसिपल सेक्रेटरी और फायनेंस डिपार्टमेंट के प्रिंसिपल सेक्रेटरी उसकी व्हायबेलिटी देखेंगे और उस पर जल्द से जल्द कार्यवाही की जाएगी.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, हाफकीन इन्स्टिटट्यूट ही मुंबईतील अतिशय मध्यवर्ती भागामध्ये वसलेली संस्था आहे आणि ती बंद व्हावी व विकासकाच्या ताब्यात जावी या पद्धतीच्या हालचाली चालू झालेल्या आहेत अशी चर्चा तेथे होत आहे. तेथभ्ल आसपासच्या जागा विकासकाने घेण्यास सुरूवात केलेली आहे. त्यामुळे माननीय मंत्री महोदय म्हणतात की, त्यांनी 14 दिवसात

...... 3डी 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. तावडे ....

तत्परतेने कारवाई केलेली आहे. परंतु 27.4.2007 ला यांच्या अंडरचे औषध प्रशासनाने बंदी घातली आहे. तेव्हा त्याबाबत त्या दिवसापासून यांचे 30 तारखेला पत्र येण्याच्या काळामध्ये जबाबदारी, कार्यतत्पर आणि कर्तव्यतत्पर असलेल्या शासनाने काय केले ?

श्री बाबा सिद्दीकी : सभापति महोदय, जी.एम.पी. की रिक्वायरमेंट सेंट्रल गवर्नमेंट की रिक्वायरमेंट है और वह पूरी करना आवश्यक है.

( यानंतर श्री. सरफरे ..... 3इ 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, मी विचारलेला प्रश्न सोडून माननीय मंत्री दुसरेच उत्तर देत आहेत. एप्रिल 2007 पासून मंत्रिमहोदयांचे पत्र येण्याच्या मधल्या काळात यांच्या कार्यतत्पर सरकारने काय केले?

Shri Baba Siddique: Sir, we have asked them to send or come up with a complete proposal to us and, accordingly, necessary action will be taken.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, मी याठिकाणी थोडी खाजगी माहिती देऊन गौप्यस्फोट करीत आहे. यांनी जॉईंट व्हेंचर करण्याबाबत अटी घातल्या आहेत. हे जॉईंट व्हेंचर रिलायन्स कंपनीबरोबर करणार आहेत असा माझा यांच्यावर आरोप आहे. मी हे विचारीत आहेत की, 50 कोटी रुपये कसे उभे करणार? पुण्याला 65 एकर जमीन असून तिचा 7/12 चा उतारा हाफकिनच्या नावावर करण्याकरिता जी.आर. काढावा आणि त्या जमिनीची मालकी आम्हाला द्यावी. ती मालकी मिळाल्यानंतर आम्ही 50 कोटी रुपये उभे करु असे त्यांनी शासनाला सांगितले आहे. जॉईंट व्हेंचर करण्यास हाफकीन संस्थेची तयारी आहे, परंतु अशाप्रकारचे औषध निर्माण करणाऱ्या कंपन्यांबरोबर जॉईंट व्हेंचर करावे अशी त्यांची मागणी आहे. तेल, पेट्रोल विकणाऱ्या कंपन्याबरोबर, रिलायन्सबरोबर आपण जॉईंट व्हेंचर करु नये. हाफकीनने आपल्याला कळविले की, आपण ग्लोबल टेंडर मागवा, परंतु तरीसुध्दा आपण काहीही केले नाही. एप्रिल महिन्यापासून आपण आतापर्यंत काय केले? माझा आपणावर आरोप आहे की, आपण परळ येथील जमीन रिलायन्सला विकणार आहात. परळ येथील जमिनीवर आपण जॉईंट व्हेंचर करावे अशी हाफकीनची मागणी आहे. ही जमीन आपण विकण्यास देऊ नका, ती आमच्या मालकीची राहू द्या. ही जमीन विकली तर ते 5 टक्के डोनेशन देतील, खर्च करतील आणि उरलेल्या जमिनीवर कमर्शिअल मॉल बांधतील. याबाबत आपण स्पष्टपणे सांगा....

श्री. बाबा सिद्दीकी : सभापति महोदय, जी.एम.पी. के लिए हमने कन्सलटेंट भी नियुक्त कर दिया है और उनका नाम है सी.एम.पी. इंजीनियर्स. माननीय सदस्य रिलायंस इंडिया की बात कर रहे हैं वह बात मेरी नॉलिज में नहीं है. .

श्री. मधुकर चव्हाण : पुण्यातील 65 एकर जमीन नावावर करण्याबाबत हाफकीन संस्था अनेक वर्षे मागणी करीत आहे, तेव्हा आपण ती जमीन त्यांच्या नावावर कां करीत नाही?

....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बाबा सिद्दीकी : सभापति महोदय, यह उनका हायपोथेटिकल प्रश्न है.

श्री. मधुकर चव्हाण : फिर यह जमीन हॉफकिन के पास ही रखेंगे क्या ? पुणे एक्सप्रेस हायवेवरील 65 एकर जमिनीचा 7/12 चा उतारा हाफकीनच्या नावावर करण्याबाबत आपण जी.आर. काढावा अशी त्यांची मागणी आहे. हा जी.आर. उद्या किवा परवा काढू अशाप्रकारचा पत्र व्यवहार झाला आहे की नाही? सभापती महोदय, 50 कोटी रुपये कसे उभे करणार असे आपण मघाशी सांगितले. त्याच्याशी माझा रिलेटेड प्रश्न आहे. पुण्यातील 65 एकर जमीन 7/12 च्या उताऱ्यावर हाफकीनच्या नावावर करुन जोपर्यंत त्यांना मालकी देत नाही तोपर्यंत बँकेकडून किंवा बाजारात त्यांना पैसे उभे करता येत नाही. आणि म्हणून त्यांनी आपणाकडे विनंती केली. तरी सुध्दा आपण जी.आर. काढतो, काढतो असे सांगता, परंतु तुम्ही जी.आर. कां काढीत नाही? तुम्हाला ही जमीन दुसऱ्या कुणाला तरी द्यावयाची आहे असा माझा आरोप आहे. म्हणून तुम्ही उद्या काढू, परवा काढू असे सांगत आहात.

श्री. विनोद तावडे : ही जमीन रिलायन्स कंपनीला देणार नाही असे आपण जाहीरपणे सांगा.

श्री. बाबा सिद्दीकी : यह शासन की जमीन है और 7/12 की जानकारी की जो बात है वह जानकारी मैं सभा पटल पर रख दूंगा.

(गोंधळ)

(विरोधी पक्षाचे अनेक माननीय सदस्य उभे राहून एकाच वेळी बोलू लागतात.)

श्री.विनोद तावडे : आमचा गिरणगाव तुम्ही विकून टाकणार आहात...

श्री. बाबा सिद्दीकी : हम यह जमीन किसी को नहीं देंगे.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. पुण्यातील 65 एकर जमिनीचा 7/12 आमच्या नावावर करण्याकरिता आपण जी.आर. काढावा अशी हाफकीनने मागणी केली आहे. त्याप्रमाणे आपण जी.आर. काढणार काय?

श्री. बाबा सिद्दीकी : ही जमीन आम्ही कुणालाही देणार नाही.

(यानंतर श्री. बरवड)

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण : शासन जी.आर. काढणार काय ?

श्री. बाबा सिद्दीकी : सभापती महोदय, मी स्पष्टीकरण दिलेले आहे की, आम्ही रिलायन्स किंवा कोणालाही देणार नाही.

श्री. मधुकर चव्हाण : जी.आर. काढून ती जमीन हाफकीनच्या मालकीची का करीत नाही ?

श्री. अरविंद सावंत : ती जमीन हाफकीनला हस्तांतरीत करणार काय ?

श्री. मधुकर चव्हाण : आम्ही जी.आर. काढू, जमीन हाफकीनला देऊ तसेच 50 कोटी रुपये टप्प्याटप्प्याने देऊ असे शासनाने सांगावे.

श्री. बाबा सिद्दीकी : मी सागितले की, Unless the proposal is scrutinized by the Secretary, Medical Education Department and the Secretary, Finance Department and after seeking the viability Report of the Project, necessary action will be taken. This is the Government land. Sir, this land will not be given to anybody.

श्री. मधुकर चव्हाण : जी.आर.च्या बाबतीत उत्तर का दिले नाही ? जी.आर.काढून हाफकीनला जमिनीची मालकी का देत नाही ?

श्री. बाबा सिद्दीकी : ही बाब तपासण्यात येईल. Sir, we will examine as to whatever they have asked for land, accordingly, necessary action will be taken.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, आपण याबाबत शासनाला निदेश द्यावेत. Otherwise, keep the matters pending.

**उपसभापती** : हाफकीनने 65 एकर जमीन आपल्या नावावर करावी अशी मागणी केलेली आहे. तो जी.आर. शासन काढणार की नाही असा प्रश्न सन्माननीय सदस्यांनी विचारलेला आहे. माननीय मंत्रिमहोदयांनी ही माहिती उद्या दुपारी जेव्हा लक्षवेधी सूचनेची चर्चा सुरु होईल तेव्हा द्यावी.

श्री. बाबा सिद्दीकी : परवा माहिती देऊ.

**उपसभापती** : ठीक आहे. परवा माहिती द्यावी.

-----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**विशेष उल्लेख**

**पृ. शी.** : 1881 च्या कायद्यात दुरुस्ती करुन माध्यमिक शाळेतील शारीरिक शिक्षण विषयाच्या शिक्षकांना सर्वसामान्य शिक्षक म्हणून मान्यता देण्याची आवश्यकता

**मु. शी.** : 1881 च्या कायद्यात दुरुस्ती करुन माध्यमिक शाळेतील शारीरिक शिक्षण विषयाच्या शिक्षकांना सर्वसामान्य शिक्षक म्हणून मान्यता देण्याची आवश्यकता याबाबत श्री. जी.एल. ऐनापूरे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : मा□□य सदस्य श्री. जी.एल.ऐनापूरे यां□ ए□ विशेष उल्ले□ाची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री. जी. एल. ऐनापूरे (पुणे विभाग शिक्षक) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ मांडतो.

" महाराष्ट्राच्या माध्यमिक शाळेतील शारीरिक शिक्षण विषयाच्या शिक्षकांना नियमित सर्वसामान्य शिक्षक म्हणून शासनाच्या आदेशानुसार मान्यता देण्यात आली आहे. मात्र या शिक्षकांच्या बाबतीत 1981 च्या कायद्यात स्पेशल टिचर म्हणून मानले आहे. त्यामुळे परस्पर विसंगती दिसून येते. म्हणून 1981 च्या कायद्यातील ती तरतूद रद्द करावी व शारीरिक शिक्षण विषयाच्या शिक्षकांचा विशेष स्पेशल शिक्षक असा उल्लेख न करता सर्वसामान्य शिक्षक म्हणून मान्यता द्यावी व तसेच या बी.पी.एड. झालेल्या शिक्षकांना शिक्षणाधिकारी वगैरे पदासाठी घेतल्या जाणाऱ्या स्पर्धा परीक्षासाठी बी.पी.एड. शिक्षकांना मान्यता नाही. ही बाब अन्यायकारक आहे. म्हणून मी माननीय शालेय शिक्षण मंत्र्यांचे या मुद्याकडे लक्ष वेधू इच्छितो."

सभापती महोदय, महाराष्ट्रातील माध्यमिक शाळेतील शारीरिक शिक्षकांना सर्वसामान्य शिक्षक म्हणून शासनाच्या आदेशानुसार मान्यता देण्यात आलेली आहे मात्र या शिक्षकांच्या बाबतीत 1981 च्या कायद्यात स्पेशल टिचर असा उल्लेख करण्यात आलेला आहे. ही विसंगती निर्माण

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ KTG/ MAP/

श्री. जी.एल.ऐनापूरे .....

झाल्यामुळे या शिक्षकांवर एकप्रकारचा अन्याय होत आहे. ही विसंगती टाळण्यासाठी 1981 च्या कायद्यातील विशिष्ट तरतूद रद्द करावी व शारीरिक शिक्षण विषयाच्या शिक्षकांचा उल्लेख स्पेशल टिचर म्हणून न करता सर्वसामान्य शिक्षक म्हणून त्यांना मान्यता द्यावी. तसेच बी.पी.एड. झालेल्या शिक्षकांना शिक्षणाधिकारी आणि उपशिक्षणाधिकारी अशा स्पर्धा परीक्षांना बसण्याची परवानगी दिली जात नाही. बी.एड. शिक्षकांना परवागनी दिली जाते. त्याप्रमाणे या शिक्षकांनाही परीक्षेला बसण्याची परवानगी द्यावी तसेच त्यांना वेगळी मान्यता घेण्याती आवश्यकता न भासता सर्वसामान्य शिक्षकम्हणून त्यांना मान्यता मिळावी. ती परवानगी मिळत नाही. म्हणून माननीय शालेय शिक्षण मंत्र्यांचे मी विशेष उल्लेखाव्दारे या बाबीकडे लक्ष वेधत आहे.

----

**उपसभापती** : या ठिकाणी सदनाला मला असे सांगावयाचे आहे की, विशेष उल्लेख दिलेल्या ज्या सन्माननीय सदस्यांची नावे पुकारली जातील त्यावेळी जर ते सन्माननीय सदस्य सभागृहात उपस्थित नसतील तर नंतर सभागृहात आल्यावर त्यांना अनुमती देण्यात येणार नाही.

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : उर्मिला अशोक गव्हाणे रा. मौजे पांढुर्णा (वाडेगाव), ता.मंठा जि.जालना या नवविवाहितेचा झालेला संशयास्पद मृत्यू

**मु. शी.** : उर्मिला अशोक गव्हाणे रा. मौजे पांढुर्णा (वाडेगाव), ता.मंठा जि.जालना या नवविवाहितेचा झालेला संशयास्पद मृत्यू याबाबत श्री. रामनाथ मोते वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांनी एक विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

श्री. मारुती सखाराम सावंत मु. कुरार, ता. दारव्हा, जिल्हा यवतमाळ यांची कन्या उर्मिला हिचा विवाह सुमारे दीड वर्षापूर्वी मौजे पांढुर्णी (वाडेगाव), ता. मंठा, जिल्हा जालना येथील लक्ष्मण गव्हाणे यांचा मुलगा अशोक गव्हाणे यांच्या बरोबर झाला. लग्न झाल्यापासून माहेरहून पैसे आणण्यासाठी नवविवाहितेला सतत त्रास दिला जात होता, सासू, सासरे आणि पती यांच्याकडून तिचा छळ होत होता. उर्मिलाच्या वडिलांनी दिनांक 17.7.2007 रोजी तिचा छळ होत असल्याबद्दल वकिलांची नोटीसही दिली होती. शेवटी 24.10.2007 रोजी उर्मिलाचा संशयास्पद मृत्यू झाला. व तिचे प्रेत विहिरीत सापडले. उर्मिलाचा खून करुन तिचे प्रेत विहिरीत टाकण्यात आले असा संशय तिच्या वडिलांनी व्यक्त केला. सदर मुलीला पोहोता येत होते. मंठा पोलीस स्टेशन येथे पती, सासू व सासरे यांच्या विरुध्द गुन्हा दाखल झालेला आहे. हुंडा प्रतिबंध कायद्याखाली हा गुन्हा दाखल झाला असून आरोपीवर अद्याप कोणतीही कारवाई झालेली नाही. मयत मुलीच्या वडिलांनी सर्व संबंधित अधिका-यांना याबाबतीत पत्रव्यवहार करुन देखील त्याची कोणीही दखल घेतलेली नाही. आरोपी आजही उजळ माथ्याने समाजामध्ये फिरत आहेत. या प्रकरणाची शासनाने दखल घेऊन, चौकशी करुन संबंधितांवर कायदेशीर कारवाई व्हावी यासाठी हा विशेष उल्लेख मी मांडत आहे.

---

...2..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

26-11-2007 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) 3G-2

**पृ. शी.** : राजपुरी ता. मुरुड जि. रायगड येथील मासळी सुकविण्याच्या चौथ-याच्या कामाची झालेली दुरवस्था

**मु. शी.** : राजपुरी ता. मुरुड जि. रायगड येथील मासळी सुकविण्याच्या चौथ-याच्या कामाची झालेली दुरवस्था याबाबत श्री.जयंत प्र. पाटील वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : मा□□य सदस्य श्री.जयंत प्र. पाटील यां□ ए□ विशेष उल्ले□ाची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री. जयंत प्र. पाटील (विधानसभेने निवडलेले) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ मांडतो.

राजपुरी (ता. मुरुड, जि. रायगड) येथे मत्सव्यवसाय विभागामार्फत सन 1982-83 साली कोळीवस्तीसमोर तीन मासळी सुकविण्याचे चौथरे व त्या चौथ-यांना संरक्षण देण्यासाठी बांधलेले बंधारे दिनांक 3.8.2004 रोजी झालेल्या जोरदार उधानाच्या त्सुनामी लाटामुळे उद्ध्वस्त झाले.

तसेच दिनांक 14.6.2006 रोजी सुमारे दोन वर्षांनी पुन्हा समुद्राच्या प्रचंड लाटांमुळे येथील कोळीवस्तीत पाणी शिरुन वस्तीला धोका निर्माण झाला व त्यामध्ये त्या ठिकाणी शासनामार्फत बांधण्यात आलेल्या व्यायामशाळा इमारतीस प्रचंड धोका निर्माण झाला आहे.

याबाबत श्री महालक्ष्मी मच्छिमार विविध कार्यकारी सहकारी सोसायटी, मु.पो. राजपुरी, ता. मुरुड, जि. रायगड या संस्थेचे सभापती श्री. कृष्णा गिदी यांनी ही बाब सहाय्यक मत्स व्यवसाय संचालक, रायगड-अलिबाग यांना दिनांक 15.6.2006 अन्वये कळविली असून घटनेची पाहणी करुन पुढील कार्यवाही करण्याची मागणी केली आहे. परंतु याबाबत अद्याप काही कार्यवाही झालेली नाही. सबब या गंभीर घटनेकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी मी हा विशेष उल्लेख करीत आहे.

---



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**हरकतीच्या मुद्याबाबत**

श्री. परशुराम उपरकर : सभापती महोदय, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील रेशनवरील धान्य घोटाळयाचा प्रश्न मागील अधिवेशनामध्ये उपस्थित झालेला असताना, घोटाळयात गुंतलेल्या स्वस्तधान्य दुकानदारांचे परवाने रद्द करावेत आणि त्या घोटाळयामध्ये जे अधिकारी गुंतलेले आहेत त्यांची तेथून बदली करावी अशा प्रकारचे आदेश आपण दिले होते. त्या अधिका-यांची बदली अथवा निलंबन अद्याप झालेले नाही. मागील अधिवेशनामध्ये जेव्हा हा मुद्दा उपस्थित झालेला होता त्यावेळी आज संध्याकाळपर्यन्त शासनाने निवेदन करावे, असे आदेश आपण दिलेले असताना शासनाने अद्याप निवेदनही केलेले नाही. राजपत्रित अधिका-यांना निलंबित करण्यास शासन विलंब लावत आहे. गोडाऊन मधील गहू श्री. किरिट सोमय्या यांना दाखविला म्हणून तेथील चतुर्थश्रेणी कर्मचा-याला अधिका-यांनी ताबडतोब निलंबित केलेले आहे. मात्र धान्य घोटाळ्यामध्ये गुंतलेल्या अधिका-यांवर शासनाने अद्याप कारवाई केलेली नाही. तेव्हा याबाबतीत योग्य ती कारवाई त्वरित करण्यासाठी मी हा मुद्दा उपस्थित केलेला आहे.

डॉ. नीलम गो-हे : सभापती महोदय, सभागृहामध्ये दिलेल्या निर्देशाची पायमल्ली होते त्यावेळी हक्कभंग हे शेवटचे हत्यार वापरावे लागते. जुलैच्या अधिवेशनामध्ये पुणे ग्रामीण पोलिसांचा जो बेबंदशाही कारभार चाललेला आहे त्याबद्दल आपण स्वत: लक्ष घालून काही निर्देश दिले होते. गृहराज्यमंत्री श्री. सिध्दाराम म्हेत्रे हे सभागृहामध्ये असताना त्यांनी आश्वासन दिले होते आणि आपण अशा स्पष्ट सूचना दिल्या होत्या की, पुणे ग्रामीण पोलीस अधिक्षकांची माननीय राज्यमंत्री, आपण आणि माझ्या उपस्थित एक बैठक घ्यावी. त्यासंबंधीचे पुरावे आपण स्वत: देणार आहात.अद्याप ती बैठक झालेली नाही. तसेच पुणे ग्रामीण पोलिसांनी याबाबतीत कोणतीही दखल घेतलेली नाही. म्हणून माझी अशी विनंती आहे की, ही बैठक घेण्याच्या संदर्भात पुणे ग्रामीण पोलीस अधिक्षकांनी जी दिरंगाई केलेली आहे त्याबाबतीत योग्य ती कारवाई करावी. सभापती महोदय, आपल्या निर्देशांचे उल्लंघन झालेले आहे.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य डॉ. नीलम गो-हे यांनी या ठिकाणी महत्वाचा मुद्दा उपस्थित केलेला आहे. याबाबतीत मी गृहमंत्रालयाला अशी सूचना करु इच्छितो की, या संदर्भामध्ये सभागृहामध्ये जी चर्चा झाली होती ...

...नंतर श्री.भोगले..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती**....

याचा तपशील सादर करण्यासाठी आणि संपूर्ण तपशील मागवून घेऊन या संदर्भात पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षकांना तातडीने नागपूर मुक्कामी बोलावून परवा दुपारी 4.00 वाजता सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे, मी स्वतः, गृहराज्यमंत्री आणि पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षक यांची बैठक घेण्यात यावी.

आता सभागृहाची बैठक दुपारी 4.00 वाजेपर्यंत मध्यंतरासाठी स्थगित करण्यात येत आहे.

(3.35 ते 4.00 मध्यंतर)

---------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( मध्यंतरानंतर )**

**( सभापतीस्थानी माननीय उपसभापती )**

**पृ.शी.**: सच्चर समितीच्या शिफारशी राज्यात अमलात आणणे.

**मु.शी.** : सच्चर समितीच्या शिफारशी राज्यात अमलात आणणे याबाबत श्रीमती फौजिया खान, सर्वश्री कपिल पाटील, अरुण गुजराथी, मुझफ्फर हुसेन, जैनुदीन जव्हेरी, एम.ए.अजीज, उल्हास पवार, भास्कर जाधव, राजन तेली, गिरीश गांधी, प्रतापसिंह मोहिते-पाटील, यशवंतराव गडाख, सुधाकर गणगणे, रणजितसिंह मोहिते-पाटील, जितेंद्र आव्हाड, संजय दत्त, सर्व श्रीमती उषा दराडे, सुधार जोशी, मंदा म्हात्रे, वि.प.स. यांचा नियम 260 अन्वये प्रस्ताव.

( चर्चा पुढे सुरु .....

श्रीमती फौजीया खान (नामनियुक्त ): सभापति महोदय, इस प्रस्ताव पर होने वाली चर्चा सुनने के लिए स्वयं सम्माननीय मुख्यमंत्री जी सदन में आए है इसलिए मैं उनका स्वागत करती हूं. पिछले सप्ताह जब इस प्रस्ताव पर चर्चा शुरु हुई थी तो बहुत घूम-धड़ाके के बीच मुझे भाषण करना पड़ा था. मुझे अफसोस इस बात का हुआ कि ऐसे गंभीर विषय पर भी उस दिन विपक्ष की तरफ से राजनीति की गई.

श्री अनिल परब : विपक्ष की तरफ से इस विषय पर कोई राजनीति नहीं की गई थी. आप विषय पर बोलिए.

श्रीमती फौजीया खान : ठीक है. विपक्ष की तरफ से राजनीति नहीं की गई. प्रश्न यह नहीं है कि मुस्लिम समाज आज इस देश का सबसे पिछड़ा समाज है. इस बात को सच्चर कमेटी की रिपोर्ट ने सिध्द कर दिया है कि मुस्लिम समाज का पिछड़ापन प्रूव्ह फेक्ट है. सच्चर कमेटी ने अपनी सिफारिश में कहा है कि किस तरह से एक असरकारक कालबध्द कार्यक्रम मुस्लिम समाज की उन्नति के लिए बनाया जा सकता है. आज तक शासन इस दिशा में कई कदम उठाते भी रहा है, कई निर्देष भी 15 सूत्रीय कार्यक्रम के जरिए आए है लेकिन उस पर प्रभावी

...2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGJ/ तालेवार/ MMP/ . 16:00

श्रीमती फौजीया खान....

अमल न होने कारण आज एक साल गुजर गया अब तक कोई प्रभावी हल नहीं निकला है. आने वाले बजट में इस पर रिफलेक्शन दिखना बहुत जरुरी है. ऐसा कहा गया है कि आने वाले बजट में रिफ्लेक्शन नज़र आएगा लेकिन यह प्रतिबिंब केवल कागजी प्रतिबिंब न हो. सही मायनो में प्रतिबिंब दिखना चाहिए. जिस प्रकार से गाड़ी के मिरर में दूर से आने वाली वस्तु नज़र आती है. इसलिए यह बहुत जरुरी है कि योजनाओं पर अमल के परिणाम अच्छे हो, अच्छे से कार्यान्वयन हो. मैं यह कहना चाहती हूं कि बहुत सी ऐसी योजनाएं है जिनके लिए बजट उतना जरुरी नहीं है सिर्फ इच्छा शक्ति की जरुरत है. सच्चर कमेटी ने डायग्नोसिस किया है, प्रिसक्रिप्शन भी लिख दिया है, अब सिर्फ सही इलाज की आवश्यकता है. लेकिन अगर इलाज करते समय सही और अच्छी औषधी नहीं दी जाएगी तो सही इलाज नहीं होगा. मैं इस विषय के संबंध में आपके सामने कुछ ठोस मांगे रखकर अपना भाषण खत्म करुंगी.

सभापति महोदय, मैंने उस दिन अपने भाषण में यह कहा था कि महाराष्ट्र हमेशा ही क्रातिकारी निर्णय लेने के लिए आगे रहा है. इस बारे में महाराष्ट्र का इतिहास गवाह है. इस देश में महिला नीति घोषित करने वाला महाराष्ट्र पहला राज्य है. रोजगार हमी योजना शुरु करने वाला देश में पहला राज्य महाराष्ट्र ही है. आरक्षण नीति को लागू करने वाला पहला राज्य महाराष्ट्र ही है. मंडल कमीशन की सिफारिश भी महाराष्ट्र सरकार ने स्वीकार की है. इसलिए सच्चर कमेटी की सिफारिशों पर ठोस रुप से अमल करने का समय अब आ गया है. सरकार को सच्चर कमेटी की सिफारिशें लागू करने के लिए तत्काल निर्णय लेना चाहिए. चाहे विरोध कितना भी हो, शासन को यह कदम उठाना चाहिए. अत: मेरी यह पहली मांग है कि महिला नीति की तरह महाराष्ट्र में मायनारिटी पॉलिसी बनाई जाए. मायनारिटी पॉलिसी बनाई जाएगी तो प्रभावी कार्यक्रम बन सकते हैं.

भाषण जारी, इसके बाद श्री दत्त

असुधारित प्रति/ प्रकाशनार्थ नहीं

**( सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.उल्हास पवार )**

श्रीमती फौजिया खान...

माननीय सभापति महोदय, मैं कहना चाहूंगी कि मॉयनारिटी वेल्फेयर डिपार्टमेंट होना भी आवश्यक है. सरकार के विभिन्न विभागों द्वारा आज जो कार्यक्रम चलाए जा रहे हैं उनमें आपस में कोआर्डिनेशन नहीं है. निर्धारित कार्यक्रमों के लिए बजट प्रोवीजन नहीं की जाती है. वक्फ बोर्ड, हज कमेटी या उर्दू अकेडमी के लिए बजट प्रोवीजन नहीं की जाती है. हमारा कहना है कि केंद्र सरकार की धरती पर एक वेल्फेयर डिपार्टमेंट यहां भी बनाया जाये तभी मुस्लिम लोगों के वेल्फेयर कार्यक्रमों पर अमल किया जा सकेगा. लेकिन इसके लिए बजट प्रोवीजन किया जाना बहुत आवश्यक है. इस काम के लिए अलग से मिनिस्ट्री बना दी जाए तो बहुत अच्छा होगा. जिस तरह से ट्रायबल सब-प्लान तथा मागासवर्गीय वर्ग के लिए स्पेशल कंपोनेंट प्लान है उसी तरह से मुस्लिम वर्ग के विकास के लिए कोई प्लान सरकार की ओर से बनाया जाना चाहिए.

माननीय सभापति महोदय, एक और बात मैं यहां पर कहना चाहूंगी कि इस वर्ग को लेजिस्लेटिव सेफगार्ड दिया जाना भी बहुत आवश्यक है. यदि ऐसा पाया जाता है कि कहीं पर धर्म के आधार पर डिसक्रिमीनेशन हो रहा है या किसी का सोशल एटीटयुड ठीक नहीं है या कहीं किसी पर अत्याचार हो रहा है तो उसको लीगल सेफगार्ड दिया जाना बहुत आवश्यक है, इस बारे में सरकार को विचार करना चाहिए, इस तरह की मांग मैं यहां पर शासन से करना चाहूंगी.

मैं यहां पर यह भी कहना चाहूंगी कि जिस तरह से सच्चर कमेटी ने पूरे देश में जाकर 13 राज्यों का सर्वे किया है उसी तरह का सर्वे महाराष्ट्र में कराने की जरुरत है. उसी लाइन पर यदि यह सर्वे कराया गया तो महाराष्ट्र में मुस्लिम समाज का सही चित्र सामने आ सकेगा. हमारा कहना है कि सभी फील्डस के एक्सपर्ट लोगों का एक स्टडी ग्रुप तैयार किया जाये और वह ग्रुप महाराष्ट्र में एक सर्वे करे. तथा मुस्लिम वर्ग के विकास के लिए वह स्टडी ग्रुप अपनी एक रिपोर्ट सरकार को दे. उस ग्रुप की सिफारिशों को किस तरह से इम्पलीमेंट किया

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती फौजिया खान......

जायेगा उसकी जानकारी सरकार द्वारा पब्लिश की जाए, इस तरह की मांग माननीय मुख्यमंत्री महोदय के सामने मैं यहां पर रखना चाहूंगी.

मैं कहना चाहूंगी कि मुस्लिम वर्ग के विकास की ज्यादातर बातें एटीटयुड रिलेटेड हैं. यदि सामाजिक मानसिकता ठीक न हो तो फिर आप कितनी भी अच्छी पॉलिसी क्यों न बनाएं और सरकार कितना भी इनीसिएटिव क्यों न लें, सुधार नहीं किया जा सकता है. ब्युरोक्रेसी का एटीटयुड ठीक होना बहुत जरुरी है. उनका एटीटयुड ठीक नहीं होगा तो मुस्लिम वर्ग का विकास ठीक से नहीं हो सकेगा. इसके लिए भी सरकार को ठोस कदम उठाए जाने चाहिए. चाहे बच्चों की पुस्तकों की बात हो, उनको डिफेंस में या पुलिस विभाग में सर्विस देने की बात हो या बच्चों के स्लेबस की बात हो, इन सब बातों के लिए पूरे समाज को सेन्सिटीव होने की जरुरत है. उनका स्लेबस इस तरह का होना चाहिए जिससे सभी के मन में मेल-जोल, एक दूसरे के प्रति मोहब्बत तथा भाई-चारे की भावना पैदा हो. ऐसी भावना पूरे समाज के अंदर पैदा करने की जरुरत है. इन्हीं बातों को शासन के सामने रखते हुए मैं अपनी बात खत्म करना चाहूंगी और अपेक्षा करती हूं कि शासन इस बारे में कोई धोरणात्मक निर्णय जरुर लेगा. इतना ही मुझे कहना है. धन्यवाद.

...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील ( मुंबई शिक्षक ) : सभापती महोदय, गेल्या दोन अधिवेशनापासून सच्चर समितीच्या निमित्ताने या सभागृहात चर्चा व्हावी असा मी प्रयत्न करीत होतो. आज सभागृहात सच्चर समितीच्या अहवालावर चर्चा होत आहे. सत्ताधारी पक्षाच्या बाजूने याबाबत सकारात्मक पावले उचलली जात आहे त्याबद्दल मी त्यांचे स्वागत करतो. मुस्लिमांच्या प्रश्नावर चर्चा होते तेव्हा तुमची आणि आमची अशी होते. या चर्चेच्या निमित्ताने हा भेदभाव मिटावा अशी माझी अपेक्षा आहे. दंगलीचा मुद्दा असो, यावरही त्यांचे आणि आमचे लोक अशाप्रकारची चर्चा नेहमीच केली जाते. त्यास कोणीही अपवाद नाही. महात्मा गांधी यांनी सांगितले आहे की, "हिंदू आणि मुस्लिम हे एकाच शरीराचे भाग आहेत. एकाच शरीराचे दोन डोळे आहेत."

यानंतर श्री.पुरी..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSP/ KTG/ पूर्वी श्री.अजित.... 16:10

श्री.कपिल पाटील...

याप्रश्नाकडे पाहताना सभागृहातील सर्व सनमाननीय सदस्यांनी गांधीजींचा दृष्टीकोन स्वीकारला पाहिजे. सभापती महोदय, या प्रश्नासंबंधी चर्चा करण्याची गरज का भासावी, हे लक्षात घ्यावे. सच्चर समितीचा अहवाल आला म्हणून सदरची चर्चा येथे उपस्थित करण्यात येत आहे अशातला भाग नाही. देशाच्या घटनेमध्ये हक्कांच्या बाबतीत ज्या तरतुदी केलेल्या आहेत, त्याकडे नजर टाकली तर हे प्रश्न का निर्माण झालेले आहेत, हे आपल्या लक्षात येईल. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेल्या संविधानातील कलम 14 असे सांगते की, "भारतात कायद्यापुढे भारतीय नागरिक समान असतील आणि त्यांना सन्मानाने वागविले जाईल." कलम 15 (1) असे सांगते की, "राज्य केवळ धर्म, वंश, जात, लिंग, जन्मस्थान या अथवा यापैकी कोणत्याही कारणावरून कोणत्याही नागरिकाला प्रतिकूल होईल अशाप्रकारचे भेदभाव करणार नाही." पुढे कलम 16 असे सांगते की, "कोणाताही भेदभाव न करता सर्वांना विकासात समान स्थान मिळेल असे नियोजन करावे." सभापती महोदय, घटनेमध्ये या तरतुदी जरुर केलेल्या आहेत, परंतु मुस्लीम समाजाच्या दृष्टीने गेल्या 60 वर्षांचे अवलोकन केले तर या तीनही कलमांचा आपण सर्वांनी मिळून भंग केलेला आहे, अशाचप्रकारचे चित्र अधोरेखित होते. आज मुस्लिमांची स्थिती काय आहे ? सच्चर समितीने जे आकडे दिलेले आहेत, त्यामध्ये मी जात नाही. परंतु मुस्लिमांच्या स्थितीला कोण जाबाबदार आहे ? या देशातील मुस्लिमांची संख्या साडे तेरा टक्के असून महाराष्ट्र राज्यातील संख्या ही 11 टक्क्यांपेक्षा थोडाशी अधिकची आहे. सच्चर समितीने दरमहा, दरमाणशी मुस्लीम समाजाच्या खर्चासंबंधी उल्लेख केलेला आहे, त्याचा मी थोडक्यात उल्लेख करु इच्छितो. भारतामध्ये मुस्लिमांवर दरमहा, दरमाणशी 712 रुपये एवढा खर्च होतो. सर्व हिंदुचा मिळून हाच खर्च दरमहा, दरमाणशी 1023 रुपये आहे. हिंदु ओबीसींचा खर्च 646 रुपये इतका असून मुस्लीम ओबीसींचा तोच खर्च 635 रुपये इतका आहे. भारतातील हिंदुचा खर्च 712 रुपये असून तोच मुस्लिमांचा 635 इतका आहे. आपल्याला ही स्थिती काय सांगते ? या देशातील मागासवर्गीयांचा म्हणजे एस.सी.,एस.टी. यांचा दरमहा, दरमाणशी खर्च 520 रुपये इतका असून मुस्लीम मागासवर्गीय एस.सी.,एस.टी.च्या प्रमाणाची नोंद न झाल्यामुळे तो आकडा समोर येत नाही. या आकडयाचा अंदाज बांधला तर देशातील मुस्लीम मागासवर्गीयांची जी आकडेवारी आहे, तीच

..2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील.....

आपल्या राज्याची आहे. यामध्ये महाराष्ट्र राज्य अपवाद नाही. महाराष्ट्र राज्यात वेगळी परिस्थिती नाही. यामध्ये बीपीएल किंवा आदिवासींच्या बरोबरीने मुस्लिमांचा उल्लेख करता येईल. सच्चर समितीने देशभर फिरुन अनेक प्रकारे सर्व्हे केलेला असून संविधानातील तरतुदीप्रमाणे मुस्लिमांना आपण किती न्याय दिला, हे त्यावरुन लक्षात येईल. ज्या खेडयामध्ये मुस्लीम समाज जास्त आहे, त्या खेडयांची आज काय स्थिती आहे, ते आपण पहावे. 1/3 खेडयांमध्ये कोणत्याही प्रकारच्या शिक्षणाच्या सोयी-सुविधा उपलब्ध नाहीत, त्याठिकाणी दवाखाने नाहीत, स्वच्छतेची कामे नाहीत, गटारे साफ नाहीत, मुख्य रस्त्यांना जोडणारे रस्ते नाहीत, वीज कनेक्शनही नही के बराबर है.

नंतर श्री.रोझेकर....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील..........

एस्.सी.,एस.टी. आणि ओ.बी.सी.,एस.सी.,एस.टी.मुस्लिम या दोघांची संख्या सारखी आहे. 1 कोटी पलिकडे ही संख्या आहे. त्यामुळे सन्माननीय सदस्या श्रीमती फौजिया खान यांनी मागणी केल्याप्रमाणे एकदा यासंबंधीचा सर्व्हे झाला पाहिजे. दलित मुस्लिमांची स्थिती बघितली तर अतिशय दयनीय स्थिती आपल्याला दिसून येईल. सच्चर समितीला सुध्दा नेमका आकडा शोधून काढता आला नाही.

सभापती महोदय, शिक्षण क्षेत्रामध्ये मुस्लिम समाज कोठे आहे ? हा समाज शिक्षणाच्या बाबतीत अतिशय मागे आहे. पदवीधरांची आकडेवारी असे सांगते की, या देशामध्ये 3 कोटी 76 लाख 70 हजार पदवीधर आहेत. यापैकी एस.सी.एस.टी.चे 30 लाख 8 हजार पदवीधर आहेत, इतर सर्व मुस्लिम सोडून 3 कोटी 22 लाख आहेत आणि मुस्लिम 23 लाख 90 हजार आहेत. त्यातील मागासवर्गीय मुस्लिमांची संख्या अगदी नगण्य एवढी आहे. मुस्लिमातील जो वरचा वर्ग आहे तो शिकलेला आहे, त्याची ही आकडेवारी आहे. बहुसंख्य मुस्लिम समाज याच्या जवळपास सुध्दा फिरकलेला नाही, ही स्थिती आहे.

सभापती महोदय, साक्षरतेचे प्रमाण बघितले तर त्यामध्येही मुस्लिम समाज पिछाडीवर आहे. हिंदु साक्षरतेचे प्रमाण 80 टक्के आहे, मुस्लिमेतरांचे 75 टक्के आहे, हिंदु ओ.बी.सी. 63.04 टक्के आहे, मुस्लिमांचे प्रमाणे 59 टक्के एवढे आहे व दलितांचे प्रमाण 52 टक्के एवढे आहे. वरचा स्तर बाजूला काढला तर ही आकडेवारी दलितांच्या प्रमाणाएवढी येते. या देशात 14 वर्षापर्यन्तच्या प्रत्येक मुलाला शिक्षण सक्तीचे आणि मोफत दिले पाहिजे, असा हक्क घटनेने दिला आहे. मुस्लिमांची स्थिती बघितली तर 25 टक्के मुले अद्याप शाळेतच गेलेली नाहीत त्यांनी शाळेचे तोंडही बघितलेले नाही. ही स्थिती अतिशय लज्जास्पद आहे.

सभापती महोदय, काम करण्याचा अधिकार घटनेने दिला आहे. वर्किंग पॉप्युलेशन रेशो बघितला तर काय परिस्थिती आहे ? टोटल वर्किंग पॉप्युलेशन 62.4 टक्के एवढे आहे. यातील हिंदुंचा वाटा 65 टक्के आहे, मागासवर्गीयांचा वाटा 71 टक्के, ओ.बी.सी.यांचा वाटा 67 टक्के आणि मुस्लिमांचा वाटा 54 टक्के एवढा आहे. यामध्ये मुस्लिम महिलांचे प्रमाणे 25 टक्के एवढे आहे. मुस्लिम महिलांचे स्थान किती खाली गेले आहे. मुस्लिम महिला कामासाठी सुध्दा बाहेर पडू शकत नाही. त्यामुळे काम करण्याचा त्यांचा वाटा कमी झाला आहे.

....2.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील...........

सभापती महोदय, सुशिक्षित बेरोजगाराचा मुद्दा देखील अतिशय महत्वाचा आहे. हा देश ज्या दिवशी स्वतंत्र झाला त्या दिवशी या देशामध्ये जवळपास मुस्लिमांचा प्रशासन, पोलीस, सैन्यदल व इतर सेवा यामधील सहभाग 40 टक्क्यांच्या घरात होता. स्वातंत्र्यानंतर हा आकडा जाणुनबुजून कमी करण्यात आला. मी फाळणीनंतरचा आकडा सांगितला आहे, जो 40 टक्के आहे. आज हा सहभाग दोन टक्के एवढाही नाही. राज्यातील स्थिती तीच आहे. प्रशासन, पोलीस आणि इतर शासकीय, निमशासकीय सेवांमध्ये मुस्लिमांची एकत्रित टक्केवारी दोन टक्क्यांपेक्षा जास्त नाही. यामध्ये देखील उर्दु शाळा शिक्षकांची संख्या बाजूला काढली तर इतर सेवातील मुस्लिमांचा सहभाग अर्धा टक्क्यापेक्षाही कमी आहे, अशी राज्याची स्थिती आहे. ही सर्व आकडेवारी अतिशय लज्जास्पद अशी आहे.

सभापती महोदय, दारिद्रय रेषेखालील, ज्यांना आपण बिलो पॉवर्टी लाईन खालील लोक म्हणतो त्यांची आकडेवारी देखील वेगळे काही सांगत नाही. या देशातील 25 कोटीहून अधिक जनतेला एकवेळच्या जेवणासाठी कष्ट घ्यावे लागतात, ज्यांना आपण बी.पी.एल.खालील म्हणतो, त्यामध्ये एस.सी.एस.टी.ची संख्या 35 टक्के आहे तर मुस्लिमांची संख्या 31 टक्के एवढी आहे. हा आकडा 4 कोटी 77 लक्ष एवढा होतो. मुस्लिमांमधील 31 टक्के लोक कोण आहेत ? शहरामध्ये 38 टक्के बी.पी.एल.ची संख्या आहे. हे जे 31 टक्के मुस्लिम आहेत ते पूर्वाश्रमीची दलित, मागासवर्गीय, ओबीसी, आदिवासी या गटातील आहेत. सच्चर समितीने सरकारी, निमसरकारी, सार्वजनिक उद्योगातील आकडा सांगितला आहे तो 5 टक्के पर्यन्त जातो. सार्वजनिक उद्योग 1 कोटी 40 लक्ष रोजगार देतो त्यामध्ये फक्त 3.3 टक्के वाटा मुस्लिमांना देऊ शकलो आहोत.

यानंतर श्री.बोरले...........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील ........

देशाच्या प्रगतीचा निर्देशांक आपण नेहमी सेन्सेक्सने मोजतो. परवा भारताने श्री.शशी थरुर यांचे नाव युनोची निवडणूक लढविण्यासाठी सूचित केले होते. ते असे म्हणाले, त्यांनी सरकारला इशारा दिला की, आपल्या देशाने सेन्सेक्सचा आकडा 20 हजाराच्या वर जरी पार केला असला तरी सेन्सेक्स म्हणजे देशाची प्रगती नाही. सेन्सेक्स वाढल्याने देशातील गरिबी नष्ट होत नाही किंवा गरीबांचे दारिद्रय कमी होत नाही. त्यांनी दिलेला इशारा किती महत्वाचा आहे. अमर्त्य सेन यांची आंतरराष्ट्रीय ख्याती आहे. त्यांना अर्थशास्त्रातील नोबेल पारितोषिक मिळालेले आहे. अमर्त्य सेन यांनी देशाची प्रगती कशावर मोजायची, माणसाची प्रगती कशावर मोजायची हे सांगितलेले आहे. देशातील माणसांची प्रगती म्हणजे त्या देशाची प्रगती असे अमर्त्य सेन सांगतात. त्यांनी मानव विकास निर्देशांक तयार केला. अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य, शिक्षण या आधारावर त्यांनी मानव विकास निर्देशांक तयार केला. या मुलभूत गरजा किती लोकांच्या किती प्रमाणात भागविल्या जातात त्यावरुन त्या देशाची प्रगती निश्चित झाली पाहिजे आणि याला त्यांनी मानव विकास निर्देशांक असे नाव दिले. हा नवीन कन्सेप्ट त्यांनी दिला आणि हा कन्सेप्ट आज जगभर स्वीकारला गेला आहे. देशातील आर्थिक उत्पन्न वाढीचा दर 8 टक्क्याहून अधिक आहे. तो 9 टक्क्याच्या घरात जाईल असे आपले माननीय पंतप्रधान सांगतात. या प्रगतीचा वाराही ज्यांना लागलेला नाही अशा समुहाची ज्याला आपण बी.पी.एल. म्हणू त्यांची स्थिती कोठे आहे ? त्यामध्ये भारत कोठे आहे ? जगामध्ये प्रगतीच्या निर्देशांकाच्या उत्पन्न वाढीमध्ये आपला देश पुढे गेलेला आहे. जगामध्ये पावणे दोनशे देश आहेत. पण गरिबीमध्ये आपला देश 120 नंबरवर आहे. ही स्थिती भूषणावह नाही. मुस्लिमांची ही स्थिती किंवा आपल्या देशातील गरिबांची ही स्थिती कशामुळे निर्माण झाली ? भारतीय घटनेच्या कलम 25 अन्वये लोकांना व्यवसायाचे स्वातंत्र्य दिलेले आहे. या देशातील लोकांना व्यवसायाचे स्वातंत्र्य किती प्रमाणात उपभोगायला मिळते ? घटनेने व्यवसायाचे स्वातंत्र्य दिले. आपल्या देशामध्ये आपण वर्षानुवर्षे समाज व्यवस्था स्वीकारलेली आहे. त्या समाज व्यवस्थेने व्यवसायाचे स्वातंत्र्य कायमचे नाकारलेले आहे. बहुसंख्य वर्गाला शिक्षणाचा अधिकार नाही. त्यांनी कोणते व्यवसाय करायचे हे देखील समाज व्यवस्थेने ठरवून दिलेले आहे. ज्याला आपण जात व्यवस्था म्हणतो ते आपण स्वीकारल्यामुळे बहुसंख्य समाज व्यवसायाच्या स्वातंत्र्यापासून पराधीन आहे,

..2...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील ........

वंचित आहे. त्यामुळे त्याला कोणत्याही प्रगतीच्या वाटेवर पोहोचता येत नाही. त्याला अधिकाधिक अवनत अवस्था प्राप्त होते. त्यामुळे आपण कितीही प्रगतीचे आकडे गाठले तरी जी समाज व्यवस्था आहे ती त्याला प्रगतीच्या दाय-यामध्ये येऊ देत नाही, त्याला बांधून ठेवते. या समाज व्यवस्थेचा आणि मुस्लिमांचा काय संबंध आहे, असे विचारले जाईल. सभापती महोदय, मी आपल्याला नम्रतापूर्वक सांगू इच्छितो की, मुस्लिमांची चर्चा जेव्हा जेव्हा होते तेव्हा ते बाहेरुन आलेले आहेत आणि या देशामध्ये टपकलेले आहेत असा आपला सर्वांचा पूर्वग्रह असतो. त्याला अमुक एक अपवाद आहे, तमुक एक अपवाद आहे असे मी मानत नाही. इतिहास असे सांगतो की, मुसलमान खैबर खिंडीतून आले. सभापती महोदय, मला नम्रपणे सांगायचे आहे की, मुसलमान खैबर खिंडीतून आलेले नाहीत. शेवटचे मोहम्मद पैगंबर यांचे निर्वाण झाल्यानंतर अवघ्या 60 वर्षामध्ये केरळमध्ये, दक्षिण भारतामध्ये पहिली मशिद उभी राहिली. त्याला 1400 वर्षे पूर्ण झालेली आहेत. याचा अर्थ असा की, ते खैबर खिंडीतून आलेले नाहीत. दक्षिण भारताचा एक राजा मोहम्मद पैगंबर यांना भेटावयास निघाला. परंतु त्याची भेट होऊ नाही शकली. कारण त्या काळातील तो प्रचंड मोठा प्रवास होता. प्रवासामुळे तो तेथे पोहोचू शकला नाही. त्यांचा प्रवासामध्येच मृत्यू झाला. त्याची समाधी किंवा कबर आजही तेथे आहे. त्या राजाने मरणापूर्वी आपल्या सैनिकांना सांगितले की, मला हा जो समतेचा पैगाम प्राप्त झाला तो तुम्ही आपल्या देशात पोहोचवा. ते सैनिक जेव्हा दक्षिण भारतात परत आले त्यावेळी इस्लामचा उदय झाला. त्यालाही आज 1400 वर्षे पूर्ण झालेली आहेत. म्हणजे आखाती देशांमध्ये जेव्हा इस्लाम पोहोचला नव्हता त्या अगोदर इस्लाम या देशामध्ये पोहोचलेला आहे. मला एवढेच सांगावयाचे आहे की, खैबर खिंडीतून आले किंवा तलवारीच्या जोरावर इस्लाम येथे आला हा इतिहासच मुळात खोटा आहे. सभापती महोदय, या देशातल्या मुघलांनी एक हजार वर्षे राज्य केले किंवा मुस्लिम राजवटीने राज्य केले, असे इतिहासात शिकविले जाते. मला इतिहासातील कोणतेही उदाहरण द्या की, ज्या बादशहाने दिल्लीचे तख्त गाजविले असेल किंवा ज्या बादशहाने दक्षिणेतील राज्ये गाजविली असतील. जे बादशहा आपल्या पत्नीचे सुध्दा धर्मांतर करु शकले नाहीत ते तलवारीच्या जोरावर इतरांना मुसलमान करतील हे संभवत नाही. त्यामुळे हा दृष्टीकोन आपण बदलला पाहिजे. मी औरंगजेबाचे उदाहरण देतो.

यानंतर कु.जयश्री.......

अशुध्दित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

JPK/ D/ MMP प्रथम श्री.बोरले...... 16:25

श्री.कपिल पाटील.....

त्यांच्या पत्नीचे धर्मांतर सुध्दा ते करु शकले नाहीत, त्यामुळे तलवारीच्या जोरावरती त्यांनी लोकांचे धर्मांतर केले हा चुकीचा ग्रह आपण करुन घेतलेला आहे. त्यामुळे मुसलमान मोगलांवरती आले, बाबरीवरती 1200 लोक आले होते......

( गोंधळ )

श्री.कपिल पाटील :सभापती महोदय.....

(गोंधळ )

**तालिका सभापती ( श्री.उल्हास पवार )** : सन्माननीय सदस्य हे विषय सोडून बोलत आहेत, त्यांनी विषयावर येऊन बोलावे.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, वाह्यातपणा रेकॉर्डवर येत आहे.

श्री.विनोद तावडे : वा रे ! औरंगजेबकी औलाद !

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे.

श्री.दिवाकर रावते : सन्माननीय सदस्य विषय सोडून बोलत आहेत.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, या ठिकाणी या विषयाला वेगळे वळण लागलेले आहे, या विषयाला जर वेगळे वळण देणार असाल तर येथे चर्चेला देखील वेगळेच वळण लागण्याची शक्यता आहे. सभापती महोदय, संभाजी राजा धर्मांतर करीत नव्हता म्हणून त्याला बक-यासारखा सोलला, गुरु गोविंदसिंहच्या दोन्ही मुलांना ते धर्मांतर करीत नव्हते म्हणून जिवंत भिंतीत चिरडून मारले. सन्माननीय सदस्यांनी केलेल्या भाषणावर माझा हरकतीचा मुद्दा आहे, हे रेकॉर्डवर येणार नाही. अनेक गुरुनानकांनी बहादूरशहांनी सोडून बाकीच्यांनी धर्मांतर केले, काय सांगता साहेब ? या ठिकाणी या प्रस्तावावर बोलतांना सच्चर समितीच्या शिफारशींवर आणि मुस्लिम लोकांच्या आर्थिक विकासावर बोला. दंगेखोरांनी किती अत्याचार केले ? मोहम्मद घोरींनी महाराणी पद्मिनीच्या प्राप्तीसाठी काय केले ? वा रे वा ! अशी अनेक उदाहरणे देता येतील. म्हणून सन्माननीय सदस्यांनी या प्रस्तावावर बोलतांना विषयाला वेगळे वळण देण्याचा प्रयत्न करु नये. धर्म बदलत नव्हते म्हणून औरंगजेबाने लोकांना सोलले, लोकांची नख ओढली, जिभा हासडल्या.

......2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण .......

ज्या शिक्षक मतदार संघातून आपण निवडून आलात, त्या मतदारसंघामध्ये मी आपल्या या भाषणाच्या प्रती वाटणार आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, हे शिक्षकांचे प्रतिनिधी म्हणून या सभागृहामध्ये निवडून आलेले आहेत, म्हणून वाईट वाटत आहे.

(गोंधळ)

**तालिका सभापती** : ठीक आहे. जे अयोग्य असेल ते तपासून पाहिले जाईल आणि रेकॉर्डवरुन काढून टाकले जाईल. सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी या प्रस्तावावर भाषण करीत असतांना केवळ सच्चर समितीवर व मुस्लिम लोकांच्या आर्थिक विकासासंदर्भात बोलावे.

( गोंधळ )

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, मी माझ्या मित्रांना, सन्माननीय सदस्यांना धन्यवाद देतो. हा ठराव आपण वाचला तर काही गोष्टी आपल्याही लक्षात येतील. मी गेले दोन अधिवेशने सातत्याने यासाठी पाठपुरावा करीत आहे. सन्माननीय सदस्यांचा मी अतिशय आदर करतो, परंतु या ठिकाणी इतिहास नाकारण्याचे कोणतेही कारण नाही.

श्री.विनोद तावडे : सन्माननीय सदस्यांनी फक्त औरंगजेबाचाच आदर करावा, आमचा नको. आम्हाला माफ करा.

( गोंधळ )

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्यांनी चेअ्रकडे बघून बोलावे.

श्री.मधुकर चव्हाण : ज्या शिक्षक मतदार संघातून सन्माननीय सदस्यांना निवडून दिलेले आहे, त्या सगळयांना मी यांच्या भाषणाच्या प्रती वाटणार आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. सन्माननीय सदस्य असे म्हणाले की, आपण जर हा ठराव वाचला तर काही गोष्टी आपल्या लक्षात येतील. परंतु मुस्लिम समाजाच्या किंवा इस्लाम धर्माच्या उदयाबद्दल, मोहम्मद पैगंबरच्या हिंदुस्थानातील प्रवेशाबद्दल किंवा पैदाईशीबद्दल या ठरावामध्ये एकही वाक्य नाही. या ठरावावर आतापर्यंत एकाच

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

सन्माननीय सदस्यांनी भाषण केले त्या सदस्या म्हणजे प्रा.फौजिया खान. त्यांनीही भाषणातून असे कुठेही म्हटले नाही, मुस्लिमांनी भारतावर आक्रमण केले, मुस्लिम बाहेरुन आले, अमुक झाले, तमुक झाले, मुस्लिम धर्माचा उदय कधी झाला ? पहिली कबर कधी खणली, कोणी खणली ?असा या ठरावामध्ये किंवा सन्माननीय सदस्या प्रा.फौजिया खान यांच्या भाषणामध्ये कोठेही उल्लेख नाही कारण त्यांच्या भाषणाचे डिटेल्स माझ्याकडे आहेत. मुस्लिम समाजाला या महाराष्ट्रामध्ये जगण्याकरिता हक्क मिळावा, त्यांना रोजी मिळावी, सामाजिक न्याय मिळावा, त्यांना शिक्षण मिळावे. मुस्लिम समाजामध्ये जे भटके, विमुक्त, आदिवासी आहेत त्यांना सुध्दा या कायद्यामध्ये समान न्याय मिळावा, अशा प्रकारचा हा ठराव आहे, असा आमचा समज आहे. हे सगळे असतांना तो मोहम्मद घोरी, तो अमुक, तो तमुक, केरळ, खैबरखिंड कशाकरिता सांगण्याची गरज आहे. या हरकतीच्या मुद्दयाच्या माध्यमातून आमची अशी विनंती आहे की, चर्चेला अशा प्रकारे वेगळे वळण लागले तर आम्ही पण यासंदर्भातील मुद्दे मांडत बसू मग सच्चर समितीवरील, मुस्लिम समाजाच्या आर्थिक विकासावरील चर्चा राहील बाजूला आणि हीच चर्चा चालू राहील. समोरील बाकवाल्यांचे यासंदर्भात मतांचे राजकारण आहे परंतु सन्माननीय सदस्यांचे कोणते राजकारण आहे, त्यांना यासंदर्भात अशा प्रकारे बोलण्याची काय गरज आहे? हे मला अद्यापही कळलेले नाही.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्य श्री.दिवाकरजी रावते यांना धन्यवाद देतो की, त्यांनी माझे नेमक्या मुद्दयांकडे लक्ष वेधले. यासंदर्भात अकबर इलाहाबादी यांचा एक शेर मी याठिकाणी वाचून दाखवितो. तो शेर आपल्या सर्वांमधील भांडण मिटवेल.

यानंतर श्री.गागरे....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

PNG/ D/ MAP/ D/ कु.खर्चे 16:30

श्री.कपिल पाटील .....

"लाठी है हवाए दहर, पानी बन जाओ ।

मौजोंकी तरह लडो मगर एक रहो । ।

लाठीचे राज्य आहे, भांडून चालणार नाही. भांडायचे असेल तर समुद्राच्या पाण्यावर लाटा जशा एकमेकावर आदळतात व पुन्हा एकत्र होतात तसे भांडा. तसे आपण सर्व जातीधर्माचे सदस्य एक आहोत असे मी मानतो व सर्वांना सांगतो. माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी ज्या नेमक्या मुद्याकडे लक्ष वेधले आहे, त्या मुद्याकडे मला येणे अतिशय आवश्यक आहे. अतिशय नेमके आणि बरोबर ते म्हणाले आहेत. या देशातील दलितामधील मुस्लिमांचा, भटक्या विमुक्त जातीमधील विमुक्तांचा त्यांनी जाणीवपूर्वक उल्लेख केलेला आहे. या देशातील मागासवर्गीय मुस्लिमांना किंवा या देशातील दलितामधील मुस्लिमांना किंवा या देशातील भटक्या विमुक्त जाती जमातीमधील मुस्लिमांना सवलती देण्यामध्ये नेमका धर्म आड आलेला आहे. या देशातील घटना कधीही धर्मावर आधारीत सवलत देत नाही. ती नाकारते. ती आर्थिकदृष्टया नव्हेतर सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागासलेले घटक किंवा प्रवर्ग आहेत त्यांना सवलत देते. धर्माच्या आधारावर सवलत देत नाही. धर्माच्या आधारावर सवलत देण्यास आपण कोणीच सहमत होणार नाही. याबद्दल माझ्या मनात पक्की खात्री आहे. मी त्याच मताचा आहे. पण या देशातील मुस्लिम समाजव्यवस्थेचा भाग आहे. तो शैक्षणिक व सामाजिकदृष्टया मागासलेला आहे किंवा नाही, हा खरा मुलभूत प्रश्न आहे. ज्यावेळी अनुसूचित जातींना सवलती दिल्या गेल्या तेव्हा घटनेमध्ये स्वच्छ उल्लेख होता. पण 1950 मध्ये प्रेसिडेंशियल ऑर्डर काढण्यात आली. या ऑर्डरने असे सांगितले आहे की, या सवलती फक्त हिंदूमधील दलितांना दिल्या जातील. मुळात ती प्रेसिडेशियल ऑर्डर घटनाबाहय होती. परंतु ती स्वीकारली गेली. पंजाबमध्ये 28 टक्के शीख हे दलित समाजातील आहेत, हे सर्वात मोठे प्रमाण आहे. 1956 मध्ये पंजाबमधील शीखांनी ओरड केल्यानंतर, मागणी केल्यानंतर शीखांमधील दलितांची मागणी अमान्य करण्यात आली. त्यापाठोपाठ 25 टक्के दलित हिमाचल प्रदेशमध्ये आहे. चौथ्या क्रमांकावर महाराष्ट्र आहे. या राज्यातील नवबौध्दांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची हाक ऐकत बौध्द धर्म स्वीकारला, मात्र त्यांची हाक ऐकायला सरकारला अनेक वर्षे जावी लागली. त्यासाठी श्री.व्ही.पी.सिंग यावे लागले. श्री.व्ही.पी.सिंगानी नवबौध्दांचा देखील समावेश केला.

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील.....

शिखांमधील दलितांचा, बौध्दांमधील दलितांचा समावेश त्यामध्ये झालेला आहे. शीख धर्म गरीब व सवर्ण असे मानत नाही, तो समतेचा संदेश देतो. याचा उल्लेख माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी केला आहे. गुरुनानकांनी समतेचा अतिशय मोठा संदेश दिला आहे. बौध्द धर्म सुध्दा समतेचे दर्शन देतो.

**तालिका सभापती** : राज्यामध्ये बौध्दांना व दलितांना आपण सवलती दिलेल्या आहेत. त्याचप्रमाणे मुस्लिमांमध्ये जे ओ.बी.सी. व मागासवर्गीय आहेत, त्यांच्याकरिता शासनाने विशेष काही सवलती दिल्या आहेत.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, हिंदू मेहतरांना सवलत मिळते. बौध्द मेहतरांना सवलत मिळते परंतु मुस्लिम मेहतरांना सवलत मिळत नाही. मुस्लिम मेहतर बाहेरुन आलेला नाही, त्याने धर्मांतर केले. त्याचा धर्म बदलला पण त्याची जात संपली नाही. जातीचा व धर्माचा काही संबंध नाही. त्या समाजव्यवस्थेमधील सवलत मेहतराला मिळाली पाहिजे ही माझी मागणी आहे म्हणून या ठरावामध्ये दलितामध्ये जे मुसलमान आहेत. मेहतर, जातगर, पूर्वीश्रमीचे मातंग, महार, लालबेगी असतील.

( वेळ संपल्याची घंटी वाजते)

**तालिका सभापती** : माझ्याकडे 24 वक्त्यांची यादी आहे. आपण विषयावर बोलावे.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, मी अतिशय थोडक्यात बोलतो. पहिल्या सदस्यांना तुम्ही दोन तास दिले आहेत. हा ठराव मी मागील दोन अधिवेशनापासून देत आहे. मला या ठरावावर बोलण्यासाठी पुरेसा वेळ द्यावा, अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, मुस्लिम ओ.बी.सी. ला सवलत आपण देत आहोत. दलित मुस्लिमांचा प्रश्न आहे. त्यांना सवलत देण्यामध्ये काही अडचणी आहेत. त्यातील एक मागणी अशी आहे, जी आपल्याला सहज करता येईल. घटना सांगते की, राज्याने ठराव करुन राष्ट्रपतींकडे पाठविला तर दलित मुस्लिमांना त्या सवलती देता येतात. म्हणून राज्याने असा ठराव करुन पाठविणे अत्यंत आवश्यक आहे. प्रेसिडेशिएल ऑर्डरमध्ये दुरुस्ती करणे आवश्यक आहे, तो काही आपला विषय नाही. त्यामुळे मी त्याबद्दल बोलत नाही. अनुसूचित जातीमध्ये जे येऊ शकतात अशा सर्व वर्गाची

.....3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील .....

आपल्याला शिफारस करुन पाठविता येईल. माझ्या पाच मागण्या आहेत, त्या थोडक्यात मांडतो. या देशातील मुस्लिम व दलितांना शेडयुल कास्टप्रमाणे व मुस्लिम आदिवासींना शेडयुल ट्राईबची सवलत मिळते व दलितांना मिळत नाही. यासाठी राज्य सरकारने पुढाकार घ्यावा. महाराष्ट्र हे अनेक बाबतीत पुढाकार घेत आलेले आहे.

नंतर कु.धनश्री......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपील पाटील....

महाराष्ट्र शासनाने याबाबत केंद्रशासनाकडे शिफारस करावी. याबाबत राज्य शासनाने पुढाकार घेतला पाहिजे. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशावरुन, केंद्र शासनाने रंगनाथ यांच्या अध्यक्षतेखाली सच्चर समिती नेमली. यांनी स्पष्टपणे केंद्र शासनाकडे अल्पसंख्यांकाच्या बाबत शिफारस केलेली आहे व ही शिफारस अंमलात आणण्यासाठी राज्यसरकार प्रयत्न करु शकेल अशी माझी मागणी आहे. दलित मुस्लिमांबद्यल ही शिफारस अंमलात येईल तोपर्यंत आपल्याला थांबण्याची आवश्यकता नाही.

सभापती महोदय आर्थिक निकषावर मौलाना आझाद महामंडळ शासनाने निर्माण केले आहे. याबाबत अतिशय दमदार पाऊल प्रथम शासनाने उचलले व त्यानंतर केंद्र शासनाने उचलले आहे. त्याबाबत मी शासनाचे आभार मानतो. निधी वाढवण्याची आवश्यकता असताना दुसऱ्या बाजूला माझी अशी मागणी आहे की, दलित मुस्लिमांचा भटक्या विमुक्तांचा प्रश्न सुटत नाही. त्यांची आर्थिक व सामाजिक स्थिती अतिशय अवनत आहे. वीर मदारी मेहतर हा छत्रपती शिवाजी महाराजांचा एकनिष्ठ सैनिक होता. त्याच्या नावाने एक स्वतंत्र मडळ निर्माण करावे व जे जे समाज यामध्ये येतात त्यांच्या आर्थिक उन्नतीचा मार्ग मोकळा करुन द्यावा. यामुळे शिवाजी महाराजांचे जे धोरण होते त्याला उजाळा मिळेल. औरंगजेबाच्या कैदेमध्ये असताना मेहतर यांनी शिवाजी महाराजांचा जीव वाचविला होता. स्वातंत्र्याच्या चळवळीमध्ये असे अत्यंत महत्वपूर्ण योगदान त्याने दिले होते. त्या मदारी मेहताला व त्याच्या समाजाला यामुळे न्याय मिळेल.

सभापती महोदय, व्हीजेएनटी आणि एससी समाजाच्या मुस्लिमांसाठी कोणतीही आश्रमशाळा नाही. त्यांच्यासाठी वसतिगृह नाही. याबाबत शासनाने पुढाकार घेऊन मागासवर्गीय वसतिगृहामध्ये त्यांना सामावून घेण्याचा प्रयत्न करावा. मुस्लिम समाजासाठी आश्रमशाळा व वसतिगृहा बरोबरच शिष्यगृहाची देखील सोय करणे आवश्यक आहे. मुस्लिम समाजाला बँका कर्ज देत नाही. माननीय पंतप्रधानांनी देखील यासंदर्भात निर्देश दिलेले आहेत. परंतु अनेक मोठया बँका याबाबत पुढाकार घेत नाहीत असे निदर्शनास आलेले आहे. या राज्यात सहकारी बँकांचे जाळे मोठे आहे. त्यांनी जर पुढाकार घेतला तर अनेकांना रोजीरोटी मिळवून देऊन आर्थिक आधार या सहकारी बँका देऊ शकतात. यासाठी राज्य शासनाने पुढाकार घेऊन बैठक घ्यावी व जे जे मागासवर्गीय मुस्लिम आहेत

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपील पाटील....

त्यांच्यासाठी स्वत:हून पुढे येण्याचे आवाहन करावे अशी माझी मागणी आहे.

सभापती महोदय, मदरशांच्या बाबत अनेक वेळा मागणी होते, परंतु मी तशी मागणी करणार नाही. हा समाज शिक्षणाच्या मुख्य प्रवाहामध्ये आला पाहिजे. मदरशांमध्ये शिक्षण घेणाऱ्या 3 टक्के मुस्लिम समाजाला आता कळून चुकले आहे, की उच्च शिक्षणाशिवाय आपल्याला आता तरणोपाय नाही. शिक्षणाशिवाय आपला विकास होऊ शकणार नाही याची त्यांना जाणीव झालेली आहे. त्यामुळे शिक्षणाच्या अनेक संधीच्या शोधात हा समाज आहे. त्यासाठी आपण त्याला हात दिला पाहिजे. पुण्यामध्ये इनामदार यांची एक संस्था आहे. अशा संस्थांची संख्या वाढली पाहिजे. अशा प्रकारच्या संस्थांना शासनाने अनुदान तसेच सवलती देणे आवश्यक आहे.

याठिकाणी मला आणखी एका मागणीचा उल्लेख करावयाचा आहे. या राज्यातील शिक्षण हे सेक्युलर होण्याची आवश्यकता आहे. पाठयपुस्तकांमधील इतिहासामध्ये असे जे दाखले असतात त्यामधून अनेक गैरसमज वाढतात. वीर मदारी मेहतरची गोष्ट सांगितली जात नाही. इतिहास पुसून टाकू नये. जे आहे ते मांडावे. काही राज्यकर्त्यांनी अत्याचार केले ते लपविण्याचे कारण नाही. पण मुस्लिम म्हणजे अतिरेकी, मुस्लिम म्हणजे वाईट हे जे चित्र आहे ते दुरुस्त करावयाचे असेल तर शिक्षण क्षेत्रामध्ये आपल्याला पुढाकार घ्यावा लागेल. पाठयपुस्तकामध्ये देखील पूर्वगृहदूषित जो भाग आहे तो दुरुस्त करावा लागेल. हे सेक्युलर शिक्षण मुस्लिमांना आणि हिंदूना अशा सर्वांना मिळाले पाहिजे. गुजरातमध्ये, गुजराती समाज शिक्षण गुजराती या भाषेमध्ये घेऊ शकतो. महाराष्ट्रामध्ये मुस्लिम समाज मराठीपासून दूर गेला याचे कारण शिक्षण हे सेक्युलर नसणं हे आहे. हा समाज मधील काही काळामध्ये उर्दू शाळा होईपर्यंत शिक्षणापासून दूर गेला. उर्दू भाषिक मुसलमान जो आहे त्याला शिक्षण मिळाले पाहिजे. उर्दु ही मराठवाडयाची भाषा आहे. तिचा जन्म मराठवाडयामध्ये झालेला आहे.शासनाने उर्दु भाषेचा विकासासाठी पुढाकार घेणे आवश्यक आहे एवढे सांगून मी माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

यानंतर श्री. सुंबरे...

अशुद्धित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. एन.पी.हिराणी (यवतमाळ स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, आपल्याला स्वातंत्र्य मिळून जवळजवळ 60 वर्षे झाली आहेत आणि या 60 वर्षामध्ये कमी जास्त प्रमाणात विकासाची फळे तुम्हा आम्हा सगळ्यांना, भारतातील जवळपास सगळ्याच समाजांना मिळाली आहेत. पण तुलनात्मकदृष्ट्या पाहू गेल्यास एकच समाज त्यापासून थोडासा बाजूला राहिला आहे आहे आणि तो समाज म्हणजे अल्पसंख्यांक समाज होय. या अल्पसंख्यांक समाजाला या विकासाची फळे गेल्या 60 वर्षामध्ये बाकींच्यांच्या बरोबरीने आपण देऊ शकलो नाही ही गोष्ट नाकबूल करता येण्यासारखी नाही. सुदैवाने आज आपला भारत देश अत्यंत गतीने पुढे जात आहे, प्रगतीच्या वाटेवर दौडत आहे असे म्हटले तरी ते वावगे होणार नाही, आणि यापुढील 15-20 वर्षामध्ये जवळपास प्रत्येक बाबतीत भारत देश हा एक महाशक्ती होण्याच्या मार्गावर आहे असे सगळेच म्हणत आहेत. अशा प्रकारे एक चांगले, आशेचे चित्र भारताचे असताना याच देशातील हा अल्पसंख्यांक समाज थोडासा बाजूला राहिला, बाजूला फेकला गेला, उपेक्षित राहिला आहे वा दुर्लक्षित राहिला आहे. अशा या समाजाच्या बाबतीत कोणी काही सवलत वगैरे देण्यासंदर्भात थोडेसे जरी बोलले तरी प्रामुख्याने मुद्दा येतो तो तुष्टीकरणाचा. या समाजाच्या विकासाबद्दल किंवा प्रगतीबद्दल जो कोणी बोलेल, मग तो कोणी असो, कोणत्याही पक्षाचा असो, लगेचच त्याच्याबद्दल म्हटले जाते की, त्यांना अल्पसंख्यांकांची मते पाहिजेत म्हणून तुष्टीकरणाचा प्रयत्न चालविला आहे. पण ते बरोबर नाही, हे अन्यायकारक होते आहे. आपल्या भारताचा इतिहास पाहिला तर जो जो समाज पाठीमागे राहिला त्याच्या प्रगतीसाठी, विकासासाठी सगळ्यांनीच एकत्रितरित्या काम केले, प्रयत्न केले किंबहुना त्यासाठी घटनेमध्ये देखील एक व्यवस्था केली गेली. जो मागासलेला समाज आहे त्याला संधी मिळाली नाही तर त्याला प्रगतीपासून दूर ठेवले जाते, दाबून ठेवले होते, त्याला संधी दिली नव्हती असे म्हणून त्या समाजाला विकासाची, प्रगतीची संधी मिळावी म्हणून खास प्रयत्न केले, तशी व्यवस्था तुम्ही आम्ही केली. आज आपण पाहतो की, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, भटक्या जाती, विमुक्त जाती समाजाला स्वत:ची प्रगती करून धेण्याची आपण अधिकाधिक संधी देत आहोत. त्यासाठी खास प्रयत्न केले जात आहेत. इतकेच नाही तर ओबीसी समाजासाठी देखील गेल्या 4-5 वर्षामध्ये उठाव होऊन राहिला आहे. त्या समाजालाही प्रगतीची फळे दिली पाहिजेत म्हणून सांगितले गेले. अशाच प्रकारे अल्पसंख्यांक समाजातील जे मागासलेले आहेत,

..... 3क्यू 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

26-11-2007 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही )

3Q 2

KBS/ MAP/ D/ कु. गायकवाड नंतर --- 16:40

श्री. हिराणी ....

ज्यांची प्रगती झाली नाही, जे प्रगतीपासून दूर राहिले आहेत त्यांना पुढे आणण्यासाठी, त्यांनाही प्रगतीची फळे चाखू देण्यासाठी तुम्ही आम्ही प्रयत्न केले पाहिजेत आणि त्यासाठी कोणी काही मागणी केली आणि ती मागणी पूर्ण करण्याचा प्रयत्न केला तर त्याला तुष्टीकरण न म्हणता त्या सगळ्या समाजाला विकासाची संधी कशी मिळेल हे पाहणे आवश्यक आहे. तसे आपण केले नाही तर या देशातील हा फार मोठा समाज, जो भारताचाच एक भाग आहे, घटक आहे तो प्रगतीच्या फळापासून, विकासाच्या फळापासून वंचित राहील आणि ते राष्ट्रहितासाठी चांगले नाही हे आपण सगळ्यांनीच लक्षात ठेवले पाहिजे. हा अल्पसंख्यांक समाज देखील आपल्या देशाचा, भारत देशाचाच एक घटक आहे, या समाजातील प्रत्येक व्यक्ती ही भारतीयच आहे आणि म्हणूनच त्याला विकासाची संधी दिली नाही, त्याच्या प्रगतीच्या आड कोणी आले तर ते या समाजावर अन्याय केल्यासारखे होईल. कारण विकास हा सगळ्यांचाच झाला पाहिजे. कोणा एका समाजाला विकासा पासून बाजूला ठेवणे म्हणजे तेवढा तुकडा आपल्या विकासापासून बाजूला राहील म्हणून त्या सगळ्या समाजाला बरोबर घेऊन आपण पुढे जाणे आवश्यक आहे. हा समाज देखील या राष्ट्राचाच एक भाग आहे आणि म्हणूनच त्याचाही इतरांबरोबर विकास झाला पाहिजे, तो समाज देखील प्रगत झाला पाहिजे असा विचार आपण केला पाहिजे. त्यातच राष्ट्रहित आहे, म्हणून सर्वांच्या बरोबरीने याही समाजाला पुढे आणणे आवश्यक आहे. त्या दृष्टीने विचार करावयाचा तर आता प्रथमत: हा समाज कोणकोणत्या क्षेत्रात मागे आहे हे पाहिले पाहिजे. ....

( यानंतर श्री. सरफरे ..... 3आर 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. एन. पी. हिराणी...

त्यांना कोणकोणत्या क्षेत्रामध्ये प्रगतीची संधी मिळाली नाही? अनेक क्षेत्रामध्ये आपल्याला प्रगतीची संधी आहे याची जाण सुध्दा त्यांना नाही हे फार मोठे दुर्दैव आहे. देशामध्ये साक्षरतेचे प्रमाण 65.1 टक्के आहे. साक्षरतेमध्ये या समाजाला इतरांच्या बरोबरीने आतापर्यंत 59.9 टक्क्यापर्यंत जाता आले आहे. साक्षरतेमधील हा दहा टक्क्यांचा फरक राहिला तर अल्पसंख्यांकांवर किंवा संपूर्ण भारताच्या साक्षरतेवर त्याचा परिणाम होणार आहे. या समाजामध्ये आतापर्यंत मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण होणाऱ्यांचे प्रमाण 17 टक्के आहे, पदवी घेणारे फक्त 4टक्के लोक आहेत. व्यावसायिक शिक्षण असो किंवा व्यवस्थापन शिक्षण असो त्यामध्ये पदार्पण करण्याची त्यांना संधी देण्यात आली नाही. त्या क्षेत्रामध्ये फक्त हाताच्या बोटावर मोजण्या इतके लोक आहेत.

सभापती महोदय, महिलांची स्थिती त्यापेक्षा वाईट आहे. महिलांचे सबलीकरण करण्याचे व त्यांना पुढे नेण्यासंबंधी आपण नेहमी बोलत असतो त्यावेळी त्यांच्या विकासासाठी कृतीशील कार्यक्रम आपण तयार करुन तो राबविला पाहिजे. शिक्षण क्षेत्रासंबंधी खूप बोलता येईल. परंतु वेळेचे भान राखून मी आता आर्थिक क्षेत्राकडे वळतो. अल्पसंख्यांकांमध्ये आत्मविश्वास निर्माण करण्यासाठी, त्यांचे व्हिजन जोडण्यासाठी आणि समाजामध्ये त्याला सक्षमपणे उभे रहाण्यासाठी कोणत्याही परिस्थितीत आपल्याला त्याचा आर्थिक विकास साधावा लागेल. त्याच्या जवळ पैसा असल्यानंतर आपल्याला शिक्षण घेता येते, आरोग्याची काळजी घेता येते, ज्या काही सुखसोई आहेत त्या आपल्याला मिळविता येतात. या समाजामध्ये असलेला आर्थिक मागासलेपणा बघितल्यानंतर गेल्या 60 वर्षाच्या कालावधीमध्ये नियोजन करुन देखील या समाजाला आपण आर्थिक क्षेत्रामध्ये अजिबात पुढे आणू शकलो नाही. सच्चर समितीच्या अहवालामध्ये आय.डी.बी.आय. ने सन 2000 ते 2004 पर्यंत 26 हजार 543 कोटी रुपयांचे कर्ज दिले. त्यापैकी या समाजाला फक्त .05 टक्के म्हणजे 124 कोटी रुपये दिले गेले. अशाप्रकारचे विदारक चित्र याठिकाणी आपल्याला दिसते. अतिशय विचित्र, मनाला क्लेष देणारी आणि डोके सुन्न करणारी अशी ही गोष्ट आहे. याबद्दल आपण बोललो तर ते तुष्टीकरण कसे? यामुळेच बँकांचा नकारात्मक दृष्टीकोन या समाजाविषयी राहिला आहे. बँकांकडे या समाजाचे अर्ज आल्यानंतर त्यांच्या डोक्याला आटया पडतात. आज जास्तीत जास्त थकबाकीदार कोण असतील तर ते या समाजातील आहेत हे मी कबूल करतो. म्हणून या समाजाला कर्जापासून पूर्णपणे वंचित ठेवणे हा त्यावरील मार्ग नसावा. त्याकरिता या समाजातील लोकांना आपण समजावून सांगितले पाहिजे, त्यांचे प्रबोधन केले पाहिजे,

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ D/ MAP/

डॉ. एन. पी. हिराणी...

शासनाच्या सर्व योजनांची माहिती त्यांना करुन दिली पाहिजे. बँकेकडून घेतलेले कर्ज आपल्याला परत फेडावे लागेल हे समजावून सांगावे लागेल. असे केल्याशिवाय या समाजाला न्याय मिळण्याची शक्यता फारच कमी आहे. माझी या निमित्ताने शासनाला विनंती आहे की, या समाजाला कर्ज देण्याच्या बाबतीत आपण बँकांवर कंपल्शन केले पाहिजे. 100 रुपयामधील 10 ते 20 रुपये कंपल्सरी या समाजाला वाटले पाहिजेत. अशाप्रकारे आपण त्यांच्या कर्जाचा नेहमी आढावा घेतला तर कदाचित बँकेच्या भूमिकेमध्ये बदल होण्याची शक्यता आहे.

सभापती महोदय, त्यांना मिळणाऱ्या पायाभूत सुविधांबाबत आपण विचारु नका. आपण कोणत्याही वस्तीमध्ये जावे. त्याठिकाणी आरोग्याची असलेली स्थिती, रस्त्याची असलेली स्थिती स्वत: पहावी. त्या वस्तीमध्ये असलेल्या शाळा कशाप्रकारे चालविल्या जातात. त्या वस्तीमध्ये बालक मंदिर आहे काय? याची पहाणी करा. त्या वस्तीमध्ये लहान लहान, उघडी, नागडी मुले फिरत असतात. ही मुले या भारताची, या देशाची भावी नागरिक आहेत. त्यांच्या मूलभूत हक्कापासून त्यांना दूर ठेवले जात आहे. त्यांना पायाभूत सुविधा देऊन त्यांचा विकास आपणास केला पाहिजे. शिक्षण, आरोग्याच्या सुविधा इत्यादी पायाभूत सुविधांमध्ये हा समाज मागासलेला आहे.

(यानंतर श्री. बरवड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. एन.पी.हिराणी ......

शिक्षण, आरोग्य या सर्व सुविधांच्या बाबतीत हा समाज अत्यंत मागासलेला आहे. याबाबतीत व्यवस्था करणे आवश्यक आहे. दारिद्र्य हे या समाजाच्या पाचवीला पुजलेले आहे. दारिद्र्याची व्याख्या कशी करावयाची असा प्रश्न कोणासमोर असेल तर त्याने मुस्लीम समाजाच्या, अल्पसंख्यांक समाजाच्या वस्तीमध्ये जाऊन त्या ठिकाणी पाच मिनिटे उभे राहावे. दारिद्र्य कसे असते हे आपल्याला त्या ठिकाणी चांगल्या प्रकारे बघता येईल. इतकी या समाजाची वाईट स्थिती आहे. सरकारी नोकऱ्यांमध्ये त्यांचा हक्क का नाही ? ते सुध्दा भारतीय आहेत. त्यांना सुध्दा बरोबरीचा हक्क मिळाला पाहिजे. आपण सगळ्यांकरिता आरक्षण ठेवले आहे. जे जे मागासलेले होते त्यांच्याकरिता जागा राखून ठेवण्याची व्यवस्था केली. त्याबाबतीत याही समाजाचा विचार झाला पाहिजे. त्यांच्या बाबतीत भाषेची अडचण येते. पोलिसांच्या भरतीमध्ये निबंध लिहावा लागतो. निबंध मराठीमध्ये लिहिणे कंपल्सरी आहे. तेही बरोबर आहे कारण मराठी ही महाराष्ट्राची भाषा आहे. प्रत्येकाने मराठी शिकले पाहिजे आणि मराठीमध्ये पेपर सोडविला पाहिजे. जे मुस्लीम अल्पसंख्यांक उर्दू भाषेमध्ये शिकलेले आहेत ते ज्यावेळी पेपर लिहितात त्यावेळी ते तोडक्यामोडक्या मराठीमध्ये लिहिण्याचा प्रयत्न करतात. ते व्याकरणदृष्ट्या बरोबर लिहू शकत नाहीत. "तो गेला" असे लिहिण्याऐवजी "तो गेली" असे लिहितात. जे आपल्या महाराष्ट्राबाहेरचे सचिव किंवा आय.ए.एस. अधिकारी आहेत त्यांच्याकडून सुध्दा अशा प्रकारची वाक्ये वापरली जातात. व्याकरणाच्या चुका होतात म्हणून त्यांचा पेपर फेकून द्यावयाचा ही जी पध्दत आहे त्याबाबतीत विचार केला पाहिजे. एक तर जे उर्दूमध्ये शिकलेले आहेत त्यांना उर्दू भाषेत पेपर लिहिण्याची व्यवस्था केली पाहिजे. कदाचित अशी व्यवस्था केली तर प्रत्येक भाषेच्या लोकांकडून आग्रहाची मागणी येईल की, आम्हाला आमच्या भाषेत पेपर लिहू द्यावा. म्हणून ज्यावेळी स्पर्धात्मक परीक्षा होतील त्यावेळी दोन तीन किंवा सहा महिन्याच्या त्यांच्या कोचिंगची व्यवस्था करावी. त्यांचे जनरल नॉलेज बरोबर नसते त्यामुळे ते स्पर्धात्मक परीक्षांमध्ये टिकू शकत नाहीत. त्यामुळे त्यांच्यासाठी जनरल नॉलेजच्या कोचिंगची व्यवस्था केली पाहिजे. या समाजाचे प्रमाण आय.ए.एस.मध्ये 3 टक्के, आय.ए.एफ.एस.मध्ये 1.1 टक्के आणि आय.पी.एस.मध्ये फक्त 4 टक्के आहे. ही उच्च पदांबाबतची

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. एन. पी. हिराणी .....

परिस्थिती आहे. पोलीस आणि इतर कनिष्ठ पदांच्या बाबतीत काय परिस्थिती आहे हे सगळ्यांना माहीत आहे. याबाबतीत विचार करण्याची आवश्यकता आहे. मी सगळ्यांना विनंती करतो. आमच्या समाजाच्या बाबतीत पूर्वग्रहदुषित पध्दतीने विचार करण्याची आवश्यकता नाही. भारताचाच एक भाग म्हणून या समाजाच्या लोकांना पुढे आणणे, त्यांना आपल्यासोबत रस्त्यावर चालण्यासाठी, धावण्यासाठी शिकवणे हे काम तुष्टीकरणाचे आहे असे म्हणणे असेल तर तो आक्षेप काढून टाकून त्याबाबतीत सगळ्यांनी मिळून प्रयत्न केला तर सन 2020 पर्यंत मुस्लीम समाज सुध्दा सर्व समाजाच्या बरोबरीने आल्या शिवाय राहणार नाही. अशा प्रकारची विनंती करुन मी माझे दोन शब्द संपवितो.

---

**तालिका सभापती** ( श्री. उल्हास पवार ) : यानंतर सन्माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी बोलतील. या प्रस्तावावर बोलण्यासाठी एकूण 20 नावे आहेत तसेच आता काही नावे येऊन जवळजवळ 30 सन्माननीय सदस्यांना या प्रस्तावावर बोलावयाचे आहे. मुद्याची पुनरावृत्ती होणार नाही याची काळजी सन्माननीय सदस्यांनी घ्यावी.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MAP/ D/

श्री. अरुण गुजराथी ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने या ठिकाणी नियम 260 अन्वये मांडण्यात आलेल्या प्रस्तावावर माझे विचार मांडण्यासाठी उभा आहे. या प्रस्तावामध्ये सहा बाबींचा उल्लेख आहे. यामध्ये मुस्लीम समाज शैक्षणिक, सामाजिक, आर्थिकदृष्ट्या मागासलेला असणे हा पहिला भाग आहे. इतर ओबीसींना ज्या सवलती देतो त्या मुस्लीम ओबीसींना द्याव्यात आणि त्याची अंमलबजावणी करावी हा दुसरा भाग आहे. जात पडताळणीमध्ये निर्माण होणारे अडथळे दूर करणे हा तिसरा भाग आहे. मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळाची अपुरी तरतूद ही चौथी बाब आहे.

यानंतर श्री. शिगम ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. अरुण गुजराथी ...)

शिक्षणातील अतिशय खालावलेले प्रमाण हा पाचवा भाग आहे, उच्च शिक्षणाच्या समान संधीचा अभाव हा देखील भाग आहे. सच्चर कमिटीने ज्या काही बाबी आपल्या अहवालामध्ये लिहिलेल्या आहेत त्या आधारे हा ठराव या ठिकाणी आणलेला आहे. छत्रपती शिवरायांचे निष्ठावान सहकारी वीर मदारी मेहतर यांच्या नावाने स्वतंत्र विकास मंडळ स्थापन करावे, दलित मुस्लिमांचा समावेश अनुसूचित जातीत करण्यासाठी राष्ट्रपतींना शिफारस करावी अशा प्रकारची मागणी केलेली आहे. सच्चर समिती नियुक्त केल्याबद्दल मी पहिल्या प्रथम माननीय पंतप्रधानांचे अभिनंदन करतो. आज देशातील विविध जाती-धर्माच्या, संप्रदायाच्या लोकांची आर्थिक, सामाजिक आणि शैक्षणिक परिस्थिती काय आहे याचा आढावा घेण्यासंबंधीचा विचार पुढे आला. सर्व लोकांच्या दृष्टीकोनातून 50-60 वर्षानंतर हा आढावा घेण्याचा विचार करण्यात आला. ज्याला फॅक्टस् फाईडिंग्ज म्हणतो, तशा पध्दतीचा हा अहवाल घेण्याचे ठरविण्यात आले. सन्माननीय सदस्य डॉ. एन.पी.हिराणी यांनी आयएएस 3 टक्के, आयएएफएस 1.1 टक्के आणि आयपीएस 4 टक्के अशी आकडेवारी दिली. परंतु सर्वात महत्वाचा भाग हा शिक्षणाचा आहे. मला वाटते आपण 4 बाबी केल्या तरी न्याय देण्याच्या संदर्भात कोठेतरी चांगली भूमिका घेतली असे होईल. पहिली बाब शिक्षण, दुसरी आरोग्य, तिसरी कर्जाची उपलब्धता आणि चौथी बाब नोकरी आणि त्या संदर्भातील प्रशिक्षण ही आहे. सर्व रोगांचे मूळ हे दारिद्र्यात आहे. दारिद्र्य हटविण्याच्या संदर्भातील हा विचार आहे. हा विचार एकाच धर्माच्या लोकांसाठी आहे असे मी म्हणणार नाही. अल्पसंख्यांक समाज, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती इत्यादीसाठी हा विचार आहे. काही बाबतीत तर अल्पसंख्यांक समाज हा अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीपेक्षाही मागासलेला असल्याचे चित्र अनेक जिल्ह्यामध्ये आपणास पहावयास मिळते. विधानसभेचा अध्यक्ष असताना साऊथ आफ्रिकेमध्ये पॉव्हर्टीच्या संदर्भातील विचार मांडण्याची संधी मला मिळाली. दारिद्र्याच्या दृष्टीकोनातून माणसाची पुढील प्रमाणे वाख्या केली जाते: A poor person is the one who does not get square meal. मला भारताच्या आणि महाराष्ट्राच्यावतीने माझे विचार मांडण्याची संधी मिळाली त्यावेळी मी दारिद्र्याच्या संदर्भात पुढीलप्रमाणे व्याख्या केली. दारिद्र्य म्हणजे Poverty, म्हणजे "P" for Property not, "O" for Opportunity not, "V" for Value not, Vocation not, "E" for Employment not,

..2..

(श्री. अरुण गुजराथी...)

Education not, "R" for Residence not, "T" for Technology not, Teaching not आणि "Y" for Youthful action not. म्हणून आपण त्यांना मूलभूत शिक्षण दिले पाहिजे. शिक्षण हीच संपत्ती आहे .शैक्षणिक संधी चांगल्या प्रकारे उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीकोनातून शासनाने पुढे यावयास पाहिजे अशी अपेक्षा या सदनाच्या माध्यमातून व्यक्त करण्यात येत आहे. याकरिता जे जे काही करता येणे शक्य आहे ते शासनाने केले पाहिजे. त्यांना संधी उपलब्ध करुन दिल्या पाहिजेत. तंत्रइ ाान, माहिती तंत्रज्ञान असे शिक्षण देण्यासाठी पुढे येणा-या संस्थांना अनुदान दिले पाहिजे.

**तालिका सभापती** : प्रस्तावावरील चर्चा संपेपर्यन्त सभागृहाची वेळ वाढविण्यात येत आहे.

..नंतर श्री.भोगले

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरुण गुजराथी : सन्माननीय सभापती महोदय, या सभागृहाचे सन्माननीय सदस्य श्री.पाशा पटेल यांनी सच्चर समितीच्या संदर्भात चांगला निर्णय सांगितला. त्या पाठिमागे राजकारण आहे असे मी समजत नाही. पण त्या समाजामध्ये आणि संपूर्ण समाजामध्ये जागृती निर्माण करणे, आपण कुठे आहोत आणि काय झाले पाहिजे, मागे काय झाले नाही यादृष्टीकोनातून चांगला असा उपक्रम त्यांनी राबविला, मोर्चा काढला, आपल्या मागण्या माननीय मुख्यमंत्र्यांकडे दिलेल्या आहेत. मी शिक्षणाच्या दृष्टीने याठिकाणी विचार मांडले. आपल्याला थोडे नियम बाजूला ठेवून या समाजासाठी पॉलिटेक्नीक असेल, इतर संस्था असतील त्या दिल्या पाहिजेत. साधारणत: अल्पसंख्यांकाचा विचार केला तर नोकरीपेक्षा स्वत:चा व्यवसाय करण्याच्या दृष्टीने ते पुढे असतात. म्हणून आपल्याला जे शिक्षण देता येणे शक्य आहे त्या शिक्षणाचा विचार महत्वाचा आहे.

दुसरा विचार आहे तो भांडवलाचा. मघाशी सांगण्यात आले की, अर्धा टक्का त्यांना मिळाला. किमान 4 ते 5 टक्के जितके अधिक देता येईल तेवढे दिले पाहिजे. राज्य शासनाच्या दोन मोठ्या संस्था आहेत. मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळाचा अहवाल माझ्या हातात आहे. मी सभागृहाचा वेळ घेऊ इच्छित नाही. परंतु या महामंडळाला रक्कम वाढवून देणे अत्यंत महत्वाचे आहे अशी मी माननीय मुख्यमंत्र्यांना विनंती करतो. राज्य शासनाचे महामंडळ आहे. यासाठी भरघोस निधीची तरतूद केली तर या सभागृहामध्ये जी चर्चा झाली त्या माध्यमातून राज्यातील अल्पसंख्यांक समाजाला आपण काहीतरी दिले ही एक समाधानाची बाब निश्चितपणे होईल. वसतिगृहाच्या संदर्भात, शैक्षणिक संदर्भात मुलींना बाहेर पाठविले जात नाही, त्या समाजातील मुलींनाही पाठविले जात नाही. वसतिगृहे स्थापन करता येतील. शिक्षण संस्था स्थापन करता येतील. भांडवलासाठी म्हणून निधी देता येईल. व्यवसाय करण्याच्या संदर्भात प्रशिक्षण देता येईल. या बाबी झाल्या तर पुष्कळसा फरक पडू शकेल. चीनमध्ये एक म्हण आहे, "Do not give him fish,teach him how to fish." एकदा अनुदान दिले आणि संपले असे नाही. अनुदान देऊ नका परंतु त्यांची रोजी रोटी त्यांना कशी मिळेल, भाकरीची चिंता दूर झाली तर ते महत्वाचे आहे. राष्ट्रीय प्रवाहात 12 ते 14 टक्के असणारा समाज, त्यांच्या प्रश्नाकडे एखाद्या धर्माचे प्रश्न आहेत, धर्माची समस्या आहे असे न समजता राष्ट्रीय प्रश्न आहेत हा मुलभूत विचार महत्वाचा आहे. या बाबीतून आपण पुष्कळसे मिळवू शकतो. आरोग्याच्या दृष्टीकोनातून पाहिले तर आरोग्याच्या संदर्भात हा समाज मागे आहे ही वस्तुस्थिती आहे. आता औषधे महाग झालेली

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरुण गुजराथी..............

आहेत. भाकरी फार स्वस्त आहे आणि औषधे फार महाग आहेत. तेव्हा आरोग्याची देखील काळजी घेणे अत्यंत महत्वाचे आहे. आरोग्याची काळजी घेण्यापूर्वी जागृतीही अत्यंत महत्वाची आहे. सच्चर समितीच्या अहवालात म्हटले आहे की, बालमृत्यूचे प्रमाण फार कमी आहे आणि मुलगा होतो की मुलगी होते याचा कधीही विचार या समाजाने केलेला नाही ही एक अभिनंदनीय बाब आहे. शैक्षणिक, आरोग्य, भांडवल आणि नोकरीच्या संदर्भातील प्रशिक्षण या चार बाबी शासनाच्या माध्यमातून व्हाव्यात अशा प्रकारची विनंती करुन माझे या संदर्भातील विचार संपवितो.

-------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : माननीय सभापती महोदय, हिंदुस्थानची फाळणी झाली आणि कालच हा सर्व समाज इकडे आला आणि त्यांना न्याय हक्क देण्यासाठी आक्रोश सुरु आहे अशा प्रकारची भाषणे ऐकून या स्वतंत्र हिंदुस्थानात ही सर्व माणसे गेली 60 वर्षे राहत आहेत का हा मला प्रश्न पडला आहे. या राष्ट्रामध्ये राहणारा प्रत्येक नागरिक हा भारतीय आहे.  जे राष्ट्रीय भावनेने राहतात ते आमचे बांधव आहेत.

(नंतर श्री.जुन्नरे...

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

तो कुठल्या धर्माचा आहे याला काही महत्व नाही ही आमची भावना आहे. गेल्या 60 वर्षापासून जो समाज हिंदुस्तानमध्ये राहतो, ज्याच्या 3-4 पिढया स्वातंत्र्यानंतर जन्माला आल्या, वाढल्या त्यांना कोणी शिक्षण घेण्यापासून रोखलेले आहे काय? नाही, कोणत्याही समाजाला शिक्षण घेण्यापासून रोखलेले नाही. दवाखान्यात जागा नाही असे कोणी मुस्लिमांना सांगितलेले आहे काय ? सर्व समाजाला जो नियम आहे तोच नियम मुस्लीम समाजालाही लागू आहे. शासनाने आणि स्थानिक प्रशासनाने करुन दिलेली व्यवस्था सर्व समाजाला लागू आहे तशीच ती मुस्लीम समाजाला सुध्दा लागू आहे. तुम्ही मुस्लीम आहात म्हणून तुम्हाला कधी अडविण्यात आलेले आहे काय ? नाही, मुस्लीम म्हणून कोठेही आणि कधीही अडवले जात नाही. जी औषधे सर्व समाजाला मिळतात तीच औषधे मुस्लीम समाजाला सुध्दा मिळतात. आम्ही हिंदू आहोत आणि तुम्ही मुस्लीम आहात अशा प्रकारची चर्चा सुरु असल्यामुळेच ख-या अर्थाने मुस्लीम समाज दूर गेलेला आहे. हिंदुसाठी वेगळी औषधे आणि मुस्लिमांसाठी वेगळी औषधे तयार केली गेली आहेत अशी परिस्थिती आहे काय? नाही असा प्रकार कधीच झालेला नाही. बस, रेल्वे, टॅक्सीमध्ये तुम्ही मुस्लिम आहात म्हणून प्रवेश दिला जात नाही का ? सभापती महोदय, घटनेच्या 19 व्या कलमामध्ये सर्व समाजाला जे अधिकार दिलेले आहेत तेच अधिकार मुस्लीम समाजाला सुध्दा दिलेले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी घटना लिहितांना जो दलित समाज आहे, पिडीत समाज आहे, ज्या समाजावर गेल्या अनेक वर्षापासून अन्याय होत होता, जो समाज वंचित राहिला होता त्या समाजाला सवलती दिलेल्या आहेत. परंतु तशी परिस्थिती मुस्लीम समाजाची कधीच नव्हती. ज्यांनी हिंदुस्तानचे नेतृत्त्व केले अशा नेत्यांना आपण या सदनात श्रध्दांजली वाहिलेली आहे. या देशाचा हिंदूस्तानी म्हणून अभिमान असलेल्यांना, ज्यांनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी आपले बलिदान केले, देशाच्या स्वातंत्र्यासाठी जे तुरुंगात गेले त्यांना आपण श्रध्दांजली अर्पण करीतच असतो. ते मुस्लीम आहेत म्हणून आपण त्यांना श्रध्दांजली अर्पण करावयाची नाही असे कधी घडलेले आहे काय? मला हे समजत नाही मुस्लीम समाजाला कोणी वंचित ठेवलेले आहे याचा शोध लागणे फार महत्वाचे आहे. आपली सावली पायाखाली का हे पाहिले पाहिजे. तुमच्या समोर जे बसलेले आहेत त्यांना मुस्लिम समाजाबद्दल काही वाटत नाही अशी परिस्थिती नाही. मुस्लीम समाजाला कोणीही वंचित ठेवलेले

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते.....

नाही, किंबहुना मुंबई महापालिका अशी एकमेव महापालिका आहे की, ज्या महापालिकेत 9 भाषांमधून शिक्षण दिले जाते या 9 भाषामध्ये एक भाषा उर्दू आहे. मुंबई महापालिकेत उर्दू भाषेतूनही शिक्षण दिले जाते. तुम्ही स्वत:च सांगता की, आम्ही तुमच्या सारखे नाही, आम्ही तुमच्या पेक्षा वेगळे आहोत तेव्हा बाकीच्या समाजाला प्रश्न पडतो की, अरे हा आपल्या शेजारी राहतो, बारशाला येतो आणि वरुन म्हणतो आम्ही तुमच्यापेक्षा वेगळे आहोत म्हणून? मुस्लीम समाजाला कोणी सांगितले की, तुम्ही शिक्षण घेऊ नका म्हणून ? सर्व समाज शाळेतून शिक्षण घेतो परंतु आपण शाळेच्या नावाने मदरसे काढून धार्मिक शिक्षण घेत बसला आहात. स्वत:च जगण्यासाठी आपण मदरसे काढलेले आहेत. पाकिस्तानमध्ये जनरल मुशर्रफ यांनी मदरसे उद्ध्वस्त केले कारण त्या मदरशामध्ये आंतकवाद्यांना शिक्षण दिले जात होते. महाराष्ट्र शासनाने मदरशांना मान्यता दिलेली आहे. मुस्लिमांनी धार्मिक शिक्षण देण्यासाठी मदरसे काढले त्याला आम्ही कधी विरोधी केला?

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते............

मदरशांना मान्यता दिल्यापासून आम्ही काही बोललो असल्यास ते याठिकाणी 'कोट' करावे मुस्लिमांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शासनाने त्यास मान्यता दिली. इतर शाळांचे इन्स्पेक्शन होते त्याप्रमाणे मदरशांचे इन्स्पेक्शन का होत नाही हे माननीय शिक्षण मंत्र्यांनी छातीठोकपणे सांगावे. अशी तटबंदी कशासाठी आहे ? ते अशाप्रकारे स्वत: भोवती कुंपण घालीत असतील तर ते कुंपण उखडून टाकण्याची आसक्ती त्यांना झाली पाहिजे.

सभापती महोदय, माझ्यापुढे अनेक प्रश्न निर्माण होत आहेत. मी सच्चर समितीचा अहवाल वाचला आहे. सुरुवातीस मुंबई आणि संभाजीनगर याठिकाणी अल्पसंख्याकांची संख्या मोठ्या प्रमाणावर होती. आता परभणी, हिंगोली या दोन जिल्ह्यांत ती वाढलेली आहे. विदर्भात अकोला, अमरावती, वाशिम व यवतमाळ हे जिल्हे अल्पसंख्याक म्हणून जाहीर झालेले आहेत. याठिकाणी अल्पसंख्याकांची वस्ती जास्त आहे. सिमीचे जाळे त्या भागात पसरलेले आहे. ते का पसरले याचे उत्तर माझ्याकडे नाही. याचे उत्तर शोधण्याचे काम माननीय गृह मंत्र्यांचे आहे.

सभापती महोदय, घटनेच्या अनुच्छेद 14 मध्ये म्हटलेले आहे की, "राज्य कोणत्याही व्यक्तीस भारताच्या राज्यक्षेत्रात कायद्यापुढे समानता अथवा कायद्यांचे समान संरक्षण नाकारता येणार नाही." या संदर्भात सर्वोच्च न्यायालयाने जवळपास 70 निर्णय दिलेले आहेत. ते सर्वच निर्णय याठिकाणी कोट करणे वेळेअभावी शक्य होणार नाही. सर्वोच्च न्यालयाने AIR 1957/877 प्रकरणामध्ये निर्णय देताना अनुच्छेद 14 मध्ये अपवाद केला होता. कामगार आणि महिलांना यातून वगळण्यात यावे, बाकीच्या सर्व बाबतीमध्ये समानता व अधिकार 14 प्रमाणे राहील, यात धर्माचा संबंध नाही असे सांगितलेले आहे. त्याचप्रमाणे सर्वोच्च न्यायालयाने AIR 1954/920 युसुफ विरुध्द स्टेट बँक या केसमध्ये निर्णय देताना "समान स्थितीतील लोकांना समान वागणूक" असे सांगितलेले आहे, यामध्ये धर्म नाही. सर्वोच्च न्यालयाने दिलेले निर्णय मी सांगत आहे. सर्वसाधारण समानता याचा अर्थ समान स्थितीतील समान वागणूक.

यानंतर श्री.पुरी...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

धर्माच्या आधारावर वेगळी वागणूक देणे न्यायालयाने वर्ज केलेले आहे." आपण समान नागरिक आहोत ना... आपली घटना ही धर्मनिरपेक्ष असून सर्वधर्मसमभाव सांभाळणारी आहे. सर्वधर्मातील नागरिक हे सारखेच आहेत, समान आहेत. यामध्ये दलितांनाही 16 वर्षांसाठी सवलती देण्याचे सांगितले होते. त्यांना बऱ्याच वर्षापासून संधी मिळालेली नव्हती म्हणून त्यांना 16 वर्षे संधी मिळण्याच्या दृष्टीने घटनेमध्ये तरतूद आहे, ती तरतूद वाढवून वाढवून पुढे आणलेली आहे. त्यांना सवलती मिळाल्या पाहिजेत, याबद्दल माझ्या मनात शंका नाही. सदरची तरतूद ही 10-10 वर्षांनी पुढे रिव्हाईज करण्यात येत आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी स्वतःच्या समाजाबद्दल 16 वर्षांनंतर आपले अस्तित्व समान होईल, असे सांगितले होते, हे आपण समजून घेतले पाहिजे. परंतु 16 वर्षामध्ये हे सर्व आपल्याला करता आलेले नाही. त्यानंतर तज्ज्ञांपासून सर्वांनी 10-10 वर्षांनी पुढे ही तरतूद रिव्हाईज केलेली आहे, त्यास आमची हरकत नाही. परंतु तेथे मुस्लीम समाज वेगळा मोडत नव्हता. त्यांना आपले नागरिक म्हणून आपण स्वीकारलेले असून आजही आपण त्यांना स्वीकारतच आहोत. आम्ही त्यांना नाकारलेले नाही. आम्ही त्यांना स्वीकारतोच. सभापती महोदय, याठिकाणी घटनेच्या कलम 51 मध्ये जी मार्गदर्शक तत्वे दिलेली आहेत, ती सर्वात मोलाची आहेत. कलम 51 मध्ये असे म्हटले आहे की, " संविधानाचे पालन करणे आणि तत्प्रणीत आदर्श व संस्था, राष्ट्रध्वज व राष्ट्रगीत यांचा आदर करणे..." आपल्याला या देशात रहायचे आहे, आपण या देशाचे नागरिक आहोत, आपण या देशाचे भूमीपूत्र आहेत, त्यामुळे या देशाचा कायदा आपल्याला बंधनकारक आहे. यामध्ये पुढे असेही म्हटले आहे की, "...ज्यांमुळे आपल्या राष्ट्रीय स्वातंत्र्यलढयास स्फूर्ती मिळाली त्या उदात्त आदर्शांची जोपासना करुन त्यांचे अनुसरण करणे, भारताची सार्वभौमता, एकता व एकात्मता उन्नत राखणे व त्यांचे संरक्षण करणे..." हे सर्वात महत्वाचे कलम आहे. पुढे असेही आहे की, "...आवाहन केले जाईल तेव्हा देशाचे संरक्षण करणे व राष्ट्रीय सेवा बजावणे, धार्मिक, भाषिक व प्रादेशिक किंवा वर्गीय भेदांच्या पलिकडे जाऊन अखिल भारतीय जनतेमध्ये एकोपा व भ्रातृभाव वाढीला लावणे, स्त्रियांच्या प्रतिष्ठेला उणेपणा आणणाऱ्या प्रथा सोडून देणे..." मुस्लीम समाजातील स्त्री बाहेर पडत नाही, असे याठिकाणी सांगण्यात आले.

..2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

त्यांना कोणीही बंदी घातलेली नाही, त्यांना कोणी थांबवले आहे का ? याचे कारण मी नंतर सांगणार आहे. यामध्ये पुढे असेही म्हटले आहे की, "...आपल्या संमिश्र संस्कृतीच्या वारशाचे मोल जाणून तो जतन करणे.." हिंदु, मुस्लीम, नवबौध्द, शिख, इसाई या सर्वांचे जतन केले पाहिजे. याठिकाणी पुढे इतरही बाबी नमूद केलेल्या आहेत. परंतु याठिकाणी माझ्या मनात प्रश्न निर्माण होतो की, आपल्याला जे पाहिजे ते घटनेने दिलेले आहे. तो आपला हक्कच आहे, तो कोणीही नाकारलेला नाही. ते आपल्याला संरक्षण देत नसतील तर आम्ही आपल्यासोबत आहोत. आपण शिकू नका, असे आम्ही आपल्याला सांगितले आहे का ? आम्ही सांगतो की, आपण शिका, एमपीएससीच्या परीक्षा द्या आणि सरकारी नोकरीमध्ये या. परंतु याठिकाणी सांगण्यात आले की, सरकारी नोकरीमध्ये हा समाज फक्त 2 टक्के आहे. मग, यामध्ये आपली टक्केवारी वाढवू नका असे आम्ही आपणांस सांगितले का ? आपण शिका, एमपीएससी परीक्षेला बसा आणि सरकारी नोकरीमध्ये या. आपण जर परीक्षेमध्ये यशस्वी झालात तर आपल्याला नोकरी देणे हे बंधनकारक आहे.

नंतर श्री.रोझेकर.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.........

कोणी नको सांगितले ? सन्माननीय ज्येष्ठ सदस्य, श्री.अरुण गुजराथीसाहेब मी आपल्या भाषणादरम्यान एवढेच म्हणालो होतो की, या समाजाचा जन्माला आलेला ओरिजिनल माणूस तुम्ही तुमच्या भाषणात उभा केला. बसून बोललो, कारण उभे राहून बोलता येत नाही. आम्ही सांगितले का त्यांना ? या देशामध्ये तुम्हाला असे का वाटते ? आमच्याप्रती तुम्हाला आपुलकीची भावना नाही, आमच्याबद्दल विश्वास नाही. आमच्या मुली आपल्या या समाजामध्ये मुक्तपणे वावरत असतील तर तुमच्या मुली का वावरत नाहीत ? आमच्या मुली आणि तुमच्या मुली एकमेकात मुक्तपणे वावरल्याने मैत्री होते, सामंजस्य निर्माण होते, विचारांची देवाण-घेवाण होते, एकमेकांप्रती चांगले मत बनविण्यास मदत होते. परंतु, याबाबतीत ज्या ज्या वेळी मी बघतो मला विचित्र परिस्थिती दिसते. मी आपल्याला एक उदाहरण देतो. दादर पोलीस स्टेशनमधील एका पोलिसाने दाढी वाढविली, अगोदर त्याने दाढी वाढविलेली नव्हती. त्या पोलिसाच्या सिनिअरने डिसिप्लिन म्हणून दाढी वाढविता येणार नाही, असे सांगितले. तो पोलीस कोर्टात गेला. मी हे गेल्या वर्षीचे उदाहरण आपल्याला देतो आहे. त्या पोलिसाने कोर्टात असे सांगितले की, माझ्या धर्माप्रमाणे मी दाढी वाढविली आहे.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, ठरावातील मजकूर सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी वाचून दाखविला. आपण या ठिकाणी धर्मा-धर्माबद्दल चर्चा करण्यास बसलेलो नाही. त्यामुळे सन्माननीय सदस्यांचे विषयांतर होत आहे, त्यांनी कृपया विषयाला धरुन बोलावे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, शिक्षणातून काय निर्माण झाले तेच मी सांगतो आहे. मिळालेला शिक्षणाचा उपयोग काय केला, ते त्यांनी कोर्टात सांगितले. त्या पोलिसाने धर्माप्रमाणे दाढी वाढविली पाहिजे, असे कोर्टात सांगितले. हा कोर्टाचा निर्णय अतिशय महत्वाचा आहे. बंधुभावाबद्दल आपण बोलत आहोत तर बंधुभाव चांगलाच केला पाहिजे. हे केले पाहिजे. मूळ प्रस्तावाकडे बघतच नाही. प्रस्ताव मांडला त्यांच्याकडे मी बघतच नाही. या कोर्टाने निर्णय दिला की, तुम्हाला दाढी वाढविण्यास हरकत नाही, पण नोकरी संपेपर्यन्त दाढी काढता येणार नाही.

.....2.........



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

धर्माप्रमाणे केले ना, तो त्यांना अधिकार आहे, घटनेप्रमाणे प्रत्येकाला आपला धर्म पाळण्याचा अधिकार आहे. मग धर्माप्रमाणे दाढी ठेवायची असेल तर नोकरी संपेपर्यन्त म्हणजे निवृत्त होईपर्यन्त दाढी काढता येणार नाही, हा कोर्टाचा निर्णय आहे. शिक्षणाचा महिमा मी सांगतो आहे.

श्री.अनिस अहमद : सभापति महोदय, मुस्लिम समाज में दाढ़ी रखना एक सुन्नत है और इसीलिए दिल्ली हाई कोर्ट ने इसे रिसेंटली जायज करार दिया है.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, शिक्षणाचे नेमके प्रदर्शन सन्माननीय मंत्री महोदयांनी केले आहे.

श्रीमती उषाताई दराडे : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. शैक्षणिक, सामाजिक, आर्थिकदृष्टया मागासलेल्या मुस्लिम समाजाला कशा पद्धतीने सुविधा उपलब्ध करुन दिल्या पाहिजेत आणि त्यांचा सामाजिक स्तर कसा समान आणला पाहिजे, अशी चर्चा आहे. कोणत्या माणसाने काय कपडे घातले पाहिजे, कसे वर्तन केले पाहिजे, दाढी ठेवली पाहिजे, हा या ठरावाशी संबंधित विषय असू शकत नाही. म्हणून माझी विनंती आहे की, सन्माननीय सदस्य या व्यतिरिक्त जे बोलले आहेत ते कामकाजातून वगळण्यात यावे.

यानंतर श्री.बोरले..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मी सच्चर समितीच्या शिफारशींवरच बोलत आहे. मुस्लिम समाजाची जी मागणी आहे त्यावर मी सुरुवातीलाच बोललो की, आम्ही तुमच्या बरोबर आहोत. कोणी नाकारले, हे सर्व मी सांगितले. का घडते याचा शोध घेतला पाहिजे, असे मी म्हणालो. मी कोणाचा द्वेष करीत नाही. मंत्री महोदय मी आताच कोर्टाचे उदाहरण दिले. मी माझे उदाहरण दिलेले नाही. त्यांनी त्यांचे शिक्षण प्रदर्शित केले, त्याला मी काय करणार ? मुळात येथेच खोट आहे. सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.एन.पी.हिराणी, सन्माननीय सदस्य श्री.मुजफ्फर हुसेन, सन्माननीय सदस्य श्री.अनिस अहमद यांना कोठे दाढी आहे. त्यांना काही फरक पडला काय ? ते मुस्लिम समाजाचे आहेत. त्यांचा धर्म बुडाला नाही. तुमच्या पायाखालच्या सावलीतून काय निर्माण होते, हे मी सांगण्याचा प्रयत्न करीत आहे. आरोग्य, शिक्षण, व्यवसाय, आरक्षण हे विषय आहेत. त्यासाठी काय करावयास पाहिजे. तुम्हाला समान नागरी कायदा का नको आहे. तुम्ही हे सर्व मागत आहात ना ? या देशाच्या संपत्तीतून तुम्हाला हे मिळाले पाहिजे. होय, भारतीय म्हणून तो तुमचा अधिकार आहे. तुम्ही स्वत:ला भारतीय म्हणवता. घटनेप्रमाणे तुम्हाला सर्व पाहिजे. मी माननीय मुख्यमंत्री महोदयांना धन्यवाद देतो. मागच्या अधिवेशनामध्ये आमच्या भगिनीने तुम्हाला सभागृहामध्ये जाब विचारला होता की, महामंडळासाठी तुम्ही 50 कोटी रुपये देण्याचे कबूल केले ते का देत नाहीत ? तुम्ही 49 कोटी रुपये दिले. एक कोटी रुपये कमी दिले. तुम्ही महामंडळाला 49 कोटी रुपये दिले त्याचा आम्हाला अभिमान आहे. ते आज सभागृहामध्ये जाहीर करा. त्यामुळे साडेचार ते पाच हजार लोकांना व्यवसाय मिळाला, ही चांगली गोष्ट आहे. सभापती महोदय, महत्वाचा मुद्दा असा आहे की, हे जे सभागृहात मागितले जाते, ते त्यांना मिळालेच पाहिजे. परंतु ते मिळविण्यासाठी "You have to prove your self" मी भारतीय आहे आणि भारतीय घटनेच्या अंतर्भूत राहून मला या देशाच्या मातीचे सर्व कायदे "the law of the land" आम्हाला मान्य आहेत. ज्यावेळी पोटगीचा प्रश्न निर्माण झाला त्यावेळी शहाबानो संपूर्ण देशात धर्माच्या नावाखाली लढल्या. घटना दुरुस्ती झाली. मी त्यावर टीका करत नाही. हा वेगळा विषय आहे. पण केलत ना. सभापती महोदय, परवा कोर्टात तलाकसंदर्भात निर्णय झाला. हा ठराव समाजाच्या उन्नतीकरिता आहे, हा ठराव महिलांच्या उन्नतीकरिता आहे. माझ्या ज्या मुस्लिम बांधव भगिनी आहेत त्यांना भविष्यात चांगले कुटुंब मिळावे, त्याकरिता आहे. त्यालाही

..2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते ..........

धर्माच्या नावाखाली विरोध. सभापती महोदय, समान नागरी कायदा मानत नाहीत. राष्ट्रीय संकल्पना, वंदे मातरम् म्हणा. तुम्ही कारण काय सांगता. उभे राहून सांगा की, तुम्ही का वंदे मातरम् म्हणत नाहीत. या देशाला वंदे मातरममुळे स्वतंत्र्य मिळालेले आहे. तुम्ही या सभागृहामध्ये बसलेले आहात आणि जे मागत आहात वंदे मातरममुळे मिळालेल्या स्वातंत्र्यातून हे सार्वभौम सभागृह निर्माण झालेले आहे आणि म्हणून तुम्हाला हे अधिकार मिळालेले आहेत, अन्यथा तेही मिळाले नसते. तुम्ही वंदे मातरम म्हणा. तुम्ही केवढे मोठे रणकंदन करता, नाही तर देशाला स्वातंत्र्य मिळाले नसते. सन्मानीय सदस्य डॉ.एन.नी.हिराणी साहेब जे बोलले, ते खरोखरच खूप गंभीर बोलले. बोलतांना ते अत्यंत सिरीयस झाले. महाराष्ट्राच्या मातीमध्ये राहणा-यांची भाषा मराठी आहे. प्रत्येक नागरिकाला मराठी भाषा आली पाहिजे. तुम्ही उर्दू शिका. मुंबई महानगरपालिकेने उर्दू शाळा उघडलेल्या आहेत. इतर भाषेच्या देखील शाळा आहेत. माननीय शिक्षण मंत्री श्री.वसंत पुरके साहेब सभागृहामध्ये बसलेले आहेत. महाराष्ट्रामध्ये मराठी भाषा अनिवार्य आहे. सन्माननीय सदस्य डॉ.एन.पी.हिराणी साहेब तुम्ही हे कशासाठी सांगता ? त्या एस.पी.ला वाचविण्यासाठी. त्यांनी कायदा तोडला म्हणून. तो प्रश्न सभागृहामध्ये येईल. का त्यांनी उर्दूचा हट्ट धरावा. या देशाची भाषा उर्दू नाही. या महाराष्ट्राची भाषा उर्दू नाही. या देशात त्रिभाषा सूत्र आहे. त्याचा तुम्हाला हट्ट धरता येईल. बाकी ठीक आहे. मला हे सांगा की, हा प्रश्न तुम्ही तुमच्या आत्मसम्मानाचा करुन जर आमच्यावर ठोसा मारण्यासाठी उभे राहणार असाल तर या मराठी मातीमध्ये मराठी अस्मिता जपली पाहिजे हे आम्ही त्याच ठोश्याने तुम्हाला सांगू, हे तुम्ही लक्षात ठेवा. हे चालावयाचे नाही. मग हक्क मागत असतांना सर्व समाजाने एकत्र येऊन तुम्हाला हक्क मागावा लागेल. हे सर्व करीत असतांना तुम्ही जरा तुम्हाला आवरा.

यानंतर कु.जयश्री.....

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

ज्यावेळी वेळ येते, त्यावेळेला आम्हाला हे मिळावयाला पाहिजे असे म्हणतात आणि ज्यावेळेला अगदीच वेळ येते त्यावेळेला मग धर्माच्या नावावर सगळे सांगत बसतात. या भारतामध्ये विविध पंथांच्या विविध धर्माच्या लोकांचे अनेक जुलूस निघतात. पण ते कधीही देशाला घातक अथवा धर्माला घातक अशा घोषणा देत नाहीत. सच्चर समितीच्या अहवालावर अथवा त्या समितीच्या सूचनांवर मी जास्त बोलणार नाही कारण हे सर्व तुम्हाला उपलब्ध आहे. फक्त तुमची इच्छाशक्ती आहे की, नाही हा प्रश्न आहे. महाराष्ट्रात अनेक ठिकाणी शेतक-यांनी आत्महत्या केल्या, त्या आत्महत्यांची संख्या 3750 च्या घरात गेलेली आहे. त्यापैकी, एका आत्महत्या केलेल्या शेतक-याच्या घरी मी गेलो होतो म्हणून त्याबद्दल मी एकच गोष्ट या ठिकाणी सांगू इच्छितो. ही घटना घडल्यानंतर मी त्या भगिनीचे अश्रू पुसून तिला साडी चोळी दिली. मी असे म्हणणार नाही की, तुम्ही पण आत्महत्या करा.

श्री.अनिस अहमद : हमारे धर्म में आत्महत्या करना पाप है!

श्री.मधुकर सरपोतदार : हमारे धर्म में भी आत्महत्या पाप है!

श्री.दिवाकर रावते : ठीक है, लेकिन वे आत्महत्या क्यों नही करते, क्योंकि वे कुछ न कुछ करते है!

श्री.मधुकर चव्हाण : आपके धर्म मे आत्महत्या पाप है ! मगर हत्या माफ है!

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आता आपणच बघा, आताही यांचा धर्म आलाच ना ? अशी परिस्थिती असतांना सुध्दा यांचा धर्म आला की नाही ? नाही, सभापती महोदय, मी माझे भाषण संपवित आहे, मी संपवितांना एकच गोष्ट या ठिकाणी चार वाक्यात सांगून संपविणार आहे. या देशामध्ये तुम्ही राहत असतांना या देशाचे जे शत्रू असतील त्यांना मोकळया मनाने विरोध करण्याची हिम्मत तुम्ही दाखविणार आहात का ? हा पहिला प्रश्न आहे. हे सगळे बांगला देशींयांना आपल्या भागामध्ये घेऊन, परदेशातील लोकांना सांभाळून या भागामध्ये आतंकवादी कारवाया निर्माण करण्याकरिता मदत करीत असतील आणि त्यांच्याकडे शासन म्हणून दुर्लक्ष करीत असाल तर हे जे राष्ट्रदोही आहेत, ते तुम्ही सांभाळणार का ? याचेही तुम्हाला उत्तर द्यावे लागेल. अनेक ठिकाणी बाँबस्फोटातून जे काही वैमनस्य, जी तेढ निर्माण होत आहे, त्याला आम्ही साथ देणार नाही हा



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

देश माझा आहे. एक गोष्ट सांगतो की, यांच्या धार्मिक भावनेने मी काहीतरी या ठिकाणी आता सांगणार आहे. ज्यावेळी या लोकांचे जुलूस किंवा मिरवणूक निघते, त्यावेळी ते घोषणा करतात. "न रहे तसदी, अल्ला हो अकबर ! मतलब क्या है!" सन्माननीय सदस्य गुजराथी साहेब याचा अर्थ असा होतो की, जगामध्ये अल्लाशिवाय इतर कोणालाही देव मानू नका, फक्त अल्लालाच देव माना.

( गोंधळ )

**तालिका सभापती ( श्री.उल्हास पवार )** : सन्माननीय सदस्यांनी खाली बसावे. या ठिकाणी आता मी सन्माननीय सदस्य श्री.मुझफ्फर हुसेन यांना बोलण्याची संधी दिलेली आहे.

श्री.मुझफ्फर हुसेन : सभापती महोदय, यासंदर्भात माझा हरकतीचा मुद्दा आहे. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी उपरोल्लेखित पंक्तीचा चूकीचा अर्थ सभागृहामध्ये सांगितला.

"न रहे तसदी, अल्ला हो अकबर." या पंक्तीचा अर्थ असा होतो की, अल्ला म्हणजे परमेश्वर, देव जो आहे, तो खूप मोठा आहे आणि ग्रेट आहे.

श्री.दिवाकर रावते : ठीक आहे, सन्माननीय सदस्यांनी मला योग्य अर्थ सांगितला व तो मला समजलेला आहे व बरोबर वाटलेला आहे.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावतेंनी....

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, अस्सल जातीवंताने मला उक्त पंक्तींचा अर्थ सांगितला आणि सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील मला येथे सन्माननीय सदस्य श्री.मुझफ्फर हुसेन असतांना कुराण सांगण्याचा प्रयत्न करीत आहेत. सभापती महोदय, घटनेने दिलेल्या अधिकारामध्ये आतंकवाद्यांना सांभाळणे हा देखील दोष आहे. मला जातांना असे सांगावयाचे आहे की, आमदार निवासामध्ये कोणी आतंकवाद्यांना आसरा दिला असेल तर तोही दोष आहे. आपल्या घरात जर कोणी सिमीच्या कार्यकर्त्यांना म्हणजे आतंकवाद्यांना आसरा देऊन खाऊ पिऊ घालत असेल तर तोही गुन्हाच आहे. त्याचवेळेला या राष्ट्राला जपण्याकरिता तुमची अवस्था काय झाली हे सांगा. "हुरळली मेंढी, लागली लांडग्याच्या पाठी," अशी मराठीमध्ये एक म्हण आहे. परंतु तोच लांडगा त्या हुरळलेल्या मेंढीला नंतर संपवून टाकतो. तुमच्या पध्दतीचा परिणाम असा झालेला आहे, आम्ही सांगितले की, अफझल गुरु हा राष्ट्रदोही आहे. त्याने संसदेवर हल्ला केलेला आहे,

.....3

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

त्याला फाशीची शिक्षा सुनाविण्यात आलेली आहे, परंतु केवळ तुमच्या भावना दुखावतील म्हणून त्याला फाशी दिली जात नाही. त्याचा परिणाम म्हणून त्याने राजीव गांधीला विमान हायजॅक करुन त्या विमानात बॉंबस्फोट घडवून राजीव गांधी यांना संपवून टाकण्यात आले. याचाच अर्थ म्हणजे हुरळली मेंढी, लागली लांडग्याच्या पाठी." आज त्या ठिकाणी राहुल गांधी उभे आहेत, तेथेही तीच परिस्थिती आहे, त्याचा जरा शोध बोध घेण्यात यावा. मुस्लिम समाजाला भारतीय म्हणून भारतीयांप्रमाणे पूर्ण अधिकार प्राप्त झाले पाहिजेत पण तुम्ही हाही विचार करा की, जर तुम्हाला आमच्याप्रमाणे समान नागरिकत्व हवे असेल तर, आमचे मित्र कालपासून हैराण आहेत की, आम्हाला चार क्यों बोलते हो, चार क्यों बोलते हो, तेही सांभाळा जरा या देशामध्ये म्हणजे बर होईल, आम्ही तुम्हाला बरोबर घेऊ, बरं करु. या सभागृहामध्ये मला या विषयावर बोलण्याची संधी दिल्याबद्दल मी आभार मानतो आणि माझे भाषण पूर्ण करतो.

---------

यानंतर श्री.गागरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजन तेली (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित): सभापती महोदय, नियम 260 अन्वये दिलेल्या प्रस्तावावर माझे मत मांडण्यासाठी मी उभा आहे.

मुस्लिमांच्या आर्थिक, सामाजिक परिस्थितीचा सखोल अभ्यास करुन नोव्हेंबर, 2006 मध्ये आपला सच्चर समितीने आपला अहवाल पंतप्रधानांकडे सुर्पूद केला. त्यामध्ये मुस्लिमांची परिस्थिती दलितांपेक्षा वाईट आहे, अशा प्रकारचा उल्ल्ेख केलेला आहे. मी जास्त सांगणार नाही, 1-2 मुद्दे मी उपस्थित करतो. ओ.बी.सी. साठी जसा मंडल आयोग होता, तशा प्रकारे मुस्लिमांसाठी सच्चर रिपोर्ट महत्वाचा आहे. लोकसंख्येच्या बाबतीत जी काही उलटसुलट चर्चा होते व जे काही समज, गैरसमज होतात त्याबाबत सांगतो. 1960 ते 2001 मध्ये लोकसंख्या वाढीचा वेग 2.1 होता. त्यामध्ये हिंदू आणि ख्रिश्चन यांच्या वाढीचा दर 2 टक्के, जैनांचे प्रमाणे 1.8 टक्के होते. शीख आणि बौध्द समाज 2.2 टक्के होता. मुस्लिमांच्या वाढीचा दर 2 टक्के होता. म्हणून 1991 ते 2001 मध्ये लोकसंख्या वाढीचा दर प्रत्येक राज्यात कमी झालेला दिसून येतो. लोकसंख्येच्या वाढीबरोबरच सेक्स रेश्योचा विचार केला पाहिजे. त्यामध्ये हिंदूचे प्रमाण 1000 पुरुष व 914 स्त्रिया असे आहे. अनुसूचित जाती व जमातीचे प्रमाणात 1000 पुरुष व 931 स्त्रिया आहेत. मुस्लिमांचे प्रमाण 1000 पुरुष 986 स्त्रिया आहेत. याबरोबर महत्वाचा मुद्दा आहे की, नवजात शिशुंचे मृत्यूचे प्रमाण मुस्लिमांमध्ये फार कमी आहे. कारण गरीबी असली तरी थोडी चांगली सामाजिक स्थिती असल्याचे म्हणावे लागेल. यामध्ये साक्षरता हा सर्वात महत्वाचा विषय आहे. साक्षरतेचे प्रमाण मुस्लिमांमध्ये फार मोठया प्रमाणावर कमी आहे. ते 59.1 टक्के इतके आहे. पूर्ण भारतातील प्रमाण 65.1 टक्के आहे. महिलांचे साक्षरतेचे प्रमाणही 50 टक्केपेक्षाही फार कमी आहे. शहरातील मुस्लिम समाजातील ज्या महिला भगिनी आहेत त्यांचे प्रमाण फक्त 18 टक्के आहे. उच्च शिक्षणाच्या बाबतीत माननीय सदस्यांनी जे प्रमाण सांगितले आहे, ते खरे आहे. उच्च शिक्षणात फक्त 3.3 टक्के एवढेच प्रमाण आहे. म्हणून खऱ्या अर्थाने शिक्षणावर भर देऊन त्यांची जागृती कशी करता येईल हा या ठिकाणी महत्वाचा मुद्दा आहे. आर्थिक समस्या, रोजगाराच्या बाबतीत जे प्रमाण आहे ते इतर समाजाचे 44 टक्के आहे. मुस्लिम समाजाचे 25 टक्के आहे. मुस्लिम मजूरांची अवस्था फार दयनीय आहे. त्यांचे सरकारी नोकरीचे प्रमाण कमी असून कपडा व्यवसाय, मोटार मॅकेनिक या क्षेत्रात जास्त आहेत. सरकारी नोकरीत

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PNG/ D/ MMP/

श्री.राजन तेली.....

हे प्रमाण 4.5 टक्के आहे. अनुसूचित जमातीचे प्रमाण 9.18 आहे. सिक्युरीटी फोर्समध्ये 4 टक्के आहे. आणि युनिव्हर्सल बँकामध्ये अतिअल्प प्रमाण आहे. कोणत्याही राज्यात मुस्लिम लोकसंख्येच्या प्रमाणात नोकऱ्या नाहीत. महत्वाचे म्हणजे पश्चिम बंगाल मध्ये मुस्लिमांचे प्रमाण 25.4 टक्के आहे. परंतु सरकारी नोकरीचे प्रमाण 2.1 टक्के आहे. याउलट गुजरातमध्ये मुस्लिमांची संख्या 9.1 टक्के असून सरकारी नोकरीत 5.4 टक्के आहे. म्हणून मुसलमानबहुल गावातील शिक्षणाची व आरोग्याची जी परिस्थिती आहे, याचा आपण विचार केला पाहिजे.

यानंतर कु.धनश्री......

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजन तेली .......

सभापती महोदय, त्याठिकाणी दळणवळणाची फार मोठी गैरसोय होत आहे. म्हणून मला असे वाटते की, मंडल आयोगाने दोन मुस्लिम जातीचा समावेश ओबीसीमध्ये केलेला आहे. त्याचा विस्तार आपल्याला याठिकाणी करता येईल काय याबाबत विचार करणे आवश्यक आहे. एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

.............

**तालिका सभापती** : यानंतर सन्माननीय सदस्य श्री. गिरीष गांधी यांनी त्यांचे विचार मांडावेत. त्यांनी या प्रस्तावावर नाव दिलेले आहे. अजून या प्रस्तावावर बोलण्यासाठी एकूण 20 सन्माननीय सदस्यांनी नावे दिलेली आहेत. या प्रस्तावावर ज्या माननीय सदस्यांनी नावे दिलेली आहेत त्यांना बोलण्यासाठी प्रथम प्राधान्य देण्यात येईल.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, आपण आम्हाला बोलण्याची संधी द्यावी. या विषयावर आम्हाला आपण बोलू द्यावे.

**तालिका सभापती** : सर्व सन्माननीय सदस्यांना याविषयावर बोलण्याची संधी मिळणार आहे. परंतु ज्या सन्माननीय सदस्यांनी प्रस्तावावर नावे दिलेली आहेत त्यांना प्राधान्य देण्यात येईल.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, आपण आम्हाला बोलण्याची संधी देत नसाल तर आम्ही येथून जातो. प्रस्ताव सभागृहामध्ये आल्यानंतर, आता तो प्रस्ताव सभागृहाची प्रॉपर्टी झाला आहे. आता त्या प्रस्तावावर सर्व सन्माननीय सदस्य बोलू शकतात.

**तालिका सभापती** : मी आपला बोलण्याचा अधिकार नाकारला नाही. मी असे सांगितले की, याठिकाणी ज्या सन्माननीय सदस्यांना बोलावयाचे आहे, त्या सर्व सन्माननीय सदस्यांना सभागृह कितीही वेळ चालले तरी देखील बोलण्याची संधी देण्यात येईल.

श्री.जगदीश गुप्ता : सभापती महोदय, सभागृहाची अशी प्रथा आहे की, सत्ताधारी पक्षातील एक सदस्याने भाषण केल्यानंतर विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्यांना बोलण्याची परवानगी देण्यात येते. या प्रथेप्रमाणे आता विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्यांना बोलण्याची आपण परवानगी द्यावी.

..2....

**तालिका सभापती** : माझी आपणास अशी विनंती आहे की, सर्व सन्माननीय सदस्यांचे विचार ऐकल्याशिवाय कोणीही जाऊ नये.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, कोठलाही प्रस्ताव सदनामध्ये मांडल्यानंतर ते सदनाची प्रॉपर्टी होते. हा ठराव ज्यांनी मांडला त्यांना प्राधान्य द्यावे असा नियम नाही तसेच ज्यांनी प्रस्तावावर बोलण्यासाठी नाव दिले नाही त्यांना बोलण्याची परवानगी द्यावयाची नाही असाही नियम नाही. तेव्हा आता विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्यांना बोलण्याची आपण परवानगी द्यावी.

**तालिका सभापती** : ज्यांनी प्रस्तावावर नावे दिलेली आहेत त्यांना संधी दिली नाही तर त्यांना बोलण्यापासून वंचित केल्या सारखे होईल. तसेच ज्यांनी नावे दिलेली नाहीत त्यांना देखील बोलण्याची संधी दिली जाईल.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, कोणत्याही सदस्यांना बोलण्यापासून वंचित करावे असे आम्ही म्हणत नाही. परंतु सत्ताधारी पक्षाच्या सदस्यांना प्राधान्य द्यावे असेही आम्ही म्हणत नाही.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, दोन्ही पक्षाच्या सन्माननीय सदस्यांना आपल्याकडून समान न्याय मिळावा.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. गिरीश गांधी यांनी आपली मते मांडावीत.

....3....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गिरीष गांधी ( नामनियुक्त ) : सभापती महोदय, हा जो प्रस्ताव याठिकाणी मांडण्यात आलेला आहे त्याचे समर्थन करण्यासाठी मी येथे उभा आहे. याचर्चेच्या वेळी असे म्हटले गेले की, स्वातंत्र्य मिळाल्यानंतर रोजगाराचे प्रमाण मुस्लिम बांधवांमध्ये 40 टक्के होते व त्यानंतर ते जाणीवपूर्वक कमी करण्यात आले. मला असे सांगावयाचे आहे की, मुस्लिम बांधवांचे रोजगाराचे प्रमाण कमी करण्याचा जाणीवपूर्वक असा कोणताही प्रयत्न करण्यात आलेला नाही. किंबहुना, स्वातंत्र्य मिळाल्यानंतर, या समाजाला कशा प्रकारे प्राधान्य देता येईल या दृष्टीकोनातून सातत्याने विचार करण्यात आला. या देशाचे सन्माननीय राष्ट्रपती डॉ. कलाम हे अतिशय संवेदनशील विभागाचे प्रमुख आहेत. त्यांचे नाव कधीही कुठेही अशा पद्धतीने घेतले गेले नाही. हीगोष्ट आपल्याला नाकारता येणार नाही. समाजाच्या विकासासाठी, सर्वांचा समतोल विकास साधावा याबाबत कोणाचेही दुमत असण्याचे कारण नाही. याठिकाणी जे आरोप करण्यात आलेले आहे, ते योग्य नाहीत एवढेच मला म्हणावयाचे आहे. परंतु दुर्दैव असे आहे की, स्वातंत्र्य मिळाल्यानंतर, आंदोलनामध्ये सर्व जातीच्या सर्व धर्माच्या लोकांचा

यानंतर श्री. सुंबरे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गांधी ....

अतिशय हिरीरीने आणि एकमताने सहभाग घेतलेला होता. पण स्वातंत्र्य मिळाल्यानंतर दुर्दैवाने जात, भाषा आणि धर्म या बाबतीत आपण जास्त भावूक झालो आहोत आणि त्याचे प्रत्यंतर वेळोवेळी आपल्याला दिसून येते. मुस्लिम बांधवांच्या बाबतीत शिक्षणापासून ते जवळपास सर्व क्षेत्रामध्ये जेवढ्याकाही उणीवा राहिल्या असतील तर त्या जाणीवपूर्वक दूर केल्या पाहिजेत हे सच्चर समितीच्या माध्यमातून जास्त जाणवू लागले आहे. हे सर्व करीत असताना डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे ज्या समाजातून आले होते तो समाजावर तर प्रामुख्याने परंपरेने आणि रूढीने अन्यायच होत होता पण त्या समाजाला जागृत करण्याचे काम डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी केले आणि त्या समाजाचे एकमेव नेते म्हणून ते पुढे आले. त्यांनी त्यांच्या समाजाला शिक्षणाचे महत्त्व समजावून दिले, त्यांना संघटित केले आणि अन्यायाविरोधात लढण्याची शक्ती दिली, त्यासाठी सातत्याने प्रयत्न केले आणि असेच प्रयत्न आपला विकास घडवून आणण्यासाठी या समाजाने केला पाहिजे याची जाणीव देखील त्यांनी आपल्या समाजाला करून दिली. त्याप्रमाणे मुस्लिम समाजातील समाजधुरीणांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे. कारण शासनाचे प्रयत्न या समाजाला पुढे आणण्यासाठी म्हणून कितीही राहिले तरी त्या प्रयत्नांना समाजातील प्रत्येक व्यक्तीचे सहकार्य मिळाले नाही तर त्या प्रयत्नांचाही काही उपयोग होत नाही, होणार नाही. आता या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.अरूणभाईंनी यांनी अतिशय चांगल्या पद्धतीने या संदर्भात मुद्दे मांडले आहेत आणि ज्या ज्या क्षेत्रात उणीवा राहिल्या असतील तर त्या दूर करण्यासाठी शासनाने प्रयत्न करावेत आणि शासनाने या बाबतीत निधीची कमतरता पडू देऊ नये. या मुस्लिम समाजातील बांधवांना न्याय देण्यासाठी, त्यांना शिक्षित करण्याच्या दृष्टीने त्यांना शासनाने मदत करावी एवढी अपेक्षा व्यक्त करतो आणि या प्रस्तावाला माझे अनुमोदन देतो.

***



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सय्यद पाशा पटेल (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, नियम 260 अन्वये जो प्रस्ताव या ठिकाणी चर्चेला आलेला आहे त्या संदर्भात माझे विचार, माझी मते व्यक्त करण्यासाठी मी उभा राहिलो आहे. 'आजादी के साठ साल, मुसलमान बेहाल, नोकरींयोंमे 2 टक्के, 55 टक्के हमाल, वाह रे सरकार, तेरा कमाल.'

सभापती महोदय, या ठिकाणी विषय असा आहे की, गेल्या 60 वर्षांमध्ये मुसलमान समाजाची सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक परिस्थिती ही दिवसेंदिवस ढासळत गेलेली आहे. 9 मार्च 2005 मध्ये या संदर्भात देशाच्या पंतप्रधानांच्या मनात विचार आला की, खरोखरी मुसलमानांची अवस्था वाईट झाली आहे आणि म्हणून त्यांनी निवृत्त न्यायमूर्ती श्री.सच्चर नियुक्त एक समिती नेमली. 2006 मध्ये या समितीचा अहवाल सरकारला सादर झाला. या अहवालात काय होते ? माझ्या दृष्टीने हा अहवाल म्हणजे मुसलमान समाजाचा गेल्या 60 वर्षांचा एक्सरे रिपोर्ट आहे. एखाद्याला खोकला, पडसे झाले की, डॉक्टर ज्याप्रमाणे त्याला चार गोळ्या देतो, पैकी दोन गोळ्या सकाळी जेवणानंतर आणि दोन गोळ्या रात्रीच्या जेवणानंतर घ्यायला सांगतो. त्याप्रमाणे काही उपाय यात दिले आहेत. परंतु या समितीने 400 पानांचा अहवाल दिला म्हणजे गेल्या 60 वर्षामध्ये या समाजावर केवळ अन्यायच झालेला आहे हेच सिद्ध होते. बऱ्याच सन्माननीय सदस्यांनी या संदर्भात येथे चर्चा केली. सन्माननीय सदस्या श्रीमती फौजिया खान यांनी हा विषय या प्रस्तावाच्या माध्यमातून येथे आणला. त्यांनी सांगितले की, एक वर्ष झाले पण यावर काही चर्चाच होत नाही. खरे तर आपण याकडे पहायचे कसे हा विचार करण्याचा विषय आहे. या संदर्भात न्यायमूर्ती सच्चर यांनी अहवालात जे विचार व्यक्त केले आहेत ते असे आहेत. ...

" पहले भी कई समितियों और परिषदों ने मुस्लिम समाज की उन्नति के लिए सिफारिशें की थी लेकिन किसी भी नये कदम के लिए उदासीन थे. बहुत से लोग परिणाम चाहते थे. "

( यानंतर श्री. सरफरे ....4इ 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पाशा पटेल...

सभापती महोदय, यापूर्वी असे खूप अहवाल आले. त्या अहवालाची आतापर्यंत कधीही दखल घेतली गेली नाही. एका वर्षामध्ये या अहवालाची दखल कशी घेतली गेली नाही? महाराष्ट्रातील हा मुस्लिम समाज गेली 60 वर्षे या सरकारच्या सोबत आहे, आम्ही हे सरकार तयार केले, त्यांच्याबरोबर राहिलो. आणि हा अहवाल वाचल्यानंतर आमचे डोळे उघडले. आम्ही सरकारबरोबर राहून सुध्दा आमच्यावर अन्याय कसा झाला? यामध्ये एक गोष्ट स्पष्टपणे सांगितली आहे की, यामध्ये मुस्लिम समाजाची जी संख्या आहे त्या प्रमाणात राजकारणात आमदार, खासदार निवडून आले नाहीत. सच्चर समितीने सांगितले आहे की, गेल्या 60 वर्षात आपल्या संख्येच्या प्रमाणात आपले प्रतिनिधी निवडून आले नाहीत. याचे कारण असे की, आपले लोकप्रतिनिधी निवडून येण्याची ज्या ज्याठिकाणी शक्यता होती ते मतदारसंघ सरकारने राखीव करुन टाकले. कुणावर विश्वास ठेवायचा? गेली 60 वर्षे ज्यांना आम्ही मते दिली, त्यांच्याबरोबर राहून आम्ही त्यांना साथ दिली. त्यांनी आम्हाला कसे वागविले ? हा अहवाल वाचल्यानंतर आमचे डोळे उघडले. तुमचे लोकप्रतिनिधी निवडून येऊ नये यासाठी भारत सरकारने संपूर्ण बंदोबस्त केला. नगरपालिका, महानगरपालिकेमध्ये मुस्लिम समाजाच्या संख्येच्या प्रमाणात लोकप्रतिनिधी निवडून कां येत नाहीत? सच्चर समितीच्या अहवालात सांगितले गेले आहे की, मुस्लिमांनी निवडून येऊ नये यासाठी एका मुस्लिम वस्तीच्या दोन मुस्लिम वस्त्या केल्या. म्हणजेच लोकसंख्येची विभागणी केल्यानंतर तुम्ही निवडून येऊ शकत नाही. एवढे करुन ते थांबले नाही तर मतदार यादीमधील मुस्लिमांची नावे बेपत्ता केली. अशाप्रकारचा भारत सरकारचा शिक्का मारलेला हा रिपोर्ट आहे. हा रिपोर्ट माझा नाही, माझ्या पक्षाचा नाही किंवा माझ्या मित्रपक्षाचा नाही. भारताचे पंतप्रधान माननीय डॉ. मनमोहनसिंह यांनी नेमलेल्या एका जबाबदार न्यायमूर्ती श्री. राजेंद्र सच्चर साहेबांनी दिलेला हा अहवाल आहे. या अहवालामध्ये स्पष्टपणे सांगण्यात आले आहे की, गेली 60 वर्षे मुस्लिम समाजाबरोबर अशाप्रकारचा खेळ खेळला गेला आहे? हे कशासाठी केले गेले आहे याची मला माहिती नाही.

सभापती महोदय, मुस्लिम समाजाच्या बाबतीत राजकारणातील सहभागाविषयी हे विदारक सत्य याठिकाणी सांगण्यात आले आहे. दुसरे सत्य मुस्लिम समाजातील नोकरीच्या प्रमाणाविषयी सांगण्यात आले आहे. मुस्लिम समाजाच्या लोकसंख्येच्या प्रमाणात त्यांना नोकऱ्या किती दिल्या

...2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पाशा पटेल...

गेल्या? त्याबाबतीत अनेक माननीय सदस्यांनी उल्लेख केला असल्यामुळे मी त्याची पुनरुक्ती करणार नाही. अनेक माननीय सदस्यांनी नोकऱ्यांमध्ये दीड ते दोन टक्का प्रमाण असल्याचे सांगितले आहे. यापैकी आय.ए.एस. झालेले, आय.पी.एस. झालेले किंवा पोलीस खात्यामध्ये असलेले, देशाच्या सुरक्षा व्यवस्थेमध्ये असलेले किती आहेत हे सांगितले गेले. यामध्ये सर्वात चिंतेची बाब अशी की, न्याय व्यवस्थेमध्ये देखील मुस्लिम समाजाचे प्रमाण किती राहिले आहे? न्यायमूर्ती श्री. राजेंद्र सच्चर यांनी सांगितले की न्याय व्यवस्था में मुसलमानों की शिरकत नहीं के बराबर है. न्याय व्यवस्थेत नाही, आय.ए.एस. नाही, आय.पी.एस. नाही, सुरक्षा व्यवस्थेत नाही. तर मग आहेत कुठे? आपणास आनंद वाटेल की, फक्त एकाच ठिकाणी त्यांची संख्या जास्त आहे. 35 टक्के समाज हा जेलमध्ये आहे. या समाजाला कुठेही न्याय मिळाला नाही. गेल्या 60 वर्षामध्ये एकाच क्षेत्रामध्ये या समाजाने प्रचंड प्रगती केली आहे. 35 टक्के लोक जेलमध्ये आहेत. ही गोष्ट आपण समजून घ्यावी. मुस्लिम समाजाला पाक, स्वच्छ समजले जाते तर मग त्यांना नापाक कसे केले गेले? डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधान परिषदेच्या शेवटच्या भाषणात सांगितले आहे की, राजकीय क्षेत्रातील लोकशाही सामाजिक, आर्थिक क्षेत्रामध्ये विस्तारत गेली त्याचे चटके ज्या लोकांना बसले ते चटके त्या समाजाला बसल्याशिवाय रहाणार नाही.

श्री. जैनुद्दीन जव्हेरी : सभापति महोदय, अभी सम्माननीय सदस्य ने कहा कि मुस्लिम समाज के 35 प्रतिशत लोग जेल में है. इस वाक्य पर मुझे एतराज है. यह अथेंटिक आंकड़ा नहीं है. ऐसा कहने से मुस्लिम समाज बदनाम हो जाएगा. सम्माननीय सदस्य असत्य बोल रहे हैं.

(गोंधळ)

**तालिका सभापती (श्री. उल्हास पवार)** : माननीय सदस्यांचे भाषण तपासून पाहिले जाईल..

(गोंधळ)

(यानंतर श्री. बरवड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पाशा पटेल : श्री. जव्हेरी साहेब, आपण मला माफ करावे. सभापती महोदय, मी हे सर्व पुस्तक वाचीन आणि मग जर कोणाला झोंबले तर मला माफ करावे. मी थोडक्यात बोलण्याचा प्रयत्न करीत आहे.

( अनेक सदस्य एकदम बोलण्याचा प्रयत्न करतात )

**तालिका सभापती** (श्री. उल्हास पवार) : ते तपासून पाहिले जाईल. सन्माननीय सदस्यांनी कृपया खाली बसावे. सन्माननीय सदस्य श्री. पाशा पटेल यांनी आपले भाषण पुढे सुरु करावे.

श्री. पाशा पटेल : मी सन्माननीय सदस्य श्री. जव्हेरी यांना सांगू इच्छितो की, आपण कायम अशा पध्दतीने चर्चेला वळण देणे बरोबर नाही.

श्री. जैनुद्दीन जव्हेरी : आप जो कह रहे हैं वह बात सच्चर कमेटी ने अपनी रिपोर्ट में नहीं लिखी है. अगर लिखी है तो हमें दिखाओ. आप मुस्लिम समाज को बदनाम कर रहे हैं. आप मुस्लिम समाज को बदनाम न कीजिए.

**तालिका सभापति** :अगर सम्माननीय सदस्य श्री पाशा जी ने कोई अनुचित बात कही होगी तो वह कार्यवाही से निकाल दी जाएगी.

श्री. पाशा पटेल : आपण सच्चर अहवाल बघितला आहे काय ?

**(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)**

**उपसभापती** : सन्माननीय सदस्यांनी खाली बसावे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. पाशा पटेल आपले मत मांडत आहेत. या विधान परिषदेमध्ये त्यांचे मत खोडून काढण्याचा सन्माननीय सदस्यांना अधिकार आहे. त्यांनी एखादे मत व्यक्त केले असेल तर हरकतीच्या मुद्याव्दारे आपण विचारु शकतो. सन्माननीय सदस्य जे सांगत आहेत ते मला पटत नाही, ते चुकीचे आहे असे आपण सांगू शकतो. सन्माननीय सदस्य म्हणतात की, 35 टक्के आहे, माझे म्हणणे आहे की 17 टक्के आहे असे सन्माननीय सदस्य सांगू शकतात. सन्माननीय सदस्यांनी 35 टक्के सांगितले. त्याबाबतीत त्यांना दुजोरा द्यावा लागेल. ते पटले नाही तर ते कामकाजातून काढून टाकू शकतो. पंरतु सभापतीनी सांगून टाकले की, ते कामकाजातून काढण्यात येईल. एखाद्या सन्माननीय सदस्याचे मत अयोग्य असेल तर सन्माननीय सदस्य दावा करतील किंवा

..2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

पॉइन्ट ऑफ इन्फॉर्मेशनच्या माध्यमातून विचारतील. सन्माननीय सदस्य त्याबाबत दुजोरा देतील. या सभागृहाची जी प्रोसीजर आहे त्याप्रमाणे कामकाज होऊ द्यावे. ते कामकाजातून काढून टाकण्याचा प्रश्न येत नाही.

**उपसभापती** : एखाद्या विषयावर सभागृहामध्ये गांभीर्यपूर्वक चर्चा चालू असेल आणि आक्षेपार्ह काही घडत असेल तर ते मांडण्याची सुध्दा काही पध्दत आहे. माझी सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, एखादा सदस्य बोलत असताना मध्ये अडथळा आणू नये. सन्माननीय सदस्य काही आक्षेपार्ह बोलले तर आम्ही या ठिकाणी बसलेलो आहोत. आपण ती बाब आमच्या निदर्शनास आणून द्यावी. आपण आपसात भांडतो तसे बोलू नये.

श्री. मुझफ्फर हुसेन : सन्माननीय सदस्य श्री. पाशा पटेल यांनी 35 टक्के मुस्लीम जेलमध्ये आहेत असा उल्लेख केला. तसे सच्चर समितीच्या रिपोर्टमध्ये आहे असा त्यांनी उल्लेख केला. जर तसा उल्लेख असेल तर त्यांनी सच्चर समितीच्या अहवालातील ते पान वाचून दाखवून सभागृहाला माहिती द्यावी. अन्यथा 35 टक्के असा जो आकडा त्यांनी सांगितलेला आहे तो कामकाजातून काढून टाकावा.

श्री. अनिस अहमद :सम्माननीय सदस्य श्री पाशा जी ने कही हुई बात सच्चर कमेटी की रिपोर्ट में होगी तो हम उसे मान्य कर सकते हैं. लेकिन वह बात सच्चर कमेटी की रिपोर्ट में नहीं है इसलिए सम्माननीय सदस्य श्री पाशा जी ने जो यह कहा है कि 35 प्रतिशत मुस्लिम जेल में है, यह वाक्य कार्यवाही से निकाल दिया जाए.

( अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलण्याचा प्रयत्न करतात )

श्री. पाशा पटेल : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य जसे जबाबदार आहेत तेवढाच मी सुध्दा जबाबदार आहे.

श्री. मुजफ्फर हुसेन : माझा हरकतीचा मुद्दा आहे. भारतीय जनता पक्षाचे सन्माननीय सदस्य सच्चर समितीबाबत एवढे गंभीर आहेत आणि मुद्दे मांडत आहेत त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो.

श्री. विनोद तावडे : यामध्ये हरकतीचा मुद्दा काय होता ?

...3



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पाशा पटेल : सभापती महोदय, त्या बाजूच्या दोघा सन्माननीय सदस्यांना परमेश्वर माफ करणार नाही.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्यांनी आपले भाषण पुढे सुरु करावे.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, आता 6.00 वाजलेले आहेत. आज सकाळी 10.30 वाजता सभागृहाचे कामकाज सुरु झालेले आहे. आठ तासापासून सभागृहाचे कामकाज चालू आहे. सुदैवाने दोन मियाँभाई एकमेकांच्या विरोधात उभे आहेत. कामकाज थांबविण्याची ही योग्य वेळ आहे. ही चर्चा नंतर ठेवावी. आता नमाजची सुध्दा वेळ होईल. ही चर्चा या ठिकाणी थांबवून नंतर चर्चा ठेवावी अशी माझी आपल्याला विनंती आहे.

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : मघाशी ही चर्चा संपेपर्यन्त सभागृहाची वेळ वाढविण्यात आलेली आहे. त्यामुळे चर्चा चालूच राहील.

श्री. पाशा पटेल : सभापती महोदय, गेल्या तीन दिवसापासून हा माणूस चर्चेला डायव्हर्शन देण्याचे काम करीत आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी या साडेसातीचा कशाला पाठिंबा घेतला. शेतक-यांचा प्रस्ताव आलेला असताना सच्चरचा प्रस्ताव पुढे आणून चर्चेला वेगळे वळण देण्याचा प्रयत्न झाला.

(दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

श्री. पाशा पटेल : सभापती महोदय, मी अभ्यास करुन गंभीरपणे या विषयावर बोलत आहे. त्यामुळे चर्चेला कृपा करुन वेगळे वळण देऊ नका. माझे चुकत असेल तर मला बाहेर गोळया घाला. परंतु चर्चेच्या वेळी कुणी लहान मुलासारखे वागू नये अशी माझी विनंती आहे. ज्यावेळी मी आमदार म्हणून शपथ घेतली त्यावेळे पासून या सदनाची गरिमा मला माहीत आहे. तेव्हा सर्वांनी त्या दृष्टीकोनातून विचार करावा. विषय असा आहे की, या मुस्लिम समाजाच्या प्रश्नाच्या सर्वच अंगांना स्पर्श करण्याची गरज आहे. सन्माननीय सदस्य डॉ. एन.पी.हिराणी यांनी अत्यंत सुंदरपणे विवेचन केले. त्यांनी सांगितले की, हा समाज उपेक्षित राहिला, बाजूला फेकला गेला. त्यांचा आर्थिक विकास झाला पाहिजे, त्यांना कर्ज दिले जात नाही, त्यांच्या गल्ल्यांची अवस्था फार वाईट आहे, दारिद्र्या त्यांच्या पाचवीलाच पुजलेले आहे, द्रारिद्र्य पहावयाचे असेल तर ते मुस्लिम वस्तीमध्ये, या सगळया गोष्टी त्यांनी चांगल्या पध्दतीने सांगितल्या. मग हा समाज गेल्या 60 वर्षापासून असाच राहिलेला आहे हे शासनाच्या लक्षात कसे आले नाही ? या शहरामध्ये सगळयात घाण वस्ती कोणती असेल तर ती मुस्लिम समाजाची वस्ती. आता मुस्लिमांच्या मतांवरच तुमचा नगरपालिकेचा माणूस निवडून येतो. तुमचा माणूस निवडून दिला. धाण देखील तुमचीच झाली.

....नंतर श्री.भोगले...

.....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ MAP/ D/ 18:05

श्री.पाशा पटेल..........

ही गोष्ट का सुचली नाही हो? मी न्या.राजेंद्र सच्चर यांचे आभार मानणार आहे. एक हिंदू माणूस मुस्लिम समाजाच्या प्रश्नाच्या संदर्भात इतका संवेदनशील असू शकतो हे पाहून मला पहिल्यांदा आनंद वाटला. एक महत्वाची गोष्ट अशी की या सगळ्या परिस्थितीचा आपण विचार केला तर मुस्लिम समाजाच्या शैक्षणिक संस्था आणि मुस्लिमांच्या शिक्षणाच्या संदर्भात ज्या गोष्टी पुढे आलेल्या आहेत त्या लक्षात घेतल्या तर जवळपास 6 ते 14 वयोगटापर्यंत 25 टक्के मुस्लिम समाजाची मुले शाळेत जातच नाहीत किंवा शाळा सोडून जातात. म्हणजे मुस्लिम समाजाची मुले शाळेचे तोंड बघत नाहीत किंवा बघितले तर मध्येच पळून जातात. कारण एकच आहे, दलित समाजाची मुले शिकत असताना त्यांना शिष्यवृत्ती मिळते. मी माझ्या गावातील 100 मुले बघितली आहेत. डॉ.बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठात मुलगा शिकायला गेला, शिकून तयार झाल्यानंतर नोकरी नाही मिळाली की कर पुढचा कोर्स, पुढचा कोर्स, पुढचा कोर्स. जेवढे जमेल तेवढे शिकतो. का? तर शिष्यवृत्ती मिळत असते. जमले तर नोकरीही मिळते. मुस्लिम समाजाच्या मुलांची परिस्थिती बघितली तर कितीही शिकला तरी त्याला माहिती असते नोकरी काही आपल्याला मिळणार नाही. मग शिक्षणापेक्षा हातात पाना धरुन गाडी रिपेअर करायला लागतात. पानपट्टीचे दुकान चालवा. गाडी रिपेअर करा. ते या धंद्याकडे का वळतात? कारण त्यांना आपले भविष्य दिसत नाही. मी स्वत: बी.ए.च्या दुसऱ्या वर्षापर्यंत शिकत असताना दरवर्षी दोन एकर जमीन विकून शिकायचो. पुढे लक्षात आले की, असेच करीत राहिलो तर नोकरी काही मिळणार नाही. परंतु बापाची आहे ती सर्व जमीन विकली जाईल, त्यापेक्षा जमीन नांगरली पाहिजे म्हणून शिक्षण सोडले. ज्यावेळी विश्वासार्हता असते त्यावेळी माणूस सर्वस्वपणाला लावतो. या ठिकाणी विश्वास मिळाला नाही म्हणून माणूस परत गेला. का परत गेला? त्यांना न्याय मिळाला नाही. मुस्लिमांचे प्रतिनिधीत्व त्यांच्या तुलनेने लक्षात येते. आरक्षणाबाबत सगळ्यात महत्वाची गोष्ट म्हणजे न्या.राजेंद्र सच्चर यांनी सांगितलेली गोष्ट सगळ्यांना आनंद देणारी आहे. त्यांनी ज्या काही मागण्या मागितल्या त्या घटनेच्या अंतर्गत मागितल्या आहेत. घटनेच्या आधीन राहून मागितल्या आहेत. धर्माच्या नावाने आरक्षणाचा कुठेही उल्लेख केलेला नाही. न्या.सच्चर यांनी सांगितले की, पुढील पिढी यापेक्षा बेकारीपणा, मागास होऊ लागली आहे. गरीब आणि सामान्य जनतेमध्ये बेरोजगारीचे प्रमाण वाढत आहे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. न्या.सच्चर यांनी घटनेमध्ये बसवून या सगळ्या सवलती मागितल्या अशा प्रकारे सन्माननीय सदस्यांनी उल्लेख केला आहे. मुस्लिम समाजाला काय मिळावे, तो मागासलेला का आहे, काय उपलब्ध आहे हे सच्चर समितीच्या अहवालात नमूद केले आहे. सच्चर समितीने घटनेत राहूनच मागण्या मांडल्या असल्यातरी या अहवालात मुस्लिमांना सर्वांबरोबर न्यावयाचे असेल तर समान नागरिकत्व कायदा अवलंबिला पाहिजे हे घटनेतील कलम बंधनकारक आहे असे का म्हटले नाही. समाजात त्यांची दुरावस्था का झाली आहे हे सांगितले आहे.

श्री.पाशा पटेल : सभापती महोदय, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक प्रश्नांच्या संदर्भात माझ्या जे वाचनात आले ते मी सांगितले आहे. एक गोष्ट अशी आहे की, न्या.राजेंद्र सच्चर यांनी आपल्या अहवालात सांगितले आहे की, शासकीय आणि खाजगी क्षेत्रात मुस्लिम समाजाचे प्रमाण कमी आहे. म्हणजे त्यांनी सांगितले की, सरकारी नोकऱ्या या समाजाला मिळाल्याच नाहीत. पण खाजगी कंपन्यांमध्ये ज्याठिकाणी पगार जास्त आणि काम कमी, जिथे हमी आहे, इन्शूरन्स आहे अशा ठिकाणी मुस्लिमांना त्यांच्या संख्येच्या प्रमाणात नोकऱ्या मिळत नाहीत.

(नंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पाशा पटेल ....

जेथे सुरक्षितता नाही, जेथे काम जास्त आणि पगार कमी अशा ठिकाणी मुस्लिमांना नोक-यांची संधी उपलब्ध झालेली आहे. सीडीपी मध्ये मुस्लिमांना किती मदत मिळाली आहे त्याची माहिती मी थोडक्यात देणार आहे. डॉ. एन.पी. हिराणी साहेबांनी मुस्लीम समाजाच्या संदर्भात फार चांगले विचार या ठिकाणी मांडलेले आहेत. मुस्लीम भागामध्ये बँका आल्या परंतु या बँका मुस्लीमांशी कसा व्यवहार करता तर त्या मुस्लिमांशी "अछुतो सरीका व्यवहार करती है" असे म्हटले तर वावगे होणार नाही. 60 वर्षे झाली तरी सुध्दा मुस्लीम समाजाची आर्थिक परिस्थिती सुधारलेली नाही. मुस्लीम समाजाची आर्थिक परिस्थिती अशी का आहे याचा कोणी तरी विचार करावयास पाहिजे होता. परंतु तसा विचार कधी झाला नाही. आपण ज्या समाजात जन्माला आलेलो आहे त्या समाजाचे आपण काही तरी ऋण फेडावे म्हणून मी प्रयत्न केलेला आहे. माननीय सभापती महोदय, मी आपल्या माध्यमातून या सदनाला सांगू इच्छितो की, मी जे वाचले त्यातून समाजाला शहाणे करण्याचा मी प्रयत्न केलेला आहे. महाराष्ट्रातील जे प्रमुख पक्ष आहेत त्या पक्षाच्या प्रमुखांकडे माझ्या या समाजातील खालच्या थरात काम करणा-या वर्गातील 60 लोकांना घेऊन त्यांची भेट घेण्यासाठी आणि म्हणणे मांडण्यासाठी गेलो होतो. मी सुरुवातीला माननीय मुख्यमंत्र्यांकडे गेलो होतो. परंतु दुर्दैवाने त्यांच्याशी भेट होऊ शकली नाही, माननीय उपमुख्यमंत्री श्री. आर.आर.पाटील, उध्दव ठाकरे ,गोपीनाथ मुंडे, नितीन गडकरी यांच्याकडे या लोकांना घेऊन गेलो होतो. खरे म्हणजे संख्येच्या तुलनेने विचार केला असता तर 40-50 हजार लोकांना मी बरोबर घेऊन जावयास पाहिजे होते. या गरीब समाजातील खालच्या वर्गातील लोकांचे म्हणणे ऐकून घ्यावयास पाहिजे होते. मी बीजेपी मध्ये आहे म्हणून मुस्लीमांवर अन्याय होऊ नये, खरे म्हणजे भारतीय जनता पक्ष आणि शिवसेनेबरोबर कोण नव्हते ? जे नारायण राणे आतापर्यंत शिवसेनेत होते ते एक दिवसात कॉंग्रेसमध्ये गेले तर ते लगेच सेक्युलर झाले, छगन भुजबळ शिवसेनेत होते त्यांनी शिवसेना सोडल्याबरोबर ते सुध्दा सेक्युलर झाले. एवढेच नव्हेतर माननीय मुख्यमंत्री महोदयांनी सुध्दा एकदा शिवसेनेचा आधार घेतला होता. सभापती महोदय, मला फक्त एकच सांगायचे आहे की, "ज्याचे जळते,त्यालाच कळते". सच्चर रिपोर्टमध्ये मुस्लीमांच्या मुलांना शिक्षण घेता यावे यासाठी होस्टेल नसल्याचा उल्लेख केलेला आहे. सभापती महोदय, मी आपल्याला सांगू इच्छितो की, मी



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पाशा पटेल ....

पाचवीला असतांना लातूर येथे शिकण्यासाठी गेलो होतो, दोन महिने वण-वण फिरलो परंतु मला खोली काही मिळाली नाही. दोन महिन्यानंतर मला बाथरुम एवढी एक खोली मिळाली परंतु एकदा मी अंघोळ करीत असतांना अंघोळीच्या पाण्याचा एक थेंब उडाला म्हणून मला ती खोली खाली करावी लागली, अशी मुस्लीम समाजाची परिस्थिती आहे. सच्चर रिपोर्टमध्ये मुस्लीम तरुण शिक्षणामध्ये मागे आहेत असा निष्कर्ष काढलेला आहे. मी जे वाचलेले आहे, मी जे सहन केलेले आहे ते माझ्या समाजापर्यंत जावे यासाठी मी प्रयत्न केलेला आहे. मौलाना अब्दल कलाम विकास महामंडळाची महाराष्ट्रात स्थापना झाली तेव्हा सुरुवातीला या महामंडळाला 50 कोटी, 500 कोटी रुपये मिळाले होत व यासंदर्भात रक्कमेची घोषणा देखील करण्यात आली होती. परंतु सभापती महोदय, मौलाना अब्दल कलाम विकास महामंडळाकडून मुस्लीम समाजाला काय मिळाले? 25 टक्के कर्ज मंजूर केले व प्रत्यक्षात 16 टक्केच कर्ज उपलब्ध झाले.

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पाशा पटेल............

प्रत्यक्षात कारवाई पूर्ण करुन कर्ज घेणाऱ्यांची संख्या 14 टक्के, त्यापैकी 1 लाख रुपयांपेक्षा जास्त कर्ज घेणाऱ्यांची संख्या 3 टक्के, पैकी 50 हजार ते 1 लाख रुपयांपर्यंत कर्ज घेणाऱ्यांची संख्या 5 टक्के, पैकी 50 हजार रुपयांपेक्षा कमी कर्ज घेणाऱ्यांची संख्या 6 टक्के. या वर्गास म्हणावा तसा कर्ज पुरवठा झाला नाही.

सभापती महोदय, महत्वाची बाब अशी की, या समाजाच्या उन्नतीसाठी मौलाना आझाद शिक्षण फाऊन्डेशन स्थापन करण्यात आले. यासाठी एक हजार कोटी रुपयांची मागणी करण्यात आली. परंतु फक्त 27 कोटी रुपये देण्यात आले. गेल्या 60 वर्षात सर्वच स्तरावर या समाजावर अन्याय झालेला आहे. कर्ज उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भात, शिक्षण क्षेत्राच्या संदर्भात, नोकऱ्यांच्या संदर्भात अन्याय झालेला आहे.

सभापती महोदय, 1443 गांवामध्ये रस्ते नाहीत आणि या सर्व गावांमध्ये मुस्लिमांची संख्या मोठ्या प्रमाणावर आहे. कित्येक गावांमध्ये शिक्षण संस्था नाहीत त्याचे कारण म्हणजे त्याठिकाणी मुस्लिमांची संख्या मोठ्या प्रमाणावर आहे असे भारत सरकारच्या रिपोर्टमध्ये म्हटलेले आहे. मी माझ्या या मनाचे सांगत नाही. मला आपल्या माध्यमातून सरकारला विनंती करावयाची आहे की, आपण हा रिपोर्ट वाचला तर आपण एक गोष्ट करणे गरजेचे आहे ती म्हणजे आता तरी मुस्लिम समाजाकडे लक्ष देणे गरजेचे आहे. आमच्या मराठवाड्यात दोन म्हणी आहेत. पहिली म्हण " रिकामं डोक भूताचं घरं आणि दुसरी म्हण " मरता क्या न करता ", " तंगा मन जंगा मन". मनात तंग असेल तर तो जंग करतो. माझ्या गावातील एका मुस्लिम तरुणाचं उदाहरण सांगतो. तो 500 रुपये घेऊन मुंबईला आला. नोकरी शोधली ती मिळाली नाही, रिक्षा-टांगा चालविण्याचा प्रयत्न केला पण त्यामध्येही त्याला अपयश आले. नोकरीधंदा मिळण्याचे सर्व उपाय शोधले पण त्यास काहीही मिळाले नाही. तसेच स्वत: जवळील 400 रुपयेही खर्च झाले. मग त्याने शक्कल लढविली. त्याने 100 रुपयांतील काही रक्कम खर्च करून एक चाकू विकत घेतला आणि रात्रीच्या शेवटच्या ट्रेनने जाणाऱ्या एका व्यक्तीच्या पोटावर धरून त्याचेकडे पैशाची मागणी केली.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पाशा पटेल.............

अशाप्रकारे तो गुन्हेगारी जगताकडे ओढला गेला. सभापती महोदय, 100 पैकी 11 लोक जर भुके असतील तर ते बाकीच्या लोकांना शांतपणे झोपू देतील का ? तो बैल सोडून देईल, कृषि पंप विहिरीत ढकलून देईल, अशाप्रकारचे तो उपदव्याप करतो. पुढील काही वर्षात भारत महासत्ता होणार आहे. पण आपले शरीर सुदृढ असेल तर त्याचा फायदा होणार आहे. एकाचा हात नसेल, बोटं नसतील तर त्याचा काही फायदा होणार नाही. सभापती महोदय, मी चंद्रपूर जिल्ह्यात गेलो होतो. त्याठिकाणी नांदे गाव आहे. त्यांचे असे म्हणणे आहे की, " हम बहुत पिछडे हैं लेकिन हमको 'मुसलमान' का प्रमाणपत्र नही मिलता. हम डमरु बजानेवाले है. रीछ और बंदर का खेल दिखाते है. पण त्यांना गारुडीचे प्रमाणपत्र मिळत नाही.

यानंतर श्री.पुरी...........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी : तालिका सभापती श्रीमती उषा दराडे)**

श्री.पाशा पटेल...

आपल्याला सगळया समाजाकडे समानन्यायाने पहावे लागणार आहे. ज्याप्रमाणे हिंदु धर्मातील ओबीसी लोकांना आरक्षण मिळते, त्याप्रमाणे मुस्लीम समाजातील मागासवर्गीय लोकांनाही मिळाले पाहिजे. दोन्ही जातीच्या नावांमध्ये थोडाथोडासा फरक आहे. त्यांचे गाव तेच असते, व्यवसाय तोच असतो, परंतु मुस्लीम समाजाला त्यांच्याप्रमाणे न्याय मिळत नाही. एका गावातील एकच व्यवसाय करणाऱ्या लोकांना आपण एक न्याय देत आहात व दुसऱ्यास एक देत आहात, हे योग्य नाही. त्यामुळे यामध्ये त्यांनाही संधी दिली पाहिजे.

सच्चर समितीच्या अहवालामध्ये वर्क्फ बोर्डाच्या जमिनीसंदर्भात सांगितलेले आहे की, यावर मुस्लीम समाजातील "नामवर" लोकांना नेमावे. आज त्यांच्या 4 लाख 9 हजार रजिस्टर्ड संस्था आहेत. यामध्ये सगळयात महत्वाची गोष्ट अशी आहे की, ज्या वर्क्फ बोर्डाच्या जमिनी दान केल्या जातात, त्या अल्लाहाच्या नावावर केल्या जातात. परंतु आज बीड जिल्हयात दान केलेल्या जमिनीवर सिलिंग लावलेली आहे. या जमिनीचे ट्रस्टी हे सरकार असून सरकारने या जमिनी ताब्यात घेतलेल्या आहेत. सच्चर समितीने काही सूचनाही केलेल्या असून त्यातील एक सूचना अशी आहे की, समान अवसर आयोग नेमा, डाटा बँक नेमा, हॉस्टेलच्या सुविधा करा, शिक्षणामध्ये मुस्लिमांना संधी द्या. अशा अनेक सूचना केलेल्या आहेत. माननीय मुख्यमंत्री साहेब, या सूचना वाचत आहेत. त्यामुळे त्यांच्यासमोर हया सर्व गोष्टी आहेत. परंतु एक गोष्ट खरी आहे की, गेल्या 60 वर्षांमध्ये आपण मुस्लीम समाजाला जवळ केलेले नाही. गेल्या 60 वर्षापासून ते आपल्यावर विश्वास ठेऊन आहेत. गेल्या 60 वर्षांपासून त्यांच्यावर अन्याय होत चालला असून आपण त्यांना कधी न्याय देणार आहात ? ...(अडथळा) त्यांनी जे लिहिले आहे, तेच आम्ही आपणांला सांगत आहोत की, यामध्ये असे असे लिहिले आहे... असे असे लिहिलेले आहे....असे असे लिहिले...(अडथळा) आपण जे लिहिलेले आहे, ते आपणही कबूल केलेले आहे. याठिकाणी माझी एकच विनंती आहे की, राज्य सरकारने या सूचनांचा गंभीरपणे विचार करावा. तसेच आम्ही जे शिष्ट मंडळ माननीय मुख्यमंत्र्याकडे घेऊन गेलो होतो, त्यास त्यांनी भेट द्यावयास पाहिजे होती.

..2....



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पाशा पटेल.....

मुस्लीम समाजातील लोकांच्या मनात आज अशी चर्चा आहे की, गेल्या 60 वर्षात पहिल्यांदा आम्ही आर्थिक प्रश्नांसाठी माननीय मुख्यमंत्री महोदयांकडे गेलो असतानाही ते साधी भेटही आम्हाला देऊ शकले नाहीत किंवा आमचे समाधान करु शकले नाहीत. सभेच्यावेळी जवळपास 250 धर्मगुरु हजर होते. सभा संपल्यानंतर राष्ट्रगीत झाले व भारतमातेच्या घोषणाही झाल्या. सभापती महोदया, आम्ही 15 ऑगस्टच्या दिवशी आंदोलन सुरु केले. त्या दिवसांपासून आम्ही जेवढया सभा घेतल्या, त्यातील प्रत्येक सभेत आम्ही राष्ट्रगीत घेतल्याशिवाय आमची सभा संपवलेली नाही. या आंदोलनाची सुरुवातच मुळात आम्ही 15 ऑगस्टच्या दिवशी केलेली आहे. हा समाज आपल्या सर्वांच्या बरोबर असून त्यांनाही आपण बरोबर घेतले पाहिजे. आपण त्यांच्यावर विश्वास ठेऊन त्यांना बरोबरीने घेण्याची आवश्यकता आहे. मी याठिकाणी शब्द देतो की, मुस्लीम समाज हा या देशातील एक अंग असून, तीच त्यांची भूमी आहे. येथे जर भारत-पाकिस्तानचे युध्द झाले व पाकिस्तानने बॉम्बहल्ला केला तर ते हा मोमीनपुऱ्याचा भाग आहे, शेखपुऱ्याचा भाग आहे असे पाहून टाकणार नाहीत, ते सगळीकडेच बॉम्बहल्ला करणार. आज माझा देश सुरक्षित असेल तर मी सुरक्षित असणार आहे, अशाप्रकारची भावना आम्हा मुस्लिमांची राहणार आहे. आम्हाला फक्त आपण वेगळे समजू नका, आम्हाला आपण सोबत घ्या व आमच्यावर विश्वास दाखवा.

नंतर श्री.रोझेकर....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SRR/ D/ MAP/ प्रथम श्री.पुरी.......... 18:25

श्री पाशा....

शेवटची ओळ सांगतो. मदरसाच्या बाबतीत नेहमी बोलले जाते. माझ्या पोराला शिवण्यासाठी पैसे नाही, काय करु, चला, तिथे शिकवू लागले आहेत, जेवू घालू लागले आहेत, मी पाठवू शकतो. सच्चर समितीने सांगितले आहे की, मदरशातील शिक्षणाबरोबर इतर शिक्षण जोडले तर या समाजातील मुले देखील डॉक्टर, प्रोफेसर होऊ शकतात. निश्चितपणे केले गेले पाहिजे. हा अर्धा-तास किंवा तासभराचा विषय नाही. ख-या अर्थाने काय काय सांगितले आहे, काय काय उणिवा आहेत, अडचणी आहेत याचा अभ्यास स्वतंत्रपणे करणे गरजेचे आहे. या समाजाला विश्वास दाखविणे गरजेचे आहे. आपल्यामार्फत सरकारला विनंती करतो की, या समाजाला विश्वासात घ्या. साठ वर्षात समाजावर अन्याय झाला आहे, या अन्यायाचा मोबदला पदरात टाकला पाहिजे, असे माझ्यासारख्या कार्यकर्त्याला वाटते. एवढे बोलून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

---------------

...2.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री जैनुदीन जव्हेरी (वर्धा-चंद्रपुर-गडचिरोली स्थानिक प्राधिकारी संस्था):सभापति महोदय, मैं सबसे पहले काँग्रेस की नेता श्रीमती सोनिया गांधी एवं सम्माननीय प्रधानमंत्री श्री मनमोहन सिंग जी का आभारी हूं, वह इसलिए कि उन्होंने मुस्लिम समाज के हित के लिए सच्चर समिति नियुक्त करने का निर्णय लिया. दुनिया का कोई भी व्यक्ति खुद की पार्टी का संबंध जहां आता हो उसके बारे में जांच-पड़ताल करने के लिए समिति नियुक्त नहीं करेगा. लेकिन सम्माननीय प्रधानमंत्री श्री मनमोहन सिंग जी ने मुस्लिम समाज के हित के लिए सच्चर समिति नियुक्त करने का निर्णय लिया. प्रधानमंत्री सम्माननीय श्री मनमोहन सिंग जी को मालूम है कि 60 साल में मुस्लिमों को क्या मिला. फिर भी उन्होंने सच्चर समिति नियुक्त करने का निर्णय लिया. ऐसा निर्णय बड़े दिल वाले ही कर सकते हैं. ऐसा निर्णय काँग्रेस के नेता ही कर सकते हैं. यह आरोप लगाया गया कि इस सिलसिले में वोट का सौदा हुआ. मैं बताना चाहूंगा कि वोट का सौदा होता तो सच्चर समिति नियुक्त नहीं होती. हम यह भी जानते थे कि यह मुद्दा उठेगा. सम्माननीय श्री मनमोहन सिंग जी इन्टरनेशनल ख्याति प्राप्त व्यक्ति है, उन्हें सारी स्थिति की जानकारी है फिर भी उन्होंने सच्चर समिति की नियुक्ति की है. काँग्रेस पार्टी जानती है कि सच्चर समिति नियुक्त करने का निर्णय लेकर कोई गलत काम नहीं किया. जनता के सामने सब को जाना है. जनता फैसला करेगी. जिस पार्टी को कुछ देना ही नही है, जिन्होंने देश को कुछ दिया ही नही, तो वे क्या बोलेंगे ? इसलिए मैं सबसे पहले श्री मनमोहन सिंग जी, श्रीमती सोनिया गांधी जी और श्री शरद पवार जी का आभारी है. अब सच्चर समिति नियुक्त करने के निर्णय पर आरोप-प्रत्यारोप किए जा रहे हैं, यह बहुत दु:ख की बात है. यह भी बड़े दु:ख की बात है कि मुस्लिम समाज पर भी कई गलत आरोप किए जाते हैं. मैं इस संबंध में यह कहूंगा कि उन्हें मुस्लिम समाज का इतिहास मालूम नहीं है. मैं जब छोटा था तो मुस्लिम समाज के एक सम्मेलन में भाषण देने के लिए गया था. मैंने अपने भाषण में कहा कि मुस्लिम समाज का अस्तित्व 1400 साल पुराना है. मेरे इस वक्तव्य पर मौलवी नाराज हो गए और उन्होंने मुझसे कहा कि मुस्लिम समाज का अस्तित्व 1400 साल पुराना नहीं बल्कि करोड़ो साल पुराना है और इतना ही नहीं जब से आदम ने इस धरती पर कदम रखा है तब से है. पैगम्बर जी ने मुस्लिम समाज के लिए एक व्यवस्था कायम की और संविधान बनाया. पैगम्बर जी के संविधान को मुस्लिम समाज गर्व से मानता है. आज मुस्लिम समाज उन्हीं के बताए हुए रास्ते पर चलता है.

..3





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री जैनुदीन जव्हेरी...

सभापति महोदय, सच्चर समिति ने अपनी रिपोर्ट में मुस्लिम समाज के हित में कुछ सिफारिशें की है. इस सिलसिले में सम्माननीय सदस्य श्री गुजराथी जी और श्री हिराणी जी ने कुछ मुद्दे रखे हैं. सरकार से मेरा अनुरोध है कि उन मुद्दों पर विचार करें एवम् उन पर अमल करें.

सभापति महोदय, मैं सम्माननीय सदस्यों को बताना चाहूंगा कि केरल का मुस्लिम खुद को केरलियन मुस्लिम कहता है, महाराष्ट्र का मुस्लिम खुद को महाराष्ट्रीयन मुस्लिम कहता है और जब कोई मुस्लिम मक्का-मदीना जाता है तो वह वहां पर अपने आपको हिन्दुस्तानी मुस्लिम कहता है. कोई मुस्लिम यह नहीं बताता कि मैं सय्यद हूं, पठाण हूं, शेख हूं. यह सही है कि मुस्लिम समाज के कुछ लोग गलत काम कर रहे हैं. वह गलत है. लेकिन हम उनको समझा नहीं सकते. उसी प्रकार से मदरसा में अच्छी शिक्षा दी जाती है. मदरसे में उर्दू, अरबी सिखायी जाती है. जहां पढ़ाया जाता है, उस स्थान को उर्दू में मदरसा कहा जाता है. ' मदरसा ' यह उर्दू का शब्द है. जिस प्रकार से ' शहाणा 'मराठी शब्द है.

भाषण अपूर्ण, इसके बाद श्री दत्त.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

GRB/ D/ KTG/ DD/

श्री जैनुदीन जव्हेरी... 18.30

इसलिए मदरसा होने का मतलब यह नहीं है कि वहां पर सब गलत काम होता है. यह बात ठीक है कि कहीं पर थोड़ा बहुत कुछ गलत काम हो सकता है. लेकिन मुस्लिम समाज यह नहीं कहता कि बंदे मातरम गीत मत गाओ. मुस्लिम समाज यह नहीं कहता कि देश की प्रगति में भाग मत लो. मैं 1985 से जिला परिषद में हूं. चंद्रपुर में जब फेमिली प्लानिंग कार्यक्रम आया तो मैं मॉयनारिटी का होने के नाते, मुस्लिम अध्यक्ष होने के नाते मैं बड़े गर्व से कहता हूं कि मुझे पहला प्राइज मिला है. मुझे महाराष्ट्र सरकार ने 25 हजार रुपए का प्राइज दिया. मैं एक और बात बताना चाहता हूं कि हम 7 भाई थे और 4 बहनें थी हमारा 11 भाई-बहनों का परिवार था. हम सब पढ़े-लिखे हैं हमने फेमिली प्लानिंग को सबसे पहले माना. मेरे किसी भी भाई के दो से ज्यादा बच्चे नहीं हैं. सिर्फ मुझें ही तीन बच्चे हैं.फेमिली प्लानिंग की बात सिर्फ वे लोग नहीं मानते जहां पर एजुकेशन नहीं है, जहां पर ंइस बात को समझ नहीं सकते, वे लोग फेमिली प्लानिंग की बात को नहीं मानते हैं. हमें तो 14 सौ साल पहले बताया गया कि समाज में क्या-क्या प्लानिंग करनी चाहिए. घर में कैसे रहना चाहिए, घर के वातावरण में महिलाओं के साथ कैसे रहना चाहिए,. किस तरह से तमीज से व्यवहार करना चाहिए, अच्छे शब्दों का इस्तेमाल किस तरह से करना चाहिए. हमें तो यह सिखाया गया है कि जिस देश में हम रहते हैं उस देश की इज्जत करो और उसकी तरक्की में हिस्सा लो. जिस देश में हम रहते हैं वहां के लोगों की मय्यत में जाओ, उनकी शादी-ब्याह में जाओ. हिन्दुस्तान के मुसलमान हिंदू रीति-रिवाजों को मानते हैं. हमारी शादियों में मटका रखा जाता है. कुछ चीजें ऐसी हैं जो मुस्लिम समाज के हिसाब से ठीक नहीं हैं, लेकिन यहां पर रहने की वजह से हम हिंदू संस्कृति को मानते हैं.

माननीय सभापति जी, आप बिहार में जाइए वहां के मुसलमान को बिहारी मुसलमान कहा जाता है, आप गुजरात में जाईए उनको गुजराती मुसलमान कहा जाता है. आप काशमीर में जाइए वहां के मुसलमान को काशमीरी मुसलमान कहा जाता है. हमारे धर्म में सिखाया गया है कि जहां आप रहते हो उस देश के वफादार रहो यदि वहां के वफादार नहीं रहोगे तो फिर आप मुसलमान नहीं हो. मैं आपको बताना चाहता हूं कि हम क्रिमिनल माइंडेड लोग नहीं हैं, हम तो डॅवलपमेंट

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

GRB/ D/ KTG/ DD/

श्री जैनुदीन जव्हेरी...

माइंडेड लोग हैं. ये बातें हमारे धर्म में सिखायी जाती हैं. मुस्लिम धर्म के अनेक लोग देश की आजादी के लिए शहीद हुए. हमारे देश के राष्ट्रपति डा. अब्दुल कलाम साहब थे. यह हम सब के लिए गर्व की बात है. मौलाना अबूल कलाम आजाद साहब भी हमारे देश के बड़े नेता थे. यह भी हम सब के लिए गर्व की बात है. यह बात अलग है कि कुछ लोग ऐसे हों जो हमारे देश के नाम पर या मुस्लिम समाज के नाम पर धब्बा लगाते हों. लेकिन इस तरह के कुछ खराब लोग तो किसी भी धर्म में हो सकते हैं. ऐसा कौन सा धर्म है जिसमें सभी लोग दूध के धुले हुए हैं.

जहां तक एजुकेशन का सवाल है मैं बताना चाहूंगा कि हमारे समाज की तकलीफ यह है कि हमें दो एजुकेशन लेनी पड़ती हैं. एक एजुकेशन हमारे धर्म के बारे में और दूसरी एजुकेशन बाहरी दुनिया के बारे में हमें लेनी पड़ती है. हमारी धार्मिक एजुकेश्ंन हमारे डॅवलपमेंट के लिए जरुरी है.

मैं कई बार अपने धर्म के भाईयों से बोलता हूं तो मुझे बुरा बनना पड़ता है. मैं अनेक बार कहता हूं कि दुनिया में ंहिंदुस्तान ही ऐसा देश है जहां हम फक्र से रहते हैं. यदि हमें सबसे ज्यादा आजादी मिली है तो वह देश हिंदुस्तान ही है. बाकी देशों में इतनी आजादी नहीं है. मैं अपने भाईयों को बोलता हूं कि जब आप कोर्ट जाते हैं तो आपको कौन रोकता है, आप मुख्यमंत्री पर दावा करते हैं तो आपको कौन रोकता है. आप अपने पड़ौसी पर दावा करते हैं तो आपको कौन रोकता है. जब कोई मीटिंग होती हे तो वहां बोलने से आपको कौन रोकता है. आप दूसरे किसी देश में जाईए और वहां पर आप कुछ बोल कर दिखाइए. ऐसी बात भी नहीं है कि मुस्लिम समाज के लोग इस देश के कायदे कानून का आदर नहीं करते, मुस्लिम समाज के सभी लोग इस देश के कायदे-कानून का आदर भी करते हैं.

मैं यहां पर बताना चाहूंगा कि सच्चर समिति और कांग्रेस पार्टी ही ऐसी पार्टी है जिसने इस बात पर विचार किया कि आखिर मुस्लिम समाज इस देश की धारा में पूरी तरह से क्यों नहीं आ पा रहा है. सच्चर समिति ने कई पहलू हमारे सामने रखे हैं और वह हकीकत भी है. एक बात मैं यहां पर यह भी रखना चाहूंगा कि सरकार ने मौलाना अबूल कलाम आजाद अल्पसंख्यांक वित्तीय महामंडल बनाया. उस बारे में मैंने अपने कई आमदारों से पूछा कि आप उस बोर्ड के अध्यक्ष क्यों नहीं बनते तो उनका कहना है कि...

( इसके बाद श्री तालेवार के पास - 4 एन 1)...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

GRB/ D/ KTG/ DD/

श्री जैनुदीन जव्हेरी...

अध्यक्ष क्यों नहीं बनते. तो उनका कहना है कि उनके एरिया में सभी मुस्लिम भाई हैं. उस बोर्ड से मदद के लिए 10 हजार एप्लीकेशन आएंगी और मैं सिर्फ 10 लोगों की ही मदद कर पाऊंगा तो फिर उसके बाद मैं कभी आमदार चुनकर नहीं आ सकता. इसलिए माननीय मुख्यमंत्री महोदय से मेरा निवेदन है कि अल्पसंख्यक लोगों की आबादी के हिसाब से उस बोर्ड को फंड दिया जाए. मुस्लिम समाज की ऐसी भावना है कि कांग्रेस पार्टी और माननीय मुख्यमंत्री महोदय ही मुस्लिम समाज के लिए अच्छा काम कर सकते हैं. मैं किसी का नाम नहीं लेना चाहता लेकिन दूसरी कोई पार्टी मुस्लिम समाज के लिए इतना अच्छा काम नहीं कर सकती.

( इसके बाद श्री तालेवार के पास...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जैनुद्दीन जव्हेरी.....

मेरे क्षेत्र में सभी मुस्लिम भाई है. अगर मेरे क्षेत्र के 50 हजार लोगों ने अर्ज दिया हो और उसमें से 10 हजार अर्ज मंजूर होंगे और निधि के अभाव में 50 लोगों को ही सहायता मिलेगी तो मैं आगे आमदार का चुनाव नहीं जीत पाऊंगा. इसलिए मेरा यह अनुरोध है कि मुस्लिमों की लोकसंख्या के आधार पर फंड का प्रावधान किया जाए. आज मुस्लिम समाज के लोगों की यह भावना हो गई है मुस्लिम समाज को सिर्फ काँग्रेस ही दे सकता है. मैं किसी का नाम नहीं लूंगा लेकिन मुस्लिम को कुछ मिलेगा तो वह दूसरा कोई नहीं दे सकता, काँग्रेस पार्टी ही दे सकती है. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी मित्र पक्ष है.

सभापति महोदय, मैं यह अनुरोध करना चाहता हूं कि सच्चर समिति की सिफारिशों पर सरकार अमल करें. दूसरी बात मैं यह बताना चाहता हूं कि सच्चा मुस्लिम वह है जो इस्लाम को मानता है, और वह देश के खिलाफ, देश के संविधान के खिलाफ, कानून के खिलाफ काम नहीं कर सकता. मुस्लिम समाज में बहुत बंधन है. अगर हम उन बंधनों को तोड़ते है तो हमें मुस्लिम कहलाने का कोई अधिकार नहीं है. मुस्लिम समाज का कोई व्यक्ति किसी नशीले पदार्थ का धंधा करता है तो उसे खराब माना जाता है. अब मैं कोई मौलवी नहीं हूं कि मैं अपने इस्लाम धर्म की सारी बात यहां बता सकूं. मैं सामान्य नागरिक हूं. आपके आशीर्वाद से आमदार बना हूं. उर्दू भाषा के शब्द है जो सभी को समझ में नहीं आ सकते हैं. जिस प्रकार से आप भगवान का नाम ले कर बोलना शुरु करते हैं उसी प्रकार से मुस्लिम भी उर्दू में अल्ला का नाम लेते है. जिस प्रकार से हिन्दी में नमस्ते कहते हैं उसी प्रकार से उर्दू में अ सलाम अलैकूम कहा जाता है. इसका अर्थ यह है कि हम सब भगवान का आदर करते हैं.हर धर्म अच्छाई सिखाता है. कोई भी धर्म बुराई नहीं सिखाता.

सभापति महोदय, यहां पर सामने बैठे हुए कई सम्माननीय सदस्यों ने कहा कि काँग्रेस पार्टी ने मुस्लिम समाज को क्या दिया, आजादी के बाद 60 सालों में मुस्लिमों की क्या स्थिति रही, यह सबको मालूम है.मैं यह बताना चाहूंगा कि काँग्रेस पार्टी ने मुस्लिमों को कुछ दिया है और कुछ देना बाकी है. मुस्लिम समाज को मालूम है कि कौन दे सकता है. जब मुस्लिम समाज के लोग रैली निकाल कर कोई समस्या रखते हैं तो कई नेता कहते हैं, पाहून घेऊ , बघून घेऊ.

.2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जैनुद्दीन जव्हेरी.....

हात तोंड वर करुन मंजूर करणार का ? मुसलमान लोकांना नोकरी देणार का ? शिक्षणामध्ये आता आपल्या आंध्रप्रदेशामध्ये पाच पर्सेंट आरक्षण देण्यात आले, कोणी विरोध केला, कोण कोर्टात गेले, हे सांगण्याची गरज नाही. आता या ठरावावर बोलत असतांना सच्चर समितीची शिफारशी मंजूर करण्याकरिता कोण विरोध करणार, कोण मंजूर करणार, हे मी बोलणार नाही. फक्त एक गोष्ट मी सांगू इच्छितो की, सभापती महोदय, सच्चर समितीमध्ये हे सांगितले आहे की, मुस्लिम समाजाला नोकरी, शिक्षण, प्रमोशन देण्यासाठी काहीतरी रिझर्व्हेशन द्यावयाला पाहिजे. तसेच, व्यापारासाठी,उद्योगासाठी कर्जामध्ये सवलती जाहीर केल्या पाहिजेत. वक्फ बोर्डाच्या संदर्भात चर्चा चालू आहे की, वक्फची जमीन गेली आहे. असे काही नाही.

यानंतर श्री गागरे/दत्त

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जैनुदीन जव्हेरी .....

सभापती महोदय, बाहेर आम्ही बरीच चर्चा ऐकतो की, वक्फ बोर्डाच्या बऱ्याच जमिनी खाली आहेत. परंतु असे काही नाही. वक्फचा कायदा आहे, तो कायदा आम्ही करु. यासाठी कोणी जागा दान दिली असेल तर सरकार आमच्या सहयोगाने हया जमिनीचा विकास करील. सरकार मुस्लिम बांधवांच्या सहयोगाने याबाबत आवश्यकता असल्यास नियम व कायदा तयार करील. वक्फची जमीन मुस्लिम समाजाच्या विकासासाठी व प्रगतीसाठी सरकार देणार आहे, त्यात नाममात्र शंका नाही. याबाबत कोणाही मोठया व्यक्तीचे नाव आले तर त्यात काही दम नाही. जी सत्य परिस्थिती आहे, ती काँग्रेस, राष्ट्रवादी आणि आमचे मित्रपक्ष लोकांसमोर आणणार आहे. त्यात काही वाद नाही. अजून येथे सांगण्यात आले आहे की, संसद उडविण्यासाठी अफजल गुरुला फाशी देण्याचा निर्णय झ ाालेला आहे. तो निर्णय मुस्लिमविरोधी आहे असे मी म्हणत नाही. मुसलमानामध्ये काही इकडचे-तिकडचे आहेत. आम्ही कायदा मानतो व म्हणतो त्याला एकदा नाही तर दहा वेळेस फाशी द्यावी. त्यास आमचा विरोध नाही. सर्व समाजामध्ये इकडचे-तिकडचे लोक असतात. एकाने चुकीचे काम केले तर पूर्ण समाजाला तुरुंगात टाकणे योग्य नाही. एकाने बदमाशी केली तर पूर्ण समाज बदनाम, एकाने चार बायका केल्या तर पूर्ण समाज बदनाम होतो का ? असे होत नाही, समाजाचे नियम आहेत. मी गर्वाने सांगतो की, मुसलमान समाज महिलांना फार इज्जत देतो, आमच्याकडे तशी प्रथा आहे. याबाबत मी एक उदाहरण देतो. हमारे समाज में इंस तरह का रिवाज है कि यदि किसी बच्चे की मां उस छोटे बच्चे को अपना दूध नहीं पिला सकती और इस वजह से यदि उनके घर की नौकरानी या मां की कोई सहेली उस बच्चे को दूध पिलाती है तो दूध पिलाने वाली उस महिला को उस बच्चे की मां का दर्जा दिया जाता है और उस महिला की बच्ची से उस बच्चे की शादी नहीं हो सकती. अपनी सगी मां से भी ज्यादा महत्व उस महिला को दिया जाता है. हमारा मानना है कि सभी धर्म अच्छाई के लिए बनाए गए हैं, इसलिए मुस्लिम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

...2

श्री जैनुदीन जव्हेरी....

धर्म भी अच्छाई के लिए ही बनाया गया है. सच्चर समिति ने जिन 5-6 मुद्दों पर जोर दिया है, उस दिशा में काम करने की विनती मैं सरकार से करना चाहूंगा. सच्चर समिति की रिपोर्ट में एजुकेशन की बात कही गयी है, लोन देने के बात कही गयी है, बिजनेस की बात कही गयी है. उन बातों पर ध्यान दिया जाना चाहिए. उर्दू स्कूल के बारे में मैं कहना चाहूंगां कि मुंबई में, चुद्रपुर में, वर्धा और गडचिरोली में तथा दूसरी जगहों पर भी उर्दू स्कूल बढ़ाए जाने चाहिए. आज सभी लोग उर्दू को छोड़कर इंगलिश स्कूल की ओर भाग रहे है. मैं माननीय मुख्यमंत्री महोदय तथा शिक्षण मंत्री पुरके साहब से कहना चाहूंगा कि क्लास में विद्यार्थियों की संख्या के बारे में जो नियम आप रखना चाहें वह आप रखें लेकिन उर्दू स्कूल होने चाहिए. सरकार द्वारा तथा पूरे समाज द्वारा यह दिखाया जाना चाहिए कि हम सब लोग मुस्लिम समाज के साथ हैं माननीय सभापति जी, आपने मुझे यहां पर बोलने का समय दिया इसके लिए आभार मानते हुए मैं अपना भाषण यहीं पर समाप्त करता हूं. जय हिंद, जय विदर्भ.

---



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, माननीय सदस्या प्रा.फौजिया खान व अन्य सदस्यांनी सच्चर समितीच्या शिफारशीच्या अंमलबजावणीसंबंधी जो प्रस्ताव मांडला त्यावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

मी सुरुवातीला माननीय सदस्य श्री.जैनुद्दीन जव्हेरी यांचे मन:पूर्वक स्वागत करतो की, आदरणीय शिवसेनाप्रमुखांची जी भूमिका आहे, त्यांचे समर्थन तुमच्या भाषणातून होत आहे. जो या मातीला आपला म्हणेल, जो या देशासाठी आपले प्राण अर्पण करण्यास तयार होईल. तो कोणत्याही जात, धर्म, पंथाचा असेल तर तो आमचा आहे, ही भूमिका शिवसेनाप्रमुखांनी मांडली आहे. हीच भूमिका तुम्ही मांडली आहे. परंतु प्रत्यक्षात काय घडत आहे ?. याबाबत माननीय सदस्य डॉ.एन.पी.हिराणी बोलत असताना मी कान टवकारुन ऐकत होतो. सुरुवातीस माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी सांगितले आहे. शासनाकडे सर्व संधी असतानाही त्याची अंमलबजावणी करु शकले नाही. माननीय सदस्य प्रा.फौजिया खान हया शिक्षकांबद्दल बोलत होत्या.

यानंतर कु.धनश्री.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत....

सभापती महोदय, मी आपणास सांगू इच्छितो की, सदनामध्ये जेवढे सन्माननीय सदस्य आहेत त्या सर्व सन्माननीय सदस्यांच्या शैक्षणिक संस्था आहेत. तुम्हा सर्व सन्माननीय सदस्यांच्या शैक्षणिक संस्था आहेत, हायस्कूल्स आहेत, इंजिनिअरींग कॉलेजेस आहेत, मेडीकल कॉलेजेस आहेत. मी या सदनामध्ये अनेकदा बोललो आहे की, शिक्षणामुळे जी विषमता तयार होत आहे त्यातून हे सर्व वाद निर्माण होत आहेत. खेडयापाडयातील शाळांमध्ये, जिल्हापरिषदेच्या शाळांमध्ये आणि मुंबई शहरातील महापालिकेच्या शाळांमध्ये शिक्षण घेणारे विद्यार्थी गरीब विद्यार्थी आहेत, आर्थिकदृष्टया मागासलेले आहेत. जात धर्म पंथ या पलिकडचे आहेत. हे गरीब विद्यार्थी या शाळांमध्ये जातात आणि आपली सर्व उच्चभ्रू मंडळींची मुले इंग्रजी माध्यमाच्या शाळेत जातात, इंटरनॅशनल शाळेमध्ये जातात. ही विषमता आपणच निर्माण केलेली आहे. तुमच्या व्यवस्थेने निर्माण केली. या 60 वर्षामध्ये या व्यवस्थेने आपल्याला येथे आणून ठेवले आहे. यामुळेच आपल्याला सच्चर समितीचा अहवाल आणावा लागला. आम्ही मुसलमानांना कधीही परके म्हटले नाही. माननीय शिवसेनाप्रमुखांनीही कधी मुसलमानांना परके म्हटले नाही. सन्माननीय सदस्य डॉ. हिराणी साहेब आपण मघाशी बोलताना एक टोमणा मारला होता की, आम्ही मुस्लिमांचे तुष्टीकरण करीत आहोत. मी आपल्याला सांगू इच्छितो की, होय मी आतासुध्दा तेच म्हणत आहे. तुम्हाला यांचे बल नको आहे. किंबहुना आपण जो ठराव मांडला आहे तो पाहिल्यानंतर असे वाटते की, आपल्याला हे उशिरा सुचलेले शहाणपण आहे. देश ज्यावेळी स्वतंत्र झाला, त्यावेळी मुस्लिमांची संख्या किती होती, महाराष्ट्रामध्ये त्यांची संख्या किती हाती व आता त्याची संख्या किती आहे हे आपण पाहिले तर आपल्या लक्षात येईल. सन्माननीय सदस्य श्री. जैनुद्दीन जव्हेरी यांच्यासारखी मंडळी म्हणत आहेत की, होय आम्ही या देशाची कायदा व सुव्यवस्था मानतो, घटना मानतो. मग या देशाच्या घटनेने दिलेले सर्व अनुसूचींचे पालन आपण करतो का ? काल परवा झालेले भिवंडीमधील उदाहरण आपण घ्या. तेथे पोलीस स्टेशनमध्ये एका पोलिसाची हत्या झाली. हत्यारे कोण होते ? आणि त्याबाबत शासनाने घेतलेली भूमिका पाहिली तर याला तुष्टीकरण, लांगुलचालन म्हणावयाचे नाही तर आणखी काय म्हणावयाचे याचे उत्तर आम्हाला आपण द्यावे. पुण्यामधील दर्ग्याच्या संबंधात सुप्रिम कोर्टाने निकाल दिला होता की, हा दर्गा अनधिकृत आहे. तरी देखील शासनाने तो दर्गा

..2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत....

पाडला नाही. पुण्यामध्ये आणखी एक अनधिकृत बांधकाम तोडण्यात आले. त्यामध्ये हिंदूंचे देखील बांधकाम तोडण्यात आले. मुंबई शहरामध्ये देवळे तोडली. सुप्रिम कोर्टाने निर्णय दिला तरी हात लावाल तर, आम्ही हात लावू देणार नाही. अशी धमकी कोण देत आहे आणि कोण घाबरत आहे याकडे आपण पहावे. धमकी देणारी माणसे कोण आणि पाऊल मागे घेणारी माणसे कोण आहेत याकडेही आपण लक्ष द्यावे. सन्माननीय सदस्य, श्री. जैनुद्दीन जव्हेरी मी आपणास सांगू इच्छितो की, आपल्या समाजामध्ये जे वातावरण तयार होत आहे त्याला कारणीभूत कोण हे आपण पाहिले तर आपल्या लक्षात येईल. यांचे खायचे दात वेगळे आहेत आणि दाखवायचे दात वेगळे आहेत. आम्ही राजकारण करु इच्छित नाही. आम्ही समाजकारण करु इच्छितो.

प्रबोधनकार श्री. बाळासाहेब ठाकरे यांचे संस्कार घेऊन आम्ही उभे आहोत. धर्माच्या बाबतीत वेगळया पद्धतीचे वातावरण प्रबोधनकारांच्या काळात होते, याची मी आपल्याला दोन छोटी उदाहरणे देऊ इच्छितो. प्रबोधनकार त्यांच्या आईला बय म्हणावयाचे. एकदा अंगणामध्ये काही मुले खेळत असताना, त्या मुलांवर दलितांची सावली पडली म्हणून ती मुले बाटली. मग त्या मुलांच्या बाजूला ब्राम्हणांची मुले बयने उभी केली आणि म्हणाली आता तू सुटलास. अशा या छोटयाशा घटनेतून मनातील कुजके विचार बाहेर काढणारे संस्कार प्रबोधनकारांना लहानपणीच त्यांच्या आईपासून मिळाले. प्रबोधनकार श्री. बाळेसाहेब ठाकरे पूर्वी चाळीमध्ये राहत असताना त्यांच्या शेजारी दाक्षिणात्य मंडळी राहत होती. चाळीमध्ये एकच न्हाणीघर असायचे. हे लोक तेल लावून अंघोळ करावयाचे त्यामुळे संपूर्ण न्हाणीघर तेलकट होऊन जायचे. एकदा कपडे धुवायला बय गेली असता न्हाणीघरातील तेलावरुन बयचा पाय घसरला आणि ती पडली. तिच्या हाताला लागले. संध्याकाळी श्री. प्रबोधनकार ठाकरे आले त्यांनी बयला विचारले, काय झाले ?

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर श्री. सुंबरे....

KBS/D/KTG/MMP. कु. गायकवाड नंतर --- 18.50

श्री. अरविंद सावंत ....

शेजारचे मद्रासी तेल लावून आंघोळ करतात आणि त्यामुळे न्हाणीघरामध्ये सारे तेल-तेल झाले होते आणि त्यामुळे मी त्यानंतर न्हाणीघरात गेले असता घसरून पडले. तेव्हा प्रबोधनकारांनी त्या मद्रासी लोकांना जाऊन समजावले की. तुम्ही असे करू नका, त्यामुळे न्हाणीघरात सारी जमीन तेलकट होते आणि त्यामुळे तेथे जो कोणी जाईल तो घसरून पडू शकतो. आमच्या आई देखील अशाच प्रकारे पडल्या. त्यावर ते मद्रासी म्हणाले की, नो, नो, धीस इज अवर रिच्युअल, धीस इज अवर रिलिजिअस प्रॅक्टीस. त्यावर प्रबोधनकार ठाकरे काही बोलले नाहीत. मात्र घरी आल्यावर त्यांनी बयला सांगितले की, उद्या कोळीण आली की, तिच्याकडून कुसके म्हावरं घे, आणि त्याप्रमाणे दुसऱ्या दिवशी म्हावरं म्हणजे मासळी घेतली गेली आणि बयला त्यांनी तेथेच शेगडी पेटवून ते म्हावरे भाजायला सांगितले. त्याप्रमाणे ती कुसकी मासळी भाजू लागल्याबरोबर जो वास सुटला त्यामुळे ते सारे मद्रासी धावत आले आणि प्रबोधनकारांना म्हणू लागले, मि. ठाकरे, व्हॉट इज धीस ? यावर त्यांनी असे उत्तर दिले की, डोन्ट डिस्टर्ब, धीस इज अवर रिच्युअल, धीस अवर रिलिजिअस प्रॅक्टिस. त्यातून ते मद्रासी शेजारी जे काही समजायचे ते समजले आणि त्यांनी त्यांची सो कॉल्ड रिलिजिअस प्रॅक्टिस सोडून दिली. म्हणजे समोरच्याला कसा न बोलता धडा शिकवावा हे यातून आपण समजून घ्या. त्या मद्रासी लोकांना कळून चुकले की, आपण असे वागलो तर समोरचा माणूस तसेच वागणार. त्याप्रमाणे आपण देखील वागायला पाहिजे. सभापती महोदय, धर्माच्या बाबतीत कधीही आम्हाला माननीय शिवसेना प्रमुखांनी सांगितले नाही की, उपवास करा. आमच्याकडे तर याबाबतीत कोणतेच बंधन नाही, मानला तर देव, नाही तर काहीही नाही. अंधश्रद्धेच्या बाबतीत देखील आम्ही आपल्याला हेच सांगितले होते. मी आमचे मित्र श्री.जैनुद्दिन जव्हेरी यांना सांगू इच्छितो की, तुम्ही हे हिंदुस्थानामध्ये बोललात, इतर देशामध्ये बोलू शकला नसता हेही आपण लक्षात घ्या. मुस्लिम समाजाच्या बाबतीत शिक्षणाचा विचार येथे मांडला गेला. पण मी म्हणतो की, तुमच्याकडे शिक्षणाच्या संस्था आहेत ना ? लोणावळ्याची संस्था आहे, तुमच्याच वनखात्याची जमिनीमध्ये घुसून त्यांनी तेथे सारे बांधले आहे. मग त्यात आमच्या मुस्लिम बांधवांना 10 टक्के आरक्षण ठेवा. तुमची इंजिनिअरींग शाळा-कॉलेजेस वगैरे आहेत त्यामध्ये देखील त्यांच्यासाठी आरक्षण ठेवा. तसे करण्याचे धाडस दाखवाना. कालच सन्माननीय सदस्य श्री.कमल किशोर कदम येथै बोलले. तेव्हासुद्ध मी हेच म्हटले. कायदा येईल तेव्हा येईल. नाही तरी चॅरिटी

...... 4 क्यू 2 ..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सावंत .....

बिगिन्स ॲट होम. त्याप्रमाणे आपण सुरूवात तरी करा. सभापती महोदय, जाती-धर्मावर आधारित जेवढ्या तुम्ही सवलती मागाल, हक्क मागाल तेवढा हा देश दुभंगण्याच्या अधिक जवळ जाणार आहे. सभापती महोदय, मंडल आयोग आला तेव्हा देशातील केवळ एकच माणूस असा होता की, ज्याने त्याला ठामपणे विरोध केला आणि तो माणूस म्हणजे शिवसेना प्रमुख माननीय श्री.बाळासाहेब ठाकरे होय. त्यांनी मंडल आयोगाला विरोध केला होता. कोणतीही गोष्ट असो, पण ती मानत नसाल तर तसे स्पष्टपणे सांगण्याची देखील हिम्मत असावी लागते. पण आज तुम्हाला हे सारे आणावे लागते आहे कारण तुमच्या हे पोटाला जात आहे. परंतु पोटाला जातच नसते. जे जे हात कामाविना रिकामे आहेत त्यांना काम द्या, आणि या देशामध्ये केवळ दोनच जाती ठरवा. एक श्रीमंतांची जात, आणि दुसरी गरीबांची जात. तसे झाले तर त्यामध्ये तुमचे मुस्लिम बांधव देखील येतील, जे गरीब आहेत. तुम्ही जेव्हा शिवसेनेच्या कार्याध्यक्षांना, श्रीमान उद्धव ठाकरे यांना भेटायला गेला होता त्यावेळी देखील त्यांनी तुम्हाला हेच सांगितले की, तुम्ही धर्म म्हणून हक्क, मागण्या, सवलती मागू नका. गरीब म्हणून जरूर मागा. शेवटी तुमचा विकास म्हणजे तरी काय ? समाजामध्ये आर्थिक संपन्नता आली की, समाजिक न्यायाची भूमिका आपोआप येते. ती आर्थिक संपन्नता येण्याच्या आड कोण आले ? आमचा एक एक आमदार दाखवा की, तो पिढीजात काही तरी होता. माननीय शिवसेना प्रमुखांनी सर्व सामान्य माणसाला न्याय दिला. तुम्हाला हे करता आले नाही. तुम्ही सातत्याने हेच पाहिले की, जात कशी राहील. कारण तुमचा एकच हेतू होता आणि तो म्हणजे व्होट ॲण्ड व्हिक्टरी. तुमचे सारे विचार आणि कृती ही त्याच्याशीच संबंधित असतात. हृदयातून बोलणे आणि डोक्यातून बालणे यामध्ये फरक आहे. तुम्ही नेहमी डोक्याने चालता आणि आम्ही हृदयाने चालतो. आज केरळमध्ये जाऊन पहा, तेथील मशिदी पाहिल्यात तर तुम्हाला दिसून येईल की, त्या इतक्या मोठ्ठ्या मोठ्या असतात .....

( यानंतर श्री. सरफरे .... 4आर 1 ..

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत...

मी मस्जिदी पाहिल्या आहेत, इतक्या मोठ-मोठया सुंदर मस्जिदी आहेत, त्या सुंदर असाव्यात. मंदिरे देखील सुंदर असतात. परंतु या मस्जिदी बांधण्यासाठी पैसा येतो. तर मग एखादी शिक्षण संस्था काढण्यासाठी पैसा कां येत नाही? हा प्रश्न सतत माझ्या मनाला भेडसावत रहातो. माझ्या मुस्लिम मित्रांना विचारतो की, मस्जिद बांधण्याकरिता तुमच्याकडे पैसा कोठून येतो. हा पैसा तुमच्या समाजातील गरीब माणसाला उभे करण्यासाठी कां वापरीत नाही? शिक्षण संस्था बांधण्याकरिता कां वापरीत नाही? सभापती महोदय, या ठिकाणी मदरश्यावरुन विषय उपस्थित करण्यात आला. सिमी या संघटनेची माणसे जळगावामध्ये पकडण्यात आली. आपण जाऊन चौकशी करावी की, या संस्था कुणाच्या असतात? चाळीसगावच्या नगराध्यक्षाच्या घरी सिमीची माणसे कशी सापडली? याची आपण चौकशी करावी. माननीय सदस्य श्री. जव्हेरी साहेब आपण याठिकाणी जे बोलला आहात त्याबद्दल मी आपले मनापासून कौतुक करतो, परंतु आपण हे धारिष्टय बाहेर जाऊन दाखवा. एखाद्या आतंकवाद्याला आपण पकडून द्या. माझ्या वस्तीमध्ये एखादा आतंकवादी आला तर मी त्याला पकडून देईन असे धाडस आपण दाखवीत नाही. समाजातील या दुष्प्रवृत्तीला समाजापुढे आणले जात नाही. आमच्या समाजामध्ये हा माणूस गैर वागत आहे, तो वाईट आहे असे सांगितले जात नाही. दुर्दैवाने मालेगावच्या बॉम्बस्फोटामध्ये आमचे मुस्लिम बांधव मेले ते आमच्या रक्ताचे होते. बौध्द आणि दलितांच्या बाबतीत सुध्दा आम्ही हाच विषय उपस्थित केला आहे. या लोकांचे धर्मांतर झाले असेल परंतु तुमचे रक्तांतर झाले नाही. ही माणसे आमच्याच रक्ताची आहेत. कदाचित आमच्या पूर्वजांनी तुमच्यावर खूप मोठया अन्याय केला आहे, हे सत्य आहे. ते आम्ही नाकारीत नाही. ते धाडस आमच्यामध्ये आहे. ही आमच्या रक्ताची माणसे आहेत असे आम्ही समजतो, परंतु तुम्ही समजत नाही हे आमचे दुर्दैव आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आम्हाला मुख्य प्रवाहामध्ये सामील होण्यास सांगितले, परंतु आम्ही तयार झालो नाही. आमचे अस्तित्व वेगळे राहिले तर आम्हाला सुध्दा राजकीय दृष्टया काही तरी मिळत राहील. यामागे खरा दृष्टीकोन हा सामाजिक नसतो तर तो राजकीय असतो. सामाजिक दृष्टीकोन असेल तर असे प्रश्न उभे रहात नाहीत.

**(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)**

सभापती महोदय, देशाच्या कायद्यासंदर्भात सुध्दा हीच घटना आहे. आपण काश्मीरबाबत चुकून बोलून गेलात. मी आता काश्मीरचा दौरा करुन आलो. त्या काश्मीरमधील शासकीय



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ D/ KTG/ MMP/

श्री. अरविंद सावंत...

कर्मचारी असलेल्या मुस्लिम बांधवांना भेटलो. त्यांच्याबरोबर तासनतास खूप गप्पा मारल्या. दुर्दैवाने आपले अंतर्मन स्वच्छ नाही हे सांगतांना माझ्या मनाला दु:ख होते. अनेकांनी मला सांगितले की, आम्हाला वेगळे राज्य हवे आहे. सभापती महोदय,उर्दू भाषा ही अतिशय मजेशीर आहे ती मला आवडते. पंतप्रधान म्हणणे आणि वझिरे आजम यामध्ये खूप मजा आहे. त्या भाषेबरोबर त्यांची मने देखील वेगळी आहेत. त्यांना वेगळेपण हवे आहे. मी त्यांना म्हणालो की, तुम्ही जम्मू-काश्मीर घेऊन वेगळे झालात तर काय होईल? हिंदुस्थानमध्ये आहात म्हणून तुम्ही इतकी नाटके करता, पाकिस्तान तुम्हाला केव्हाच गिळंकृत करुन टाकील. म्हणून माझी आपणाकडून मूलभूत अपेक्षा आहे की, ज्या गोष्टी आपणास हव्या आहेत? त्या हव्याच आहेत. आपण जातीवर आधारीत करु नका. सभापती महोदय, आपल्या समाजामध्ये किती वाईट गोष्टी घडत आहेत? काल-परवा मुस्लिम बांधवाने एका मुलीशी लग्न केले, ते वर्तमानपत्रामध्ये छापून आले. तो आर्थिकदृष्टया संपन्न आहे? नाही. याबाबत त्याने काय सांगितले? उन्होंने कहा कि अल्लाह का संदेश आया है.ही दळभद्री माणसे कोणाच्याही समाजातील असू देत, आमच्याही समाजातील असू देत परंतु समाज म्हणून त्या समाजातील माणूस उभा राहिला पाहिजे. महात्मा फुले मोठे झाले, छत्रपती शाहू महाराज मोठे झाले. याचे कारण त्या समाजामध्ये असून सुध्दा समाजातील बुरसट विचारांच्या विरोधात उभे राहिले. तुमचे दुर्दैव असे की, तुम्हाला नेतृत्व नाही. या बुरसट विचारांच्या विरोधात लढणारे नेतृत्व तुमच्या समाजामध्ये पाहिजे. त्यामुळे तुमचा विकास आणखी होईल. तुमच्यात हिंमत होत नसल्यामुळे तुमची फरफट चालली आहे, ती आपण थांबविली पाहिजे. सभापती महोदय, मी आपणास एक-दोन गोष्टी सांगणार आहे. प्रतिक्रिया कशा तयार होतात? दंगे होतात. क्रिकेट मॅच जिंकल्यानंतर मुस्लिम बांधवांकडून प्रतिक्रिया आली पाहिजे, ती येत नाही. या संदर्भात एकच गोष्ट सांगेन की, सच्चर समिती कां नेमण्यात आली? यामध्ये मूळ मुद्दा शिक्षणाचा आहे. त्यांना आपण शिक्षणापासून वंचित ठेवल्यामुळे त्यांची ससेहोलपट होत आहे. त्याबाबत आपल्याला कुठे काय केले पाहिजे. आणि ते करतांना आपण त्यामध्ये फरक केला पाहिजे एवढेच मला सांगितले पाहिजे. सभापती महोदय, मी आपणास शेवटचा मुद्दा सांगतो.

(यानंतर श्री. बरवड)

अमुद्रित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत ....

मघाशी मी सन्माननीय सदस्यांना विचारले की आप इस के खिलाफ है क्या ? त्यावर सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, हम जाती व्यवस्था के खिलाफ है. या देशात जर आपल्याला आरक्षण हवे असेल तर जात, धर्म या आधारावर कोणतेही आरक्षण मागू नका. गरिबीचा आपण कधी विचार केला आहे काय ? आपण माझ्यासोबत नंदूरबारमध्ये चला. आपण ठाणे जिल्ह्यातील जव्हार, मोखाडा भागात जाऊ आणि तेथील आदिवासींची काय अवस्था आहे ते बघू. त्यांच्यासाठी कोण बघणार ? त्यांचे टक्के कोण मागणार ? त्यांना कोण आरक्षण देणार ? जे जे आर्थिकदृष्ट्या गरीब आहेत त्यादृष्टीने विचार झाला पाहिजे. जे का रंजले गांजले, त्यासी म्हणे जो आपुले, तेची सरकार ओळखावे. जे रंजले गांजले आहेत त्यांना मदत केली तर तो कोणत्याही धर्माचा असला तरी त्याला न्याय मिळेल. सच्चर समितीला एवढ्यासाठी विरोध आहे. मुस्लीम समाजाचे खऱ्या अर्थाने उत्थापन होण्याची गरज आहे आणि ते शिक्षणातून होणार असेल तर त्याबाबत विचार करण्याची गरज आहे. गरिबी हटविण्याची गरज आहे. नुसते गरिबी हटाव असे म्हटल्याने ते होणार नाही. गेली 60 वर्षे कॉंग्रेस गरिबी हटावचा नारा देत आहे. त्यातून गरीब हटला परंतु गरिबी हटली नाही. पुन्हा एकदा एवढेच सांगतो की, फक्त आर्थिकदृष्ट्या मागासलेपणा ठरवून जर आपण दिले तर खऱ्या अर्थाने न्याय मिळेल असे मला वाटते. एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

----

**उपसभापती** : आता उत्तराच्या भाषणाला सुरुवात करावयाची काय ?

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, आम्हाला बोलावयाचे आहे.

श्री. विनोद तावडे : मघाशी आपण सांगितले की, जेवढी चर्चा होईल तेवढी आज पूर्ण करु.

**उपसभापती** : मी तसे बोललो नाही पण आपण म्हणत आहात ते मी सत्य मानतो. सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार यांनी उल्लेख केला होता. सन्माननीय सदस्यांनी पाच पाच मिनिटात बोलावे. यानंतर सन्माननीय सदस्य श्री. मुझफ्फर हुसेन बोलतील.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ MMP/

श्री. मुझफ्फर हुसेन ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, सच्चर समितीच्या संदर्भातील चर्चेत भाग घेण्यासाठी मी उभा आहे. आदरणीय पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग तसेच आदरणीय श्रीमती सोनियाजी गांधी यांच्या माध्यमातून सच्चर समितीचा अहवाल या देशासमोर आलेला आहे. त्या अहवालावर या सभागृहामध्ये फार चांगली चर्चा झालेली आहे. प्रत्येक मुद्यावर, प्रत्येक आकडेवारीवर या ठिकाणी चर्चा झालेली आहे. त्यामुळे प्रत्येक आकडेवारीवर मी बोलणार नाही. अल्पसंख्यांक समाज हा सच्चर समितीचा मुख्य केंद्रबिंदू आहे. अल्पसंख्यांक समाज सामाजिकदृष्टया, आर्थिकदृष्ट्या आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासलेला आहे. याबाबतचा पूर्ण आढावा या सच्चर समितीच्या माध्यमातून देशासमोर आलेला आहे. अल्पसंख्याक समाज, मुस्लीम समाज इस्लाम धर्माला मानणारा आहे. दोन समाजामध्ये जेव्हा जेव्हा दुरावा निर्माण होतो त्या त्या वेळी अशा प्रकारचे मोठमोठे प्रश्न आपल्या समोर उभे राहात असतात. जोपर्यंत हा दुरावा कमी होणार नाही तोपर्यंत हा प्रश्न सुटणार नाही. ज्यावेळी बाबर या देशात आला त्यावेळी तो 10 कोटी किंवा 15 कोटी मुस्लिमांना सोबत घेऊन आला नव्हता. या देशामध्ये मुस्लिमांची एवढी संख्या जी वाढली त्यामध्ये येथील हिंदू लोक मुस्लीम झाले. ते कन्व्हर्ट झाले आहेत. याच मातीमध्ये जन्माला आलेले लोक मुस्लीम झालेले आहेत. इस्लाम धर्म, त्याची व्यूहरचना, कुराणावरील पूर्ण विश्वास आणि कुराणात प्रत्येक वर्गाला, मनुष्याला, महिलांना, मुलांना, प्रत्येक मानवाला देण्यात आलेले अधिकार तसेच प्रेम, सन्मान, न्याय याचा उल्लेख त्या धर्मामध्ये आहे.

यानंतर श्री. शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. मुझफ्फर हुसेन....)

आणि त्या धर्माला माणणा-या लोकांना या देशामध्ये अल्पसंख्यांक म्हणून संबोधले जाते. इस्लाम धर्मामध्ये सर्वसामान्य लोकांना न्याय आणि अधिकार आहे. आम्ही नमाजासाठी सर्व मुस्लिम बांधव एका रांगेत उभे राहतो. गरीब श्रीमंत हा भेदभाव नसतो. एखाद्या अत्यंत गरीब असलेल्या मुस्लिम बांधवाच्या बाजूला श्रीमंत मुस्लिम बांधव उभा राहून प्रार्थना करु शकतो. माझ्या घरामध्ये काम करणारा नोकर देखील माझ्या बाजूला उभा राहून प्रार्थना करु शकतो. धार्मिकतेच्या बाबतीत सांगायचे तर मुस्लिम समाजामध्ये सर्व स्तरातील माणसांना अधिकार दिलेले आहेत. महिलांना तर मुस्लिम धर्मात सर्वात जास्त अधिकार दिलेले आहेत. परंतु त्याची माहिती अल्पसंख्यांक समाजाला त्याने या धर्माचा, कुराणाचा नीट अभ्यास केलेला नसल्यामुळे नाही. ज्या पध्दतीने कुराणाचा अभ्यास करायला पाहिजे त्याप्रमाणे तो केलेला नाही. जोपर्यन्त आपण एखाद्या धर्माची भाषा समजत नाही तोपर्यन्त त्या धर्माला आपण समजू शकत नाही. अनेक हिंदू धर्मग्रंथ हे संस्कृत भाषेत आहेत. ख्रिश्चनांचे बायबल हेही विविध भाषांमध्ये आहे. याठिकाणी उर्दू भाषेबद्दल नेहमीच चर्चा केली जाते. ज्यावेळी मुघल सल्तनत हिंदुस्थानात होती त्यावेळी आजूबाजूच्या राज्यातील लोक व्यवसायाच्या निमित्ताने दिल्लीला येत होते. एका चांगल्या आणि सर्वसाधारण भाषेतून व्यवहार व्हावा म्हणून उर्दू भाषेचा वापर त्यावेळी करण्यात आला आणि ती भाषा विकसित होत गेली. 17व्या-18व्या शतकामध्ये जेव्हा मुघल सल्तनत या हिन्दुस्थानामध्ये होती त्यावेळी उर्दू भाषा ही फौजी भाषा म्हणून संबोधली जात असे. स्वातंत्र्यानंतर देशाची भाषा हिंदी झाली. परिणामी उर्दू भाषेचा प्रभाव हळूहळू कमी झ ाला. परंतु ज्या तीन-चार पिढ्यांनी उर्दू भाषेचे शिक्षण घेतले त्यांनी स्वातंत्र्यानंतरच्या काळामध्ये स्वत:मध्ये जो बदल घडवून आणायला पाहिजे होता तो घडवून आणला नाही. आता मुस्लिम मराठी बोलत नाहीत असे सांगितले गेले ते चुकीचे आहे. मुंबईतील काही भाग वगळता दक्षिण मुंबईमध्ये जेथे हा अल्पसंख्याक समाज गुजराथ, ओरिसा, मध्यप्रदेश, उत्तरप्रदेश, बिहार या राज्यातून आलेला आहे त्यांना मराठी बोलता येत नाही. परंतु उर्वरित महाराष्ट्रामध्ये प्रत्येक अल्पसंख्यांक माणूस मराठी बोलतो, मराठीतून शिक्षण घेण्याचा प्रयत्न करतो. अल्पसंख्याक माणसाची उर्दू ही मातृभाषा आहे. सन्माननीय सदस्य श्री. अरविंद सांवत यांनी

..2..

(श्री. मुझफ्फर हुसेन....)

चांगले मुद्दे मांडले. जात आणि धर्म कशाला पाहिजेत असे त्यांनी सांगितले. आदरणीय श्री. बाळासाहेब ठाकरे यांचा देखील संदर्भ त्यांनी दिला. मी सन्माननीय सदस्यांच्या मताशी सहमत आहे. शाळेमध्ये प्रवेश देताना तो मुस्लिम आहे, की हिंदू आहे, की ख्रिश्चन आहे हे पाहिले जाता कामा नये. शिक्षणासाठी प्रवेश देताना धर्म ही संकल्पना गौण आहे या मताचा मी आहे. शासनाने लागू केलेल्या सवलतीचा लाभ मिळण्यासाठी त्याठिकाणी ओ.बी.सी.,एस.सी.,एस.टी. व्ही.जे.एन.टी अशी नोंद असली पाहिजे. जो पर्यन्त धर्म ही संकल्पना काढली जाणार नाही तोपर्यन्त आपण एकूणच समाजामध्ये आमूलाग्र बदल घडवून आणू शकणार नाही या मताचा मी आहे.

**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मुझफ्फर हुसेन.........

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.पाशा पटेल यांनी सांगितले की, नगरपालिका, जिल्हा परिषदा, महानगरपालिका, विधानसभा, लोकसभा याठिकाणी आरक्षण असे केले, आरक्षण तसे केले. ते आता सभागृहात उपस्थित नाहीत. मी त्यांच्या माहितीसाठी सांगू इच्छितो की, ज्या ज्यावेळी अशा प्रकारची आरक्षणे केली जातात त्या त्यावेळी ऑब्जेक्शन्स आणि सजेशन्स मागविण्यात येतात. त्यानंतरच त्या मतदारसंघाची आणि वॉर्डाची पुनर्रचना केली जाते. एकच राजकीय पक्ष केंद्रात आतापर्यंत सत्तेवर होता आणि जे घडले ते सर्व त्यांनीच घडवून आणले अशी त्यांची भूमिका असेल तर ती चुकीची भूमिका आहे. राजकारणाचे स्वरुप याठिकाणी स्पष्ट आहे. सेक्युलर आणि अनसेक्युलर फोर्सेस आहेत त्यापैकी अनसेक्युलर फोर्सेसनी ठरवावयाचे आहे की, अल्पसंख्य समाजाला खरोखर आपल्या बरोबरीने घेऊन जाण्याची भूमिका असेल तर आपण ती स्वीकारायची की नाही? फक्त काँग्रेस पक्ष सेक्युलर फोर्स आहे आणि बाकीचे सगळे अनसेक्युलर फोर्सेस आहेत हे म्हणणे चुकीचे आहे. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी घटनेच्या संदर्भात सांगितले आहे. घटनेने सर्वांना अधिकार दिले आहेत हे मान्य आहे. आपण याठिकाणी कायदे बनवितो. तरी सुध्दा प्रत्येक तीन महिन्यानंतर आपल्याला अधिवेशन घ्यावे लागते. सभागृहात प्रश्नोत्तरे होतात आणि त्या माध्यमातून प्रशासनाच्या चुका होतात त्या दुरुस्त करण्याचे काम या सभागृहाच्या माध्यमातून केले जाते. त्याच पध्दतीने घटना जरी असली तरी देशामध्ये कुठे काही चुकीचे घडत असेल तर ते दुरुस्त करण्याचे काम राजकीय पक्षांचे देखील आहे. शेवटी राजकीय पक्ष हे समाजाचे रोल मॉडेल आहेत. त्यांनी आपली भूमिका त्यादृष्टीनेच पार पाडण्याची गरज आहे. मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळ आणि इतर महामंडळांची स्थापना करण्यात आली आहे. जरुर त्यामध्ये काही गोष्टींची कमतरता असेल तर ती दूर करण्याची गरज आहे. या सभागृहाच्या माध्यमातून आणि संसदेच्या माध्यमातून लोकप्रतिनिधी प्रश्न मांडण्याचा प्रयत्न करतात आणि त्यांचा पाठपुरावा करीत असतात. मला असे वाटते की, कायदा आणि सुव्यवस्था व टेररिझमचा मुद्दा प्रत्येक वेळी अल्पसंख्यांकाचा विषय उपस्थित झाल्यानंतर मांडला जातो. आज जगामध्ये इस्लाम आणि मुस्लिमांबाबत हा महत्वाचा प्रश्न निश्चितपणे उभा राहिला आहे. हे मान्य करण्याची गरज आहे. आज जगामध्ये कुठेही जा. युरोपमध्ये, युएसमध्ये, पॅरिसमध्ये कुठेही जा. इमिग्रेशन अधिकारी चारवेळा तुमचा चेहरा निरखून



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मुझफ्फर हुसेन.........

बघितल्याशिवाय तुमच्या पासपोर्टवर शिक्का उमटवत नाही. यामध्ये दोष हिंदुस्थानातील मुस्लिमांचा आहे असे म्हटले तर ते चुकीचे होईल. जरुर मिडल इस्टमध्ये आणि इतर ठिकाणी घडलेले राजकारण आणि त्याचे पडसाद या देशात उमटतात. ज्याची पायात चप्पल घालायची ऐपत नाही, पोटात अन्न घालण्याची सोय नाही त्याला जर कोणी चार पैसे दिले तर तो निश्चितपणे कोणत्याही थराला जाऊ शकतो. त्याला धर्म, देश, राज्य, जात महत्वाची नसते. त्याच्या दृष्टीने फक्त पैशाला महत्व असते. मला असे वाटते की, न्या.सच्चर समितीने चांगल्यापैकी आढावा घेऊन केंद्र सरकारला अहवाल सादर केला आहे. आपण सर्व सेक्युलर आणि अनसेक्युलर फोर्सेसनी, प्रत्येक पक्षाच्या लोकांनी आपल्याला देश पुढे घेऊन जाण्याचा विचार करीत असताना या समाजामध्ये ज्या काही कमतरता आहेत त्या दूर करण्यासाठी स्वत: सहभागी होण्याची गरज आहे एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

-----

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : सदनातील दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांना माझी विनंती आहे, या प्रस्तावावर आतापर्यंत जवळजवळ चार तास चर्चा केलेली आहे, परवा देखील या प्रस्तावावर किमान दीड तास चर्चा झालेली होती. नियम 260 अन्वये जी चर्चा प्रस्तावावर केली जाते त्यासाठी उत्तरासह अडीच तासाची वेळ दिली जाते. याठिकाणी दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी आपले विचार या प्रस्तावाच्या संदर्भात मांडले आहेत. खरे तर अनेकवेळा असे प्रसंग येतात.......

(नंतर श्री.जुन्नरे......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** .....

त्या त्या पक्षाला दिलेला वेळ संपतो तेव्हा नाइलाजाने आपल्याला चर्चा थांबवावी लागते व उत्तराला सुरुवात करावी लागत असते. म्हणून मी विनंती करतो की, या प्रस्तावाला उत्तर देण्यासाठी मुख्यमंत्री महोदयांनी आता सुरुवात करावी.

श्री. विनोद तावडे : आदरणीय सभापती महोदय, आपण आम्हाला बोलण्यासाठी पाच मिनिटांचा वेळ द्यावा अशी माझी आपल्याला विनंती आहे.

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, या सदनामध्ये कोणत्याही विषयावर चर्चा सुरु असतांना सन्माननीय सदस्य चर्चेला पाठिंबा देण्यासाठी उभा आहे किंवा चर्चेला विरोध करण्यासाठी उभा आहे असे सांगून आपल्या भाषणास सुरुवात करीत असतात. ज्यावेळेस सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत हे प्रस्तावावर विचार मांडण्यासाठी उभे राहिले तेव्हा त्यांना मी विचारले की, आपण प्रस्तावाला पाठिंबा देण्यासाठी उभे आहात की विरोध करण्यासाठी उभे आहात ? त्यावर त्यांनी सांगितले की, मी प्रस्तावाला विरोध करणार आहे की, पाठिंबा देणार आहे हे माझे भाषण झ ाल्यावर तुम्हाला समजून येईल. त्यांचे भाषण झाल्यानंतर शिवसेनेची या प्रस्तावाच्या संदर्भात कोणती भूमिका आहे, ते स्पष्ट झाले. परंतु जेव्हा भारतीय जनता पक्षाचे सन्माननीय सदस्य श्री. पाशा पटेल बोलण्यासाठी उभे राहिले तेव्हा त्यांनी सच्चर आयोग लागू केला पाहिजे अशी भूमिका स्पष्ट केली. त्यामुळे आता बीजेपीची नेमकी अडचण झालेली आहे. त्यामुळे बीजेपीने सच्चर आयोगाच्या संदर्भात या सदनात आपली भूमिका स्पष्ट करणे आवश्यक आहे. या प्रस्तावाच्या संदर्भात बीजेपीची भूमिका काय आहे, हे जाणून घेण्याचा या सदनाला हक्क आहे. सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. फुंडकर साहेबांनी सांगितले आहे की, बीजेपीचा या प्रस्तावाला तसेच सच्चर आयोगाला विरोध असून ही पक्षाची भूमिका आहे. परंतु भारतीय जनता पक्षाचे सन्माननीय सदस्य श्री. पाशा पटेल यांनी मुस्लीम समाजाची दु:खे स्पष्टपणे या ठिकाणी मांडलेली आहेत. त्यामुळे पक्षाचा विरोध असतांना प्रस्तावाच्या बाजूने त्याच पक्षाचे सन्माननीय सदस्य कशी भूमिका मांडू शकतात, पक्षाच्या विरोधी भूमिका कशी काय व्यक्त करु शकता ? बीजेपी हा एक शिस्तबध्द पक्ष आहे. बीजेपी सत्तेसाठी किंवा मतासाठी कदाचित वेगळी भूमिका घेत



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील.....

असेल. बीजेपीची व्होट बँक गल्ली पासून दिल्ली पर्यंत आहे असे असतांना या पक्षाचा एक आमदार पक्षापेक्षा वेगळी भूमिका मांडत असेल तर त्याच्यासंदर्भात पक्षाने काही व्हीप काढला आहे काय किंवा सन्माननीय सदस्यांनी पक्षाला सोडले की, पक्षाने सन्माननीय सदस्यांना काढले याचा खुलासा होणे आवश्यक आहे.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांनी आपल्या भाषणाला सुरुवात करावी.

....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे (विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, आपण मला बोलण्यासाठी संधी दिली होती परंतु मध्येच सन्माननीय गृहमंत्र्यांनी सभागृहाचा वेळ घेतल्यामुळे माझे भाषण थोडे लांबले जाणार आहे. या ठिकाणी जो प्रस्ताव सत्ताधारी पक्षाने मांडलेला आहे त्याला माझ्या पक्षाचा विरोधच आहे. हा प्रस्ताव सत्ताधारी पक्षाचा असतांना त्या प्रस्तावावर सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील साहेबांचे सुध्दा नाव आहे. याचा अर्थ सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील हे विरोधी पक्षात नसून सत्ताधारी पक्षाच्या बाकावर आहेत, असे मी समजतो. सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील हे आता सत्ताधारी पक्षात आहेत हे या निमित्ताने रजिस्टर्ड झाले आहे असेही मी समजतो. परंतु सन्माननीय सदस्य बाहेर बोलतांना मी विरोधी पक्षात आहे असे नेहमी सांगत असतात. परंतु बरे झाले एकदा काय तो निर्णय झाला.

**सभापती** : दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी दिलेले प्रस्ताव काही वेळेला चर्चेला येत असतात.

(अडथळा)

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सभागृहाचे नेते व माननीय उपमुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील यांच्या डोक्यात कोणते विचार सुरु आहेत हे मला माहीत नाही. मी भाषणाच्या सुरुवातीला आमच्या पक्षाची भूमिका सांगितली. असे असताना त्यांनी पुन्हा असा प्रश्न करावा याचे मला आश्चर्य वाटते. त्यांच्याकडून असे कधी होत नाही.

सभापती महोदय, या प्रस्तावामधील "प्रशासनातला या समाजाचा 2 टक्क्यांहून कमी असलेला वाटा." ही वाक्य रचना दुरुस्त केली पाहिजे. उच्च शिक्षणामध्ये समान संधीचा अभाव असणे. आर्टीकल 30नुसार मायनॉरिटीज स्टेटस देत असताना कुणी मुद्दाम अल्पसंख्यांकांना उच्च शिक्षणासाठी कमी संधी दिली असे नाही. त्या त्या समाजाला असणाऱ्या अडचणींमुळे ते उच्च शिक्षण घेऊ शकत नसतील तर त्याबाबत विचार केला पाहिजे हे समजू शकतो. पण या प्रस्तावात उच्च शिक्षणाच्या समान संधीचा अभाव असणे असे सत्ताधारी पक्षाने म्हणणे बरोबर नाही. असा अभाव शासन यंत्रणेने निर्माण केला असेल असे त्यांना म्हणायचे असेल आणि त्यास समोरुन पाठिंबा दिला असेल तर त्याबाबत आमचे काही म्हणणे नाही, फक्त याची नोंद करणे आवश्यक आहे. सन्माननीय सदस्य श्री.जैनुद्दीन जव्हेरी यांनी भाषण करताना सच्चर समितीची नियुक्ती केल्याबद्दल माननीय पंतप्रधान व युपीए नेत्यांचे अभिनंदन केले. या सच्चर समितीची नियुक्ती केल्यानंतर माननीय पंतप्रधानांचे वक्तव्य केले की, "देशाच्या अनेक गोष्टींमध्ये आता मुस्लिम फर्स्ट करण्याची गरज आहे" परंतु हे वक्तव्य उत्तर प्रदेशातील निवडणुकांना सामोरे जात असताना केलेले असल्यामुळे लोकांना खरे काय ते कळले होते. सच्चर समिती हा एक कात्रजचा घाट आहे. मुळात अनुसूचित जातीच्या घटनादत्त अधिकारावर गदा आणण्यासाठी सच्चरच्या निमित्ताने एक चित्र उभे करण्यात आले. ख्रिश्चन मिशनरींना धर्मांतर करण्यासाठी आरक्षणाचे फायदे मिळत नाहीत ही जी अडचण होती ती या माध्यमातून दूर करण्याचा हा एक प्रयत्न आहे. परमपूज्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी अनुच्छेद 30 नुसार आरक्षण मिळण्यासाठी हिंदू, शीख व बौध्द धर्माची अट घातली होती. हा अनुच्छेद 30 बदलण्याचा प्रयत्न रंगनाथ मिश्रा समिती नेमून करण्यात आला. त्यावेळी सर्वोच्च न्यालयाने 'अनुसूचित जाती आयोगाला' काय वाटते असे विचारावे असे सांगितल्यानंतर अनुसूचित जाती आयोगाने त्यास विरोध दर्शविला होता. त्यामुळे त्यात बदल करता

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे.........

आला नाही. पण आताच्या अनुसूचित जाती आयोगाच्या अध्यक्षांनी अशाप्रकारची हरकत मागे घेतली आहे. ती कुणाच्या सांगण्यावरुन मागे घेतली हे मी अतिशय स्पष्टपणे सांगितले पाहिजे असे नाही. त्यामुळे पूजनीय डॉ.बाबासाहेब आंबडेकर यांनी दलित समाजाला जे आरक्षण दिले आहे त्या आरक्षणामध्ये मुस्लिम, ख्रिश्चनांना बसविण्याचा हा एक डाव व षडयंत्र आहे....

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, सभागृहात चुकीचे नोंदले जाऊ नये म्हणून मी बोलण्यासाठी उभा आहे. सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांनी सांगितले की, परमपूज्य डॉ.बाबासाहेब आंबडेकरांनी बौध्द,शीख व हिंदू यांच्यासाठी तरतूद केली होती. घटनेमध्ये कुठेही धर्माचा उल्लेख नाही. 1950 मध्ये वेगळी प्रेसिडेन्शीअल ऑर्डर काढून ती लागू करण्यात आली. यामध्ये घटनेचा भाग नाही. प्रेसिडेन्शीअल ऑर्डर संविधानानंतर आहे. ही नंतर झालेली दुरुस्ती आहे ( अडथळा ) ...

यानंतर श्री.पुरी.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSP/ D/ MAP/ MMP/ पूर्वी श्री.अजित.... 19:25

श्री.कपिल पाटील...

मघाशी सन्माननीय सदस्य, श्री.विनोद तावडे यांनी माझ्या नावाचा व्यक्तिगत उल्लेख केला, त्याबाबत मी खुलासा करणार नाही. परंतु डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या बाबतीत चुकीचा मॅसेज व चुकीची नोंद पटलावर येईल, ती त्यांनी मागे घेतली पाहिजे.

**सभापती** : याबाबतीत योग्य ते तपासून घेतले जाईल. जे योग्य आहे ते रेकॉर्डवर राहील व जे अयोग्य आहे ते रेकॉर्डवरुन काढण्यात येईल.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, घटना समितीमध्ये खिश्चन आणि मुस्लीम समाजाला आरक्षण का असू नये यावर बोलताना पूजनीय बाबासाहेब असे म्हणाले होते की, मुस्लीम समाज 700 वर्षे सत्तेत होता व खिश्चन समाज 200 वर्षे सत्तेत होता, त्या धर्माच्या लोकांना आरक्षणात आणण्याची गरज नाही. जवाहरलाल नेहरू यांनीसुध्दा... त्यांच्या नातसूनबाई काय करतात, ते मला सांगायचे नाही. परंतु जवाहरलाल नेहरू यांनीसुध्दा धर्माच्या आधारावर आरक्षण देऊ नये, असे म्हटले होते. त्यांच्या आदर्शावर चालणाऱ्यांना हे माहीत आहे की नाही याची मला कल्पना नाही. सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील बोलल्यामुळे या गोष्टीचा मी उल्लेख केला, अन्यथा मी उल्लेख करणार नव्हतो. याबाबत मी सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांना धन्यवाद देऊ इच्छितो. सच्चर समितीची गरज काय ? गोपाल स्वामींच्या कमिशनला 25 वर्षे झाली, ते आपण टेबल केले का ? याबाबतची माहिती आपण विद्वान लोकांना विचारा. याची आपणांस गरज का पडली ? हासुध्दा प्रश्न आपण विचारावा. सच्चर साहेबांनी 13 राज्यांचा दौरा केला.

श्री.उल्हास पवार : त्यावेळी त्या कमिशनमध्ये रफिक झकेरिया होते, तो संपूर्ण अहवाल शासनाला सादर झालेला आहे. अशाचप्रकारे वातावरण निर्मिती करुन अनेक मंडळींनी देशामध्ये वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न केला, म्हणून तो टेबल झालेला नाही. शासकीय विद्वान मंडळींनीही त्यामध्ये अडथळे निर्माण केले होते. माझ्याडे याबाबतची माहिती आहे. याठिकाणी चुकीचे रेकॉर्ड होऊ नये, म्हणून मी बोलत आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, हे काय चालले आहे ? त्यांची भाषणे आम्ही शांतपणे ऐकली. प्रत्येक गोष्ट आपणांस का लागत आहे ? आमच्या भाषणांच्यावेळी आपण मुद्दामहून का अडथळा निर्माण करीत आहात ?

..2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : मी मघाशीच सांगितले की, जे अयोग्य असेल ते काढून टाकण्यात येईल व योग्य असेल ते ठेवले जाईल.

श्री.नितीन गडकरी : आपण शपथ घेता, मग आपणांस एखादया गोष्टीची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने आपल्यामध्ये ताकद नाही का ? आपलेच सरकार कमकुवत आहे, ते काम करण्यास लायक नाही का ?

श्री.विनोद तावडे : माननीय उल्हास दादांना असे म्हणावयाचे असेल की, त्योवळी जनतेचा असा दबाव आला की सरकारला ते आणता आले नाही, तसे आपण म्हणा, त्यास आमची हरकत नाही. सच्चर समितीने जे काही दिलेले आहे, त्यांनी विविध विभागाकडून माहिती मागविली, काही शिष्ट मंडळेही त्यांना भेटली, सच्चर साहेब, 13 राज्यांमध्ये जाऊन आले. खरे म्हणजे, हा काही ऑथेंटीक असा टाटा इन्स्टिटयूटसारखा किंवा अभ्यासपूर्ण रिपोर्ट नाही. परंतु काँग्रेसला आपले गिरेबानमे झांकने के लिए पर्याप्त है इतकाच अहवाल त्यांनी दिलेला आहे. सच्चर समिती नेमत असताना, दलित, आदिवासींची अवस्था मुस्लिमांपेक्षाही अधिक भयानक आहे, त्यामध्ये ही घुसखोरी करण्याचा प्रयत्न चाललेला आहे, त्याला आमचा विरोध आहे. माननीय गृहमंत्री, श्री.आर.आर.पाटील येथून बाहेर का गेले, ते मला कळले नाही, असो. त्यामध्ये घुसखोरी करु नका, असे डॉ.बाबासाहेबांनी सांगितलेले आहे.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, याठिकाणी पुन्हा पुन्हा डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे नांव घेऊन चुकीचे बोलले जात आहे, ते आपण तपासून घ्यावे व सन्माननीय सदस्यांना असे बोलण्यापासून थांबवावे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, माझा सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांच्या बोलण्यावरच हरकतीचा मुद्दा आहे.

**सभापती** : कृपया सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांना मी सांगू इच्छितो की, मी आपणांस बोलण्यास परवानगी दिलेली नाही.

..3....



SSP/ D/ MAP/ MMP/ पूर्वी श्री.अजित.... 19:25

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, सभागृहामध्ये एखादा असंसदीय शब्द बोलला किंवा आक्षेपार्ह काही बोलले तर तो शब्द किंवा वाक्य काढून टाकण्याचा आपल्याला अधिकार आहे. परंतु एखादा सदस्य जर व्हयू पॉईंट मांडत असेल व आपल्याला तो मान्य नसेल तर आपल्या भाषणांमध्ये आपण तो दुरुस्त करा. परंतु याठिकाणी बोलूच नका असे जर आपण म्हणणार असाल तर ते योग्य नाही. आपण लोकशाही मानता. मग, अशाप्रकारे वारंवार आक्षेप का घेत आहात ? आपल्याला काही गोष्टी चालणार नसतील तर त्या आम्ही मांडावयाच्या नाहीत का ?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, पूजनीय बाबासाहेब आंबेडकरांचे नांव घेण्याचा ठेका फक्त त्यांनीच घेतला आहे का ? डॉ.बाबासाहेबांनी पुस्तके लिहिलेली आहेत. सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील साहेब, आपणच मला त्यांचे एक पुस्तक वाचायला दिले होते. त्यातील अनेक गोष्टी मी आपल्याला दाखवलेल्या आहेत, त्या आपण सोयीस्करपणे विसरल्यासारखे वाटते, त्या विसरण्याच्या दृष्टीने आपल्याला कुठूनतरी इशारा वगैरे झाला असेल.

नंतर श्री.रोझेकर...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे........

सच्चर समितीच्या अहवालामध्ये जी काही गोलमोल आकडेवारी आली त्यामध्ये भारतीय जनता पक्षप्रणीत सरकारे ज्या प्रांतात आहेत त्या ठिकाणी मुस्लिमांचे चित्र चांगले आहे, असे आले आहे. त्यामुळे आमच्यामुळे काही कमी होते, असे जे तावातावाने बोलणे चालू होते त्यांना खरे चित्र कळेल, मुस्लिम समाजालाही कळेल की, कोणाचे राज्य आले तर आपले भले होते, कोणाचे राज्य आले तर अहित होते. ज्यावेळी ज्येष्ठ नेते श्री.मुरली मनोहर जोशी हे केंद्रात मानव संसाधन मंत्री होते त्यावेळी पहिल्यांदा त्यांनी मदरशांना कॉम्प्युटर देण्याचे काम केले, स्वातंत्र्य मिळून साठ वर्षे झाली, कॉम्प्युटर येऊन 10/15 वर्षे झाली, कोणालाही हे सूचले नव्हते, ते आम्हाला सूचले, हे आपल्याला मान्य केलेच पाहिजे. त्यामुळे हा जो आरोप होतो की, आम्ही कुठेतरी प्रतिगामी आहोत, मुसलमानांच्या विरोधात आहोत, सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांना मी सांगू इच्छितो की, तसलिमा नसरीनला संरक्षण कोणी दिले ? राजस्थानच्या मुख्यमंत्र्यांनी संरक्षण दिले तथाकथित कम्युनिस्टांनी पळवून लावलं. प्रतिभा स्वातंत्र्य, सर्वधर्मसमभाववाल्यांनी संरक्षण दिले ? दिले नाही. त्यामुळे आमचे थोडे कौतुक करा. भाजपाचे लोक, विशिष्ट प्रकारचे लोक हे विरोध करतात, पण तसे नाही. सच्चर समितीने म्हटले आहे की, हिंदुंनी मुसलमानांना अंतर दिलं असं कुठेही घडलेलं नाही. त्यांचे म्हणणे आहे की, प्रशासन व शासनाने हे केले आहे. जाणुनबुजून अल्पसंख्यांक, जाणूनबुजुन मायनॉरिटी दाखविली जाते, पण असे नाही. सच्चर समितीने असे साफसाफ म्हटले आहे आणि त्यातून खरे म्हणजे आपण आपले आत्मपरीक्षण करण्याची गरज आहे. सच्चर समितीच्या अहवालामध्ये मात्र एक गोष्ट चिंताजनक आहे. विविधतेमध्ये एकता ही दिसली पाहिजे आणि अनेकतेमध्ये एकता दिसत नाही कारण त्यात मुसलमान नाहीत. त्या एकतेमध्ये मुसलमान दिसत नाहीत म्हणून चिंतित होणार असाल पण मुसलमान असेल, पारशी नसेल, ज्यू नसेल तर ती अनेकतेतील एकता आहे काय ? त्याबद्दल सच्चर काही बोलले नाहीत. बाकी जे मुसलमान समाज मागे पडला आहे, पुढे आला पाहिजे, याबाबतीत वास्तव आले आहे त्याबाबत आम्ही सहमत आहोत. परंतु, अनेकतेमध्ये मुसलमान दिसत नाहीत, भारतामध्ये मुसलमान दिसत नाहीत ? भारताने भारतीय नागरिकाचे प्रभुत्व मान्य केले आहे. मुसलमान किंवा हिंदुंचे नाही, मग सच्चर असे का म्हणतात आणि या म्हणण्याला तुमचा पाठिंबा आहे काय ? हे स्पष्टपणे मांडले

....2..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे..........

पाहिजे. सभागृह नेते यासाठी हवे होते, पण ते पळ काढून गेले. भारतात प्रभुत्व हे भारतीय नागरिकाचे असेल, भारतीय संविधानामध्ये असेल. त्यामुळे इलेक्शनमध्ये मुसलमानांना किती तिकीटे देतात त्यावर निवडणूक आयोग तुमच्या पक्षाची मान्यता ठरविणार, हे काय आहे ? या गोष्टी मान्य होणार आहेत काय ? या गोष्टीला मान्यता दिली तर स्थिती कुठे जाईल ? उत्तर प्रदेशमध्ये ग्रीन लॅण्डची मागणी झाली ना त्याकडे आपण सरकू शकतो. एका विशिष्ट समाजाला मेनस्ट्रिमपासून विभागण्याची प्रक्रिया सुरु करु शकता. म्हणून मला आवाहन करावयाचे आहे की, महाराष्ट्र हे पुरोगामी राज्य आहे, सुधारणावादी गोष्टी मुस्लिम समाज सुधारक समितीचे हमीदभाई असतील सय्यदभाई असतील यांनी मुस्लिमांमध्ये सुधारणा घडवून आणण्याचे काम केले आहे. त्यांचे पुतणे काय करतात याबाबत मी जास्त बोलणार नाही कारण ते आता सभागृहात नाहीत. या सर्वांनी ही पुरोगामी मुसलमान चळवळ पुढे आणली. तामिळनाडू आणि आंध्र प्रदेशमध्येही अशाप्रकारचा प्रयत्न झाला होता. गोव्यामध्ये समान नागरी कायदा आणला गेला, तेथे मुसलमानांनी तक्रार केली नाही. गरज आहे ती महाराष्ट्राला पुरोगामी पद्धतीने पुढे नेण्याची. या समाजाला मेनस्ट्रिमनपासून वेगळे काढून आरक्षणाचा हक्क असणा-या दलित समाजामध्ये घुसवून समाजात दुही निर्माण करीत आहात. या पद्धतीने विचार केला तर पुरोगामी महाराष्ट्राला आपण बदनाम करीत आहात म्हणून माझा या गोष्टीला विरोध आहे.

यानंतर श्री.बोरले.........

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषाताई दराडे.....

हीही परिस्थिती आम्ही वर्तमानपत्रातून म्हणजे मिडियातून पाहिलेली आहे. आणि म्हणून मला एकच म्हणावयाचे आहे की, अल्पसंख्यांकांना त्यांच्या महिलांसकट ख-या अर्थाने घटनेच्या सर्व तरतुदींप्रमाणे मेन स्ट्रीमधमध्ये आणण्यासाठी आपण जाणीवपूर्वक प्रयत्न करावा आणि मी या ठिकाणी सदर प्रस्तावाला मी माझा पाठिंबा व्यक्त करुन मला बोलण्यासाठी संधी दिली त्याबद्दल मी धन्यवाद देते व माझे दोन शब्द पूर्ण करते.

------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण ( मुंबई स्थानिक प्राधिकरण ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी ज्याप्रमाणे गुजरात राज्याची आठवण करुन दिली त्याप्रमाणे काश्मीर घाटीतून हिंदू स्त्रियांना हाकलून लावले व सांगितले की, फक्त 14 वर्षावरील आणि 48 वर्षाखालच्या स्त्रियांना येथे ठेवण्यात यावे, कारण त्यांच्या उघडया जांघां तुम्ही आमच्या उपभोगासाठी आहात,असे त्यांना म्हणून त्या स्त्रियांना ठेवण्यात आले होते,त्यांच्यासाठी आपल्या येथे नकली अश्रू सुध्दा ढाळले गेले नाहीत म्हणून कृपा करुन आपण या विषयाला हात घालू नका कारण त्याला विरोध करण्यासाठीच आम्ही उभे आहोत. वाटल्यास या विषयावरील संपूर्ण प्रोसिडिंग काढून बघावे त्यामध्ये सन्माननीय सदस्य श्री.पाशा पटेल यांनी आपल्या संपूर्ण भाषणात कोठेही सच्चर आयोगाला पाठिंबा दिलेला नाही. कॉंग्रेसने गेल्या 60 वर्षात मुसलमनांना मतांसाठी कसे उल्लू बनविले याची त्यांनी माहिती दिलेली आहे.....अडथळा..... सभापती महोदय,मला बोलू द्या.

( गोंधळ )

( सत्ताधारी बाकावरील सर्व सन्माननीय सदस्य एकाच वेळी उभे राहून बोलण्याचा प्रयत्न करतात.)

**सभापती** : कृपा करुन शांतता राखावी.

श्री.मधुकर चव्हाण : माननीय सभापती महोदयांनी मला बोलण्याची संधी दिलेली आहे, यावरील निर्णय माननीय सभापती घेतील. सभापती महोदय,मला बोलू द्या.

( गोंधळ )

श्री.मधुकर चव्हाण : कोणत्या सन्माननीय सदस्यांनी बोलावे, वा कोणत्या सन्माननीय सदस्यांनी बोलू नये, याचा निर्णय माननीय सभापती घेतील ? आपण सभापती आहात का ?

( गोंधळ )

श्री.सुरेशदादा देशमुख : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.पाशा पटेल सांगतील की, त्यांचा सच्चर समितीच्या शिफारशी लागू करण्यासाठी विरोध आहे की पाठिंबा आहे. श्री.पाशा भाई, बोला ना, आपण सुध्दा लातूरचे आहात, पाशाभाई बोला ना ! 50,000 लोकांना काय उत्तर देणार तुम्ही ?

श्री.जैनुद्दीन जव्हेरी : पाशा भाईने बोलना चाहिए! पाशाभाई! बोलो ना. सभापती महोदय, इसके उपर अभि आपही निर्णय दिजिये.

.....3





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : या सभागृहामध्ये कोणत्या सन्माननीय सदस्यांनी कोणते विचार मांडावयाचे, ते सांगण्याचे काम सभापतींचे नाही. सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी आपले विचार व्यक्त करावे.यापुढे मी कोणाच्याही हरकतीच्या मुद्दयाला परवानगी देणार नाही.

श्री.मधुकर चव्हाण : माननीय सभापती महोदय, या ठिकाणी आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल मी आपले आभार व्यक्त करुन माझे भाषण पाच मिनिटात संपवितो.

या ठरावामध्ये असे लिहिले आहे की, मुस्लिम समाजामध्ये एकंदर मुस्लिम स्त्रियांच्या शिक्षणाचे प्रमाण खालविलेले आहे. अलाहाबाद हायकोर्टात 70 वर्षाच्या एका मुस्लिम भगिनीने तिच्याविरुध्द घटस्फोटाचा निर्णय दिला, म्हणून त्या मुस्लिम स्त्रीने सुप्रिम कोर्टात याचिका दाखल केली आणि न्यायमुर्ती श्री.चंद्रचूड साहेबांनी असा निर्णय दिला की, मुस्लीम स्त्रियांना घटस्फोटानंतर अथवा तिच्या मागणीनुसार पोटगी दिली पाहिजे. सरकारनेही त्यावेळी या लोकांना मुख्य प्रवाहात आणले गेले पाहिजे, अशा प्रकारे भाषा केली होती. प्रवाहात आणायचयं ना ताई मग राजीव गांधींनी घटना बदलून मुस्लिम महिलांना 14 व्या शतकात ढकलण्याचा प्रयत्न केला व मतांचे लांगुलचालन केले, त्यावेळेला मुख्य प्रवाहाची भाषा का केली गेली नाही ? या ठिकाणी जे धारिष्टय श्रीमती इंदिरा गांधींनी केले नाही, स्व.जवाहरलाल नेहरु, मा.चरणसिंगांनी जे धारिष्टय केलेले नाही, स्व.राजीव गांधींनी केलेले नाही ते धारिष्टय माननीय पंतप्रधान श्री.मनमोहन सिंग यांनी केले आणि संरक्षण मंत्री श्री.प्रणव मुखर्जी यांनी सैन्यामध्ये किती टक्के अल्पसंख्यांक आहेत, याचा आकडा दिला, त्याची बोंबाबोंब झाली. जगाच्या पाठीवर कोठेही, कोणत्याही सैन्यामध्ये कोणत्या जातीचे, कोणत्या धर्माचे किती लोक आहेत, हे कोणीच व कधीच सांगू दिले नाही, हे मताचे लांगुलचालन नाही ? खरे तर स्व.इंदिरा गांधींनी त्यांच्या मंत्रिमंडळामध्ये मुस्लिमांचे हित जपण्यासाठी वेगळा मिनिस्टर नेमला नाही. बॅ.अंतुले साहेबांना वेगळी मिनिस्ट्री सांभाळण्यासाठी त्या ठिकाणी देण्यात आली होती.

सभापती महोदय, स्व.बाबासाहेब आंबेडकरांचा वारंवार उल्लेख केला जातो, त्यांनी आपल्या समाजाला एक घोषणा दिली की, "शिका, संघटित व्हा, आणि संघर्ष करा" आणि त्याही वेळेला घटना समितीच्या वेळी घडलेला एक प्रसंग मी आपल्याला सांगतो. त्यावेळेला घटना समितीची बैठक चालली होती. बैठकीनंतर चहापानाच्या वेळेस घटनेत दलितांसाठीचे रिझर्व्हेशनचे कलम समाविष्ट करण्यासंबंधी स्व.राजेंद्रप्रसाद यांनी डॉ.आंबेडकरांना विचारले की,

यानंतर श्री.गागरे....

अमुद्रित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण .....

"आपने तो कुछ समय के लिए आरक्षण रखा है" दलित बांधवाना काही काळाकरिता आरक्षण ठेवणे आवश्यक होते. 2000 वर्षासाठी आरक्षण ठेवले असते तरी चालले असते. कारण आमच्या पूर्वजांनी दलितांना जनावरासारखे वागविले आहे. डॉ.आंबेडकर संरक्षण व आरक्षणाबद्दल असे म्हणाले की, "मला माहिती आहे की, समाजामध्ये एक प्रिव्हिलेज क्लास असा होता की, त्या वर्गाने माझ्या वर्गाच्या गळयात गाडगी, मडकी बांधली आणि सावलीसुध्दा पडू दिली नाही. इतकी अमानुष वागणूक दिली. त्यांना विशेष अधिकार मिळण्यासाठी मी भांडत आहे. हे अधिकार मी तहहयात जर कायम ठेवले तर माझा समाज प्रिव्हिलेज क्लास होईल आणि समाजा-समाजामध्ये वर्गसंघर्ष निर्माण होईल". म्हणून त्या ठिकाणी दलित बांधवांना सवलत देण्याचे काम त्यांनी केले परंतु दर दहा वर्षांनी रिव्हीजन करण्यास सांगितले. या सवलती दिल्या पाहिजेत कारण त्यांचा फार छळ झालेला होता. घटनेमध्ये धर्माच्या आधारावर कोठेही आरक्षण नाही. मुस्लिम आर्थिकदृटया मागासलेले आहेत, असे म्हणतात. त्यांना कोणी मागास ठेवले ? त्यांना कोणी कॉलेजमध्ये जायला सांगितले नाही ? माननीय सदस्यांनी जे भाषण केले, त्याची पुनरावृत्ती मी करीत नाही. मी 2-3 मुद्दे मांडून माझे बोलणे संपवितो. आपल्या देशातील जमीनीचा ॲव्हरेज सांगतो. राजस्थानमध्ये प्रत्येक मुस्लिम कुटुंबामध्ये 3.33 हेक्टर जमीन आहे तर हिंदुकडे 2.73 हेक्टर आहे. गुजरातमध्ये मुस्लिमांकडे 1.46 हेक्टर जमीन असून हिंदूंकडे 1.48 टक्के आहे. बंगालमध्ये मुस्लिमांकडे .33 हेक्टर जमीन आहे तर हिंदूकडे .31 आहे. केरळमध्ये मुस्लिमांकडे .59 हेक्टर एकर जमीन आहे तर हिंदूकडे 1.52 हेक्टर आहे. माननीय पंतप्रधानांनी त्यांच्या पहिल्या भाषणात सांगितले आहे की, या देशातील 15 टक्के बजेट आणि सर्व साधनसामुग्री मुस्लिम समाजासाठी हवी आहे. या देशाचे बजेट 2 लाख कोटी रुपयांचे आहे. मुस्लिम समाजासाठी बजेट ठेवायचे असेल तर 31 हजार कोटी रुपये ठेवावे लागतील. नंतर या ठिकाणी मुस्लिमांच्या सुरक्षिततेसंबंधी विषय आलेला आहे. सध्या खरा सुरक्षेचा प्रश्न हिंदूचा झालेला आहे. काश्मिर, बिहार, आसाम, बंगाल येथील हिंदू असुरक्षित आहेत. माननीय सदस्यांनी आताच सांगितले आहे की, हा एकमेव देश असा आहे की, या देशातील राष्ट्रपती मुस्लिम होऊ शकतात. या देशातील न्यायाधिश मुस्लिम होऊ शकतात. हिदायतुल्ला

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PNG/ D/ MAP/

श्री.मधुकर चव्हाण .....

सरन्यायाधिश होतात, मुहम्मद हे गव्हर्नर होऊ शकतात. म्हणून मला असे वाटते की, मुस्लिम समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी कोणी बंधन घातलेले आहे का ?. मस्जीद हे त्यांचे पवित्र स्थान आहे, मी त्याचा उल्लेख करीत नाही. मी घटना व समाज अधिकाराचा वेगळा उल्लेख करीत आहे. या देशात काही घटना घडलेल्या नाहीत. युसुफ पटेल यांच्या नेतृत्वाखाली आझाद मैदानावरील आंदोलनात हिंदुस्थानच्या विरोधात मुस्लिमांनी घोषणा दिल्या आहेत. त्यावेळी कोणी काही बोलले नाही. माननीय सदस्यांनी बाबरी मस्जीदचा उल्लेख केला. बाबरी मस्जीद तेथे नव्हती असे आयोध्येच्या मुसलमान मंडळीने सांगितले. त्यांनी सांगितले की, जबरदस्तीसे कब्जा किए हुए जमीनपर नमाज पढा नही जाता, वो अल्लातालाह को मंजूर नही है. जमीन नापाक होईल म्हणून मंजूर नाही. तेथे मंदिर बांधू नका म्हणून सांगितले जाते. तेथे आम्ही दंगली केल्या नाहीत. सभापती महोदय, मला असे वाटते की, या देशातील कोणतेही धर्मस्थळ वैभवसंपन्न व सुशोषित करण्यास काही हरकत नाही. मुंबई शहरात आपण सर्व राहातो. एखाद्या झोपडपट्टीमध्ये मुस्लीम समाज जास्त असेल तर तेथे मार्बल लावलेल्या मस्जीद असतात. त्याच पैशाने त्यांच्यासाठी शाळा, दवाखाने, कॉलेज, हॉस्पीटल काढून त्यांची उन्नती का करीत नाही ?. त्यांना धर्मांधतेचे शिक्षण दिले जात आहे. मला असे म्हणवयाचे आहे की, धर्माच्या आधारावर सच्चर लिहिले आहे. सच्चर यांनी मंडल आयोगाचे सचिवपद भुषविले होते. त्यांच्याबाबत वर्तमानपत्रात लेख आलेला आहे की, सरकार और सच्चर दोनो झुटे है. गिल नावाचे आय.ए.एस. अधिकाऱ्याचा मी याबाबत उल्लेख करीत आहे. या देशामध्ये धर्माच्या आधारावर दलित बांधव, ओबीसी, मागासवर्गीय यांना वर्षानुवर्षे अमानुष वागणूक दुर्दैवाने आमच्या हिंदू समाजामध्ये दिली होती. शेवटी एक मुद्दा सांगतो की, हिंदू समाजाला गंगेच्या पाण्याची गतिमानता आहे, तो डबक्यासारखा नाही. याला ऋतूची विविधता आहे. सतीची चाल बंद होताना आम्ही त्याला विरोध केला नाही.

यानंतर कु.धनश्री......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DVG/ MAP/ KTG/ 19:50

श्री. मधुकर चव्हाण.....

सभापती महोदय, आणखी एक शेवटचा मुद्दा मी येथे सांगू इच्छितो. काळया रामाच्या मंदिरामध्ये, माणूस म्हणून दर्शन घेण्याचा मला अधिकार आहे असे श्री. बाबासाहेब आंबेडकर यांनी सांगितले. मंदिरावर शेण उडवा असे त्यांनी सांगितले नाही. चवदार तळयाचे पाणी पिण्याचा मला अधिकार आहे, त्या तळयामध्ये घाण घाला असे त्यांनी सांगितले नाही. मला असे वाटते की, धर्माच्या आधारावर कोठल्याही प्रकारच्या सवलती दिल्या जाऊ नयेत. मुख्य प्रवाहामध्ये त्यांना सामावून घेतले जावे. अल्प संख्यांकांचे कोणीच नाही. धर्माच्या आधारावर पाकिस्तान निर्माण झाल्यानंतर भारतामध्ये जे स्थायिक झाले ते भारतीय आणि हिंदुस्तानी आहेत. धर्माच्या आधारावर कोणत्याही सवलती देण्यात येऊ नयेत. भारतीय जनता पक्षाचा सच्चर आयोगास स्पष्टपणे विरोध आहे. एवढे बोलून मी माझे भाषण संपवतो.

...............

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..2...

श्री. नितीन गडकरी ( नागपूर विभाग पदवीधर ): सभापती महोदय, मुस्लिम समाजाच्या प्रगतीच्या दृष्टीने हा ठराव सभागृहात मांडण्यात आला आहे. त्या विषयावर बोलण्याकरीता मी येथे उभा आहे.

खरे पाहता, या ठरावाची अंमलबजावणी हा विषय केंद्र सरकारचा आहे. राज्य शासनाने याबाबत काही करावयाचे नाही. परंतु सवयीप्रमाणे मतांचे राजकारण करण्याकरिता, विशेषत: मायावतींचा हत्ती काँग्रेसच्या पिकामध्ये जोरात निघाला आहे, त्यातून मुस्लिम आणि दलितांचे पीक वाचविण्याकरीता हा केविलवाणा प्रयत्न या ठरावाच्या रुपाने काँग्रेस पक्षाने केलेला आहे. वेळ कमी असल्यामुळे मी येथे फक्त महत्वाच्या मुद्यांवरच बोलणार आहे. मुस्लिम समाजाच्या विकास करताना, काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्यांनी वक्फ बोर्डाच्या ज्या जमिनी हडप केल्या आहेत त्या तरी कमीत कमी त्यांना परत कराव्यात. त्या जमिनीवर इंजिनिअरिंग, पॉलिटेक्निक किंवा मेडिकल कॉलेजेस सुरु करावीत. 24 रुपये चौरस फूट या दराने आपण मस्जिद देखील विकून टाकली आहे. माननीय मुख्यमंत्री देखील आता येथे सभागृहामध्ये उपस्थित आहेत. आपण सांगितले होते की, यासंदर्भात हाय कोर्टच्या जजकडून चौकशी करण्यात येईल. परंतु आपण जिल्हा न्यायाधीश श्री. ए.टी. शेख यांची नियुक्ती केली आहे त्यांचा वकालतनामा मी आपणास वाचून दाखवतो. एक शिष्टमंडळ त्यांना जाऊन भेटले. त्यांनी दिलेला हा वकालतनामा सही सहीत आहे. अधिसूचनेद्वारे शासनाने वक्फ प्रकरणी चौकशी करण्याकरिता सेवानिवृत्त न्यायाधिश श्री. ए.टी. शेख यांची नियुक्ती केली आहे. त्यांचे मुख्यालय औरंगाबाद येथे निश्चित करण्यात आले आहे. मागील आठवडयामध्ये वक्फ बोर्डाची बैठक झाली असता, वक्फ बोर्ड मंडळातील सदस्य तेथे आले असता त्यांना उपरोक्त आयोगाचे नियुक्तीबाबत काही शिष्टमंडळ भेटावयाला आले. त्यांनी असा वकालतनामा सादर केला आहे. त्यामध्ये असे म्हटले आहे की, श्री. शेख हे सध्या वकिली व्यवसाय करत आहेत. त्यांनी औरंगाबाद येथील वक्फ बोर्डाची मालमत्ता हडप करण्याबाबत ज्यांच्यावर आरोप आहेत असे श्री. अग्रवाल व श्री. चितलांगे यांचा वकालतनामा घेतला असून ते प्रकरण वक्फ न्यायाधिकरण,औरंगाबाद येथे चालू आहे. सभापती महोदय, ज्यांनी वक्फच्या जमिनी हडप केल्या त्यांची वकालत करणाऱ्या माणसाला आपण न्यायाधीश म्हणून नियुक्त केले आहे. माझ्याजवळ हा वकालतनामा आहे.

..3...



DVG/ MAP/ KTG/ 19:50

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विलासराव देशमुख : सभापती महोदय, मंत्रिमंडळाने निर्णय घेतला त्याप्रमाणे उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधिशांना पत्र पाठविण्यात आले. मुख्य न्यायाधिशांनी हे नाव शासनाला सुचविले व त्याप्रमाणे शासनाने ऑर्डर काढली आहे. मुख्य न्यायाधिशांनी एखादे नाव सुचविल्यानंतर त्याबाबत खुलासा विचारण्याची शासनाला आवश्यकता नाही. ही नियुक्ती जर शासनाने केली असती तर आपला जो आरोप आहे त्यासंदर्भात आम्ही उत्तर दिले असते. यासंदर्भामध्ये आणखी काही माहिती आपणाकडे असेल तर त्यांनी ती न्यायालयासमोर मांडावी.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माझ्या माहितीप्रमाणे, हायकोर्टमध्ये अशी पद्धत आहे की, मुख्य न्यायाधीश तीन नावे शासनाला सुचवितात व त्यातील एक नाव शासनाला निश्चित करावयाचे असते. ही गोष्ट कदाचित नजरचुकीने झाली असेल. माझ्याकडे पुरावा आहे की, श्री. चितलांगे आणि श्री. अग्रवाल यांनी वक्फ बोर्डाची जमीन हडपली आहे. त्यांच्या वकालतनाम्यावर श्री. शेख यांची सही आहे. सन्माननीय मुख्यमंत्री श्री. विलासराव देशमुख, आपण असे मानले की, आपल्याला याबाबत काहीही माहिती नाही. तरीही मी आपणास सांगू इच्छितो की, यासंदर्भात निवृत्त हायकोर्ट न्यायाधीशांची नियुक्ती करु असे आश्वासन आपण आम्हाला दिले होते. या वकालतनाम्याचा पुरावा मी आपल्याकडे सादर करीत आहे. या वकालतनाम्याच्या आधारावर हायकोर्टला श्री. शेख यांची नियुक्ती रद्द करण्याची शिफारस आपण करावी. तसेच या प्रकरणी निवृत्त हायकोर्टच्या न्यायाधिशांची नेमणूक करावी. सभापती महोदय, जो मनुष्य वक्फ बोर्डाच्या जमिनी हडप करणाऱ्यांचे वकीलीपत्र घेत आहे, तो माणूस कशी चौकशी करणार आहे ? त्यांची नियुक्ती करणे योग्य होणार नाही. तेव्हा हायकोर्टकडे आपण शिफारस करुन श्री. शेख यांची नियुक्ती रद्द करावी आणि निवृत्त हायकोर्ट न्यायाधीशांची नियुक्ती करावी अशी माझी मागणी आहे.

सभापती महोदय, मुस्लिम समाजाला कॉंग्रेस आणि राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाने काय दिले आहे ? चहाची टपरी, पानाचा ठेला, ट्रक ड्रायव्हर, क्लिनर याशिवाय दुसरा धंदा त्यांना मिळवून दिलेला नाही. सन्माननीय सदस्य श्री. अनिस अहमद साहेब येथे बसले आहेत. मी आपणास सांगू इच्छितो की, नागपूरचा पालक मंत्री असताना,मी अंजुमन इस्लाम हे इंजिनिअरिंग कॉलेज तेथे सुरु केले.

यानंतर श्री. सुंबरे....

अप्रसिद्ध प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

KBS/D/MAP/KTG. कु. गायकवाड नंतर --- 19:55

श्री. गडकरी ....

माझी तुम्हाला विनंती आहे की, मुस्लिम समाजातील गरीब लोकांची प्रगती झाली पाहिजे याबद्दल दुमत नाही, पण मग तुम्ही जे मौलाना अबुल कलाम आझाद अल्पसंख्यांक विकास महामंडळ काढले आहे त्यासाठी किती पैसे दिले ? मी राष्ट्रवादी कॉंग्रेसला 'राष्ट्रद्रोही कॉंग्रेस' असे म्हटले तेव्हा आमचे काही मित्र माझ्यावर फार नाराज झाले. ज्या व्यक्तीने आपल्या देशाच्या पार्लमेंटवर हल्ला करण्यासाठी मास्टर माईंड केले तो अफझल गुरू, त्याची फाशीची शिक्षा माफ करावी म्हणून त्या पक्षाचे नेते, जनरल सेक्रेटरी राष्ट्रपतींकडे मागणी करतात. आपल्या शूर जवानांनी तेथे बलिदान केले त्यांच्या बहिणींनी त्याना दिलेली सोन्याची पदके देखील याच कारणामुळे फेकून दिली, परत घ्या म्हणाल्या. आणि असे असतानाही अजून पर्यंत त्या अफझल गुरूची फाशीची शिक्षा माफ करा असे आपण म्हणता, तर मग तुम्हाला काय म्हणावे ? मुंबई बॉम्बस्फोटातील आरोपींचे वकील असणारे माजिद मेमन यांना तुम्ही ऑल इंडिया जनरल सेक्रेटरी केले. कशासाठी हे आपण केले ? तेव्हा आपल्याला मुस्लिम समाजाचा विकास करावयाचा असेल तर जरूर करा. समाजातील प्रत्येक गरीब, शोषित, पीडित माणसाला विकासाचा न्याय मिळाला पाहिजे. परंतु मतपेटीच्या राजकारणासाठी तुष्टीकरणाची नीती अवलंबून तुम्ही राष्ट्रीय मुद्यांवर जी तडजोड करता ती बरोबर नाही, ती आम्हाला पटत नाही. देशमुख साहेब, तुमचे लीडर श्री.गुलाम नबी आझाद यांनी राष्ट्रपतींना पत्र लिहिले आणि त्यांना सांगितले की, अफझल गुरूची फाशीची शिक्षा माफ करा. सभापती महोदय, आम्ही आणि शिवसेना मुसलमानांच्या विरोधात असतो तर श्री.अटलबिहारी बाजपेयी आणि श्री.बाळासाहेब ठाकरे ज्या एनडीएमध्ये आहेत त्या एनडीएने या देशातील एक श्रेष्ठ वैज्ञानिक डॉ.अब्दुल कलाम यांना हिंदुस्थानचे राष्ट्रपती कसे केले असते ? तेव्हा आम्ही मुसलमानांच्या विरूद्ध नाही. आम्ही आयएसआयच्या विरूद्ध आहोत. आम्ही तुष्टीकरणाच्या नीतीच्या विरोधात आहोत. सभापती महोदय, कॉंग्रेसच्या मनात आजही मुसलमानांच्याबद्दल प्रेम नाही, वापरा आणि फेकून द्या अशीच त्यांच्याबद्दल आमच्या समोरच्या मित्रांची नीती आहे. सभापती महोदय, मी नागपूरला ज्या भागामध्ये, ज्या वॉर्डामध्ये राहतो त्या भागात साडेचार हजार मुस्लिम राहतात. त्यांना आपण विचारून घ्यावे, मी कट्टर आरएसएस वाला आहे. आपण कधीही आमच्या भागात या आणि पहा, आमचे सारे मतदार हे मुसलमान आहेत. सभापती महोदय, मला आमच्या समोरच्या मित्रांना एवढेच सांगावयाचे आहे की, मतपेटीसाठी तुम्ही मुसलमानांना वापरू नका. सरकार म्हणून

...... 5डी 2 ..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गडकरी ....

तुमच्यामध्ये काही इमानदारी असेल तर मी माननीय मुख्यमंत्र्यांना विनंती करतो की, ज्या वक्फ बोर्डाच्या जमिनी आपल्या काँग्रेसच्या, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नेत्यांनी हडपल्या आहेत त्या जमिनी ताब्यात घ्या. इंजिनिअरींग कॉलेज, पॉलिटेक्निक कॉलेज, आयटीआय, कॉम्प्युटर ट्रेनिंग इन्स्टिटट्यूट, इलेक्ट्रॉनिक वगैरेसाठी देऊन टाका. मी आपल्याला सांगतो की, तुमच्या बजेटमधून 50 कोटी रूपये त्यासाठी मंजूर करा आणि या समाजातील लाखो मुलांना तुम्ही शिकवा, इंजिनिअर करा, डॉक्टर बनवा तर तुमच्या नियतीवर कोणी संशय घेणार नाही. पण तुम्ही त्यांना इंजिनिअरींग कॉलेज देत नाहीत. रिलिजिअस, मायनॉरिटी असे आपण म्हणतो., आणि रिलिजिअस मायनॉरिटी आणि लिंग्विस्टिक मायनॉरिटीज इंजिनिअरींग कॉलेजेस घेतात, पण त्याचे काय झाले हे माहीत आहे का ? धार्मिक अल्पसंख्यांक आणि भाषिक अल्पसंख्यांक म्हणून इंजिनिअरींग कॉलेज घेतले गेले, त्यातून 90 टक्के प्रवेश आपल्या हातात घेतले आणि आपल्या धर्माच्या आणि भाषेचे सोडून, लक्ष्मीदर्शन घेऊन दणादण ॲडमिशन्स ठोकल्या. नाव मुसलामानांचे, नाव भाषिक अल्पसंख्यांकांचे मात्र लक्ष्मीदर्शन यांचे. माझी तुम्हाला या निमित्ताने विनंती आहे. सच्चर समितीचा अहवाल हा एक याबाबतीतील पुरावा आहे की, 60 वर्षामध्ये तुम्ही मुसलमानांना सामाजिकदृष्ट्या, आर्थिकदृष्ट्या कसे मागासलेले ठेवले याचा हा पुरावा आहे. म्हणून माझी आपणास एकच विनंती आहे की, या ज्या वक्फ बोर्डाच्या जमिनी आहेत त्या तुम्ही ताब्यात घ्या. 26 रूपये, 24 रूपये भावाने तुम्ही मशीद विकून टाकलीत. ही कोणती धर्मनिरपेक्षता आहे ? आहे का कोणी यामध्ये बीजेपी, आरएसएसवाला किंवा शिवसेनेवाला की ज्याने तुमच्या मशिदी विकल्या, वक्फच्या जागा विकल्या ?

सभापती महोदय, हे जे आमच्यासमोर आमचे मुस्लिम सदस्य मित्र बसले आहेत त्यांना मी प्रश्न विचारू इच्छितो की आम्ही तुमच्या या जमिनी घेतल्या आहेत का ? उलट ज्यांनी तुमच्या जमिनी घेतल्या आहेत ते तुमच्या आजूबाजूलाच बसलेले आहेत. त्यांचा विचार करा. इंजिनिअरींग कॉलेज उघडा, पॉलिटेक्निक्स उघडा. सभापती महोदय, काय सांगावे आपल्या अंतुले साहेबांचे. परवाच्याच दिवशी राणे साहेबांच्या मुलाच्या लग्नाप्रसंगी भेटले होते. त्यावेळेस त्यांनी माझ्या पाठीवर थाप मारली आणि म्हटले की, नितीन ब्रेव्हो मॅन, गो अहेड. चांगला विषय मांडलास, पुढे हो. काय माझ ी स्थिती आहे म्हणे ? मी दिल्लीमध्ये मंत्री आहे पण माझ्या हातात काहीच नाही. दिल्लीमध्ये बिच्चारे अंतुलेही अज्ञातवासात आहेत आणि येथे आमचे मित्र अनीस अहमद यांचीही तीच अवस्था

...... 5डी 3 ...

आहे. त्यांच्या हातामध्ये कोठलीही फाईलदेखील जात नाही. कमीत कमी दिल्लीमध्ये मुस्लिम मंत्र्यांची तरी प्रतिष्ठा राहिली पाहिजे, महाराष्ट्रात राहिली पाहिजे ...

श्री. उल्हास पवार : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. सन्माननीय केंद्रीय मंत्री श्री.अंतुले साहेब सन्माननीय सदस्य श्री.गडकरी यांना लग्नसमारंभामध्ये खाजगीत काय बोलले ते येथे रेकॉर्डवर येऊ नये. ते खरोखरी बोलले की नाही हे आम्हाला माहिती नाही. पण असे काही रेकॉर्डवर येणे बरोबर नाही.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, मी या सभागृहात जे काही बोलतो आणि बोललो आहे ते माझ्या जबाबदारीवर बोललो आहे. वाटल्यास आपण त्याबद्दल अंतुलेसाहेबांना विचारू शकता.

श्री. उल्हास पवार : पण त्याबाबत खुलासा करण्यास आता येथे अंतुले साहेब नाहीत म्हणूनच माझी विनंती आहे की, असे काही रेकॉर्डवर येऊ नये आणि आल्यास ते ठेवले जाऊ नये. सन्माननीय सदस्यांना अंतुले हे काय बोलले ते त्यांनी त्यांच्या घरी ठेवावे.

**सभापती** : मी ते रेकॉर्डवरून काढून टाकतो.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, हे रेकॉर्डवरून काहीही काढू नका. मी आपल्याला जबाबदारीने सांगतो, शपथेवर सांगतो, मी कधीही खोटे बोलणार नाही. त्यांनी मला सांगितले की, मी जे केले ते योग्य आहे, पुढे जा. ते तुमच्या पक्षाचे एक नेते आहेत. ते जर म्हणाले की, मी असे बोललो नाही, तर उल्हासदादा मी आपली क्षमा मागेन आणि माझे शब्द वापस घेईन.

**सभापती** : अंतुले साहेबांच्या बाबतीतील सन्माननीय सदस्यांचे असे जे काही बोलणे आहे ते मी तपासून पाहतो आणि आवश्यक असेल तर रेकॉर्डवरून काढून टाकतो.

श्री. उल्हास पवार : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी अंतुले साहेबांचा अशा प्रकारे उल्लेख केला आहे की, ते त्यांना म्हणाले की, दिल्लीमध्ये माझी काय अवस्था आहे ? तर अशा प्रकारे ते जे बोलले आहेत ते रेकॉर्डवर राहणे योग्य नाही. कारण त्याबाबत खुलासा करण्यास अंतुले साहेब येथे उपस्थित नाहीत.

**सभापती** : मी सांगितले आहे की, मी हा भाग तपासून पाहतो आणि त्यात काही आक्षेपार्ह असेल ते रेकॉर्डवरून काढून टाकण्यात येईल.

( यानंतर श्री. सरफरे .... 5इ 1 ..

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, मी त्यांना सांगितले की, तुम्ही वक्फ बोर्डामध्ये हस्तक्षेप करा. ते म्हणाले की, माझ्याकडे काहीही अधिकार नाहीत. हे मी मुद्दाम बोलत नाही तर वर्तमानपत्रामध्ये छापून आले आहे. माननीय बॅ. अंतुले साहेबांची दिल्लीमध्ये काय परिस्थिती आहे? हे मी या ठिकाणी बोलत नाही तर ते वर्तमानपत्रात छापून आले आहे. आता उत्तरप्रदेशच्या मुख्यमंत्री माननीय श्रीमती मायावती यांचा हत्ती जोरात आहे. आणि वक्फ बोर्डामुळे मुस्लिम समाज खवळलेला आहे, दलित समाज खवळलेला आहे. हे दोन्हीही समाज आता बाहेर जात असल्यामुळे आपल्या विषयाशी संबंध नसतांना पुन्हा एकदा व्होट बँक पॉलिटिक्सकरिता हा आपला केविलवाणा प्रयत्न आहे. सभापती महोदय, यानिमित्ताने मी एवढीच विनंती करतो की, सभागृहामध्ये आज माननीय मुख्यमंत्री उपस्थित आहेत. वक्फ बोर्डाच्या सर्व मालमत्ता आपण ताब्यात घ्या, आणि मुस्लिम समाजाकरिता इंजिनिअरिंग कॉलेज, मेडिकल कॉलेज, आय.टी.आय., पॉलिटेक्निक, कॉप्युटर सायन्स शिकविण्याकरिता त्यांचा पूर्ण उपयोग करा. आणि सर्वार्थाने मुस्लिम समाजाचे आपण ईमानदारीने कल्याण करा. त्यासंबंधी आपण याठिकाणी निर्णय जाहीर करावा जे 24 रुपये भावाने मस्जिद विकतात, त्यांना मुस्लिम समाजाच्या विकासावर बोलण्याचा अधिकार नाही. ज्यांनी मुस्लिम समाजाची ईदगाह, दर्गा, कब्रस्तान, अनाथालयाच्या जागा लुटल्या त्यांनी मुस्लिम समाजाचा कळवळा दाखवू नये. महाराष्ट्रातील आणि देशातील जनतेला हा सेक्युलर भ्रष्टाचार माहिती आहे. यावर तुम्ही बोलू शकत नाही. मी आपल्याला 7/12 च्या उतारासहीत सांगितले आहे. तेव्हा आपण खऱ्या अर्थाने मुस्लिम समाजासाठी कल्याणकारी योजना राबवून दाखवाव्यात एवढी विनंती करुन माझे भाषण संपवितो.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विलासराव देशमुख ( मुख्यमंत्री ): सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती फौजिया खान सन्माननीय सदस्य सर्वश्री कपिल पाटील, अरुण गुजराती, मुजफ्फर हुसैन इत्यादी सदस्यांनी महत्वपूर्ण विषयावर या सदनामध्ये चर्चा उपस्थित केली, त्याबद्दल या सर्व सदस्यांचे मी मन:पूर्वक अभिनंदन करतो.

सभापती महोदय, या सदनामध्ये आतापर्यंत जी चर्चा झाली आहे त्या चर्चेमध्ये कुठेही राजकीय अर्थ जोडण्याचा कुणाकडूनही प्रयत्न केला गेला नाही. शेवटी दोन-तीन माननीय सदस्यांचा अपवाद सोडला तर बहुतेक माननीय सदस्यांचा चर्चेचा हेतू असा होता की, अनेक वर्षापासून शिक्षण क्षेत्रामध्ये, खाजगी क्षेत्रामध्ये किंवा आर्थिक परिस्थितीमध्ये हा वर्ग मागे राहिला आहे, त्याला आपल्याला मुख्य प्रवाहात आणले पाहिजे. याकरिता देशाच्या माननीय पंतप्रधानांनी सच्चर समिती नियुक्त केली. त्या समितीचा अहवाल एक वर्षाच्या आत आला. आणि तो संसदेच्या पटलावर ठेवण्यात आला. हा अहवाल संसदेच्या पटलावर ठेवण्यात आल्यानंतर त्यातील प्रमुख शिफारशी शासनाने मान्य केल्या. त्यामध्ये प्रामुख्याने या समाजावर वेगवेगळया क्षेत्रामध्ये जो अन्याय झाला आहे तो दूर झाला पाहिजे अशाप्रकारची भूमिका मांडण्यात आली. देशातील कोणकोणत्या जिल्हयामध्ये अल्पसंख्यांकांची संख्या अधिक आहे यासंबंधीचा त्यांनी अभ्यास केला. त्या अभ्यासानंतर देशामध्ये 90 जिल्हे असून ते अल्पसंख्यांकबहुल आहेत. त्या ठिकाणी अधिक प्रमाणात मुस्लिम समाज रहातो. त्या 90 जिल्हयांची माहिती त्यांनी अहवालात दिली आहे. महाराष्ट्रामध्ये हिंगोली, परभणी, वाशिम आणि बुलढाणा हे चार जिल्हे अल्पसंख्यांकबहुल जिल्हे असल्याची नोंद अहवालात आहे. त्याचप्रमाणे अल्पसंख्यांकबहुल लोकसंख्या असलेली 338 शहरे संपूर्ण देशामध्ये आहेत. त्यापैकी 43 शहरे महाराष्ट्रामध्ये आहेत. शहरातील ज्या भागामध्ये मुस्लिम मोठया संख्येने रहातात त्यांची नेमकी अवस्था काय आहे? त्यांची स्थिती काय आहे ? या संबंधी चर्चा करण्यात आली. आणि म्हणून हा टारगेट एरीया समजून त्या ठिकाणी सर्व योजना प्राधान्याने राबवाव्यात अशाप्रकारची शिफारस अहवालात केली आहे. विशेषत: शहरामध्ये स्वर्ण जयंती शहरी रोजगार योजना, इंदिरा आवास योजना, जवाहरलाल नेहरु नागरी पुर्ननिर्माण योजना आणि गृहनिर्माण योजना या सर्व क्षेत्रामध्ये प्राधान्याने राबवाव्यात अशाप्रकारची शिफारस केली आहे.

(यानंतर श्री. बरवड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विलासराव देशमुख ......

सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी या ठिकाणी म्हणाले. खरे म्हणजे सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांचे भाषण ऐकल्यानंतर नेमके ते काय बोलतात, कोणाबद्दल बोलतात हे बऱ्याचदा कळत नाही. त्यांनी या ठिकाणी इतका जोरदार आव आणला की जणू काही मुस्लिमाचे ते एकच कर्ते आहेत. त्यांनी सांगितले की, वक्फच्या जमिनी ज्यांना कोणाला दिल्या असतील त्या ताबडतोब काढा, इंजिनिअरींग कॉलेज काढा, 50 कोटी रुपये ठेवा. म्हणजे बजेटही तेच ठरवणार, निर्णयही तेच देणार.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. पाशा पटेल हे या सदनातील भारतीय जनता पक्षाचे अधिकृत सदस्य आहेत. त्यांनी आपल्या भावना प्रामाणिकपणे मांडल्या. त्यांनी राज्यभर फिरावे अशा पध्दतीचे आदेश पक्षाने त्यांना दिले. एवढेच नव्हे तर कालच्या मेळाव्यामध्ये त्या पक्षाचे राष्ट्रीय नेते श्री. गोपीनाथरावजी मुंडे यांनी जाऊन भाषण केले. ते भाषण सर्व वर्तमानपत्रातून आम्ही सर्वांनी वाचले. यांची नेमकी भूमिका काय आहे हे कळावयास मार्ग नाही. म्हणूनच सतत गोंधळ निर्माण करणे, वैचारिक गोंधळ तर आहेच, पण वक्तव्यामधून असा गोंधळ निर्माण करावयाचा अशी परिस्थिती आहे. एक सन्माननीय सदस्य म्हणतात की, कोणत्याही परिस्थितीमध्ये हा अहवाल सरकारने मान्य केला पाहिजे. 60 वर्षामध्ये तुम्ही काही केलेले नाही. शेवटी तुम्हाला आता आठवण झाली. त्यांचे मुद्दे योग्य आहेत. परंतु अंमलबजावणी करावी, किमान एवढे तरी करा अशा प्रकारचे आवाहन त्यांच्याच पक्षाचे सदस्य या ठिकाणी करीत आहेत आणि त्यांचे दुसरे सिनियर नेते त्यांना गप्प करीत आहेत. म्हणजे अन्याय तर होतच आहे. या ठिकाणी सगळे सन्माननीय सदस्य त्यांना म्हणत आहेत की, त्यांची नेमकी भूमिका काय आहे ते त्यांनी या ठिकाणी उठून सांगावे. त्यांनी त्यांची भूमिका व्यक्त केलेली आहे. त्यांचे भाषण रेकॉर्ड झालेले आहे. त्याची प्रत तातडीने उद्या सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी साहेबांकडे पोहोचवितो. त्यांनी ते भाषण वाचावे आणि सन्माननीय सदस्यांची नेमकी भावना काय आहे ते पहावे. शेवटी एक भूमिका ठरविली पाहिजे. सच्चर समितीच्या बाबतीत सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे असतील, सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण असतील, त्यांच्या प्रामाणिक भूमिकेचे खरे म्हणजे आपण सर्वांनी

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ KTG/

श्री. विलासराव देशमुख .....

स्वागतच केले पाहिजे. कारण त्यांचे ते खरे दात आहेत. ते दाखवण्याचे दात नाहीत. त्यांनी सांगितले की, ही आमची भूमिका आहे. ती भूमिका कोणी नाकारण्याचे कारण नाही. कारण पॉलिटिकल आयडॉलॉजीचा प्रश्न जेव्हा येतो तेव्हा त्यांची ती भूमिका ठरलेली आहे की, या देशामधील मुस्लीम समाजाचे गरीब लोक जरी असले तरी त्यांच्यासाठी तुम्ही वेगळे काही करता कामा नये. ही त्यांची सुरुवातीपासूनची भूमिका आहे. जेव्हा 60 वर्षे काही झाले नाही तेव्हा त्याचा विचार काँग्रेसनेच केला ना ? काँग्रेसच्याच माननीय पंतप्रधानांनी हा विचार केला. हा विचार इतरांनी केला नाही. त्यांनीच ही सच्चर समिती नेमली आणि तो अहवाल मागविला. त्यांनी मायनॉरिटीसाठी वेगळे खाते निर्माण केले. मी आज या ठिकाणी घोषणा करतो की, महाराष्ट्रामध्ये सुध्दा मायनॉरिटीच्या कल्याणाचा वेगळा विभाग महाराष्ट्र सरकार तातडीने निर्माण करणार आहे. त्यामध्ये भीती का वाटावी ? आपण लोकांमध्ये जी काही भूमिका रंगवू इच्छिता त्याबाबत मी सांगू इच्छितो की, ज्यांनी आम्हाला इतकी वर्षे सत्तेमध्ये बसवले त्या वर्गासाठी जर आम्ही एखादा निर्णय केला आणि त्या निर्णयामुळे जरी सत्ता सोडावी लागली तरी त्याची आम्हाला पर्वा नाही. ती प्रामाणिकता असली पाहिजे. त्यामुळे त्याची चिंता आम्ही करीत नाही. काँग्रेसने असे अनेक पराभव पचविलेले आहेत. त्याची चिंता आम्ही कधी करत नाही. शेवटी त्या वर्गाला न्याय देण्याचा निर्णय एकदा तुम्ही केल्यानंतर प्रत्येक निर्णयाचे मूल्यमापन मताच्या गणितामध्ये करण्याची गरज नाही. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, हत्ती आला, अमूक आला, तमूक आला. आम्ही खूप हत्ती पाहिलेले आहेत. त्याची फार चिंता करण्याचे काही कारण नाही. हत्ती आम्ही खूप पाहतोय. पण तो प्रश्न नाही. प्रश्न सच्चर समितीने केलेल्या शिफारशींच्या संदर्भात आहे. प्रामुख्याने महाराष्ट्रामध्ये त्यांची 10.6 टक्के एवढी लोकसंख्या आहे. देशामध्ये 13.6 टक्के लोकसंख्या आहे. एवढे सगळे प्रमाण तसेच आपण आतापर्यंत त्यांना काय देऊ शकलो, किती लोक नोकरीमध्ये आले हे यामध्ये सांगितलेले आहे. शिक्षणाचे प्रमाण अतिशय कमी आहे. साक्षरतेचे प्रमाण निश्चितपणे जास्त आहे पण प्रत्यक्षपणे इयत्ता चौथीपर्यंत किती मुले गेली, इयत्ता सातवीपर्यंत किती मुले गेली, किती मुले मॅट्रिक झाली, किती मुले ग्रॅज्युएट झाली ? या अर्थाने शिक्षणाचे प्रमाण कमी आहे. गळतीचे

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विलासराव देशमुख .....

सर्वाधिक प्रमाण मुस्लीम समाजामध्ये आहे. म्हणून त्यांना मुख्य प्रवाहामध्ये आणण्यासाठी जादा वजन किंवा जादा सवलती देणे यादृष्टीने परवा केंद्र सरकारने निर्णय घेतला. या सगळ्या अशा विद्यार्थ्यांना स्कॉलरशीप देण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतलेला आहे. महाराष्ट्र त्या निर्णयाचे स्वागत करील आणि महाराष्ट्रामध्ये सुध्दा अशा प्रकारच्या केंद्र सरकारने घेतलेल्या धोरणावर आधारित स्कॉलरशीप देण्याच्या संदर्भामध्ये राज्य सरकार तातडीने निर्णय करील हेही मला या ठिकाणी सांगितले पाहिजे.

यानंतर श्री. शिगम ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ D/ KTG/ पूर्वी श्री. बरवड 20:10

(श्री. विलासराव देशमुख...)

प्रामुख्याने मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळाची आम्ही निर्मिती केली. ही गोष्ट खरी आहे की, त्यासाठी अधिक पैशाची तरतूद असली पाहिजे. 50 कोटीचे भागभांडवल द्यावयाचे आहे. गैरसमज असा होता की, 50 कोटी रुपये इतक्या लोकांना कसे पुरतील. 50 कोटी हे भागभांडवल आहे. केन्द्र सरकार देखील याबाबतीत मदत करीत आहे. 39 कोटीचे भागभांडवल दिलेले असून 24 कोटीचे कर्ज वितरित झालेले आहे. या महामंडळाच्या निर्मितीमुळे पुढच्या कामाला निश्चितपणे वेग येईल. या महामंडळामार्फत जास्तीत जास्त आर्थिक मदत करणे, स्वयंरोजगार निर्माण करणे असे प्रयत्न आम्ही निश्चितपणे करणार आहोत. सन्माननीय सदस्य श्री. पाशा पटेल यांनी आपल्या भाषणात मुस्लिम ओ.बी.सी.चा उल्लेख केला. मुस्लिम समाजामध्ये वेगवेगळया अशा 44 जाती आहेत. मग त्यामध्ये ओ.बी.सी.असतील, व्ही.जे.एन.टी असतील, एन.टी. असतील. शासनाने मुस्लिम समाजामध्ये असलेल्या अशा 44 वेगवेगळया जातींचा ओ.बी.सी., एन.टी, व्ही.जे.एन.टी.मध्ये समावेश केलेला आहे. म्हणून त्या जातीतील लोकांना त्या सवलती निश्चितपणे उपलब्ध होतील. दुसरा मुद्दा असा उपस्थित करण्यात आला की, सेवेत भरती करताना निवडसमितीमध्ये एक मुस्लिम सदस्य असला पाहिजे. चतुर्थ आणि तृतीय श्रेणी निवड समितीमध्ये मुस्मिल सदस्य असावा ही गोष्ट शासनाने यापूर्वीच मान्य केलेली आहे. परंतु वर्ग-1 आणि वर्ग-2च्या संदर्भात तशी व्यवस्था नाही. ती व्यवस्था देखील करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतलेला आहे. निवड समितीमध्ये मुस्लिम सदस्य असेल तर अन्यायाची जी भावना आहे ती निश्चितपणे दूर करता येईल. सच्चर समितीने डाव्हर्सिटी इण्डेक्स सांगितला. त्यांना मुख्य प्रवाहामध्ये आणले पाहिजे. कोणत्याही गृहनिर्माण संस्थेमध्ये कोणी मुस्लिम व्यक्ती सभासद होण्यासाठी पुढे येत असेल तर त्यांना तशी संधी दिली पाहिजे जेणे करुन समाजामध्ये समानतेचे वातावरण निर्माण होईल. ही बाब कायद्यामध्ये कशी बसवावी याबाबतीत विचार करण्यात येणार आहे. जेथे हौसिंग सोसायट्यांना जागा देण्याचा विषय असेल, म्हाडाच्या इमारतीमध्ये घरे देण्याचा विषय असेल त्या त्या ठिकाणी मुस्लिम समाजाला घर घेण्यासाठी आवश्यक ती टक्केवारी ठेवण्याच्या बाबतीत राज्य सरकार निश्चितपणे विचार करील. सच्चर समितीने शैक्षणिक आणि कौशल्य विकास यासाठी वेगळी व्यवस्था असली पाहिजे असे सुचविलेले आहे. छोट्या मोठ्या

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. विलासराव देशमुख...)

धंद्यामध्ये या समाजातील लोकांची संख्या जास्त असल्याचे आढळून येते. अशा प्रकारचे व्यावसायिक प्रशिक्षण त्यांना देण्याचा सरकारचा विचार आहे. सच्चर समितीचा रिपोर्ट हा संपूर्ण देशाचा रिपोर्ट आहे. या राज्यामध्ये कोणकोणत्या भागामध्ये मागासलेपणा अधिक प्रमाणात आहे हे पाहण्यासाठी एका नामवंत मुस्लिम व्यक्तीच्या अध्यक्षतेखाली एक अभ्यास गट नियुक्त करु आणि तो नॉन-पोलिटिकल असेल. म्हणजे जे स्कॉलर आहेत ते प्रत्येक जिल्ह्याचा आणि शहराचा अभ्यास करुन नेमकी आर्थिक आणि शैक्षणिक परिस्थिती काय आहे, त्यांना विविध सवलती कशा देता येतील याचा अभ्यास करतील. आंध्रप्रदेशने रिझर्व्हेशन दिलेले आहे.

....नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विलासराव देशमुख..........

केरळमध्ये आणि तामिळनाडूमध्ये यापूर्वीपासूनच रिझर्व्हेशन त्यांनी दिलेले आहे. फक्त सुप्रीम कोर्ट हे सांगते की, रिझर्व्हेशन देत असताना ते मागासलेपणावर आधारित असले पाहिजे, हा त्याचा प्रमुख हेतू आहे. केवळ धर्म किंवा जात म्हणून रिझर्व्हेशन नव्हे. म्हणून या संदर्भात जो आमचा राज्य मागासवर्ग आयोग आहे त्या आयोगाकडे आम्ही या संदर्भातील माहिती मागवून घेऊ आणि नेमका किती मागासलेपणा त्यांचा आहे हे आयोगाकडून पहिल्यांदा अभ्यास करुन समजून घेऊ आणि त्यानंतर मग नोकऱ्यांमध्ये आरक्षण देण्याच्या संदर्भात नेमकी काय भूमिका घेता येईल या संदर्भात विचार करु. सुप्रीम कोर्टाने या ज्या काही कारणासाठी आंध्रप्रदेशचा निर्णय रद्दबातल ठरविला, त्यांनी सांगितले की, पहिल्यांदा आयोगाकडून अहवाल घेतला पाहिजे, नेमका या समाजाचा मागासलेपणा किती आहे आणि मागासलेपणाच्या आधारावर तुम्ही एकदा सवलत दिली तर ती ग्राह्य होऊ शकते. म्हणून आम्ही हा विचार करीत आहोत. त्या संदर्भातील अहवाल आम्ही राज्य मागासवर्ग आयोगाकडून लवकरात लवकर घेऊ आणि त्या दिशेने आम्ही प्रयत्न करणार आहोत. या राज्यामध्ये आम्ही अनेक चांगले निर्णय आतापर्यंत निश्चितपणे घेतलेले आहेत. त्यामध्ये शिक्षणाच्या संदर्भात केंद्र सरकारच्या ज्या विविध योजना आहेत, त्या योजनांच्या आधारावर मोठ्या प्रमाणावर उर्दू शाळा देण्याचे काम, मदरशांना काही प्रमाणात आर्थिक मदत देण्याचा निर्णय राज्य सरकारने केलेला आहे. शिक्षण त्यांनी कोणत्या भाषेत घ्यावे हा अधिकार आम्ही त्यांना अवश्य दिलेला आहे. त्याचबरोबर बऱ्याचदा इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये मराठी विषय सक्तीचा ठेवला आहे. परंतु उर्दू माध्यमांच्या शाळांमध्ये मराठी विषय शिकविला जात नाही. त्यामुळे बऱ्याचदा पुढच्या परीक्षांमध्ये पेपर लिहिताना, स्पर्धा परीक्षांमध्ये भाग घेताना त्यांची अडचण निर्माण होते. म्हणून मराठीचा सुध्दा अभ्यास उर्दू शाळातील विद्यार्थ्यांचा असला पाहिजे यासाठी नेमकी काय व्यवस्था करता येईल ती करण्याचा राज्य सरकारचा विचार आहे. टेक्नीकल एज्युकेशन जोपर्यंत आम्ही त्यांना देणार नाही तोपर्यंत उर्दू केवळ प्राथमिकपर्यंत शिकवू, माध्यमिक शाळांपर्यंत शिकवू परंतु दहावी, अकरावी झाल्यानंतर महाविद्यालयीन शिक्षण घ्यायचे आहे, डॉक्टर, इंजिनिअर व्हायचे असेल तर इंग्रजीचा अभ्यास अतिशय आवश्यक आहे. म्हणून अभ्यासक्रम ठरवित असताना निश्चितपणे उर्दू शाळांमध्ये सुध्दा तांत्रिक विषय कसे शिकविता येतील या संदर्भात शैक्षणिक पध्दतीमध्ये काय नेमका बदल करता येईल तो करण्याच्या दृष्टीने राज्य सरकार प्रयत्न करणार

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विलासराव देशमुख..........

आहे हेही मी आपल्याला मुद्दाम याठिकाणी सांगू इच्छितो.

सभापती महोदय, वक्फ बोर्डाच्या संदर्भात या शिफारशींमध्ये तरतूद आहे. आवश्यक असेल तर 1995 च्या कायद्यामध्ये बदल करण्याची शिफारस या सच्चर समितीने केली आहे. वक्फ बोर्डाच्या जमिनीबद्दल बोलले गेले. ज्या न्यायाधीशांची नियुक्ती शासनाने केली आहे, ती हायकोर्टाच्या शिफारशीवर नियुक्ती झालेली आहे. सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी जी कागदपत्रे दिली अवश्य, त्या संदर्भात आम्ही हायकोर्टाकडे विचारणा करु आणि कुठल्याही व्यक्तीच्या संदर्भात, उलट हायकोर्टाचे न्यायाधीश किंवा डिस्ट्रिक्ट जज्ज नियुक्त करण्याची विनंती आम्ही केली होती. आता जज्ज मिळणे सुध्दा अडचणीचे झाले आहे. किती हायकोर्ट जज्ज मुस्लिम समाजाचे आहेत? ती एक अडचण आहे, ती अडचण पहिल्यांदा दूर केली पाहिजे. मला विनंती करावयाची आहे, या सच्चर समितीच्या अहवालाला पाठिंबा द्या, अडचण दूर करावयाची असेल तर जास्तीत जास्त लोक शिकतील, हायकोर्टाचे जज्ज होतील यासाठी पाठिंबा द्या.

श्री.नितीन गडकरी : वक्फ बोर्डाच्या जमिनींवर इंजिनिअरिंग कॉलेज काढा, टेक्नीकल कॉलेज काढा, लॉ कॉलेज काढा, आम्हाला सपोर्ट करावयाचा आहे.

श्री.विलासराव देशमुख : सभापती महोदय, प्रश्न असा आहे की, यांची भूमिका कशी आहे? फक्त कॉलेज द्या असे हे म्हणतात. कॉलेज देऊन प्रश्न सुटणार नाही. जोपर्यंत त्या समाजाला तुम्ही इतर समाजाच्या बरोबरीने आणणार नाही, ते जे दारिद्र्य आहे त्याचा विचार करणार नाही, तोपर्यंत हा समाज मुख्य प्रवाहात येऊ शकत नाही. म्हणूनच सच्चर समितीने कठोर अशा प्रकारच्या शिफारशी केल्या आहेत. सन्माननीय सदस्य श्री.पाशा पटेल यांचे वाक्य फार महत्वाचे आहे. ते म्हणाले, खऱ्या अर्थाने मुस्लिम समाजाचा हा एक्स-रे रिपोर्ट आहे. हे त्यांनी प्रामाणिकपणे सांगितले. त्यांना थोडेसे अवघडल्यासारखे होत आहे. त्यांचे नेते वेगळे आहेत ही त्यांची अडचण आहे हे मी समजू शकतो.

(नंतर श्री.जुन्नरे.....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. विलासराव देशमुख ...

मी यांचे पॉलिटिक्स चांगले ओळखू शकतो. हे केवळ आपलीच नाही तर अल्पसंख्याकांची फसवणूक करण्याचेही काम करतात. आम्हाला मुस्लीम समाजासाठी जे करणे शक्य आहे त्याची माहिती मी या ठिकाणी दिलेली आहे. मुस्लीम समाजाला मदत करण्याची आमची भावना आहे. आपल्याला काय सोईचे आहे, राजकीय फायदा कसा होईल हे जे काही चाललेले आहे ते आता आपण थांबवले पाहिजे. आमच्या पक्षाची समाजाला न्याय देण्याची भूमिका प्रथमपासूनच राहिलेली आहे. पक्षाची काहीही भूमिका असली तरी आपल्या समाजाला न्याय मिळावा यासाठी सन्माननीय सदस्य श्री. पाशा पटेल यांनी चांगल्या प्रकारे या ठिकाणी विचार व्यक्त केलेले आहे. सन्माननीय सदस्य श्री. पाशा पटेल हे माझ्या मतदारसंघातील असून ते माझे मतदार आहेत. या ठिकाणी एक मुस्लीम आमदार आपल्या बाजूला बसवला याचा अर्थ सारा मुस्लीम समाज आपल्या बाजूने आहे असे समजण्याचे काही कारण नाही. तुमचाही तसा विचार नसावा आणि सन्माननीय सदस्यांचाही तसा विचार नसावा असे मला वाटते. आपल्या पक्षाची भूमिका समाजाला न्याय देण्यासाठी असली पाहिजे, समाजाला न्याय देण्यासाठी मेहनत घेणे आवश्यक आहे. आता सन्माननीय सदस्यांना त्यांच्या पक्षाची भूमिका समजली असेल, हळू हळू का होईना आपल्याला आपल्या पक्षाची भूमिका समजायला लागेल. उशिराका होईना आपल्याला आपल्या पक्षाची भूमिका समजून येईल. सन्माननीय सदस्यांना जोपर्यंत त्या पक्षात राहावयाचे असेल तो पर्यंत त्यांनी तेथे रहावे व ज्यावेळेस तुम्हाला तेथे राहणे गैरसोयीचे होईल त्यावेळेस तुम्ही या बाजूला या. मला माहिती आहे की, सन्माननीय सदस्य आपली टर्म संपेपर्यंत या बाजूला येणार नाहीत कारण त्यांना आता असे करणे अडचणीचे ठरु शकेल. शेतक-यांच्या प्रश्नाच्या बाबतीत सन्माननीय सदस्य श्री. पाशा पटेल यांनी फार चांगल्या प्रकारे विचार व्यक्त केलेले आहेत. प्रश्न असा आहे की, या पक्षामधील नेत्यांना आपण ओळखलेले नाही. गडकरी हे काय आहेत हे आपल्याला अजून कळणार नाहीत. गडकरी काय आहेत हे कळण्यास आपल्यला फार वेळ लागेल. (अडथळा )

सभापती महोदय, सच्चर समितीच्या शिफारसी केंद्रसरकारने स्वीकारल्या असून त्या सर्व शिफारसींची अंमलबजावणी महाराष्ट्रातील लोकशाही आघाडीचे शासन करेल हे मी येथे स्पष्टपणे



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विलासराव देशमुख.....

सांगू इच्छितो व त्या दिशेने शासनाने पाऊल टाकलेले आहे हे सुध्दा मी या ठिकाणी सांगू इच्छितो. मुस्लीम समाजाला वर आणण्याच्यासंदर्भात सन्माननीय सदस्य श्री. पाशा पटेल आम्हाला वैयक्तिक मदत करतील अशी अपेक्षा करतो. आणि सदनातील सर्व सन्माननीय सदस्यांना मनापासून धन्यवाद देतो.

**सभापती** : सभागृहाने या प्रस्तावर विचार केलेला आहे.

आजच्या कार्यक्रमपत्रिकेत दाखवलेली शासकीय विधेयके आणि अर्धातास चर्चा आज होणार नाही. हे कामकाज पुढे ढकलण्यात आले आहे.

सभागृहाची बैठक आता स्थगित होत असून मंगळवार, दिनांक 27 नोव्हेंबर, 2007 रोजी सभागृहाची विशेष बैठक सकाळी 10.45 ते 12.45 पर्यंत घेण्यात येईल. या बैठकीत शेतक-यांच्या आत्महत्येच्या प्रस्तावावर चर्चा होईल व सभागृहाची नियमित बैठक दुपारी 1.00 वाजता पुन्हा भरेल.

सभा□ृहापुढील आजचे □म□ज संपलेले आहे. सभा□ृहाची बैठ□ आता स्थगि□ होऊ□ उद्या मंगळवार, दि□ां□ 27 नोव्हेंबर, 2007 रोजी स□ाळी 10.45 वाजता पु□ः भरेल.

( सभा□ृहाची बैठ□ रात्रौ 8 वाजू□ 23 मि□िटां□ी, मंगळवार, दि□ां□ 27 नोव्हेंबर, 2007 रोजीच्या स□ाळी 10.45 वाजेपर्य□ त स्थगि□ झाली )

---------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही